# श्री साईबाबा संस्थान विश्वस्तव्यवस्था (शिर्डी)

**सभा क्र. १३/ २०१३** **दिनांक १७.०९.२०१३**
**स्थळ - जिल्हाधिकारी कार्यालय,अहमदनगर** **वेळ- सांय. ०५.०० वाजता**

श्रीसाईबाबा संस्थान व्यवस्थापन समितीची सभा शुक्रवार दिनांक ०६.०९.२०१३ रोजी सायंकाळी ०५.०० वाजता जिल्हाधिकारी कार्यालय, अहमदनगर येथे आयोजित करण्यात आली असलेबाबत इकडील जा.नं.एसएसएस-वशी-०४-२५६४-२०१३, दिनांक ०५ सप्टेंबर,२०१३ रोजीचे पत्राने सर्व सदस्यांना कळविण्यात आले होते. परंतू सदरहू सभाही काही अपरिहार्य कारणास्तव तहकुब करण्यात आली असलेबाबत इकडील जा.नं.एसएसएस-वशी-०४-२६१७-२०१३, दिनांक ०६ सप्टेंबर,२०१३ रोजीचे पत्राने सर्व सदस्यांना कळविण्यात आले.

तहकुब करण्यात आलेली सदरहू सभा मंगळवार दिनांक १७ सप्टेंबर, २०१३ रोजी सायंकाळी ०५.०० वाजता जिल्हाधिकारी कार्यालय, अहमदनगर येथे आयोजित करणेत आली असलेबाबत इकडील जा.नं.एसएसएस-वशी-०४-२७४१-२०१३, दिनांक १६ सप्टेंबर, २०१३ रोजीचे पत्राने सर्व मा.सदस्यांना कळविणेत आले होते. त्यानुसार सदरहू सभा मंगळवार दिनांक १७ सप्टेंबर, २०१३ रोजी सायंकाळी ०५.०० वाजता जिल्हाधिकारी कार्यालय, अहमदनगर येथे मा.अध्यक्ष श्री.जयंत दत्तात्रय कुलकर्णी, मुख्य जिल्हा न्यायाधीश, अहमदनगर यांचे अध्यक्षतेखाली सुरु करण्यात आली.

या सभेस खालील मा. सदस्य उपस्थित होते.

०१. मा.श्री.जयंत दत्तात्रय कुलकर्णी, मुख्य जिल्हा न्यायाधीश, अहमदनगर, अध्यक्ष
०२. मा.डॉ.संजीवकुमार, जिल्हाधिकारी, अहमदनगर, सदस्य
०३. मा.डॉ.यशवंतराव वसंतराव माने, कार्यकारी अधिकारी

सभेच्या सुरुवातीस श्रीसाईबाबांची प्रार्थना करणेत येऊन शासन अधिनियमातील कलम ११ (२) नुसार आवश्यक गणपूर्ती असल्याने सभेचे कामकाज मा.अध्यक्ष मा.श्री.जयंत दत्तात्रय कुलकर्णी, मुख्य जिल्हा न्यायाधीश, अहमदनगर यांचे अध्यक्षतेखाली सुरु करण्यात आले.

यानंतर विषय पत्रिकेवरील विषयांवर चर्चा सुरू करणेत आली.

**विषय नं.०१** **दिनांक २६.०७.२०१३ रोजी शिर्डी येथे झालेल्या व्यवस्थापन समिती सभेचे इतिवृत्त वाचुन कायम करणे.**

**निर्णय क्र.६१३** **दिनांक २६.०७.२०१३ रोजी शिर्डी येथे झालेल्या व्यवस्थापन समितीचे सर्वसाधरण सभेच्या इतिवृत्ताच्या प्रती सर्व सदस्यांना सभेत पुरविण्यात आल्या होत्या, त्यांची नोंद घेण्यात येऊन सदरहू इतिवृत्त वाचून कायम करण्यात आले.**

---

**विषय नं.०२ (अ) नोंद घेण्याचे विषय.**

**०१. (अ) जमाखर्च तक्ता माहे, मार्च, एप्रिल व मे-२०१३**

माहे मार्च, एप्रिल व मे- २०१३ मधील अनुक्रमे जमा रु.४८,०९,८६,४८२/-, रु.४४,७४,१३,१७०/- व रु.३८,२४,७९,८३७/- आणि खर्च रु.३५,४५,४३,२४३/- रु.२६,०१,९३,३०२/- रु.११,७२,१७,६७३/-, चा तक्ता, मा.कार्यकारी अधिकारी यांचे अधिकारात मंजूर रक्कम रुपये २५ हजार पर्यंतच्या सर्वसाधारण खर्चाचा तपशील अनुक्रमे माहे मार्च, एप्रिल व मे- २०१३ मधील रुपये ९,९१,०४४/-, रु.१,२७,४८९/- व रु.५,६६,५५०/- चा तक्ता, संस्थानची गुंतवणूक दि.३१.०३.२०१३ रु.८,६०,७५,६३,५३९/- दि.३०.०४.२०१३ मधील रु.८,६८,०९,६८,८५६/- दिनांक ३१.०५.२०१३ अखेर रुपये ९,१०,९९,७९,४३०/- चा तक्ता.

**निर्णय क्र.६१४ (A) नोंद घेण्यात येऊन मान्यता देण्यात आली.** (कार्यवाही-मुख्यलेखाधिकारी)

---

**(ब माहे जुलै - २०१३ मध्ये दक्षिणा पेटीत जमा झालेल्या देणगीची नोंद घेणे.**

दक्षिणा पेटीत जमा झालेल्या सोने, चांदी, कापड व इतर वस्तूसह आलेल्या माहे जुलै- २०१३ मधील जमा रु.१५,३१,४९,३९०-/- मात्र तक्त्याच्या प्रती सर्व मा.सदस्यांना पुरविण्यात आल्या होत्या.

**निर्णय क्र.६१४ (B) नोंद घेण्यात येऊन मान्यता देण्यात आली.** (कार्यवाही-मुख्यलेखाधिकारी)

---

**(क) माहे जुलै -२०१३, मध्ये श्री साईबाबांना अर्पण झालेली वस्त्रे व इतर वस्तूंच्या अहवालाची नोंद घेऊन मान्यता देणे.**

श्रीसाईबाबांना अर्पण झालेली वस्त्रे व इतर वस्तु यांच्या विक्रीचा माहे जुलै- २०१३ मधील रु.३,४६,२७५/- मात्र अहवालाच्या प्रती सर्व मा.सदस्यांना पुरविण्यात आल्या होत्या.

**निर्णय क्र.६१४ (C) नोंद घेण्यात येऊन मान्यता देण्यात आली.** (कार्यवाही-मुख्यलेखाधिकारी)

---

**०२. श्री साईनाथ रुग्णालयात माहे जुलै- २०१३ मध्ये गरीब रुग्णांना वैद्यकिय बीलात दिलेल्या सवलतीची नोंद घेणे.**

साईनाथ रुग्णालयात माहे जुलै- २०१३ मधील अंतररुग्ण व बाह्यरुग्ण तसेच थॅलसेमिया व हिमोफेलिया रुग्णांसाठी रुपये २,४१,५५७/- मात्र रकमेची वैद्यकीय बीलांमध्ये देण्यात आलेल्या सवलतीची माहिती दर्शविणाऱ्या तक्त्याच्या प्रती सर्व मा. सदस्यांना पुरविण्यात आल्या होत्या.

**निर्णय क्र.६१४ (D) नोंद घेण्यात येऊन मान्यता देण्यात आली.** (कार्यवाही-वैद्यकीय संचालक)

---

**०३. श्री साईनाथ रुग्णालयात माहे जुलै- २०१३ या महिन्यात आलेल्या वैद्यकीय अनुदान मागणी अर्जाबाबत.**

श्रीसाईनाथ रुग्णालयामध्ये माहे जुलै- २०१३ मधील रु.५५,८३,५२०/- मात्र देण्यात आलेल्या वैद्यकीय अनुदान तक्त्याच्या प्रती सर्व मा. सदस्यांना पुरविण्यात आल्या होत्या.

**निर्णय क्र.६१४ (E) नोंद घेण्यात येऊन मान्यता देण्यात आली.** (कार्यवाही-वैद्यकीय संचालक)

---

**०४. श्री साईबाबा रुग्णालयात माहे एप्रिल व जुन - २०१३ मध्ये वैद्यकिय बीलात दिलेल्या सवलतीची नोंद घेणे.**

श्री साईबाबा रुग्णालयात अनुक्रमे माहे एप्रिल व जुन- २०१३ मध्ये वैद्यकीय बीलांमध्ये रु.७३,२४,०९२/- व रु.५३,९१,९१७/- याप्रमाणे देण्यात आलेल्या सवलतीची माहिती दर्शविणाऱ्या तक्त्याच्या प्रती सर्व मा. सदस्यांना पुरविण्यात आल्या होत्या.

**निर्णय क्र.६१४ (F) नोंद घेण्यात येऊन मान्यता देण्यात आली.** (कार्यवाही-वैद्यकीय संचालक)

---

**०५. बांधकाम प्रगती तक्त्याची नोंद घेऊन मान्यता देणे. (अंतीम बीले)**

बांधकाम प्रगती अहवाल दर्शविणारा तक्ता, ज्यांच्या प्रती सर्व मा. सदस्यांना पुरविण्यात आल्या होत्या.

**निर्णय क्र.६१४ (G) नोंद घेण्यात येऊन, तक्ता "ब" मधील खालीलप्रमाणे बांधकामाची अंतिम बिले अदा करण्यास मान्यता देण्यात आली.**

**०१) साईआश्रम व साईधर्मशाळा प्रकल्पासाठी अ‍ॅक्रेलीक LED बोर्ड बनविणे व बसविणेचे कामाचे अंतिम बील आदा करणेस मान्यता देण्यात आली.**

**०२) श्री साईप्रसादालय इमारतीतील साईटेक प्रकल्पासाठी डाटा सेंटर हॉल छताच्या डोमचे नुतनीकरण करणेचे कामाचे मुदतवाढीस, जादा खर्चास व अंतिम बील आदा करणेस मान्यता देण्यात आली.**

**०३) साईनिवास अतिथीगृह इमारतीचे डोमचे पॉलीकार्बोनेट शिट बसविणेचे कामाचे अंतिम बील आदा करणेस मान्यता देण्यात आली.**

**०४) श्री साईनाथ रुग्णालयासाठी मॉर्च्युरी रुमचे बांधकामाचे कामास मुदतवाढीस, दंडआकारणी पोटी राखुन ठेवलेल्या रकमेसह अंतिम बील आदा करणेस मान्यता देण्यात आली.**

(कार्यवाही-बांधकाम विभाग प्रमुख)

---

**०६. पाणी तपासणी अहवाल माहे मे व जुलै- २०१३.**

माहे मे व जुलै- २०१३ मध्ये संस्थान पाणीपुरवठा योजने अंतर्गत पुरविण्यात येणाऱ्या संस्थानचे परिसरातील पिण्याच्या पाण्याचे नमूने (सॅम्पल्स) मे.एनव्हायरो लॅब, नाशिक यांचेकडे तपासणीसाठी पाठविण्यात आले होते. त्यांचेकडून आलेले तपासणी अहवाल, ज्यांच्या प्रती सर्व मा.सदस्यांना पुरविण्यात आल्या होत्या.

**निर्णय क्र.६१४ (H) नोंद घेण्यात येऊन मान्यता देण्यात आली.** (कार्यवाही- पाणी पुरवठा विभाग प्रमुख)

---

**०७. माहे जुलै- २०१३ मध्ये लावलेल्या ठेकेदारी कर्मचारी संख्येची नोंद घेणे.**

माहे जुलै- २०१३ मध्ये संस्थानमधील कामांसाठी कंत्राटदारांमार्फत वेळोवेळी रोजंदारीवर लावलेल्या अनुक्रमे ५५,६२७ मनुष्य दिनांच्या कर्मचाऱ्यांच्या/ कामगारांच्या संख्येची माहिती दर्शविणारे तक्ते, ज्यांच्या प्रती सर्व मा.सदस्यांना पुरविण्यात आल्या होत्या.

**निर्णय क्र.६१४ (I) नोंद घेण्यात येऊन मान्यता देण्यात आली.** (कार्यवाही-कामगार अधिकारी)

---

**विषय नं.०३ शिर्डी येथील स.नं.१७१/१२ पै. मधील जागेवर संस्थान निधीतून बस स्थानक व भक्तनिवास इमारतीचे बांधकाम ठेकेदार मे.पाटील कन्स्ट्रक्शन अ‍ॅण्ड इन्फ्रास्ट्रक्चर प्रा.लि.पुणे यांचे मुदतवाढ मागणीबाबत.**

**प्रस्ताव- श्री साईबाबा संस्थान विश्वस्तव्यवस्था अधिनियम २००४ मधील तरतूद:-**

श्री साईबाबा संस्थान विश्वस्तव्यवस्था (शिर्डी) अधिनियम २००४ च्या कलम १७ (१) मधील तरतुदींनुसार भक्तांना सोयी- सुविधा पुरविणे हे व्यवस्थापन समितीचे कर्तव्य असल्याने, महाराष्ट्र शासन विधी व न्याय विभाग, शासन निर्णय क्रमांक :- सासंवि २००६/६०७/ (८७) / का. सोळा मंत्रालय, मुंबई -४०० ०३२, दि.१३/०१/२००९ अन्वये शिर्डी येथील बसस्थानक अत्याधुनिक पद्धतीने बांधण्याकरीता रु.७,६५,५०,८९८/- मात्र इतक्या खर्चास शासन मान्यता देण्यात आली आहे.

**व्यवस्थापन समिती निर्णय :-**

१. मा. व्यवस्थापन समितीचे नि.क्र.३६२ दि.१८/०४/२०१० चे सभेत ठेकेदार पाटील कन्स्ट्रक्शन, पुणे यांचे निम्नतम दर स्विकारणेत येऊन त्यांना कार्यादेश देण्यात यावा असे ठरले.

२. मा. व्यवस्थापन समितीचे दि.१४/०१/२०१२ नि.क्र. ८१ अन्वये, ठेकेदार पाटील कन्स्ट्रक्शन ॲण्ड इन्फ्रास्ट्रक्चर प्रा.लि.,पुणे यांना दि.३१/०७/२०१२ अखेर मूदतवाढ देण्यात यावी. मात्र दरवाढीची मागणी केल्यास ती अमान्य करण्यात यावी, असे ठरले.

३. मा. व्यवस्थापन समितीचे दि.१५/०९/२०१२ नि.क्र.७४६ अन्वये, ठेकेदार यांना काम पूर्ण करणेकरीता दि.२८/०२/२०१३ अखेर मूदतवाढ देणेस मान्यता देणेत आली.

**प्रस्तावना :**

शिर्डी येथील स.नं. १७१/१२ पै. मधिल बसस्थानकाचे जागेवर संस्थान निधीतून अद्यावत बसस्थानकाचे बांधकाम करणेकरीता ठेकेदार पाटील कन्स्ट्रक्शन ॲण्ड इन्फ्रास्ट्रक्चर प्रा.लि.,पुणे यांना इकडील जा.नं.६८२१/२०१० दि.२९/०४/२०१० अन्वये कार्यादेश देणेत आलेला आहे. सदर कामाचा तपशिल खालिलप्रमाणे आहे.

| | | | |
|---|---|---|---|
| ०१ | कामाचे नांव | :- | शिर्डी बसस्थानक व त्यावरील भक्तनिवास संस्थान निधीतून विकसीत करणे. |
| ०२ | आर्किटेक्ट | :- | मे. काबरे चौधरी आर्किटेक्टस्, नाशिक |
| ०३ | ठेकेदार | :- | मे.पाटील कन्स्ट्रक्शन ॲण्ड इन्फ्रास्ट्रक्चर प्रा.लि., पुणे |
| ०४ | मंजूर निविदा रक्कम | :- | रु. ७,६०,९०,०८९/- |
| ०५ | कार्यादेश क्र. व दिनांक | :- | जा.क्र.६८२१/१०, दि.२९/०४/२०१० |
| ०६ | करारनाम्यानुसार काम सुरु केल्याचा दिनांक | :- | १४/०५/२०१० |
| ०७ | प्रत्यक्ष काम सुरु केल्याचा दिनांक | :- | २६/०६/२०१० |
| ०८ | काम पूर्ण करण्याचा कालावधी | :- | १५ महिने |
| ०९ | करारनाम्यानुसार काम पूर्ण करण्याचा दिनांक | :- | १३/०८/२०११ |
| १० | मुदतवाढ | :- | अ) मा.व्य.स.निर्णय क्र.८१, दि.१४/०१/२०१२ अन्वये दि.३१/०७/२०१२ अखेर प्रथम मुदतवाढ<br>ब) मा. व्यवस्थापन समिती निर्णय क्र. ७४६ दि.१५/०९/२०१२ अन्वये दि.२८/०२/२०१३ अखेर व्दितीय मूदतवाढ देणेत आली आहे. |
| ११ | कामाची सद्यस्थिती | :- | **अ)** तळमजला अधिक तीन मजल्यावरील स्लॅबचे तसेच तळमजल्यावरील विट बांधकाम ८०% पूर्ण पहिल्या मजल्यावरील ७०% दुसऱ्या मजल्यावरील ५०% व तिसऱ्या मजल्यावरील ५०% विट बांधकाम पूर्ण.<br>**ब)** तळमजल्यावरील ५०% पहिल्या मजल्यावरील ३०% आतील प्लास्टर पूर्ण. पुढील काम प्रगतीपथावर आहे.<br>**क)** प्लंबींगचे काम सुरु केले आहे.<br>**ड)** ओव्हरहेड वॉटर टँकचे कॉलमचे काम चालू आहे. |

सुरुवातीला ठेकेदार यांना एकूण १५९५ चौ.मी. बांधकाम क्षेत्रफळापैकी ११६० चौ.मी. क्षेत्रफळाचे क्षेत्र ताब्यात देणेत आले होते. उर्वरीत ४३५ चौ.मी. क्षेत्रफळाचा ताबा बसस्थानकातील वाणिज्य आस्थापनांचा (दुकान गाळ्यांचा) कोर्टात दावा चालू असल्याने मिळालेला नव्हता. ठेकेदार यांनी ताब्यात मिळालेल्या ११६० चौ.मी. बांधकाम क्षेत्रात प्रत्यक्ष दि.१४/०५/२०१० रोजी कामास सुरुवात केली आहे. ठेकेदार यांना उर्वरीत ४३५ चौ.मी. क्षेत्राचा ताबा दि.०२/०७/२०१२ रोजी देणेत आला आहे.

ठेकेदार यांची निवेदेनुसार काम करण्याची मूदत दि.१३/०८/२०११ (१५ महिने) अखेर संपुष्टात आली असून ठेकेदार यांना काम पुर्ण करणेकरीता मा.व्यवस्थापन समितीचे दि.१४/०१/२०१२ चे सभेत नि.क्र.८१ अन्वये दि.१३/०७/२०१२ अखेर मूदतवाढ तसेच दि.१५/०९/२०१२ चे सभेत नि.क्र. ७४६ अन्वये दि.२८/०२/२०१३ अखेर व्दितीय मूदवाढ देणेत आली आहे.

**प्रस्ताव:-** ठेकेदार यांनी दि.२०/०४/२०१३ चे पत्रान्वये खालील प्रमुख अडचणीमुळे काम पूर्ण करता आले नसल्याचे कळविले आहे.

१. साईटचा पूर्ण एरिया (१००%) ताब्यात न मिळालेमुळे कामाची गती एकसारखी ठेवता आली नाही.

२. शिर्डी परिसरात वाळू उपलब्ध होत नाही. त्यामुळे वाळुच्या उपलब्धतेनुसार काम करावे लागते.

३. सध्या पाण्याचा तुटवडा असल्याने पाणी विकत घेवूनही वेळेवर उपलब्ध होत नाही.

तसेच सदर काम लवकरात लवकर पूर्ण करण्याचा आम्ही प्रयत्न करत असून काम पूर्णकरणेकरीता दि.३०/११/२०१३ पर्यंत मूदतवाढ मिळणेस ठेकेदार यांनी विनंती केली आहे.

याबाबत आर्किटेक्ट काबरे चौधरी, नाशिक यांनी दि.०६/०६/२०१३ पत्राव्दारे ठेकेदार यांचे कामास खालील कारणांमुळे विलंब झाले असल्याचे कळविले आहे.

1. No Specific Permanent responible senior professional Engineer in-charge is deputed on the site
2. Lack of site management and control over the work.
3. Insufficient site staff (only one senior Engineer/ manager working as on today)
4. Insufficient & inexperienced labour force/ labour agenices.
5. Inexperienced & Ever changing site technical staff, therefore no consitency in the work. Also which required to supply drawings and details repetitively from architects, structural engineer and S.S.S.T. engineers. Mismanagement in maintaining hard and soft copies.
6. Lack in following proper sequence and co-ordination of various construction activities.
7. Improper quality of workmanship. Shall be difficult to rectify mistakes in finishing.

ठेकेदार यांनी कळविलेल्या अडचणींचा विचार करता काम पूर्ण होणेचे दृष्टीने ठेकेदार यांना दि.३०/११/२०१३ पर्यंत मूदतवाढ देणेस तसेच ठेकेदार यांनी सदर मूदतीत काम पूर्ण न केल्यास त्यापुढील काळात ठेकेदार यांना निविदा शर्तीनुसार दंड आकारणी करणेच्या अटीवर आर्किटेक्ट यांनी मूदतवाढ देणेची शिफारस केली आहे.

**विभागाचा अभिप्राय/ मत :-**

१. याबाबत ठेकेदार यांना यापुर्वी दिलेल्या व्दितीय मूदतवाढ (दि.२८/०२/२०१३) संपले पासून निविदा शर्तीनुसार दंड आकारणी करता येईल.

२. ठेकेदार यांचे निविदेतील दर सन २०१० चे असून ठेकेदार यांना निविदा शर्तीनुसार RBI Index नुसार सिमेंट, स्टील, इत्यादी मटेरीअल पोटी भावफरक देणेची तरतूद आहे.

३. सुरुवातीला ठेकेदार यांना एकूण बांधकाम क्षेत्र १५९५ चौ.मी. पैकी ११६० चौ.मी. क्षेत्र ताब्यात देणेत आले होते. उर्वरीत ४३५ चौ.मी. क्षेत्रफळाचा ताबा बसस्थानकातील वाणिज्य आस्थापनांचा (दुकान गाळ्यांच्या) कोर्टात दावा चालू असल्याने मिळालेला नव्हता त्यामुळे ठेकेदार यांना साईटवर काम करणेस तांत्रिक दृष्ट्या अडचण होती. त्यामुळे ठेकेदार यांना यापुर्वी दि.२८/०२/२०१३ पर्यंत मूदतवाढ देणेत आलेली होती. दि.०२/०७/२०१२ रोजी ठेकेदार यांना उर्वरीत क्षेत्राचा ताबा देणेत आला असून काम प्रगतीपथावर आहे.

तरी याबाबत आर्किटेक्ट यांनी शिफारस केल्याप्रमाणे काम पूर्ण होणेच दृष्टीने दि.३०/११/२०१३ अखेर मूदतवाढ देणेस हरकत नाही असे मत आहे. तथापी त्यासाठी प्रथम ठेकेदार यांचे व्यवस्थापनातील जबाबदार प्रतिनिधी सभेपुढे बोलावून वाढीव मूदतीत काम पूर्ण करुन देणेची हमी त्यांचेकडून घेणे आवश्यक आहे असे वाटते.

तरी उपरोक्त प्रस्तावावर मा. त्रिसदस्य समितीचे सभेत निर्णय होणेस विनंती.

**निर्णय क्र.६१५ यावर सविस्तर चर्चा होऊन, उपरोक्त प्रस्तावास मान्यता देण्यात आली.**

(कार्यवाही- बांधकाम विभागप्रमुख)

---

**विषय नं.०४ मौजे रुई येथील श्री.लखीचंद कचरदास भंडारी, सौ.पुष्पाताई लखीचंद भंडारी, श्री.राजेंद्र चंदनमल भनसाळी व श्री.सुभाष चंदनमल भनसाळी यांची रुई येथील जमीन संस्थानने खरेदी करणेबाबत, तसेच या जमिनीच्या मालकांच्या विरुध्द श्री.संग्राम माधवराव देशमुख यांनी सिव्हील जज्जसाहेब, सिनियर डिव्हीजन, कोपरगांव यांचे कोर्टात दाखल केलेला स्पे.मु.नं. ५९/ २०१२ बाबत.**

**प्रस्ताव-** मौजे रुई तहसिल- राहाता,येथील खाली नमुद केलेल्या जमिनी संस्थानने खरेदी करण्याचे प्रस्तावित आहे

**<u>तक्ता क्रमांक ०१</u>**

| अ.नं. | गट नंबर | क्षेत्र हे-आर-चौमी | कब्जेदार सदरी नांव | इतर हक्कातील नोंदी |
|---|---|---|---|---|
| ०१ | २८८ अ | ०२-९२-००<br>००-०२-०० पोख<br>**०२-९४-००** | लखीचंद कचरदास भंडारी | १. रुई वि.का.स.से.सो. इ.प.क.घे.<br>२.साई नागरी सह. पतसंस्था,शिर्डी न.ग.क.घे. |

| | | | | |
|---|---|---|---|---|
| | | | | ३.संग्राम माधवराव देशमुख पेन्डेन्सी करुन घेणार.<br>४. विहीर |
| ०२ | २८८ ब | **००-४२-००** | पुष्पाताई लखीचंद भंडारी | १. रुई वि.का.स.से.सो. इ.प.क.घे.<br>२. शिर्डी नागरी सह. पतसंस्था, शिर्डी न.ग. क.घे. (दोन वेळेस)<br>३.संग्राम माधवराव देशमुख पेन्डेन्सी करुन घेणार. |
| ०३ | २८८ क | **००-९७-००** | पुष्पाताई लखीचंद भंडारी | १.कोहकी सोसा. इ.प. क. घे.<br>२. रुई वि.का.स.से.सो. इ.प.क.घे.<br>३. शिर्डी नागरी सह. पतसंस्था, शिर्डी न.ग. क.घे. (दोन वेळेस)<br>४. संग्राम माधवराव देशमुख पेन्डेन्सी करुन घेणार. |
| ०४ | २९४ | ०२-९४-००<br>००-०१-५० पोख<br>**०२-९५-५०**<br>०२-९३-००<br>००-०१-५० पोख<br>**०२-९४-५०** | राजेंद्र चांदमल भनसाळी<br><br><br><br>सुभाष चांदमल भनसाळी | १. रुई वि.का.स.से.सो. इ.प.क.घे.<br>२. संग्राम माधवराव देशमुख पेन्डेन्सी करुन घेणार (राजेंद्र व सुभाषचा हिस्सा)<br>३. विहीर |
| | **एकूण** | **१०-२३-००** | | |

**अ) १)** राधा कलियनदास चॅरिटेबल ट्रस्ट यांचे विषयांकित जमिन  खरेदीच्या विषयाबाबत मा. व्यवस्थापन समितीचे दिनांक ०६ सप्टेंबर २००८ रोजीचे सभेत निर्णय क्रमांक ७४६ अन्वये, उपरोक्त जमिनी रुपये २३ लाख प्रति एकर या दराने सर्व कायदेशीर बाबींची पुर्तता करुन खरेदी करणेबाबत निर्णय झालेला होता. सदर निर्णयानुसार जमिनी खरेदीची कार्यवाही ही सुरु करण्यात आली होती. परंतू त्यामध्ये काही कायदेशीर त्रूटी आढळल्याने जमिनीची खरेदी प्रलंबित ठेवण्यात आली.

**२)** त्यानंतर मा.विश्वस्त, राधाकिसन कलियनदास चॅरिटेबल ट्रस्ट,मुंबई यांनी त्यांचे दिनांक ३ सप्टेंबर २०१० रोजीचे पत्राने पुनःश्च विषयांकित जमिनीच्या कायदेशीर बाबी संपुष्टात आल्या असून सदर जमिनी संस्थानने रुपये ५० लाख मात्र प्रति एकर या दराने खरेदी घ्याव्यात म्हणून प्रस्ताव दिला होता.

सदर प्रस्तावावर मा.व्यवस्थापन समितीचे दिनांक १० आक्टोबर २०१० रोजीचे सभेत सविस्तर चर्चा होऊन निर्णय क्रमांक ८३१ नुसार विषयांकित जमीनीचा राधा कलियनदास चॅरिटेबल ट्रस्ट, मुंबई यांनी खरेदी केल्यानंतर व त्यांचे नांव जमिनीचे अभिलेखास कब्जेदार सदरी लागले,  नंतर ट्रस्टमार्फत आवश्यक त्या सर्व कायदेशीर बाबींची पुर्तता झालेनंतर संस्थानमार्फत सर्व कायदेशीर बाबीची पडताळणी करुन त्याबाबत कायदेशीर अभिप्राय घेऊन सदर जमीन ४५ लाख प्रति एकर या दराने खरेदी करणेबाबत निर्णय घेणेत आला.

**३)** सदर अनुषंगाने दर्यानानी ट्रस्टचे कार्यकारी विश्वस्त श्री. प्रेम दर्यानानी यांनी १० सप्टेंबर २०११ रोजी मा. अध्यक्षसाो.यांचेशी समक्ष भेट घेतली त्यावेळेस मा.कार्यकारी अधिकारी यांचेसह इतर अधिकारी हजर होते. सदर भेटीचे चर्चेत त्यांनी असे सांगितले की,  जमिनीचे संबंधित सर्वांनी एकत्र बसून समेटाबाबत चर्चा केली असून त्याबाबत कार्यवाही सुरु केलेली आहे. तथापि जमीन मालकाने संस्थानने देऊ केलेली किंमत मान्य नसल्याचे नमुद करुन संस्थानने जर रुपये ५५ लाख (अक्षरी- पंचावन्न लाख) प्रति एकर देण्यास तयार असल्यास आम्ही संस्थानला सर्व कायदेशीर बाबी पुर्ण करुन जमीन थेट खरेदी देणेस तयार आहोत. याबाबत संस्थानने निर्णय घेतल्यास विषयांकित जमीनीबाबत करावयाची न्यायालयीन कार्यवाही पुर्ण करणेस आम्ही तयार आहोत असे म्हटले आहे. यावर संस्थानचे दिनांक २४ सप्टेंबर २०११ रोजीच्या सभेत निर्णय क्रमांक ७५९ झाला त्याचा सारांश खालीलप्रमाणे आहे.

"उपरोक्त प्रस्तावावर सविस्तर चर्चा होऊन, यापुर्वी मा.व्यवस्थापन मंडळाने दिनांक १० ऑक्टोबर २०१० रोजीचे सभेत घेतलेल्या निर्णयास अनुसरुन,दर्यानानी ट्रस्ट यांची वर नमुद केलेली जमीन सर्व कायदेशीर बाबींची पडताळणी व पुर्तता करुन रुपये ५५ लाख प्रति एकर या दराने खरेदी करणेत यावी. याकामी विहीत पध्दतीने संस्थान वकिलांमार्फत जमिनीचा सर्च रिपोर्टसह अभिप्राय घेणेत यावा. तसेच वकिलांमार्फत विषयांकित जमिनीबाबत कोणत्याही व्यक्तिची/ संस्थेची हरकत नाही याबाबत वृतपत्रात जाहिर नोटीस प्रसिध्द करुन, जमीनी खरेदीस कोणाची ही हरकत नाही याबाबत

पडताळणी करणेत यावी. दर्यानानी ट्रस्ट, संबंधित जमीनमालक व इतर हितसंबंधित व्यक्ति/ संस्था यांचेत असणारे सर्व न्यायालयीन दावे निपटल्यानंतर जमीनमालकांनी संस्थानकडे जमीन विक्रीचा स्वतंत्ररित्या प्रस्ताव सादर करावा..."

जमीन मालक श्री.लखीचंद कचरदास भंडारी व इतर ३ यांनी विषयांकित जमिनी राधा कलियनदास दर्यानानी चॅरिटेबल ट्रस्ट यांचेकडून रक्कम घेऊन जमीन खरेदी देण्यासाठी साठेखत करुन दिले होते त्याबाबत राधा कलियनदास चॅरिटेबल ट्रस्ट यांनी कोर्टात दावे केले होते ते समेटाने मिटलेले आहेत. दरम्यान श्री मयेकर व श्री.संग्राम देशमुख यांचे नांवे जमिन मालकांनी ही रक्कम घेतली व विसार पावती करुन दिली. श्री. सग्राम देशमुख यांनी दिवाणी न्यायालयात याबाबत दावा ४९/२००८ दाखल केला होता. त्यात उपरोक्त जमिनीचे मालक व राधा कलियनदास दर्यानानी चॅरिटेबल ट्रस्ट हे प्रतिवादी होते. त्यात अर्जदार व सामनेवाले यांची तडजोड झाली. सदर दाव्यातील तडजोडीच्या अंतर्गत कलम २ मध्ये खालील बाब नमुद केलेली आहे.

**४)** श्री साईबाबा संस्थान, शिर्डी यांनी जमिनीचा भाव निश्चित केला असून त्यानुसार वादी व प्रतिवादी यांचे प्रपोजल त्यांनी मान्य केलेले आहे. प्रतिवादी १ ते ४ यांनी श्री साईबाबा संस्थान,शिर्डी यांना दावा मिळकतीत त्यांचा हिस्सा कायम खरेदी देण्याचे मान्य केले

त्या व्यवहारास वादी व प्रतिवादी नं. ५ यांनी संमत्ती देण्याचे मान्य केले असून त्यानुसार त्यांनी खरेदीखतावर सहया द्यावयाच्या आहेत. वादी व प्रतवादी क्र. १ ते ५ यांना आता त्यांनी घेतलेला निर्णय बदलणे नाही. दावा मिळकतीत श्री साईबाबा संस्थान,शिर्डी यांनी जी किंमत देवू केली आहे. ती सर्वांना मान्य आहे. तो करार पण सर्वांना मान्य असून तो करार सर्वांना बंधनकारक आहे. वादी व प्रतिवादी यांचेत वाद असणारी मिळकत श्री साईबाबा संस्थान,शिर्डी या धार्मिक ट्रस्टला चांगल्या कामासाठी विक्री होत असल्याने सर्वांनी एकत्रित बसून त्या व्यवहारास संमती दिली आहे.." यावरुन वादी व प्रतिवादी क्रमांक १ ते ५ यांनी तंटयाची जमीन संस्थानला द्यावयाची आहे हया एकाच कारणास्तव तडजोड झालेली आहे. सदर तडजोड न्यायालयाने मान्य केली व त्याप्रमाणे दिनांक ०६ मार्च, २०१२ रोजी दावा निकाली काढला.

**ब)** १) श्री.लखीचंद कचरदास भंडारी, २) सौ. पुष्पाताई लखीचंद भंडारी ३) श्री. सुभाष चंदनमल भनसाळी ४) श्री. संग्राम माधवराव देशमुख ५) राधा कलियनदास दर्यानानी ट्रस्ट, मुंबई करिता ॲडव्होकेट श्री. व्ही.जी.गवांदे यांनी दिनांक १६/११/२०११ रोजीच्या पत्राने " संस्थानला जागेची गरज असल्याचे समजले वरुन जागा विकत देण्याचा प्रस्ताव तुम्हास देत आहोत. आम्ही तुम्हांस जी जागा विकत देणार आहोत त्या जागेबाबत प्रकरण न्याय प्रविष्ठ आहे. दाव्यातील सर्व पार्टीनी आपसात तडजोड करुन वाद मिटविण्याचे ठरविले आहे. ती जागा जर संस्थान विकत घेण्यास तयार असेल तर जागेची किंमत निश्चित करावी .. "

अर्जदार यांना दिनांक २२/११/२०११ रोजीच्या पत्राने दिनांक २४ सप्टेंबर २०११ रोजीच्या सभेतील निर्णय क्रमांक ७५९ पाठवून संस्थान प्रति एकर ५५ लाख रुपये या दराने जमिनी विकत घ्यावयास तयार आहे असे कळविले.

अर्जदाराने त्यानंतर न्यायालयाच्या निर्णयाच्या प्रती, समझोता करावयाच्या प्रती संस्थानकडे दिल्या. संस्थानचे वकिलाकडून सर्च रिपोर्ट प्राप्त करुन घेणेत आला तसेच संस्थान वकील श्री. जे.के.गोंदकर यांचाही अभिप्राय प्राप्त करुन घेणेत आला.

संस्थानचे वकीलाचा अभिप्राय व जमीन मालकांनी हजर केलेली कागदपत्र याची छाननी करण्यात आली. दिनांक ५/१०/२०१२ रोजीच्या पत्राने सर्व जमीन मालक व श्री. संग्राम माधवराव देशमुख व श्री प्रेम कालीयनदास दर्यानानी, कार्यकारी विश्वस्त यांनी खरेदीखताच्या दृष्टीने आवश्यक असणाऱ्या कागदपत्रांची पुर्तता करणेबाबत विनंती पत्र दिले.

**क)** दरम्यान दिनांक २४ सप्टेंबर २०१२ चे दैनिंक सार्वमत मध्ये ॲड रविराज लालजी गोतीस, येवला यांनी प्रश्नाधीन जमिनी जमिनीचे मालक त्यांचे अशिलास खरेदी देणार आहेत. सदर जमिनीबाबत कोणाचा दावा, किंवा हक्क असलेबाबत त्यांना १५ दिवसांत कळविणेबाबत नोटीस दिलेली आहे. सदर नोटीस श्री. संग्राम माधवराव देशमुख यांच्या पाहण्यात आली. त्यांनी मा. दिवाणी न्यायाधिश, वरिष्ठस्तर, कोपरगांव येथे स्पे.मु.नं. ५९/२०१२ दाखल केला आहे. त्यात सामनेवाले उपरोक्त जमिनीचे मालक, श्री. अभिजित जितेंद्र शहा, राधा कालीयनदास दर्यानानी चॅरिटेबल ट्रस्ट, श्री साईबाबा संस्थान व श्री. रविराज लालजी गोतीस हे आहेत. श्री. संग्राम देशमुख यांची सदर दाव्यात ज्या मागण्या आहेत. त्यांची मागणी (इ) खालीलप्रमाणे आहे.

विक्रीचे करुन प्रतिवादी न. १ ते ५ यांनी केलेल्या ताडजोडी नुसार तसेच करार नाम्यानुसार प्रतिवादी नं.७ (श्री साईबाबा संस्थान विश्वस्तव्यवस्था, शिर्डी ) यांना ठरलेल्या शर्तीनुसार सदर मिळकत विकत घेण्याचा अग्रहक्क असे विकल्पे करुन जाहीर व्हावे व त्यानुसार वादी यांना ठरलेली रक्कम ठरलेल्या शर्तीनुसार नुकसान भरपाईसह वसूल होवून मिळावी.

सदर केसमध्ये संस्थानचे वकील श्री.जे.के. गोंदकर काम पाहत आहेत. अद्यापावेतो संस्थानतर्फे कॅव्हेट अथवा शपथपत्र दाखल झालेले नाही.

**ड)** अर्जदार यांनी दाखल केलेल्या स्पेशल स्पेशल मुकादम्यामध्ये त्यांनी (इ) मध्ये मागणी केल्याप्रमाणे कोर्टाने निकाल दिला किंवा त्यांची आपसात तडजोड झाली तर मा. व्यवस्थापन समिती दि.२४ सप्टेंबर २०११ रोजीच्या सभेत जो निर्णय क्र. ७५९ झाला त्याप्रमाणे संस्थानने जमिन घेणे उचित राहील. तसेच त्यात नमूद केलेल्या शर्ती व अटीनुसार जमिनी खरेदी करण्याची कार्यवाही करण्यता येईल.

**तथापी.**

**इ)** मा. उच्च न्यायायल, मुंबई खंडपीठ, औरंगाबाद येथे श्री. राजेंद्र भाऊसाहेब गोंदकर यांनी पी.टी.एल. १८/२०११ दाखल केलेला आहे. त्यामध्ये सिव्हील ॲप्लीकेशन १२०५६/२०१२ वर खालील प्रमाणे दिनांक १६ ऑक्टोबर २०१२ रोजी निर्णय झालेला आहे.

6) We direct that, without prior permission of this court, the committee.
c) Shall no enter into agreement, contract for purchase of any immovable property on behalf of the Respondent No.2 Trust.;

तत्कालीन व्यवस्थापन समितीच्या दिनांक २४ सप्टेंबर २०११ रोजी उपरोक्त जमिनी प्रती एकर ५५ लाख या दराने खरेदी बाबत निर्णय क्रमांक ७५९ झालेला आहे. याचा अर्थ जमिनी खरेदीचा निर्णय पुर्वीच झालेला आहे.

वर नमुद केलेल्या मा.उच्च न्यायालय,मुंबई खंडपीठ औरंगाबाद यांच्या निर्देशानुसार संस्थानने प्रस्तुत जमिनी विकत घ्यावयाच्या किंवा कसे यांचा निर्णय होणे आवश्यक आहे. जर प्रस्तुत जमिनी विकत घेण्याचा निर्णय झाला तर संस्थानचे वकील श्री.जे.के.गोंदकर यांनी स्पे.मु.नं. ५९/२०१२ मध्ये दाखल करावयाचा मसुदा मान्य होऊन कोर्टामध्ये सादर करणे उचित राहील.

**खालील बाबीवर निर्णय होण्याची विनंती आहे.**

मौजे रुई येथील जमिनमालक श्री.लखीचंद कचरदास भंडारी, सौ.पुष्पाताई लखीचंद भंडारी, श्री.राजेंद्र चंदनमल भनसाळी, श्री.सुभाष चंदनमल भनसाळी यांच्या जमीनी स्पे.मु.नं. ५९/२०१२ मध्ये आपसांत तडजोड झाली किंवा मा.कोर्टाने प्रस्तुत जमिनी संस्थानला खरेदी द्याव्यात असा निर्देश दिला तर सर्व कायदेशीर बाबीची पुर्तता झाल्यावर तत्कालीन व्यवस्थापन समितीच्या दिनांक २४ सप्टेंबर २०११ रोजीच्या सभेतील निर्णय क्रमांक ७५९ प्रमाणे प्रती एकर ५५ लाख (पंचावन्न लाख) या दराने खरेदी करणेत याव्यात. सदर व्यवहार हा मा.उच्च न्यायालय,मुंबई खंडपीठ औरंगाबाद येथे चालू असलेल्या पी.टी.एल. १८/२०११ मधील सिव्हील ॲप्लीकेशन १२०५६/२०१२ मधील दिनांक १६ ऑक्टोबर २०१२ रोजी झालेल्या निकालापुर्वीचा असल्याने मा.उच्च न्यायालय,मुंबई खंडपीठ औरंगाबाद येथे सिव्हील ॲप्लीकेशन करुन अनुमती मिळण्यासाठी आवश्यकता नसल्याने त्याप्रमाणे अर्ज न करणे.

**किंवा**

२ अ) मौजे रुई येथील जमीन मालक श्री. लखीचंद कचरदास भंडारी,सौ. पुष्पाताई लखीचंद भंडारी, श्री.राजेंद्र चंदनमल भंडारी, श्री.सुभाष चंदनमल भंडारी यांच्या जमीनी मालक व हित संबंधीत व्यक्ती वादी श्री.संग्राम माधवराव देशमुख व प्रतिवादी श्री.प्रेम कालीयनदास,कार्यकारी विश्वस्त, दर्यानानी चॅरिटेबल ट्रस्ट,मुंबई यांचेकडून स्पे.मु. नं. ५९/२०१२ मध्ये आपसांत तडजोड झाली किंवा ना.कोर्टाने प्रस्तुत जमीनी संस्थानला खरेदी द्याव्यात असा निर्देश दिला तर सर्व कायदेशीर बाबींची पुर्तता झाल्यावर तत्कालीन मा.व्यवस्थापन समितीच्या दिनांक २४ सप्टेंबर २०११ रोजीच्या सभेतील निर्णय क्रमांक ७५९ प्रमाणे प्रती एकर ५५ लाख (पंचावन्न लाख) या दराने खरेदी करण्यांत याव्यात.

**२ ब)** वर नमुद केलेल्या सर्व बाबींची पुर्तता झाल्यावर मा.उच्च न्यायालय,मुंबई खंडपीठ औरंगाबाद येथे चालू असलेल्या पी.आय.एल. १८/२०११ मधील सिव्हील ॲप्लीकेशन १२०५६/२०१२ मधील दिनांक १६ ऑक्टोबर २०१२ मध्ये दिलेल्या निर्देशाप्रमाणे मा. उच्च न्यायालय, मुंबई, खंडपीठ औरंगाबाद येथे प्रस्तुत जमिनी खरेदीबाबत अनुमती मिळणेकामी सिव्हील ॲप्लीकेशन करणे.

सदरहू जमीन खरेदीबाबत त्रिसदसीय समितीचे सभेत निर्णय झाल्यास वरील २ ब नुसार कार्यवाही करणे योग्य होईल तसेच श्री. संग्राम देशमुख यांनी दाखल केलेल्या दाव्या संदर्भात संस्थानने कैफीयत देणेस हरकत नाही, असे मत आहे.

तरी उपरोक्त प्रस्तावावर निर्णय होणेस विनंती.

**निर्णय क्र.६१६** **यावर सविस्तर चर्चा होऊन, सदरहू जमीनीचा शासनाचे रेडीरेकनरप्रमाणे रेट घेण्यात यावा व त्यानुसार सुधारित प्रस्ताव तयार करुन तो व्यवस्थापन समितीसमोर निर्णयार्थ सादर करणेत यावा, असे ठरले.** (कार्यवाही- बांधकाम विभाग प्रमुख)

---

**विषय नं.०५** **श्री साईबाबा इंग्लिश मिडीयम स्कुलकडील खराब बेचेंस दुरुस्ती करणेबाबत.**

**प्रस्ताव-** श्री साईबाबा संस्थान विश्वस्तव्यवस्था (शिर्डी) अधिनियम २००४ मधील तरतुद : अधिनियम कलम २१ (१) अन्वये समितीकडून विश्वस्तव्यवस्था निधीचा विनियोग पुढील सर्व किंवा त्यापैकी कोणत्याही

प्रयोजनांसाठी करणेबाबत तरतुद आहे. त्यातील पोटकलम (क) अन्वये मंदिराची व विश्वस्तव्यवस्थेच्या मालमत्तांची देखभाल, व्यवस्थापन व प्रशासन या प्रयोजनांसाठी करण्यात येईल अशी तरतुद आहे.

**प्रस्ताविक:** संस्थानचे श्री साईबाबा इंग्लिश मिडीयम स्कुलमध्ये विद्यार्थ्यांना बसणेकामी सन १९९६ मध्ये देण्यात आलेल्या ७० बेंचेसपैकी ६० नग बेंचेसच्या फळया निघालेल्या असल्याने त्यांची दुरुस्ती करणेकामी विविध साईजच्या सागवानी फळ्या आवश्यक आहेत.

**मागणी:** संस्थानचे श्री साईबाबा इंग्लिश मिडीयम स्कुलमध्ये विद्यार्थ्यांना बसणेकामी असलेले बेंचेसपैकी साठ बेंचेसच्या फळया निघालेल्या असून, सदरच्या बेंचेसला फळया बसवून मिळणेबाबत प्राचार्य यांनी दि.१६/०७/२०१३ रोजीचे डी.पी.अन्वये कळविले आहे.

उपरोक्त प्रमाणे बेंचेस दुरुस्तीकामी इकडील विभागामार्फत समक्ष पहाणी करणेत आली असून सदर ६० नग बेंचेस दुरुस्त करणेकामी विविध साईजच्या सागवानी फळ्या व मटेरिअलची आवश्यकता असून, त्यासाठी खालील प्रमाणे खर्च अपेक्षित आहे.

| अ. नं. | मटेरिअलचा तपशिल | परिमाण / एकक | अंदाजे दर | रक्कम रुपये |
|---|---|---|---|---|
| ०१ | सागवानी फळ्या | ५४.५३ घन फुट | २०००/- प्रती घन फुट | १,०९,०६०.०० |
| ०२ | २" नट बोल्ट | १२०० नग | ३/- प्रती नग | ३,६००.०० |
| ०३ | टचवुड (पॉलिश) | ३० लिटर | २१०/- प्रती लिटर | ६,३००.०० |
| | | | एकुण रुपये.. | १,१८,९६०.०० |

**विभागाचा अभिप्राय:** उपरोक्त प्रमाणे सदरचे साठ बेंचेसला फळया बसविल्यास सदरचे बेंचेस उपयोगात आणता येतील. यासाठी मटेरिअल खरेदीकामी अंदाजे रुपये १,१८,९६०/- मात्र खर्च अपेक्षित आहे. करीता सदरहू कामी येणारे खर्चास व सदरचे मटेरिअल विहीत पध्दतीने कोटेशन मागवून खरेदी करुन सदरचे काम विभागामार्फत करुन घेता येईल असे मत आहे.

तरी याकामी येणारे रुपये १,१८,९६०/- मात्रचे खर्चास व सदरचे मटेरिअल विहीत पध्दतीने कोटेशन मागवून खरेदी करणेस मान्यता मिळणेस विनंती.

**निर्णय क्र.६१७ यावर सविस्तर चर्चा होऊन, श्री साईबाबा इंग्लिश मिडीयम स्कुलमधील सततच्या वापराने खराब झालेल्या बेचेंस दुरुस्ती करणेसाठी येणाऱ्या रु.१,१८,९६०/- मात्रचे खर्चास व याकामी लागणारे मटेरिअल विहीत पध्दतीने कोटेशन मागवून खरेदी करणेस मान्यता देण्यात आली.**

(कार्यवाही- बांधकाम विभाग प्रमुख)

---

**विषय नं.०६ श्री साईनाथ मंगल कार्यालय नुतनीकरण कामासाठी आर्किटेक्ट फी ठरविणेबाबत.**

**प्रस्ताव- श्री साईबाबा संस्थान संस्थान विश्वस्तव्यवस्था अधिनियम,२००४ मधिल तरतूदः-**अधिनियमाच्या कलम २१ मधील पोट - कलम (१) अनवये खालिलप्रमाणे तरतूद आहे.

विश्वस्तव्यवस्थेचा निधी आयकर अधिनियम,१९६१ च्या तरतुदींना अधिन राहून, समितीकडून पुढीलपैकी सर्व किंवा कोणत्याही प्रयोजनांसाठी वापरण्यात अथवा खर्च करण्यात येईल.:-

(क) मंदिराची व विश्वस्तव्यवस्थेच्या मालमत्तांची देखभाल व्यवस्थापन व प्रशासन ;

(झ) विश्वस्तव्यवस्थेच्या मालमत्तांचा विकास करणे आणि विश्वस्तव्यवस्थेच्या प्रयोजनांसाठी स्थावर किंवा जंगम मालमत्तांचे संपादन करणे;

(त्र) भक्तांच्या निवासासाठी व त्यांच्या उपयोगासाठी विश्रामगृहे बांधणे व त्यांची देखभाल करणे;

**व्यवस्थापन समितीचा निर्णय :-** मा.त्रीसदस्य समितीचे दि.३०/०३/२०१३ रोजीचे सभेतील नि.क्र.३३५ अन्वये श्री साईनाथ मंगल कार्यालयाचे नूतनीकरण करणेसाठी प्रशासकीय मान्यता देणेत आली व याकामी आर्किटेक्टचरल सेवा पुरविणेसाठी काबरे चौधरी, आर्किटेक्ट यांची नियुक्ती करणेस मान्यता देण्यात आली आहे.

**प्रस्तावना :-** श्री साईबाबा समाधी मंदिर परिसरापासून जवळच उत्तर- पूर्व बाजूस जुना पिंपळवाडी रस्त्यालगत संस्थानची श्री साईनाथ मंगल कार्यालय इमारत आहे. सदर इमारत विस्तारीकरणाचे काम सन २०००-२००१ मध्ये करणेत आले आहे. तसेच त्यानंतर सन २००८-२००९ मधे सदर इमारतीचे आतील बाजुने रंगकाम करणेत आले आहे.

मा. अध्यक्ष श्री साईबाबा संस्थान विश्वस्तव्यवस्था, शिर्डी यांनी दि.०७/०३/२०१३ रोजी सदरहू मंगल कार्यालयाची पाहणी कली यावेळी सदर इमारतीचे आतील व बाहेरील रंगकाम करणेबाबत सूचना दिल्या आहेत. सध्या सदर इमारतीत फ्लोअरींगकरीता कोटा फरशी, जिन्यात कडप्पाचे टप्पे, लाकडी खिडक्या असून सदर इमारत बरीच जुनी असल्याने सदर इमारतीचे नूतनीकरण करणे आवश्यक आहे. मंगल कार्यालय इमारत नूतनीकरण केल्यास सुशोभित होईल तसेच इमारतीचा भक्तांसाठी अधिक उपयोग होईल.

उपरोक्त कामासाठी आर्किटेक्टचरल डीझाईन, ड्रॉईंग, एस्टीमेट व निविदा इ. साठी सेवा घ्यावी लागणार आहे. वरीलप्रमाणे मा.त्रिसदस्य समितीचे दि.३०/०३/२०१३ रोजीचे सभेतील नि.क्र.३३५ अन्वये

श्री साईनाथ मंगल कार्यालयाचे नूतनीकरण करणेसाठी व याकामी आर्किटेक्टचरल सेवा पुरविणेसाठी काबरे चौधरी आर्किटेक्टस्, नाशिक यांची नियुक्ती करणेस मान्यता देण्यात आली आहे.

**प्रस्ताव :-** काबरे चौधरी आर्किटेक्टस्, नाशिक यांचेकडून संस्थानचे काही प्रकल्पांसाठी यापुर्वी आर्किटेक्चरल सेवा घेण्यात आलेली आहे. सध्या संस्थानमार्फत बांधकाम करण्यात येत असलेल्या शिर्डी बसस्थानक व त्यावरील भक्तनिवासस्थान इमारतीचे प्रकल्पासाठी काबरे चौधरी आर्किटेक्टस्, नाशिक यांचेकडून आर्किटेक्चरल सेवा घेण्यात येत आहे.

याकामी त्यांना प्रकल्पाच्या किमतीच्या २% फी अधिक प्रचलित दराने सर्व्हीस टॅक्स साईट व्हीजीटसाठी येणाऱ्या प्रत्यक्ष प्रवास खर्चाची प्रतीपुर्ती याप्रमाणे फी अदा करणेत येत आहे. वरील कामासाठी आर्किटेक्चरल सेवा घेणेसाठी काबरे चौधरी आर्किटेक्टस्, नाशिक यांना प्रकल्पासाठी अपेक्षित सेवांबाबत Scope & Schedule of Architectural Services देऊन त्यांचेकडून वाणिज्यिक प्रस्ताव मागविणेत आला होता. त्यानुसार काबरे चौधरी आर्किटेक्टस् यांनी दि.११/०७/२०१३ रोजीचे पत्राव्दारे प्रकल्पाचे किमंतीच्या २% फी अधिक प्रचलीत दराने सर्व्हीस टॅक्स व साईट व्हिजीटसाठी येणारा प्रत्यक्ष प्रवास खर्चाची प्रतीपुर्ती याप्रमाणे फीमध्ये वरीलप्रमाणे आर्किटेक्चरल सेवा पुरविणेची तयारी दर्शविली आहे.

**विभागाचा अभिप्राय/ मत :** तरी संस्थानचे श्री साईनाथ मंगल कार्यालयाचे नूतनीकरण करणेसाठी आर्किटेक्चरल सेवा पुरविणेकामी काबरे चौधरी आर्किटेक्टस्, नाशिक यांना प्रकल्पाच्या किंमतीचे २% फी, अधिक प्रचलीत दराने सर्व्हीस टॅक्स व साईट व्हीजीटसाठी येणाऱ्या प्रत्यक्ष प्रवास खर्चाची प्रतीपुर्ती याप्रमाणे फी ठरविणेबाबत निर्णय होणेस विनंती.

**निर्णय क्र.६१८** **यावर सविस्तर चर्चा होऊन, संस्थानच्या श्री साईनाथ मंगल कार्यालयाचे नूतनीकरण करणेसाठी त्यामध्ये काय बदल व सुविधा करता येईल याचा मसुदा तयार करावा, असे ठरले.**

(कार्यवाही- बांधकाम विभाग प्रमुख)

---

**विषय नं.०७** **संस्थानचे मौजे निमगांव कोऱ्हाळे येथील गट नं.१६९ मधील कर्मचारी निवासस्थान इमारतीचे सांडपाण्याचे व्यवस्थापनाबाबत.**

**निर्णय क्र.६१९** **सदरहू विषयावरील चर्चा पुढे ढकलणेत आली.** (कार्यवाही- बांधकाम विभाग प्रमुख)

---

**विषय नं.०८** **संस्थानचे व्यायाम शाळेच्या भिंतींना तसेच स्ट्रक्चरल स्टिलला रंगकाम करणेबाबत.**

**प्रस्ताव-** **श्री साईबाबा संस्थान विश्वस्तव्यवस्था (शिर्डी) अधिनियम,२००४ मधील तरतूद :-** अधिनियमाच्या कलम २१ मधील पोट- कलम (१) च्या खंड (क) अन्वये मंदिराची व विश्वस्तव्यवस्थेच्या मालमत्तांची देखभाल, व्यवस्थापन व प्रशासन करण्याचे प्रयोजनासाठी विश्वस्तव्यवस्थेचा निधी समितीकडून खर्च करण्याची तरतूद आहे.

**प्रस्तावना :-** संस्थानचे संरक्षण विभागा अंतर्गत सन २०१२ पासून साईनाथ माध्यमिक विद्यालयाचे लगत असलेले संस्थानचे जागेत व्यायामशाळा सुरु करणेत आली आहे. बऱ्याच वर्षापासून व्यायाम शाळेला रंगकाम केलेले नाही. त्यामुळे व्यायाम शाळेच्या भिंतींचे आतिल बाहेरील रंगकाम निघालेले असल्याने, खराब दिसत आहे. तसेच आतिल ग्रीलच्या जाळ्या व शेडचे पत्र्याला गेटला रंगकाम करुन मिळणेबाबत संरक्षण अधिकारी यांनी कळविले आहे.

**प्रस्ताव :-** याबाबत व्यायाम शाळेचे आतिल व बाहेरील रंगकाम खराब झालेले असल्याने, त्याठिकाणी रंगकाम करणे आवश्यक आहे. याकरीता आवश्यक रंगमटेरीअल खरेदी करुन मजुरी दराने सदरचे रंगकाम करुन घेता येईल.

**अ) याकामी खालीलप्रमाणे रंगमटेरीअलची आवश्यकता आहे.**

| **अ.नं.** | **तपशिल** | **परिमाण/एकक** | **दर** | **रक्कम** |
|---|---|---|---|---|
| ०१ | ॲक्रॅलिक पुट्टी | १२ किलो | ३४/- प्र. कि. | ४०८/- |
| ०२ | व्हाईटींग | १२ किलो | १०/- प्र. कि. | १२०/- |
| ०३ | अेशिया ॲक्रलिक ओ.बी.डी. | २२ किलो | ५७/- प्र. कि. | १२५४/- |
| ०४ | रेड ऑक्साईड | ४५ लिटर | १३०/- प्र.लि. | ५८५०/- |
| ०५ | टरपेन | ६० लिटर | ७०/- प्र. लि. | ४२००/- |
| ०६ | अेशिया ॲपकोलाईट फ्लॅट ऑईलपेंट | ११२ लिटर | २३२/- प्र.लि. | २५९८४/- |
| ०७ | अेशिया सिथेंटीक ईनेमल ऑईलपेंट | २ लिटर | २५०/- प्र. लि. | ५००/- |
| ०८ | वॉटरप्रुफ सिमेंटपेंट (सोसेम) | २५ किलो | १४००/- प्रती २५ किलो | १४००/- |
| | | | **एकूण रुपये (अ)** | **३९,७१६/-** |

ब) मजुरी दराने रंगकाम करणे

| अ.नं. | तपशिल | परिमाण/एकक | दर | रक्कम |
|---|---|---|---|---|
| ०१ | भिंतीचा जुना रंग घासनू प्रायमर पल्टी करुन दोन कोट ओ.बी.डी. रंगकाम करणे | १२३७.४० चौ.फुट | २/- | २४७४.८० |
| ०२ | पत्र्याला एक कोट रेड ऑक्साईड देणे | ४३०४.०० चौ.फुट | १/- | ४३०४/- |
| ०३ | दरवाजाचा जुना रंग घासून प्रायमर पल्टी करुन दरवाजाला दोन कोट ऑईलपेंट देणे | ६५.०९ चौ.फुट | २/- | १३०.१८ |
| ०४ | भिंतीचा बाहेरील बाजुचा रंग साफकरुन दोन कोट सिमेंट पेंट देणे | १४५० चौ.फुट | १.५० | २१७५/- |
| ०५ | पत्र्याला व स्ट्रक्चरल स्टिलला दोन कोट ऑईलपेंट रंगकाम करणे | ६४०२.२० चौ.फुट | १.५० | ९६०३.३० |
| | **एकूण रुपये (ब)** | | | **१८,६८७/-** |

**विभागाचा अभिप्राय:-** विषयांकीत रंगकाम खराब झाल्याने सदरहू रंगकाम करणे आवश्यक आहे. करीता उपरोक्तप्रमाणे आवश्यक रंगमटेरीअल खरेदीकरीता अंदाजे रु.३९,७१६/- तसेच मजुरी दराने रंगकाम करुन घेणेकरीता अंदाजे रु.१८,६८७/- खर्च येईल. म्हणजेच याकामी एकूण अंदाजे रु.५८,४०३/- खर्च अपेक्षीत आहे.

तरी याकामी येणारे अंदाजे रु.५८,४०३/- चे खर्चास व सदरचे कामाकरीता आवश्यक रंगमटेरीअल खरेदीकरुन मजुरी दराने सदरचे रंगकाम करुन घेणेस मान्यता मिळणेस विांती.

निर्णय क्र.६२० **यावर सविस्तर चर्चा होऊन, संस्थानचे व्यायाम शाळेच्या भिंतींना आणि स्ट्रक्चरल स्टिलला रंगकाम करणेस व याकामी येणाऱ्या अंदाजे रु.५८,४०३/- मात्रचे खर्चास मान्यता देण्यात आली.**

**तसेच सदर रंगकामाकरिता आवश्यक असलेले रंगमटेरीअल खरेदी करुन मजुरी दराने काम करुन घेण्यात यावे, असे ठरले.** (कार्यवाही- बांधकाम विभाग प्रमुख)

---

**विषय नं.०९ गेट नं.२ दर्शनरांग येथे बॅगेज स्कॅनर मशिनजवळ पेशंट चेकींगकरीता रुम बनविणेबाबत.**

**प्रस्ताव- श्री साईबाबा संस्थान विश्वस्तव्यवस्था (शिर्डी) अधिनियम, २००४ मधील तरतूद :-**

अधिनियमाच्या कलम २१ मधील पोट-कलम (१) च्या खंड (क) अन्वये मंदिराची व विश्वस्तव्यवस्थेच्या मालमत्तांची देखभाल, व्यवस्थापन व प्रशासन करण्याचे प्रयोजनासाठी समितीकडून विश्वस्तव्यवस्था निधींचा विनियोग करण्याची तरतूद आहे.

**प्रस्तावना :-** पिंपळवाडी रस्त्यावर दर्शन रांगेकरीता उभारणेत आलेल्या पॉलीकार्बोनेट शेडमध्ये गेट नं. २ जवळ बॅगेज स्कॅनर मशिन जवळ साईभक्तांचे सोयीसाठी प्रथमोचार केंद्र सुरु आहे. सदरहु प्रथमोचार केंद्रावर पेशंटला इंजेक्शन देणेसाठी आडोशाची सोय नसलेने महिला / पुरुष पेशंटला कमरेला इंजेक्शन देताना अडचण येत असल्याने मा. वैद्यकीय संचालक, साईनाथ रुग्णालय यांचे अभिप्रायानुसार १०' x १०' या साईजची कॅबीन तयार करुन मिळणेबाबत संरक्षण विभाग यांनी टिपणी अन्वये कळविले आहे.

**प्रस्ताव :-** वरीलप्रमाणे उपयोगाकरीता केबीन तयार करणेसाठी खालिलप्रमाणे दोन पर्यायांचा विचार करता येईल.

१) साईज १०' x १०' ऊंची ८' याप्रमाणे बेसकरिता एम.एस. स्ट्रक्चर असलेली व केबीन साईडने ४० एम.एस. जाडीचे कम्पोझिट पॉलीमरचे FRP केबीन खरेदीकामी अंदाजे रु. १.८० लक्ष मात्र इतका खर्च येईल.

२) साईज १०' x १०' उंची ७' याप्रमाणे ॲल्युमिनिअम सेक्शन व प्रिलॅमिनेटेड पार्टीकल बोर्ड / बाजरी काच पॅनेल्समध्ये पार्टीशन करणेसाठी अंदाजे रु. ४०,०००/- मात्र इतका खर्च येईल.

तरी वरीलपैकी योग्य तो पर्याय निवडून त्यानुसार काम करुन घेणेसाठी कोटेशन्स मागविता येतील.

**विभागाचा अभिप्राय / मत :-**वरीलपैकी ॲल्युमिनिअम सेक्शनमधिल पार्टीशनची केबीन तेथिल परिसराशी सुसंगत दिसेल व त्यासाठी खर्चही कमी लागेल. तरी वरीलप्रमाणे ॲल्युमिनिअम सेक्शनमध्ये केबीन करणेसाठी येणारे अंदाजे रु. ४०,०००/- मात्रचे खर्चास अपेक्षित व त्यासाठी कोटेशन्स मागवून काम करुन घेणेस मा. त्रिसदस्य समितीची मान्यता मिळणेस विनंती.

निर्णय क्र.६२१ **यावर सविस्तर चर्चा होऊन, गेट नं.२ दर्शनरांग येथे बॅगेज स्कॅनर मशिनजवळ पेशंट चेकींगकरीता ॲल्युमिनिअम सेक्शनमध्ये रुम तयार करणेस व याकामी येणाऱ्या अंदाजे रु.४०,०००/- मात्रचे खर्चास मान्यता देण्यात आली.**

**तसेच, सदरचे काम कोटेशन्स मागवून करुन घेणेत यावे, असे ठरले.**

(कार्यवाही- बांधकाम विभाग प्रमुख)

---

**विषय नं.१०** **श्रावण महिन्यातील श्री साईसच्चरित पारायण सोहळा-२०१३ कार्यक्रमासाठी मंडप व इतर अनुषंगिक व्यवस्था करणेसाठी कोटेशन्स मागवून त्यावर करण्यात आलेल्या कार्यवाहीबाबत.**

**प्रस्ताव-** **श्री साईबाबा संस्थान विश्वस्तव्यवस्था (शिर्डी) अधिनियम २००४ मधील तरतूद :-** अधिनियमाच्या कलम १७ मधील पोट- कलम (२) च्या खंड (ठ) अन्वये श्री साईबाबांचे जीवन, त्यांचे कार्य, त्यांच्या लिला व त्यांची शिकवण याबाबतच्या उपयुक्त माहितीचा प्रचार व प्रसार करील आणि श्री साहित्य ग्रंथालय चालवील व त्याचा विस्तार करिल या प्रयोजनासाठी विश्वस्तव्यवस्थेचा निधी समितीकडून खर्च करण्याची तरतूद आहे.

**व्यवस्थापन समिती निर्णय :-**मा. व्यवस्थापन समितीचे दि.२१/०६/२०१३ रोजीचे सभेत श्रावण महिन्यातील श्री साईसच्चरीत पारायण सोहळा २०१३ चे कार्यक्रमासाठी रुपये १५,००,०००/-मात्रचे खर्चास मान्यता देण्यात आली आहे. त्यापैकी रु.७,००,०००/- मात्र इतका खर्च मंडप, स्टेज, कमानी व इतर अनुषंगिक व्यवस्थेकरीता मंजूर करण्यात आलेला आहे.

**प्रस्तावना :-** श्री साईबाबा संस्थान विश्वस्तव्यवस्था, शिर्डी तर्फे नाट्य रसिक संच, शिर्डी यांचे सहकार्याने सालाबाद प्रमाणे यावर्षीही श्रावणमास निमीत्त दि.०७/०८/२०१३ ते दि.१५/०८/२०१३ या कालावधीत श्री साईसच्चरीत पारायण सोहळा साई कॉम्प्लेक्स शेजारील संस्थानचे १६ गुंठे जागेत आयोजित करण्यास मा. त्रिसदस्यीय समितीचे दिनांक २१/०६/२०१३ रोजीचे सभेत मान्यता मिळालेली आहे. या कार्यक्रमाकरीता मंडप, कमानी, स्टेज व अनुषंगीक व्यवस्था करणेसाठी येणारे रु.७,००,०००/- मात्र इतक्या खर्चास उपरोक्त सभेत मान्यता देणेत आलेली आहे.

सदरहू कार्यक्रमासाठी इकडील विभागामार्फत एम.एस. कॉलम व कैच्या वापरुन ताडपत्रीचे छत असलेला डोम टाईप कापडी मंडप, पार्टीशन, स्टेज, स्वागत कमानी, मॅटींग, मेकअप रुम, बॅरेकेटींग, कनात इ. व्यवस्था करुन घेणेकामी अशा प्रकारचे व्यवस्थेचे काम करणारे मंडप ठेकेदार यांचेकडून दि.२७ जुलै,२०१३ अखेर पर्यंत सिलबंद कोटेशन्स मागविणेस इकडील दि.१०/०७/२०१३ रोजीचे टिपणी अन्वये मान्यता मिळालेली आहे.

उपरोक्त प्रमाणे मंडप व्यवस्था करणेकामी इकडील जा. नं. १८२६/२०१३ दि. १७ जुलै, २०१३ रोजीचे मागणी पत्रान्वये अशा प्रकारचे मंडपाचे काम करणारे एकुण २६ ठेकेदारांना कोरे निविदा फॉर्म घेऊन दि. २७ जुलै, २०१३ पर्यन्त सिलबंद कोटेशन सादर करणेबाबत कळविणेत आले होते. त्यानुसार खालील मंडप ठेकेदारांनी कोरे कोटेशन फॉर्म विकत घेतले होते.

| | |
|---|---|
| ०१. | कैलास मंडप ॲण्ड लाईट डेकोरेटर्स, अहमदनगर |
| ०२. | बाबला टेन्ट हाऊस, मु.पो. श्रीरामपूर जि. अ.नगर |
| ०३ | कला साधना डेकोरेटर्स, नाशिक |
| ०४ | रोशनी मंडप ॲण्ड लाईट डेकोरेशन, संक्रापूर ता. राहुरी जि. अहमदनगर |
| ०५. | शगून इव्हेन्टस् ॲण्ड मार्केटींग सर्व्हीसेस, नागपूर |
| ०६. | जाधव मंडप डेकोरेटर्स, औरंगाबाद |
| ०७. | लोकप्रिय डेकोरेटर्स, संक्रापूर ता. राहुरी जि. अहमदनगर |

उपरोक्त पैकी खालील ०६ ठेकेदारांनी विहीत मुदतीत (दि. २७ जुलै, २०१३) अखेर दिलेल्या विहीत मूदतीत सिलबंद कोटेशन सादर केले आहेत.

| अ. नं. | कोटेशन सादरकर्त्यांचे नांव / पत्ता | आवक नंबर | दिनांक |
|---|---|---|---|
| ०१. | लोकप्रिय डेकोरेटर्स, संक्रापूर ता. राहुरी जि. अहमदनगर | ६९१९ | २४/०७/२०१३ |
| ०२. | कैलास मंडप ॲण्ड लाईट डेकोरेटर्स, अहमदनगर | ६९५३ | २४/०७/२०१३ |
| ०३ | रोशनी मंडप ॲण्ड लाईट डेकोरेशन, संक्रापूर ता. राहुरी जि. अहमदनगर | ६९६४ | २५/०७/२०१३ |
| ०४ | शगून इव्हेन्टस् ॲण्ड मार्केटींग सर्व्हीसेस, नागपूर | ७०१२ | २५/०७/२०१३ |
| ०५. | बाबला टेन्ट हाऊस, मु.पो. श्रीरामपूर जि. अ.नगर | ७१२४ | २७/०७/२०१३ |
| ०६. | कला साधना डेकोरेटर्स, नाशिक | ७१४२ | २७/०७/२०१३२४ |

**प्रस्ताव :-** श्री साईसच्चरित पारायण सोहळा २०१३ निमित्त पारायणार्थीची गर्दी होणे अपेक्षीत आहे. करीता उपरोक्त नमूद केलेल्या तपशिलानुसार मंडप व इतर अनुषंगीक व्यवस्था करणे आवश्यक आहे.

सदरची व्यवस्था ही वेळेत पूर्ण करणे गरजेचे असल्यामुळे विहीत मूदतीत प्राप्त झालेल्या ०६ सिलबंद निविदा दि.२९/०७/२०१३ रोजी मा. कार्यकारी अधिकारी यांचे समक्ष उघडणेत येऊन निविदाधारकांशी चर्चा/ वाटाघाटीककेल्या असता त्यांनी खालीलप्रमाणे दर देऊ केले.

| अ. नं. | कामाचा तपशिल | परिमाण / एकक | कोटेशन सादरकर्त्यांचे नांव / दर | | | | | | | | | | | |
|---|---|---|---|---|---|---|---|---|---|---|---|---|---|---|
| | | | लोकप्रिय डेकोरेटर्स, संक्रापूर ता. राहुरी जि. अहमदनगर | | कैलास मंडप ॲण्ड लाईट डेकोरेटर्स, अहमदनगर | | रोशनी मंडप ॲण्ड लाईट डेकोरेशन, संक्रापूर ता. राहुरी जि. अहमदनगर | | शगून इव्हेन्टस् ॲण्ड मार्केटींग सर्व्हीसेस, नागपूर | | बाबला टेन्ट हाऊस, मु.पो. श्रीरामपूर जि. अ.नगर | | कला साधना डेकोरेटर्स, नाशिक | |
| | | | कोटेशन मधील दर | चर्चे नंतरचे दर | कोटेशन मधील दर | चर्चे नंतरचे दर | कोटेशन मधील दर | चर्चे नंतरचे दर | कोटेशन मधील दर | चर्चे नंतरचे दर | कोटेशन मधील दर | चर्चे नंतरचे दर | कोटेशन मधील दर | चर्चे नंतरचे दर |
| ०१ | वॉटरप्रुफ छत असलेले व आतील बाजुने सुशोभित कापडी मंडपाची उभारणी करणे. (लोखंडी कॉलम व कैच्याचे नटबोल्ट फिटींग असलेला डोम टाईप मंडप ) | १६८००.०० चौ. फुट | २०/- | -- | १६/- | -- | १५/- | | २.१० | -- | २.७० | -- | १.५५ | १.४० |
| ०२ | स्टेज व्यवस्था :- ३०'x२०' साईजचे स्टेज, सदरचें स्टेजची जमिनीपासून ३ फुटापर्यंत उंची असलेले भक्कम स्टेज तयार करणे. स्टेजवर मॅटींग टाकणे. | ६००.०० चौ. फुट | २५/- | २.७७ | ५/- | -- | ४०/- | -- | ५.३३ | -- | ७/- | ४/- | ५.५० | ४.५० |
| ०३ | १०'x१०' साईजचे स्टेज तयार करणे सदरचें स्टेजची जमिनीपासून ३ फुटापर्यंत उंची असलेले स्टेज तयार करणे, मॅटीग टाकणे व बाजूने सुशोभित कापड बांधणे. | १००.०० चौ. फुट | २५/- | २.७७ | ५/- | -- | ४०/- | -- | ५.३३ | -- | ७/- | ४/- | ५.५० | ४.५० |
| ०४ | स्वागत कमानी १'-६" x१'-६" साईजचे बॉक्सच्या ०२ नग कमीत कमी १५ फुट रुंदीच्या बॉक्स टाईप कमानी बांधणे. | ०२ नग | २०००/- | **<u>२२२.२२</u>** | ४०००/- | -- | ३०००/- | -- | ३०००/- | -- | १०००/- | ६००/- | १७००/- | १०००/- |
| ०५ | संपुर्ण मंडपात मॅटीग व सतरंजी टाकणे | १६५००.०० चौ. फुट | २/- | - | १/- | ०.९० | १/- | -- | **<u>०.३०</u>** | -- | ०.४० | **<u>०.३०</u>** | ६.७७ | ०.७० |
| ०६ | ग्रीन रुम ०२ नग :- साईडने ताडपत्री व आतिल | १२००.०० चौ. फुट | ८/- | **<u>०.८०</u>** | **<u>०.८०</u>** | -- | ५/- | -- | २.५० | -- | २/- | १.२५ | १.५० | १.२५ |

| | | | | | | | | | | | | | | |
|---|---|---|---|---|---|---|---|---|---|---|---|---|---|---|
| | बाजूस सुशोभित कापड लावून ३०'x२०' साईजच्या दोन ग्रीन रुम तयार करणे व रुममध्ये मॅटींग टाकणे. | | | | | | | | | | | | | |
| ०७ | मंडपाचे पश्चिम बाजूने ३ फुट उंचीचे रेलिंग आवश्यक भक्कम सर्पोटसह करुन देणे. | २०० रनिंग फुट | २५/- | -- | ५/- | ४/- | <u>२/-</u> | -- | ३/- | -- | <u>२/-</u> | -- | ३/- | २.५० |
| ०८ | मंडपाचे पूर्व व पश्चिम बाजूने पूर्ण ६ फुट उंचीची कनात आवश्यक सर्पोट देवून लावणे. | ५०० रनिंग फुट | २/- | <u>**०.२२**</u> | २/- | १.८० | ५/- | -- | १ | -- | ०.२५ | -- | ६/- | ५.५० |

वरीलपैकी अ.नं.५ करीता शगून इव्हेन्टस् अॅण्ड मार्केटींग सर्व्हीसेस, नागपूर व बाबला टेन्ट हाऊस, श्रीरामपूर यांचे दर निम्नतम व समान स्वरुपाचे आहेत. तथापी शगून इव्हेन्टस् हे अनुपस्थित असल्याने सदर कामासाठी मे. बाबला टेन्ट हाऊस, श्रीरामपूर यांचे दर स्विकारुन त्यांना कार्यादेश देण्यात आला आहे. तसेच वरीलपैकी अ.नं.६ करीता लोकप्रिय डेकोरेटर्स, संक्रापूर व कैलास मंडप अॅण्ड लाईट डेकोरेटर्स, अहमदनगर यांचे दर निम्नतम व समान स्वरुपाचे आहेत. परंतू कैलास मंडप यांनी चर्चेदरम्यान सदर काम करणेस असमर्थता दर्शविल्याने या कामासाठी मे. लोकप्रिय डेकोरेटर्स, संक्रापूर यांचे दर स्विकारुन त्यांना कार्यादेश देण्यात आला आहे. तसेच अ.नं.७ करीता रोशनी मंडप अॅण्ड लाईट डेकोरेशन, संक्रापूर व बाबला टेन्ट हाऊस, श्रीरामपूर यांचे दर निम्नतम व समान स्वरुपाचे आहेत. परंतू रोशनी मंडप यांनी चर्चेदरम्यान सदर काम करणेस असमर्थता दर्शविल्याने या कामासाठी बाबला टेन्ट हाऊस, श्रीरामपूर यांचे दर स्विकारुन त्यांना कार्यादेश देण्यात आला आहे. तरी त्यानुसार निविदा सादरकर्त्यांना देण्यात आलेले कार्यादेश व कामांचा तपशिल खालिलप्रमाणे आहे.

**१) कलासाधना डेकोरेटर्स, नाशिक :-**
**कार्यादेश जा.नं. २०४९ दि.३१/०७/२०१३**
**एम.एस. कॉलम व कैच्या वापरुन ताडपत्रीचे छत असलेले डोम टाईप कापडी मंडप इ. व्यवस्था करणे.**
(कालावधी दि.०७/०८/२०१३ ते १५/०८/२०१३) एकूण - ०९ दिवस)

| **अ. नं.** | **व्यवस्थेचा तपशिल** | **साईज** | **परिमाण / एकक** | **दर (रु)** (प्रति दिवस प्रति चौ/र.फुट ) | **एकूण रक्कम (रु.)** (०९ दिवसांकरीता ) |
|---|---|---|---|---|---|
| ०१ | वॉटरप्रुफ छत असलेले व आतील बाजुने सुशोभित कापडी मंडपाची उभारणी करणे. (लोखंडी कॉलम व कैच्याचे नटबोल्ट फिटींग असलेला डोम टाईप मंडप ) | २१०'x८०' | १६८००.०० चौ. फुट | १.४० | २,११,६८०/- |
| | | | | **एकूण रक्कम रुपये** | २,११,६८०/- |
| | | | | **अधिक सर्व्हीस टॅक्स व व्हॅट १३.८६%** | २९,३३९/- |
| | | | | **एकूण पूर्णांकीत रक्कम रुपये** | २,४१,०१९/- |

**२) बाबला टेन्ट होऊस, श्रीरामपूर**
**कार्यादेश जा.नं. २०५१ दि.३१/०७/२०१३**
**मंडपात मॅटींग व सतरंजी टाकणे, रेलिंग करणे इ. अनुषंगीक व्यवस्था करणे**
(कालावधी दि.०७/०८/२०१३ ते १५/०८/२०१३) एकूण - ०९ दिवस)

| अ. नं. | व्यवस्थेचा तपशिल | साईज | परिमाण / एकक | दर (रु) (प्रति दिवस प्रति चौ/ र.फुट ) | एकूण रक्कम (रु.) (०९ दिवसांकरीता ) |
|---|---|---|---|---|---|
| ०१ | संपुर्ण मंडपात मॅटीग व सतरंजी टाकणे | १६५००.०० चौ. फुट | १६५००.०० चौ. फुट | ०.३० | ४४,५५०/- |
| ०२ | मंडपाचे पश्चिम बाजूने ३ फुट उंचीचे रेलिंग आवश्यक भक्कम सर्पोटसह करुन देणे. | २०० रनिंग फुट | २०० रनिंग फुट | २.०० | ३,६००/- |
| | | | | **एकूण पूर्णांकीत रक्कम रुपये** | ४८,१५०/- |

**३) लोकप्रिय डेकोरेटर्स, संक्रापूर :-**
**कार्यादेश जा.नं. २०५० दि.३१/०७/२०१३**
**श्रावण महिन्यातील श्री साईसच्चरीत पारायण सोहळा-२०१३ कार्यक्रमासाठी मंडपात स्टेज व्यवस्था, स्वागत कमानी , ग्रीन रुम, कनात इ. व्यवस्था**
(कालावधी दि.०७/०८/२०१३ ते १५/०८/२०१३) एकूण - ०९ दिवस)

| अ. नं. | व्यवस्थेचा तपशिल | साईज | परिमाण / एकक | दर (रु) (प्रति दिवस प्रति चौ/र.फुट ) | एकूण रक्कम (रु.) (०९ दिवसांकरीता ) |
|---|---|---|---|---|---|
| ०१ | स्टेज व्यवस्था :- ३०'x२०' साईजचे व जमिनीपासून ३ फुटापर्यंत उंची असलेले भक्कम स्टेज तयार करणे. स्टेजवर मॅटींग टाकणे. | ३०'x२०' | ६००.०० चौ. फुट | २.७७ | १४,९५८/- |
| ०२ | १०'x१०' साईजचे व जमिनीपासून ३ फुटापर्यंत उंची असलेले स्टेज तयार करणे, मॅटीग टाकणे व बाजूने सुशोभित कापड बांधणे. | १०'x१०' | १००.०० चौ. फुट | २.७७ | २,४९३/- |
| ०३ | स्वागत कमानी १'-६" x१'-६" साईजचे बॉक्सच्या ०२ नग कमीत कमी १५ फुट रुंदीच्या बॉक्स टाईप कमानी बांधणे. | ०२ नग | ०२ नग | २२२.२२ | ३९९९.९६ |
| ०४ | ग्रीन रुम ०२ नग :- साईडने ताडपत्री व आतिल बाजूस सुशोभित कापड लावून ३०'x२०' साईजच्या दोन ग्रीन रुम तयार करणे व रुममध्ये मॅटींग टाकणे. | ३०'x२०'x२ नग | १२००.०० चौ. फुट | ०.८० | ८,६४०/- |
| ०५ | मंडपाचे पूर्व व पश्चिम बाजूने पूर्ण ६ फुट उंचीची कनात आवश्यक सर्पोट देवून लावणे. | ५०० रनिंग फुट | ५०० रनिंग फुट | ०.२२ | ९९०/- |
| | | | | **एकूण रुपये** | ३१,०८०.९६ |
| | | | | **एकूण पूर्णांकीत रक्कम रुपये** | ३१,०८१/- |

वरील तपशिलाप्रमाणे मंडप ठेकेदार यांना देण्यात आलेल्या कार्यादेशानुसार संपूर्ण काम करुन घेणेसाठी एकूण रु.३,२०,२५०/- मात्र इतका खर्च येईल. तरी याप्रमाणे करण्यात आलेल्या कार्यवाहीस तसेच ऐनवेळी आवश्यकतेनुसार वाढीव व्यवस्था करावयाची झाल्यास ती उपरोक्त मंजूर दराने करुन घेणेस व त्यासाठी येणारे सर्वसमावेशक खर्चास मान्यता मिळणेस विनंती.

**निर्णय क्र.६२२ यावर सविस्तर चर्चा होऊन, उपरोक्तप्रमाणे केलेल्या कार्यवाहीस कार्योत्तर मान्यता देण्यात आली.**
(कार्यवाही- बांधकाम विभाग प्रमुख)

---

**विषय नं.११ श्री साईबाबा मंदिर दर्शन रांग व मंदिर परिसर पुनर्विकास प्रकल्पाकरीता आर्किटेक्ट संस्थांकडून प्राप्त झालेल्या वाणिज्यिक प्रस्तावांबाबत.**

**निर्णय क्र.६२३ सदरहू विषयावरील चर्चा पुढे ढकलणेत आली.** (कार्यवाही- बांधकाम विभाग प्रमुख)

---

**विषय नं.१२ साईबाबा भक्तनिवासस्थान व व्दारावती भक्तनिवास इमारतीसमोरील रोडवर स्पीडब्रेकर बसविणेबाबत.**

**प्रस्ताव-** **श्री साईबाबा संस्थान विश्वस्तव्यवस्था (शिर्डी) अधिनियम २००४ मधील तरतुद:** अधिनियम कलम २१ (१) अन्वये समितीकडून विश्वस्तव्यवस्था निधीचा विनियोग पुढील सर्व किंवा त्यापैकी कोणत्याही

प्रयोजनांसाठी करणेबाबत तरतुद आहे. त्यातील पोटकलम (क) अन्वये मंदिराची व विश्वस्तव्यवस्थेच्या मालमत्तांची देखभाल, व्यवस्थापन व प्रशासन या प्रयोजनांसाठी करण्यात येईल अशी तरतुद आहे.

**प्रस्ताविक:** श्री साईबाबा भक्तनिवासस्थान इमारतीचे दक्षिण बाजूने शैक्षणिक संकुल इमारती आहेत. साईभक्तांची व संस्थानची दैनंदिन वाहने जाणे-येणेसाठी तसेच भक्तनिवासस्थानचे पूर्वेस असलेले अधिकारी निवासस्थाने तसेच साई श्रध्दा हौसींग सोसायटीकडे जाणाऱ्या वाहनांची. सदरचे परिसरामध्ये दैनंदिन वाहतुकीची नेहमीच वर्दळ असते. तथापि, वाहनांना वेगाची मर्यादा/अडथळा नसलेमुळे वाहने भरधाव वेगात चालतात. करिता वाहनांचे वेगावर मर्यादा असावी यासाठी वाहन विभागाकडे जाणाऱ्या रस्त्याजवळ, कार्यकारी अधिकारी निवासस्थानाकडे जाणाऱ्या रस्त्याजवळ, गुलाब गार्डन-भक्तनिवास गेटजवळ व इंग्लिश मिडियम स्कूल/ कन्याशाळा गेटजवळ स्पीड ब्रेकर असणे आवश्यक आहे तसेच श्री साईनाथ रुग्णालय व व्दारावती भक्तनिवास इमारतीकडै जाणारी वाहने मोठ्या प्रमाणात असतात तेथेही साईभक्तांची व रुग्ण व रुग्णांचे नातेवाईकांची मोठ्या प्रमाणात वर्दळ असल्याने, सदरहू रस्त्यावरही एकुण तीन ठिकाणी योग्य अंतरावर संरक्षण विभागाचे नियोजनानुसार स्पीड ब्रेकर बसवून घेता येतील.

**मागणी:** उपरोक्त दोन्ही ठिकाणी स्पीड ब्रेकर बसवून घेणेकामी अनुक्रमे संरक्षण विभाग यांनी त्यांचेकडील दिनांक १८ जुन, २०१३ रोजीचे व प्र. अधिक्षक, व्दारावती भक्तनिवास यांनी त्यांचेकडील दिनांक २६ जानेवारी, २०१३ रोजीचे पत्रान्वये कळविले आहे.

उपरोक्तप्रमाणेचे मागणी नुसार सदरहू रस्त्यावर रहदारीचे नियंत्रण करणेकामी रबरराईज्ड स्पीड ब्रेकर बसवून घेता येईल. त्यासाठी खालील प्रमाणे खर्च अपेक्षित आहे.

| अ. नं. | मटेरिअलचा तपशिल | परिमाण / एकक | अंदाजे दर | रक्कम रुपये |
|---|---|---|---|---|
| ०१ | श्री साईबाबा भक्तनिवासस्थान (५००) रुम) रोडवर एकुण चार ठिकाणी | ६३ मीटर | ३,२००/- प्रती मिटर | २,०१,६००.०० |
| ०२ | व्दारावती भक्तनिवास रोडवर एकुण तिन ठिकाणी | | | |
| | | | **एकुण रुपये..** | **२,०१,६००.००** |

**विभागाचा अभिप्राय :** श्री साईबाबा भक्तनिवासस्थान व व्दारावती भक्तनिवास तसेच श्री साईनाथ रुग्णालयाकडे जाणाऱ्या अंतर्गत रस्त्यावर वाहतूकीचे नियंत्रण करणेसाठी स्पीड ब्रेकर बसविणे आवश्यक आहे. करीता सदरहू कामी आवश्यक असणारे रबरराईज्ड स्पीड ब्रेकर विहीत पध्दतीने कोटेशन मागवून खरेदी करुन बसवून घेता येईल असे मत आहे.

तरी याकामी येणारे रुपये २,०१,६००/- मात्रचे खर्चास व सदरचे काम विहीत पध्दतीने कोटेशन मागवून करुन घेणेस मान्यता मिळणेस विनंती.

**निर्णय क्र.६२४ यावर सविस्तर चर्चा होऊन, श्री साईबाबा भक्तनिवासस्थान व व्दारावती भक्तनिवास तसेच श्री साईनाथ रुग्णालयाकडे जाणाऱ्या अंतर्गत रस्त्यावर वाहतूकीचे नियंत्रण करणेसाठी आवश्यक असणारे रबरराईज्ड स्पीड ब्रेकर, विहीत पध्दतीने कोटेशन मागवून खरेदी करुन बसविणेस व याकामी येणाऱ्या रु.२,०१,६००/- मात्रचे खर्चास मान्यता देण्यात आली.**

(कार्यवाही- बांधकाम विभाग प्रमुख)

---

**विषय नं.१३ साईआश्रम प्रकल्पाचे भाग- ०२ येथील डॉरमिटरी हॉल्समध्ये ठेवणेसाठी लॉकर्स खरेदी करणेकामी प्राप्त झालेल्या सिलबंद निविदांबाबत.**

प्रस्ताव- **श्री साईबाबा संस्थान संस्थान विश्वस्तव्यवस्था अधिनियम, २००४ मधिल तरतूद :** अधिनियमाच्या कलम २१ मधील पोट - कलम (१) च्या खंड (त्र) अन्वये भक्तांच्या निवासासाठी व त्यांच्या उपयोगासाठी विश्रामगृहे बांधणे व त्यांची देखभाल करणे अशी तरतूद आहे.

**मा. व्यवस्थापन समिती निर्णय :** दि.२८/०४/२०१२ रोजी झालेल्या मा. व्यवस्थापन समितीचे सभेत याबाबत खालिलप्रमाणे निर्णय क्र.३६५ संमत करण्यात आलेला आहे.

"...... यावर सविस्तर चर्चा होऊन, प्रस्तावात नमूद केल्याप्रमाणे साई आश्रम भाग-२ चे हॉलसाठी एकूण ५७६ नग लॉकर्स युनिट (३४५६ नग लॉकर्स) खरेदीकामी येणारे अंदाजे रक्कम रु.१,०३,६८,०००/- मात्रचे खर्चास मान्यता देण्यात आली. याकामी वर्तमानपत्रात जाहिरात देऊन निविदा मागविण्यात याव्यात असे ठरले. "

**प्रस्तावना :** दि.२७/०८/२०१२ रोजीचे वर्तमानपत्रात याकामी जाहिरात प्रसिध्द करण्यात आली होती. त्यामध्ये कोऱ्या निविदा विक्रीसाठी दि.२७/०८/२०१२ ते दि.१०/०९/२०१२ पर्यंत कालावधी देण्यात आला होता. विहित मूदतीत खालील ०३ (तीन) ठेकेदार यांनी कोरे निविदा फॉर्म घेतले होते.

१. स्पेसवूड फनिशर्स प्रा.लि., नागपूर
२. पवार इलेक्ट्रो सिस्टीमस् प्रा.लि., नाशिक
३. एर्गोमॅक्स (इंडिया) प्रा.लि, चेन्नई

तसेच सिलबंद निविदा सादर करणेसाठी दि.१८/०९/२०१२ अखेरपर्यंत मूदत देण्यात आली होती. पंरतू दि.१२/०९/२०१२ रोजी आयोजीत करण्यात आलेल्या निविदापूर्व बैठकीमध्ये सिलबंद निविदा सादर करण्याची मूदत दि.२५/०९/२०१२ अखेर वाढविण्यात आली. सदरचे कालावधीत खालील फक्त ०२ (दोन) ठेकेदार यांनी सिलबंद निविदा सादर केलेल्या आहेत.

| अ.क्र. | ठेकेदारांचे नांव | आवक क्र. दिनांक |
|---|---|---|
| ०१ | स्पेसवूड फर्निशर्स प्रा.लि., नागपूर | ९५९६, दि.२५/०९/२०१२ |
| ०२ | पवार इलेक्ट्रो सिस्टीमस् प्रा.लि., नासिक | ९६००, दि.२५/०९/२०१२ |

अशाप्रकारे वरील कामासाठी फक्त दोनच सिलबंद निविदा प्राप्त झाल्या. सुरुवातीला देण्यात आलेल्या Minimum Qualifiying Criteria मधिल प्रमुख निकष खालिलप्रमाणे होते.

1. The bidder should have satisfactorily completed atleast single work of similar nature or steel furniture work costing minimum Rs.1 Crore, during the last three financial years (FY 2009-2010, 2010-2011 & 2011-2012).
2. The bidder should have average annual financial turnover of Rs.3 Crores during the last three financial years (FY 2009-2010, 2010-2011 & 2011-2012). Bidder will be required to submit certified and audited balance sheets and turnover certificate issued by the Chartered Accountant.

सदर निविदेकरीता नामांकीत उत्पादक व पुरवठादारांचा जास्तीत जास्त प्रतिसाद मिळण्याचे दृष्टीने यापुर्वी विहीत करण्यात आलेला Minimum Qualifying Criteria काही प्रमाणात शिथिल करुन दि.१२/१०/२०१२ रोजीचे मंजूर टिपणी अन्वये वर्तमानपत्रात व संस्थानचे संकेतस्थळावर निविदा सूचना पुन्हा प्रसिध्द करुन निविदा मागविणेस प्रशासकीय मान्यता घेण्यात आली.

त्यानुसार दै. फ्री प्रेस जर्नल, मुंबई या वृत्तपत्रात व संस्थानचे संकेतस्थळावर पुन्हा जाहिरात प्रसिध्द करण्यात आली. त्यानुसार कोरे निविदा फॉर्म विक्रीसाठी दि.०७/११/२०१२ ते दि.२०/११/२०१२ कालावधी देण्यात आला व सिलबंद निविदा सादर करणेसाठी दि.२६/११/२०१२ अखेर पर्यंत मूदत देण्यात आली होती. पंरतू सदरहू कालावधीत कोणीही कोरी निविदा घेतली नाही. त्यामुळे दुसऱ्या वेळेस जाहिरात देऊनही याकामी नव्याने एकही निविदा प्राप्त झाली नाही.

त्यानंतर दि.०४/०१/२०१३ चे मंजूर टिपणी अन्वये इंटरनेटचे माध्यमातून नामांकित व मोठ्या स्वरुपाच्या उत्पादक व पुरवठादारांचा शोध घेऊन त्यांना इकडील जा.क्र.एसएसएसटी/बांध/५२४८/२०१३ दि.१४/०२/२०१३ रोजी निविदा मागणी पत्र पाठविण्यात आले. सदरचे निविदा मागणी पत्रान्वये कोरे निविदा फॉर्म विक्रीसाठी दि.२१/०२/२०१३ ते दि.०६/०३/२०१३ असा कालावधी देण्यात आला व सिलबंद निविदा सादर करणेसाठी दि.१९/०३/२०१३ अखेरपर्यंत मूदत देण्यात आली होती. सदरहू कालावधीत फक्त एकाच कोऱ्या निविदा फॉर्मची विक्री झाली. परंतू सदरहू ठेकेदार यांनी विहीत मूदतीत सिलबंद निविदा सादर केली नाही. त्यामुळे तीसऱ्या वेळेस निविदा मागवून देखील याकामी एकही निविदा नव्याने प्राप्त झाली नाही.

दि.०९/०५/२०१३ रोजीचे मंजूर टिपणी अन्वये त्याकरीता नामांकीत उत्पादक व पुरवठादारांचा जास्तीत जास्त प्रतिसाद मिळण्याचे दृष्टीने यापूर्वी विहीत करणेत आलेला Minimum Qualifying Criteria खालीलप्रमाणे पुन्हा शिथिल करुन नव्याने वर्तमानपत्रात व संस्थानचे अधिकृत संकेतस्थळावर पुन्हा जाहिरात प्रसिध्द करुन फेर निविदा मागविणेस प्रशासकीय मान्यता घेण्यात आली.

1. The bidder should have satisfactorily completed atleast single work of similar nature or steel furniture work costing minimum Rs.50 Lakhs or two works of each costing minimum Rs.25 Lakhs, during the last three financial years (FY 2009-2010, 2010-2011 & 2011-2012).
2.The bidder should have average annual financial turnover of Rs.1 Crore, during the last three financial years (FY 2009-2010, 2010-2011 & 2011-2012). Bidder will be required to submit certified and audited balance sheets and turnover certificate issued by the Chartered Accountant.

त्यानुसार दै. सामना व दै. पुण्यनगरी या वर्तमानपत्रात व संस्थानचे संकेतस्थळावर पुन्हा जाहिरात प्रसिध्द करण्यात आली. त्यानुसार कोरे निविदा फॉर्म विक्रीसाठी दि.२७/०५/२०१३ ते दि.१०/०६/२०१३ अखेर याप्रमाणे कालावधी देण्यात आला व सिलबंद निविदा सादर करणेसाठी दि.१४/०६/२०१३ अखेर पर्यंत मूदत देण्यात आली होती. पंरतू यावेळी देखील सदरहू कालावधीत कोणीही कोरी निविदा घेतली नाही. त्यामुळे चौथ्या वेळेस निविदा मागवून देखील नव्याने एकही निविदा प्राप्त झालेली नाही.

**प्रस्ताव :-** वरीलप्रमाणे लॉकर्स खरेदीसाठी चार वेळा निविदा मागवुनही फक्त दोनच निविदा प्राप्त झालेल्या आहेत. तसेच सदर प्राप्त दोन सिलबंद निविदांची वैधता (Validity) दि.२५/१२/२०१२ रोजी संपुष्टात आलेली आहे. सदर खरेदी ही रु.१ कोटी पेक्षा जास्त, म्हणजेच मोठ्या खर्चाची असल्याने याकामी पुन्हा नव्याने निविदा मागविणे उचित होईल असे मत आहे. तथापी पुर्वानुभव लक्षात घेता, निविदेस व्यापक प्रतिसाद मिळण्याचे दृष्टीने यापुर्वी निश्चित केलेले किमान प्रात्रता निकष (Minimum

Qualifying Criteria) खालीलप्रमाणे अजून काही प्रमाणात शिथिल करणे आवश्यक आहे.

1. The bidder should have satisfactorily completed atleast single work of similar nature or steel furniture work costing minimum Rs.30 Lakhs or two works of each costing minimum Rs.15 Lakhs, during the last three financial years (FY 2010-2011, 2011-2012 & 2012-2013).

2. The bidder should have average annual financial turnover of Rs.60 Lakhs, during the last three financial years (FY 2010-2011, 2011-2012 & 2012-2013). Bidder will be required to submit certified and audited balance sheets and turnover certificate issued by the Chartered Accountant.

वरीलप्रमाणे नव्याने निविदा काढतांना त्या आता ई- टेंडर पद्धतीने मागविता येतिल. त्यासाठी जाहिरातीचा खर्च कमीत कमी व्हावा याकरीता वर्तमानपत्रात अतिसंक्षिप्त स्वरुपात निविदा सूचना प्रसिद्ध करुन इच्छुकांना संस्थानचे अथवा ई-टेंडरचे वेबसाईटवर संपर्क करणेबाबत सूचित करता येईल. तसेच अधिक प्रसिद्धिसाठी इंटरनेटवरील सुयोग्य अशा संकेतस्थळावर (indiamart अथवा तत्सम) निविदा प्रसिद्ध करता येतिल.

मा. उच्च न्यायालय, मुंबई खंडपीठ औरंगाबाद यांचे समोरील PIL No १८/२०११ मधिल सिव्हील ॲप्लिकेशन नं.१२६९५/२०१२ व १४३७२/२०१२ वर दि.२०/०२/२०१३ रोजी झालेल्या आदेशातील कलम १२ अन्वये मे. कोर्टाने सदरहु कामासाठी येणारे रक्कम रु.१,०३,६८,०००/- मात्रचे खर्चास परवानगी दिलेली आहे.

**विभागाचा अभिप्राय/ मत:-** वर प्रस्तावित केल्याप्रमाणे Minimum Qualifying Critera शिथिल करुन नव्याने ई-टेंडर पद्धतीने निविदा मागविण्यात याव्यात, असे मत आहे. तरी त्यासाठी मान्यता मिळणेस विनंती.

**निर्णय क्र.६२५ यावर सविस्तर चर्चा होऊन, उपरोक्त प्रस्तावास मान्यता देण्यात आली.**

(कार्यवाही- बांधकाम विभाग प्रमुख)

---

**विषय नं.१४ श्री साईबाबा हॉस्पीटलमधील कॅन्टीनमध्ये असलेल्या टेबलचे टॉप बदलणेबाबत.**

**प्रस्ताव-** **श्री साईबाबा संस्थान विश्वस्तव्यवस्था (शिर्डी) अधिनियम २००४ मधील तरतुद:** अधिनियम कलम २१ (१) अन्वये समितीकडून विश्वस्तव्यवस्था निधीचा विनियोग पुढील सर्व किंवा त्यापैकी कोणत्याही प्रयोजनांसाठी करणेबाबत तरतुद आहे. त्यातील पोटकलम (क) अन्वये मंदिराची व विश्वस्तव्यवस्थेच्या मालमत्तांची देखभाल, व्यवस्थापन व प्रशासन या प्रयोजनांसाठी करण्यात येईल अशी तरतुद आहे.

**प्रस्तावना :** संस्थानचे श्री साईबाबा हॉस्पीटलमध्ये रुग्ण व रुग्णांचे नातेवाईक यांचे सोयीसाठी चहा, कॉफी व दुध विक्रीसाठी कॅन्टीन असून, सदरचे कॅन्टीनमध्ये असलेले टेबलचे टॉप सततचे वापराने खराब झालेले आहेत.

**प्रस्ताव :** श्री साईबाबा हॉस्पीटकडील कॅन्टीनमध्ये असलेले टेबलचे टॉप सततचे वापराने खराब झालेले असल्याने, सदरचे टॉप बसविणे आवश्यक आहे.

**मागणी :** करीता सदरहू कॅन्टीनमध्ये असलेले दहा नग टेबलसाठी नवीन टॉप बसवून मिळणेबाबत श्री साईबाबा हॉस्पीटलकडील - मनुष्यबळ व्यवस्थापक यांनी त्यांचेकडील दिनांक ०४ जूलै, २०१३ रोजीचे पत्रान्वये कळविले आहे.

करीता उपरोक्त मागणीनुसार सदरहू टेबलची इकडील विभागामार्फत पहाणी करणेत आली असून, सदरचे टॉप करीता १८ एम. एम. वॉटरप्रुफ प्लायवूड (६'x३') बसवून त्यावर १ एम. एम. जाडीचे लॅमिनेट बसविता येईल. याकामी आवश्यक मटेरिअल विभागामार्फत खरेदी करुन सदरचे काम विभागामार्फत करुन घेता येईल. याकामी रुपये ३२,०००/- मात्र इतका खर्च अपेक्षित आहे.

**विभागाचा अभिप्राय/ स्पष्ट मत:** श्री साईबाबा हॉस्पीटलकडील असलेले कॅन्टीनमधील टेबलसाठी नवीन टॉप तयार करुन बसविणे आवश्यक आहे. असे नम्र मत आहे.

तरी याकामी आवश्यक मटेरिअल खरेदी करीता येणारे अंदाजे रु. ३२,०००/- मात्रचे खर्चास व सदरचे काम विहीत पध्दतीने कोटेशन मागवून खरेदी करुन विभागामार्फत काम करुन घेणेस मान्यता मिळणेस विनंती.

**निर्णय क्र.६२६ यावर सविस्तर चर्चा होऊन, श्री साईबाबा हॉस्पीटलकडील कॅन्टीनमध्ये असलेल्या टेबलचे टॉप बदलणेस व याकामी येणाऱ्या अंदाजे रु.३२,०००/- मात्रचे खर्चास मान्यता देण्यात आली.**

**तसेच, सदरचे कामी आवश्यक असलेले मटेरीयल विहीत पध्दतीने कोटेशन मागवून खरेदी करावे व विभागामार्फत काम करुन घेणेत यावे, असे ठरले.** (कार्यवाही- बांधकाम विभाग प्रमुख)

---

**विषय नं.१५ साईआश्रम प्रकल्पाचे भाग- ०१ येथे सुरक्षेच्या दृष्टीने गतीरोधक बनविणेबाबत.**

**प्रस्ताव-** **श्री साईबाबा संस्थान विश्वस्तव्यवस्था (शिर्डी) अधिनियम, २००४ मधील तरतूद :-**

अधिनियमांच्या कलम -२१ मधील पोटकलम (१) च्या खंड (त्र) अन्वये भक्तांच्या निवासासाठी व त्यांच्या उपयोगासाठी विश्रामगृहे बांधणे व त्यांची देखभाल करणे अशी तरतुद आहे.

**प्रस्तावना:-** श्री साईबाबा संस्थान विश्वस्तव्यवस्था शिर्डी व शिर्डी साई ट्रस्ट, चेन्नई यांचे संयुक्त विद्यमाने साईआश्रम प्रकल्पाचे काम पुर्ण झालेले आहे. दि. ११/०४/२०१३ पासुन साई आश्रम भाग -०१ हा प्रकल्प साई भक्तांसाठी खुला करण्यात आलेला आहे. दि. १९/०६/२०१३ रोजीचे पत्रान्वये मा. अधिक्षक, साई आश्रम भक्तनिवास, यांनी साई आश्रम भक्तनिवास परिसरात वाहनांचे वेगावर नियंत्रण ठेवण्यासाठी मेनगेट व R - Block इमारतीचे दरम्यान आत जाणारे रस्त्यावर दोन व बाहेर जाणारे रस्त्याच्या ठिकाणी दोन गतिरोधक तयार करणे गरजेचे असल्याचे कळविले आहे. त्यानुसार दि. २६/०७/२०१३ रोजी साईटवर समक्ष पाहणी करणेत आली आहे. त्यानुसार खालील नमुद ठिकाणी गतीरोधक बसविणे आवश्यक आहेत.

१) मुख्य प्रवेशव्दाराचे बाहेर.
२) R - Block चे उत्तर बाजूस असलेल्या रस्त्यावर दोन ठिकाणी.
३) R - Block चे दक्षिण बाजूस असलेल्या रस्त्यावर दोन ठिकाणी.
४) H - इमारतीचे पश्चिमेस असलेल्या बाहेर जाणारे रस्त्यावर एका ठिकाणी.
५) ॲम्फीथिएटरचे पूर्वेस असलेल्या रस्त्यावर एका ठिकाणी.
६) उत्तर बाजूचे पार्किगकडे जाणारे रस्त्यावर डी.जी. रुमचे पूर्वेस एका ठिकाणी.
७) उत्तर बाजुचे पार्किंगचे रस्त्यावर तीन ठिकाणी.

उपरोक्त नमूद ठिकाणी गतिरोधक व कॅट आईज बसविणेसाठी खालीलप्रमाणे खर्च अपेक्षित आहे.

| Sr.No. | Description | Qty / Unit | Rate | Amount |
|---|---|---|---|---|
| 01. | Providing & fixing ready made rubberised speed breakers inclusive of all taxes etc. complete.<br>Size - 500 mm x 400 mm x 48 mm.<br>Colour – Yellow & Black.<br>Load Capacity – 20 – 25 Tonners. | 125.00 Mtr. | 3200/- | 4,00,000/- |
| 02. | Providing & fixing cat eye stud of size 100 mm x 100 mm at base with M.S. zinc coated nails of size 12 mm dia. of 120 mm long having both as sides (Dual Direction) high impact ABC 3 Nos. of eyes of 16 mm dia. on both sides containing 7 heads each i.e. 42 heads in retro reflector etc. complete. | 300 Nos. | 180/- | 54,000/- |
| | **Total Amount Rs. :** | | | **4,54,000/-** |

**प्रस्ताव :-** सदरचे कामासाठी उपरोक्त तपशिलाप्रमाणे रु. ४,५४,०००/- मात्र इतका खर्च अपेक्षित आहे. सदरचे काम नासिक, औरंगाबाद, पुणे, अहमदनगर येथील सदरचे काम करणारे ठेकेदार यांचेकडून दरपत्रके मागवून करता येईल. याकामी होणारे उपरोक्त खर्चास प्रशासकीय मान्यता मिळणेस विनंती.

**विभागाचा अभिप्राय/ मत :-** तरी उपरोक्त कामास व येणारे रु. ४,५४,०००/- मात्रचे खर्चास प्रशासकीय मान्यता मिळणेस व सदरहू काम या क्षेत्रातील ठेकेदार यांचेकडुन दरपत्रके मागवून करुन घेणेस मान्यतेस्तव सविनय सादर.

**निर्णय क्र.६२७ यावर सविस्तर चर्चा होऊन, प्रस्तावात नमुद ठिकाणी सुरक्षिततेच्या दृष्टीने गतीरोधक बनविणेस व याकामी येणाऱ्या रु.४,५४,०००/- मात्रचे खर्चास मान्यता देण्यात आली.**

**तसेच, सदरचे काम या क्षेत्रातील ठेकेदारांकडून दरपत्रके मागवून करुन घेणेत यावे, असे ठरले.** (कार्यवाही- बांधकाम विभाग प्रमुख)

---

**विषय नं.१६ साईआश्रम प्रकल्पाचे भाग- ०२ येथील हॉलसाठी एम.एस.सिंगल बेडस खरेदी करणेबाबत.**

**प्रस्ताव- श्री साईबाबा संस्थान विश्वस्तव्यवस्था (शिर्डी) अधिनियम २००४ मधील तरतूद:-** अधिनियम कलम २१ मधील पोटकलम (१) च्या खंड (त्र) अन्वये भक्तांच्या निवासासाठी व त्यांच्या उपयोगासाठी विश्रामगृहे बांधणे व त्यांची देखभाल करणे अशी तरतूद आहे.

**मा. व्यवस्थापन समिती निर्णय :-** मा. व्यवस्थापन समितीचे दि.२८/०४/२०१२ रोजीचे सभेतील निर्णय क्र.३६४ अन्वये खालीलप्रमाणे निर्णय समंत करणेत आलेला आहे.

"... ... यावर सविस्तर चर्चा होऊन, प्रस्तावात नमूद केल्याप्रमाणे साईआश्रम प्रकल्पातील भाग-०२ येथील हॉलसाठी कॉटस् खरेदीकामी वर्तमानपत्रात जाहिरात देऊन निविदा मागविण्यात याव्यात, याकामी येणारे अंदाजे रक्कम रु.१,८५,६०,०००/- मात्रचे खर्चास मान्यता देण्यात आली".

वरील निर्णयानुसार साईआश्रम प्रकल्पातील भाग-०२ येथील हॉलसाठी कॉटस् खरेदी करीता विहीत पध्दतीने निविदा मागविणेकामी वर्तमानपत्रात व संस्थानचे अधिकृत संकेत स्थळावर जाहिरात प्रसिध्द करण्यात आली होती. त्यानुसार खालिल ०४ ठेकेदार यांनी सिलबंद निविदा सादर केल्या होत्या.

०१) गोदरेज ॲण्ड बॉईस मॅन्यु कं.लि., पुणे
०२) स्पेसवूड फर्निशर्स प्रा.लि., नागपूर
०३) अरगोमॅक्स् (इं.) प्रा.लि., चेन्नई
०४) पवार इलेक्ट्रो सिस्टीम्स् प्रा.लि., नासिक

सदरहू सिलबंद निविदा दि.०८/१२/२०१२ रोजीचे मा. त्रिसदस्य समितीचे सभेत उघडण्यात येऊन त्यावर खालीलप्रमाणे निर्णय क्र.९६३ संमत करणेत आला आहे.

"... निविदा सादरकर्त्यांनी सादर केलेल्या कॉटस्च्या नमुन्यांची समितीने पाहणी केली. यानंतर चर्चा होऊन, खरेदी करावयाच्या कॉटस्चा वापर हा साई आश्रम प्रकल्पाचे भाग-०२ येथील डॉरमेटरी हॉल्समध्ये करावयाचा असल्याने ते मजबुत होण्याचे दृष्टीने सदर कॉटसचे डिझाईन सुधारीत करुन त्यानुसार निविदासादरकर्त्यांकडून एक नमुना आगोदर तयार करुन घ्यावा व सदरचे नमुने पाहुन अंतिम निर्णय घेण्यात यावा, असे ठरले".

**प्रस्ताव :-** निविदासादरकर्ते ठेकेदार यांनी निविदेसोबत सादर केलेले बयाना रकमेचे डी.डी. परत मिळणेकामी विनंती केली होती. त्यानुसार इकडील विभागाचे दि.१७/०४/२०१३ रोजीचे टिपणी अन्वये मान्यता घेऊन संबंधीत ०४ ही ठेकेदार यांची बयाणा रक्कम त्यांना चेकव्दारे परत करण्यात आलेली आहे.

वरीलप्रमाणे प्राप्त झालेल्या ०४ सिलबंद निविदा उघडणेत आल्या आहेत. तसेच निविदा सादरकर्त्यांनी निविदेसोबत सादर केलेली बयाणा रक्कम सर्व निविदा सादरकर्त्यांना परत करण्यात आलेली आहे. त्यामुळे सदर निविदा रद्द करुन याकामी मा.व्यवस्थापन समितीचे उपरोक्त निर्णयानुसार सुधारीत डिझाईन तयार करुन त्यानुसार नव्याने निविदा मागविणे उचित होईल असे मत आहे. त्यासाठी सोबत चार प्रकारच्या एम. एस बेडस्ची छायाचित्रे अवलोकनार्थ जोडली आहेत. त्यापैकी क्र.१ चे छायाचित्र हे गोदरेज कं. यांनी संस्थानचे व्दारावती भक्तनिवास इमारतीसाठी पुरविलेल्या सिंगल बेडचे आहे. तसेच इतर तिन छायाचित्रे ही इंटरनेटचे माध्यमातून घेतलेली आहेत. तरी यापैकी एक डिझाईन निश्चित केल्यास त्याप्रमाणे बेडस् तयार करुन घेणेसाठी नव्याने निविदा मागविता येतिल.

वरीलप्रमाणे नव्याने निविदा काढतांना त्या आता ई- टेंडर पद्धतीने मागविता येतिल. त्यासाठी जाहिरातीचा खर्च कमीत कमी व्हावा याकरीता वर्तमानपत्रात अतिसंक्षिप्त स्वरुपात निविदा सूचना प्रसिद्ध करुन इच्छुकांना संस्थानचे अथवा ई-टेंडरचे वेबसाईटवर संपर्क करणेबाबत सूचित करता येईल. तसेच अधिक प्रसिध्दिसाठी इंटरनेटवरील सुयोग्य अशा संकेतस्थळावर (indiamart अथवा तत्सम) निविदा प्रसिद्ध करता येतिल.

मा. उच्च न्यायालय, मुंबई खंडपीठ औरंगाबाद यांचे समोरील PIL No १८/२०११ मधिल सिव्हील ॲप्लिकेशन नं.१२६९५/२०१२ व १४३७२/२०१२ वर दि.२०/०२/२०१३ रोजी झालेल्या आदेशातील कलम १२ अन्वये मे. कोर्टाने सदरहु कामासाठी येणारे रक्कम रु.१,८५,६०,०००/- मात्रचे खर्चास परवानगी दिलेली आहे.

**विभागाचा अभिप्राय :-** सोबत जोडलेल्या छायाचित्रातील क्र.१ चे बेडमध्ये गादीचे सपोर्टसाठी एम.एस जाळीचा वापर करण्यात आलेला असून इतर तिन बेडस्मध्ये प्लायवूड वापरल्याचे दिसून येते. तरी यापैकी योग्य त्या डिझाईनची निवड केल्यास त्यानुसार नमुना तयार करुन त्यामध्ये आवश्यक त्या किरकोळ सुधारणा करता येतिल. तरी सुधारीत डिझाईननुसार नव्याने ई- टेंडर पद्धतीने नविदा मागविण्यात याव्यात, असे मत आहे. त्यासाठी मान्यता मिळणेस विनंती.

**निर्णय क्र.६२८ सदरहू विषयावरील चर्चा पुढे ढकलणेत आली.** (कार्यवाही- बांधकाम विभाग प्रमुख)

---

**विषय नं.१७ श्री साईबाबा पुण्यतिथी उत्सव (दसरा) सन २०१३ करीता मंडप व इतर अनुषंगीक व्यवस्था करणेबाबत.**

प्रस्ताव- **श्री साईबाबा संस्थान संस्थान विश्वस्तव्यवस्था अधिनियम,२००४ मधिल तरतूद :** अधिनियमाच्या कलम २१ मधील पोट- कलम (१) च्या खंड (ख) अन्वये "रुढी व प्रथांनुसार, मंदिरातील धार्मिक विधी, पुजा-अर्चा, समारंभ व उत्सव आयोजीत करणे व पार पाडणे" या प्रयोजनासाठी समितीकडून विश्वस्तव्यवस्थेचा निधीचा विनीयोग करण्याची तरतदू आहे.

तसेच अधिनियमाच्या पोट कलम (१) च्या खंड (ग) अन्वये "भक्तांना मंदिरात देवतेच्या दर्शनासाठी व मंदिरात प्रार्थनेसाठी किंवा कोणेतही धार्मिक कार्य किंवा समारंभ पार पाडण्यासाठी सोयी

सुविधा पुरविणे" या प्रयोजनासाठी समितीकडून विश्वस्तव्यवस्थेच्या निधीचा विनीयोग करण्याची तरतूद आहे.

**प्रस्तवना :-** श्री साईबाबा संस्थान मार्फत सालाबाद प्रमाणे याही वर्षी शनिवार, दि.१२ ऑक्टोबर, २०१३ ते सोमवार, दि.१४ ऑक्टोबर, २०१३ अखेर ०३ दिवस "श्रीं " चा पुण्यतिथी (दसरा) उत्सव साजरा करण्यात येणार आहे. उत्सवाचे कालावधीमध्ये साईभक्तांची मोठया प्रमाणावर गर्दी होण्याची शक्यता असल्यामुळे मंदिर परिसरात उत्सवाच्या कालावधीत खालील परिशिष्ट प्रमाणे मंडप व इतर अनुषंगीक व्यवस्था करणे आवश्यक आहे.

**अ) समाधि मंदिर परिसरात ताडपत्रीचे छत असलेले कापडी मंडप उभारणे. :-**

**I एम. एस. पाईप, कैच्या वापरुन वरिल बाजूने ताडपत्री व आतिल बाजूने सुशोभित कापड असलेले मंडप.**

| अ.नं. | मंडपाचे ठिकाण | मंडपाची साईज | चौरस फुट |
|---|---|---|---|
| ०१ | समाधी मंदिर उत्तर बाजूस, चावडी गेट ते नगरव्दार गेटपर्यन्त | २८४'x१९' | ५३९६.०० |
| ०२ | समाधी मंदिरा समोरील सभाकुंडामध्ये | ६१'x६१' | ३७२१.०० |
| ०४ | साई कॉम्प्लॅक्स समोरील जागेवर (१६ आर मध्ये) | २००'x ८०' | १६,०००.०० |
| | | **एकुण चौ. फुट..** | **२५,११७.००** |
| | | **अंदाजे रु.२.९० प्रती चौ.फुट प्रमाणे येणारे एकुण अंदाजे अपेक्षीत खर्च** | **२,१८,५१८/-** |

**II. पाईप/ बांबू व गोल्टे वापरुन वरिल बाजूने ताडपत्री व आतिल बाजूने सुशोभित कापड असलेले मंडप.**

| अ.नं | मंडपाचे ठिकाण | मंडपाची साईज | चौरस फुट |
|---|---|---|---|
| ०१ | समाधी मंदिर दक्षिण बाजूस, व्दारकामाई ते पालखी गेटपर्यन्त | १६०'x१८' | २८८०.०० |
| ०२ | अ) समाधी मंदिर बाहेर पडण्याचा मार्ग (गुरुस्थान गेट) ते गुरुस्थान समोरील बेसमेंट पर्यंत | १५०'x१०' | १५००.०० |
| | ब) गुरुस्थान समोरील बेसमेंटचे दक्षिण बाजूस | ५०'x१०' | ५००.०० |
| | क) गुरुस्थान समोर पश्चिम बाजूस दक्षिण-उत्तर असा. | ४५'x३५' | १५७५.०० |
| ०३ | गेट नं. ३ ते श्री मारुती मंदिर पर्यंत १५ फुट उंचीचा | १००'x २०' | २०००.०० |
| ०४ | श्री मारुती मंदिर ते शाम सुंदर हॉल पर्यंत. | ६०'x २७' | १६२०.०० |
| ०५ | गेट नं. ०४ समोर | ६०'x २५' | १५००.०० |
| ०६ | श्रीं चे चावडी समोर शामसुंदर हॉल पर्यंत | ८०'x ३०' | २४००.०० |
| ०७ | शनि मंदिर, महादेव, श्री गणेश मंदिरा समोर | ६०'x ४०' | २४००.०० |
| ०८ | शनि मंदिर व्हि. आय. पी. गेट समोर दर्शन रांगेकरीता | ८०'x १०' | ८००.०० |
| ०९ | मंदिर परिसरामध्ये कॅलेंडर विक्री काउंटर समोर | १५'x२०' | ३००.०० |
| १० | श्री साई प्रसादालय मुख्य गेट ते तिकीट बुकींग काउंटर पर्यंत | १५०'x१५' | २२५०.०० |
| ११ | जनसंपर्क कार्यालयाचे पश्चिम बाजूस | ८०'x१०' | ८००.०० |
| १२ | लेंडीबागेत श्री दत्त मंदिरा समोर | १०५'x ३५' | ३६७५.०० |
| १३ | उदी काउंटर समोर | ४५' x २०' | ९००.०० |
| १४ | जुना पिंपळवाडी रस्ता दर्शन रांगेच्या पूर्व व पश्चिम बाजूने | ३०'x७५'<br>४५'x१५' | २२५०.००<br>६७५.०० |
| १५ | जुने प्रसादालय परिसरात मोबाईल लॉकर्स समोर व बाहेरील बाजूस फुटपाथवर | ४५'x२५'<br>३०'x१०' | ११२५.००<br>३००.०० |
| १६ | लाडू विक्री काउंटर समोर | ६०'x३०' | ९००.०० |
| | | **एकुण चौ. फुट..** | **३०,३५०.००** |
| | | **अंदाजे रु.२.८५ प्रती चौ.फुट प्रमाणे येणारे एकूण अंदाजे अपेक्षीत खर्च** | **रु. २,५९,४९३.००** |
| | | **एकूण (अ= I +II)=** | **रु.४,७८,०११.००** |

**ब) साईनगर मैदानावर कलाकारांचे कार्यक्रमासाठी स्टेज व्यवस्था :-**

| अ.नं. | ठिकाण | साईज | चौरस फुट |
|---|---|---|---|
| ०१ | सदरहू स्टेजवर सुमारे ४० ते ५० कलाकारांसाठी ३'-६" उंचीचे स्टेज अँगल फ्रेममध्ये मजबूत बांधी तयार करुन, स्टेजचे वरिल बाजूने भक्कम असे प्लायवूड वापरुन व मजबूत सपोर्ट देऊन ३०' x२०' साईजचे स्टेज तयार करणे., तसेच सदरहू स्टेजचे वरिल बाजूने ताडपत्री बांधून, आतिल बाजूने सुशोभित एकाच रंगाचे कापड बांधून, स्टेज फ्रेमचे चारही बाजूने सुशोभित एकाच रंगाचे कापड बांधणे, स्टेजचे पुढील भागासाठी सुशोभित एकाच रंगांचा सुमारे ३५' लांबीचा व १५' उंचीचा पडदा बसविणे. तसेच स्टेजचे बाजूस कलाकारांचे मेकअपसाठी २०'x१५' साईजच्या ०२ ग्रीन रुम जाड कापडामध्ये तयार करणे. स्टेजवर व साईभक्तांना बसणेकामी १०,००० चौ. फुट मॅटीन, १००० नग फायबर खुर्च्या पुरविणे व कार्यक्रमाचे वेळी व्यवस्थीत मांडणी करुन देणे इ. सह. स्टेज व्यवस्था | ३०' x२०' | ६००.०० |
| | | **एकुण चौ. फुट.** | **६००.००** |
| | | **अंदाजे रु.१६ प्रती चौ.फुट प्रमाणे येणारे एकूण अंदाजे अपेक्षीत खर्च रु.** | **२८,८००.००** |

| | | | |
|---|---|---|---|
| ०२ | **मंदीर परिसरामध्ये सभाकुड येथे :-** सदर स्टेजवर सुमारे २० ते २५ कलाकारांकरीता २'-६" उंचीचे स्टेज अँगल फ्रेममध्ये स्टॅण्ड उभारणी करुन प्रत्येकी ३' x ३' अंतरावर खालील बाजूस सपोर्ट देऊन त्यावर भक्कम प्लायवूड एकाच लेव्हलमध्ये बांधणेत यावेत. स्टेजचे पाठिमागील भागात निळ्या रंगाचा प्लेन पडदा लावून साईडणे सफेद (पांढरे) कापड तसेच स्टेजचे प्लॅटफॉर्मला पुढील बाजूने तसेच साईडणी चॉकलेटी / सफेद रंगाचे कापड लावण्यात यावेत. स्टेजचे बाजूस कलाकारांचे मेकअप करीता १०'x१०' साईजचे दोन (०२) ग्रीन रुम, जाड कापडी पार्टीशनमध्ये तयार करणे. स्टेजवर मॅटीन टाकून स्टेज समोर ३०० नग फायबर खुर्च्या टाकणे. तसेच स्टेजचे बाजूने स्पीकर ठेवणेकरीता ६x६ साईजचे व ३ फुट उंचीचे प्लॅटफॉर्म तयार करुन देणे. व स्टेज करीता दोन बाजूने अंदाजे ३' ते ४' रुंदीच्या पायऱ्या (जिने) तयार करुन बसविणे. इ. सह स्टेज व्यवस्था करणे. | .१६x२४ | ३८४.०० चौरस फुट |
| | **एकुण चौ. फुट.** | | **३८४.००** |
| | **अंदाजे रु.१६ प्रती चौ.फुट प्रमाणे येणारे एकूण अंदाजे अपेक्षीत खर्च** | | **रु.१८,४३२.००** |
| | **एकूण (ब. १+२)** | | **४७,२३२.००** |

**क) दर्शन रांगेसाठी व श्री साईप्रसादालय येथे तिकीट रेलिंगसाठी बॅरेकेटींग करणे.**

| **अ.नं.** | **तपशिल** | **साईज** | रनिंग फुट |
|---|---|---|---|
| ०१ | दर्शन रांगेकरीता व श्री साई प्रसादालय येथे साईभक्तांचे रेलिंग व्यवस्थेकामी व इतर आवश्यक ठिकाणी ४' उंचीचे लोखंडी पाईप / बांबू वापरुन भक्कम बांधी करुन बॅरेकेटींग करणे. | १००० रनिग फुट | १००० |
| | **एकुण चौ. फुट.** | | **१०००.००** |
| | **अंदाजे रु.५.५ प्रती चौ.फुट प्रमाणे येणारे एकूण अंदाजे अपेक्षीत खर्च** | | **रु.१६,५००.००** |
| | **एकूण (अ + ब + क)** | | **रु.५,४१,७४३/-** |

पुण्यतिथी उत्सव २०१३ निमित्त करावयाच्या मंडप व इतर अनुषंगीक व्यवस्थेकरीता वरीलप्रमाणे एकूण खर्च रु.५,४१,७४३/- मात्र खर्च अपेक्षित आहे.

**प्रस्ताव :-** उपरोक्त प्रमाणे ताडपत्रीचे छत असलेले कापडी मंडप, कलाकारांचे कार्यक्रमासाठी स्टेज, दर्शन रांगेसाठी बॅरेकेटींग, इ. व्यवस्था करणेकामी अंदाजे रु. ५.४२ लक्ष मात्र इतका खर्च अपेक्षित आहे. उपरोक्त श्री पुण्यतिथी उत्सव (दसरा) २०१३ करीता साईभक्तांचे सोयी सुविधेसाठी मंडप उभारणीसह इतर अनुषंगीक सुविधा पुरविणेकामी सिलबंद निविदा मागविणेसाठी वर्तमान- पत्रात व संस्थानचे अधिकृत संकेत स्थळावर निविदा सूचना प्रसिध्द करुन निविदा मागविता येतील. उत्सवा निमीत्ताने उभारणेत येणारे डेकोरेशन करीता आवश्यक असणारे बांबू व गोल्टे भाडेतत्वावर घेणेकामी येणारे अंदाजे रु.२५,०००/- मात्रचे खर्चास तसेच मंदिर परिसरात आवश्यक ठिकाणी रंगकाम करणेकामी येणारे रु.१०,०००/- मात्रचे खर्चास असे अंदाजे एकुण रु.५.७७ लक्ष मात्र इतका खर्च अपेक्षित आहे.

तरी वरिल प्रमाणे मंडप व इतर व्यवस्था करुन घेणेकामी येणारे अंदाजे एकुण रु.५.७७ लक्ष मात्रचे अपेक्षित खर्चास व सदरहू कामासाठी वर्तमान पत्रात व संस्थानचे अधिकृत संकेत स्थळावर निविदा सूचना प्रसिध्द करुन सिलबंद निविदा मागविणेस मंजुरी मिळणेस विनंती.

**विभागाचा अभिप्राय :-**पुण्यतिथी उत्सव २०१३ निमित्त साईभक्तांची मोठ्या प्रमाणावर गर्दी होणे अपेक्षित आहे. सदर कालावधीत अवकाळी पाऊन पडण्याचीही शक्याता असते. तरी साईभक्तांचे उन व पावसापासून संरक्षण होणेसाठी वरीलप्रमाणे मंडप व इतर व्यवस्था होणे आवश्यक आहे. तरी त्यासाठी वरीलप्रमाणे येणारे खर्चास व वर्तमानपत्रातील जाहीरातीव्दारे निविदा मागविणेस मंजुरीस्तव सविनय सादर.

**निर्णय क्र.६२९ यावर सविस्तर चर्चा होऊन, उपरोक्त प्रस्तावास मान्यता देण्यात आली.**

(कार्यवाही- बांधकाम विभाग प्रमुख)

---

**विषय नं.१८ डॉ.राम शंकर महाजन (कंत्राटी सोनोलॉजिस्ट) यांना पुढील नेमणूक देणेबाबत.**

**प्रस्ताव-** डॉ राम शंकर महाजन हे श्री साईनाथ रुग्णालयाकडे वैद्यकिय अधिकारी (सोनोलॉजिस्ट) या पदावर कार्यरत होते. यांचे वयास दि. ३१/०८/२०१२ रोजी ६० वर्षे पूर्ण झाल्याने प्रचलीत सेवानियमांनुसार ते दि. ३१/०८/२०१२ चे माध्यान्होत्तर संस्थान सेवेतून निवृत्त झालेले असल्याने सदरचे पद रिक्त आहे. ते भरणेकामी दि. २१/०६/२०१२ रोजी वर्तमान पत्रामध्ये जाहिरात प्रसिध्द करण्यात आली होती. सदरचे जाहिरातीनुसार वैद्यकिय अधिकारी उपलब्ध न झाल्याने मा. त्रिसदस्यीय समितीचे दि. १५/०९/२०१२ रोजीचे सभेतील निर्णय क्र. ७५२ नुसार डॉ. महाजन यांना श्री साईनाथ रुग्णालयाकडे वैद्यकिय अधिकारी (सोनोलॉजिस्ट) या पदावर कंत्राटी पध्दतीने दि. ०१/०९/२०१२ पासून पुढे सहा महिने कालावधीसाठी मासिक रु. ३५,०००/- मानधनावर तात्पुरती नेमणूक करण्यात आली आहे. सदर मुदत दि. २८/०२/२०१३ अखेर संपुष्टात आल्याने व रुग्णालयात सोनोलॉजीस्टची आवश्यकता असल्याने डॉ. महाजन यांना मा. त्रिसदस्यीय समितीचे दि. ०७/०२/२०१३ रोजीचे सभेतील निर्णय क्र. १०९ अन्वये

पूर्वीचेच अटी-शर्तीवर पुढील ०६ महिने कालावधीसाठी नेमणूक देण्यात आली असून त्यानुसार ते दि. ०१/०३/२०१३ रोजी कामावर हजर झालेले आहेत.

त्यानुसार त्यांच्या ०६ महिने नेमणूकीचा कालावधी दि. ३१/०८/२०१३ रोजी संपुष्टात येत असून त्यांनी दि. १४/०६/२०१३ रोजी अर्ज सादर करुन त्यात पुढीलप्रमाणे नमूद केले आहे. जा.नं. एसएसएस/एसएसबीएच/१४९५/ २०१३ दि. २८/०२/२०१३ अन्वये देण्यात आलेली नियुक्ती दि. ३१ ऑगस्ट, २०१३ रोजी संपत आहे. त्यानंतरही मी सेवा देण्यास तयार आहे. सध्या मला रु. ३५,०००/- ऑनररीयम मिळतो. परंतु वाढीव खर्च विचारात घेता रु. ५०,०००/- दरमहा ऑनररीयम मिळावा अशी अपेक्षा आहे. तसेच नेमणूक देतांना ६ महिन्यांऐवजी २ वर्षाची नेमणूक केल्यास मला पुढील नियोजनाच्या दृष्टीने सोईचे होईल. असा अर्ज केला होता. सदर अर्ज निर्णयास्तव मा. त्रिसदस्यीय समितीचे सभेमध्ये सादर करण्यात आला असून सध्या सदरचा प्रस्ताव स्थगीत ठेवणेबाबत निर्णय झालेला आहे.

डॉ. महाजन यांची नेमणूकीची मुदत दि. ३१/०८/२०१३ अखेर संपुष्टात येत आहे. श्री साईनाथ रुग्णालयात स्त्री रोग विभाग व जनरल सर्जरी विभाग सुरु आहे. सदरचे विभाग सोनोग्राफी विभागावर अवलंबून असून दररोज सरासरी ३० ते ४० सोनोग्राफी होत आहेत.

श्री साईबाबा हॉस्पीटलमध्ये सोनोग्राफी विभाग सुरु आहे. परंतु, श्री साईबाबा हॉस्पीटलमध्येही श्री साईनाथ रुग्णालयाइतकेच सोनोग्राफीचे रुग्ण असतात. एका दिवसात दोन्ही रुग्णालयांकडील रुग्णांच्या सोनोग्राफी एका वैद्यकिय अधिकाऱ्याकडून करुन घेणे शक्य होणार नाही.

मा. उच्च न्यायालयाने दि. १३/०८/२०१३ रोजीचे आदेशाने दोन्ही रुग्णालयांमध्ये आवश्यक वैद्यकिय अधिकाऱ्यांची पदे भरणेस मान्यता दिलेली आहे. परंतु, सदरचे प्रक्रियेस साधारणतः दोन ते तीन महिने कालावधी लागण्याची शक्यता आहे. तोपर्यंत रुग्णांची गैरसोय होऊन रुग्णालयाचे सोनोग्राफी संदर्भातील कामकाजावर परिणाम होऊ नये म्हणून डॉ. महाजन याचे जागेवर नवीन सोनोलॉजीस्टची नेमणूक होईपर्यंत पूर्वीचे वेतनावर व अटी-शर्तीवर नेमणूक देणेस मान्यता असावी.

**निर्णय क्र.६३०** **यावर सविस्तर चर्चा होऊन, उपरोक्त प्रस्तावाची नोंद घेण्यात येऊन, प्रस्तावास मान्यता देण्यात आली.**

(कार्यवाही- वैद्यकिय संचालक)

---

**विषय नं.१९** **श्री. रवि आगुस्तीन मुन्तोडे यांचा दि.१२.०६.२०१३ रोजीचा कामावर रुजू होणेबाबतचा अर्ज.**

**प्रस्ताव-** श्री रवि आगुस्तीन मुन्तोडे यांनी दि. १२/०६/२०१३ रोजी अर्ज सादर करुन त्यात पुढीलप्रमाणे नमूद केले आहे. वरील विषयान्वये मी विनंती अर्ज करतो की, मी लिविंग फ्री फाऊंडेशन पूनर्वसन (नशामुक्ती) केंद्र, अलिबाग येथे दि. २४/०८/२०१२ पासून दि. ०९/०६/२०१३ पर्यंत उपचारासाठी भरती झालो होतो. मी आता पूर्णपणे बरा झालो असून आता मी कामावर रुजू होण्यास पूर्णपणे फिट झालो आहे. तरी माझ्या अर्जाचा सहानुभूतिपूर्वक विचार करुन कामावर लवकरात लवकर रुजू करुन घ्यावे, ही आपणास नम्र विनंती.

मा. व्यवस्थापन समितीचे दि. १८/१०/२००८ रोजीचे सभेतील निर्णय क्र. ७६२ अन्वये मुलाखतीत पात्र ठरलेल्या ३७ उमेदवारांना एक वर्षाचे परिविक्षाधीन कालावधीसाठी नेमणूक आदेश देण्यात आले होते. परंतु, बिंदु नामावलीनुसार प्रवर्गातील पुरेसे उमेदवार उपलब्ध न झाल्याने मुलाखतीत पात्र ठरलेल्या उमेदवारांमधून २७ उमेदवारांना ११ महिने कालावधीसाठी तात्पुरते नेमणूक आदेश देण्यात आले होते. असे एकूण ६४ (३७+२७=६४) उमेदवारांना स्टाफ नर्स या पदासाठी नेमणूक आदेश देण्यात आलेले होते. त्यापैकी १४ उमेदवार हजर न झाल्याने त्यांचे नेमणूक आदेश रद्द करुन त्यांचे जागेवर व उर्वरित रिक्त जागांवर मुलाखती घेण्यात आलेल्या प्रतिक्षा यादीतील उर्वरित उमेदवारांना नेमणूक आदेश देण्यात आलेले आहे. सदर उमेदवारांमध्ये श्री रवि आगुस्तीन मुन्तोडे यांचे नावाचा समावेश असून त्यांची श्री साईबाबा हॉस्पीटलकडे स्टाफ नर्स या पदावर जा. नं. एसएसएस/वशी-०१/१८९४३/२००८ दि. २९/१२/२००८ नुसार ११ महिने कालावधीसाठी तात्पुरती नेमणूक करण्यात आली होती. सदर ११ महिन्यांची तात्पुरती नेमणूक संपुष्टात आल्यानंतर त्यांना मा. व्यवस्थापन समितीचे सभेतील निर्णयांनुसार वेळोवेळी ११ महिन्यांची नेमणूक देण्यात आलेली आहे. त्यांना जा.नं. एसएसएस/एसएसबीएच/ एचआर/ ६३५/२०११ दि. ०५/१०/२०११ नुसार एकत्रित मासिक वेतन रु. ११,०००/- वर देण्यात आलेली ११ महिन्यांची नेमणूक दि. ०८/११/२०१२ अखेर पासून संपुष्टात आली आहे.

मुन्तोडे यांनी दि. २०/०९/२०१२ रोजीच्या अर्जाने मी लिव्हींग फ्री फाऊंडेशन पूनर्वसन (नशामुक्ती) केंद्र, अलिबाग येथे दि. २४/०८/२०१२ पासून एक वर्षाच्या कालावधीसाठी भरती झालो असल्याने माझी एक वर्ष कालावधीची वैद्यकिय रजा मंजूर करावी असा अर्ज सादर केला होता. श्री मुन्तोडे दि. १३/०८/२०१२ पासून कामावर हजर नसल्याने कामगार विभागामार्फत त्यांना वेळोवेळी कामावर बोलविण्यात आले होते. परंतु, त्यांनी कामावर न येता दि. २०/०९/२०१२ रोजी वैद्यकिय रजा मागणीचा अर्ज पाठविला होता. श्री मुन्तोडे यांचेबाबत कामगार विभागामार्फत कार्यवाही चालू असल्याने

वैद्यकिय रजा मागणीचा अर्ज पुढील कार्यवाहीसाठी कामगार विभाग (वशी-७ बी) कडे दि. २७/०९/२०१२ रोजी पाठविण्यात आला होता.

तथापि, श्री रवि आगुस्तीन मुन्तोडे यांना जा.नं. एसएसएस/एसएसबीएच/एचआर/६३५/२०११ दि. ०५/१०/२०११ नुसार देण्यात आलेली ११ महिन्यांची नेमणूक दि. ०८/११/२०१२ अखेरपासून संपुष्टात येत असून त्या दिवसापासून त्यांची सेवा आपोआप संपुष्टात येणार असल्याने कामगार विभाग(वशी- ७ बी) चे दि. २२/१०/२०१२ रोजीचे मंजूर टिपणीअन्वये सदरचे प्रकरण दप्तरी दाखल करुन बंद करणेत आलेले आहे.

तरी, श्री रवि आगुस्तीन मुन्तोडे यांना कामावर हजर करुन घेणेबाबतचे दि.१२/०६/२०१३ रोजीच्या अर्जावर निर्णय होणेस विनंती.

**निर्णय क्र.६३१ यावर सविस्तर चर्चा होऊन, श्री. रवि आगुस्तीन मुन्तोडे यांना लेबर कॉन्ट्रॅक्टरमार्फत कंत्राटी पध्दतीने ११ महिने कालावधीसाठी नव्याने नेमणूक देण्यात यावी, असे ठरले.**

(कार्यवाही- वैद्यकिय संचालक)

---

**विषय नं.२० श्री साईबाबा संस्थानचे रुग्णालयाकरीता आवश्यक परिचारक/ परिचारीकांची पदे कंत्राटदारामार्फत कंत्राटी पध्दतीने भरणेबाबत.**

**प्रस्ताव-** श्री साईनाथ रुग्णालय व श्री साईबाबा हॉस्पीटलसाठी बिंदुनामावलीनुसार एकुण १०० पदे स्थायी पध्दतीने भरणेकामी मा. त्रिसदस्यीय समितीचे दि. २६/०२/२०१३ रोजीचे सभेमध्ये प्रस्ताव सादर करण्यात आला होता.

सदर प्रस्तावावर चर्चा होऊन, श्री साईबाबा व श्री साईनाथ या रुग्णालयांकरीता आवश्यक असलेले परिचारक/ परिचारीकांची रिक्त पदे भरणेकामी मा. मुंबई उच्च न्यायालयाचे औरंगाबाद खंडपीठामध्ये संस्थान वकीलामार्फत अर्ज सादर करुन खंडपीठाची पूर्व मान्यता घेण्यात येऊन मान्यतेनंतर कार्यवाही करण्यात यावी, असे ठरले आहे.

उपरोक्त निर्णयानुसार, संस्थानचे विधी विभागामार्फत मा. मुंबई उच्च न्यायालयाचे औरंगाबाद खंडपीठामध्ये सिव्हील ॲप्लीकेशन दाखल करण्यात आले होते. सदर ॲप्लीकेशनवर दि. ०२/०८/२०१३ रोजी चर्चा होऊन, न्यायालयाने खालीलप्रमाणे आदेश दिलेला आहे.

For the present, we are of the view that hospital administration may continue to take services of Staff Nurses on contract basis. The issue could be considered at a later point of time.

उपरोक्तप्रमाणे रुग्णालयांसाठी आवश्यक स्टाफ नर्स कंत्राटी पध्दतीने घेण्यात यावेत, असा मा. मुंबई उच्च न्यायालयाचे औरंगाबाद खंडपीठाने आदेश दिलेला आहे.

संस्थानचे दोन्ही रुग्णालयांत ११ महिने कालावधीसाठी एकूण १८ स्टाफ नर्स कार्यरत आहेत. उपरोक्त तक्त्यात या १८ स्टाफ नर्सचा समावेश करुन एकूण १०० जागांची मागणी केलेली आहे. आता सदरच्या जागा कंत्राटी पध्दतीने भरणेबाबत मा. मुंबई उच्च न्यायालय औरंगाबाद खंडपीठाने आदेश दिलेला असल्याने १८ स्टाफ नर्स व्यतिरिक्त ८२ स्टाफ नर्स ह्या कंत्राटी पध्दतीने भराव्या लागतील. सध्या कंत्राटदारामार्फत कार्यरत असलेल्या स्टाफ नर्स यांना मासिक पध्दतीने प्रतिमाह रु. ११,०००/- मेहनताना देण्यात येत आहे.

तरी, उपरोक्त नमुद केलेप्रमाणे ११ महिने कालावधीसाठी कार्यरत असलेल्या १८ स्टाफ नर्स व्यतिरिक्त ८२ स्टाफ नर्सच्या जागा मा. मुंबई उच्च न्यायालय औरंगाबाद खंडपीठाचे आदेशानुसार कंत्राटी पध्दतीने कंत्राटदारामार्फत भरणेबाबत निर्णय होणेस विनंती.

**निर्णय क्र.६३२ यावर सविस्तर चर्चा होऊन, श्री साईबाबा संस्थानचे रुग्णालयाकरीता भरावयाची परिचारक/ परिचारीकांची पदे, मा. मुंबई उच्च न्यायालय औरंगाबाद खंडपीठाचे आदेशानुसार कंत्राटी पध्दतीने कंत्राटदारामार्फत भरणेत यावी, असे ठरले.** (कार्यवाही- वैद्यकिय संचालक)

---

**विषय नं.२१ श्री साईनाथ रुग्णालयातील ऑप्थल ओ.टी. विभागाकरीता जुने Phacoemulsification Machine परत (Buyback) करुन नवीन मशिन खरेदीबाबत.**

**प्रस्ताव-** **अधिनियम २००४ मधील तरतुद :-** १७ (४)

**प्रस्ताविकः-** श्री साईनाथ रुग्णालयातील ऑप्थल ओ.टी विभागात Phacoemulsification Machine हे मोतीबिंदु शस्त्रक्रिया करण्यासाठी आवश्यक असते. त्यांचेकडे असलेले Phacoemulsification Machine हे M/s. Alcon या कंपनीकडुन सन २००६ साली रक्कम रु. २३,००,०००/- इतक्या रक्कमेत खरेदी केलेले होते परंतु सदर मशिनचे M/s. Alcon कंपनीने उत्पादन बंद केलेले असल्यामुळे सदर मशिनचे Spare Part बाजारात मिळणार नाही असे त्यांनी दि.१२/०१/२०१२ (प्राप्त दि.२३/०१/२०१३) चे पत्रान्वये कळविले आहे. त्यामुळे सदर मशिन परत (Buyback) करुन नविन मशिन खरेदी करणेबाबत त्याचे मागणी पत्रावर बायोमेडीकल विभागाने शिफारस केलेली आहे.

सदरचे Phacoemulsification Machine मशिन खरेदीकामी ०३ अधिकृत विक्रेते/ पुरवठाधारक यांचेकडुन इकडील पत्र क्र. ७२७ दि.१०/०५/२०१३ अन्वये अंदाजे खर्चासाठी दरपत्रक मागविण्यात आले होते. त्यानुसार M/s. Omni Lens Pvt. Ltd., Ahmedabad व M/s. KLB Instruments Co. Pvt. New Delhi यांनी दरपत्रक कळविलेले आहे. त्यास वापर करणारे डॉ. सोनटक्के यांना दाखवुन M/s. Omni Lens Pvt. Ltd., Ahmedabad यांचे मशिन चांगल्या असले बाबत कळविले आहे. त्यांचे दरानुसार सदर Phacoemulsification Machine खरेदीकामी रु. १०,५०,०००/- इतका खर्च अपेक्षित आहे.

तरी सदर ०१ नग Phacoemulsification Machine विहीत पध्दतीने निविदा मागवुन खरेदीस व याकामी येणाऱ्या रु. १०,५०,०००/- चे खर्चास तसेच जुने मशिन (Buyback ) परत करता येईल. सदर मशिनची घसारा वजा जाता किंमत दि.३१/०३/२०१३ अखेर रु. ३०७०१२.९४ इतकी आहे.

**मागणी :-** सध्या असलेल्या मशिनचे कंपनीने उत्पादन बंद झालेले आहे व त्याचे Spare Part बाजारात मिळत नाही. त्यामुळे त्यांनी ०१ नगाची मागणी केलेली आहे.

**संस्थान अधिनियम / ठराव यानुसार छाननी, शासन निर्देश, तांत्रिक, कायदेशीर तसेच आर्थिक विषय इ. छाननी करुन अनुमान :-**

१) अधिनियमातील समितीचे कर्तव्ये व अधिकार क्र. १७-२ (ण) अन्वये मानवजातीच्या कल्याण करणाऱ्या किंवा मानवाला आपत्तीमध्ये साहय्य करणाऱ्या अन्य कोणत्याही उदात्त कार्यास चालना देईल असा आहे. त्यानुसार संस्थानतर्फे ०२ धर्मादाय रुग्णालय चालविण्यात येतात.

२) सदर मशिनची घसारा वजा जाता येणारी किंमत ही रक्कम रु. ५०,०००/- पेक्षा जास्त आहे. त्यामुळे संस्थान अधिनियम क्र. १७-४ अन्वये ते परत (Buyback) करणेपुर्वी राज्य शासनाची मशिन परत करणेस मान्यता घेण्याकामी राज्य शासनाकडे प्रस्ताव पाठवता येईल.

**विभागाचा अभिप्राय/ स्पष्ट मत:-** ऑप्थल ओ.टी विभागातील दैनंदिन कामाची गैरसोय होऊ नये म्हणून मागणी केल्याप्रमाणे ०१ नग Phacoemulsification Machine विहीत पध्दतीने निविदा मागवुन खरेदी करण्यास हरकत नाही.

तरी सदर प्रस्तावास मान्यता असावी.

**निर्णय क्र.६३३** **यावर सविस्तर चर्चा होऊन, श्री साईनाथ रुग्णालयाच्या ऑप्थल ओ.टी विभागाकरिता ०१ नग Phacoemulsification Machine खरेदीकामी विहीत पध्दतीने निविदा मागवून त्यात नवीन मशिनचे दर व जुने Phacoemulsification Machine परत (Buyback) करणे यासाठीचे दर मागविणेत यावेत. तसेच, जुन्या Phacoemulsification Machine चा वापर चालु ठेवणेत यावा, असे ठरले.** (कार्यवाही- वैद्यकिय संचालक)

---

**विषय नं.२२** **श्री साईबाबा रुग्णालयाकरीता नविन झेरॉक्स मशिन खरेदी व जुने मशिन परत (Buyback) करणेबाबत.**

**प्रस्ताव-** **अधिनियम २००४ मधील तरतुद :-** १७ (२) ण, १७ (४)

**प्रस्ताविक:-** श्री साईबाबा रुग्णालयातील अधिक्षक कार्यालयात श्री साईनाथ रुग्णालय, कन्या शाळा, वाहन विभागातील कार्यालयीन झेरॉक्स काढण्याकरिता एक झेरॉक्स मशिन सध्या कार्यरत आहे. सदर मशिन हे सन २००६ साली रु.१,५,००००/- इतक्या रक्कमेत खरेदी केलेले असून त्याचा वॉरंटी कालावधी संपलेला आहे सदर मशिन हे वार्षीक सर्व्हीस कॉन्ट्रक्टमध्ये आहे. परंतु दरवर्षी वार्षीक सर्व्हीस कॉन्ट्रक्टसाठी १६८५४/- इतका खर्च येतो. सदर मशिनचे आयुष्य हे साधारणत: ६ ते ७ वर्षे इतके असते.

उपरोक्त विभागातील झेरॉक्स काढण्याचे काम सदर मशिन वर चालते. परंतु सदर मशिन वारंवार बंद पडत आहे. त्यामुळे झेरॉक्स काढण्यासाठी मेनऑफिसमध्ये जावे लागते त्यामुळे वेळ जास्त लागुन कामाल विलंब होतो. त्यामुळे नविन ३० p.p.m मशिन खरेदी करणेबाबत व जुने मशिन परत (Buyback) करणेबाबत त्याच मागणीपत्रावर बायोमेडीकल विभागाने शिफारस केलेली आहे. जुने मशिनची घसारा वजा जाता येणारी किंमत रक्कम रु.२०४४१.७२ इतकी आहे.

सदरचे ३० p.p.m झेरॉक्स मशिन खरेदीकामी M/s. Sai Automation, Ahmednagar यांचेकडुन दुरध्वनीद्वारे अंदाजे खर्चासाठी दरपत्रक मागविण्यात आले होते त्यानुसार त्यांनी त्यांचे दि.०५/०७/२०१३ पत्रान्वये दर कळविलेले आहे. त्याचे दरानुसार सदर झेरॉक्स मशिन खरेदीकामी रु.२,४३,३९०/- इतका खर्च अपेक्षित आहे.

तरी १ नग झेरॉक्स मशिन विहीत पध्दतीने कोटेशन मागवुन खरेदीस व याकामी येणाऱ्या रक्कम रु.२,४३,३९०/- चे खर्चास मान्यता असावी.

**मागणी:-** सध्या त्यांच्याकडे असलेले मशिन वारंवार बंद पडत असल्यामुळे त्यांनी ०१ नगाची मागणी केलेली आहे.

**संस्थान अधिनियम / ठराव यानुसार छाननी, शासन निर्देश, तांत्रिक, कायदेशीर तसेच आर्थिक विषय इ. छाननी करुन अनुमान :-**

१. अधिनियमातील समितीचे कर्तव्ये व अधिकार क्र. १७-२ (ण) अन्वये मानवजातीच्या कल्याण करणाऱ्या किंवा मानवाला आपत्तीमध्ये साहय्य करणाऱ्या अन्य कोणत्याही उदात्त कार्यास चालना देईल असा आहे. त्यानुसार संस्थानतर्फे ०२ धर्मादाय रुग्णालय चालविण्यात येतात.

२. सदर मशिनची घसारा वजा जाता येणारी किंमत रु.२०४४१.७२ इतकी आहे. सदर किंमत ५०,०००/- पेक्षा कमी असल्यामुळे महाराष्ट्र शासनाची मान्यता घेण्याची गरज नाही.

**विभागाचा अभिप्राय/ स्पष्ट मत :-** दोन्ही रुग्णालयात, वाहन विभाग, इंग्लिश मेडीयम स्कुल व कन्या विदया मंदिर इत्यादी विभागाचे झेरॉक्स कामकाज सदर मशिनवर चालते. त्यामुळे झेरॉक्सची गैरसोय होऊ नये म्हणून वरील मागणी केल्याप्रमाणे ०१ नग झेरॉक्स मशिन विहीत पध्दतीने कोटेशन मागवुन खरेदी करण्यास हरकत नाही.

तरी सदर प्रस्तावास मान्यता असावी.

**निर्णय क्र.६३४ यावर सविस्तर चर्चा होऊन, श्री साईबाबा रुग्णालयाकरीता नविन झेरॉक्स मशिन खरेदीकामी व जुने मशिन परत (Buyback) करणे, अशा दोन्हीही साठी दरांची विहीत पध्दतीने कोटेशन मागविणेत यावी, असे ठरले.** (कार्यवाही- वैद्यकिय संचालक)

---

**विषय नं.२३ एम.आर.आय. मशिन (Magnetom Avanto) चे वार्षीक सर्व्हीस कॉन्ट्रॅक्ट करणेबाबत.**

**प्रस्ताव-** श्री साईबाबा हॉस्पिटलचे रेडीओलॉजी विभागाकरीता पुरवठा आदेश क्र. १५८९५/२००६,दि.१३/११/०६ अन्वये मे. सिमेन्स लि. मुंबई, यांचेकडून Magnetom Avanto मशीन एकुण रू. ५,०५,००,०००/- इतक्या रकमेत खरेदी करण्यात आले आहे. सदरचे मशिन दि. १/०६/०७ रोजी कार्यान्वित करण्यात आले असून कंपनीने मशीनकरीता दिलेला वॉरंटी कालावधी दि. ३१/०५/२००९ रोजी संपला आहे. मशीन खरेदी करतेवेळी झालेला ठराव, कंपनीसोबत करण्यात आलेले ॲग्रीमेंट आणि कंपनीस दिलेल्या पुरवठा आदेशातील अटीनुसार पुढील कालावधीतील दुरुस्ती व देखभालीकरीता वार्षिक CMC (Comprehensive Maintenance Contract) करणेबाबत खालीलप्रमाणे निर्णय झालेला आहे.

'मशिनचा वॉरंटी कालावधी दोन वर्षाचा असून तो संपुष्टात आल्यानंतर कंपनीकडे CMC कॉम्प्रेहेन्सीव मेंटेनन्स सर्व्हीस कॉन्ट्रॅक्ट करण्यात यावे. तसेच याकामी कंपनीस पहिल्या वर्षी २० लाख रूपये व त्यानंतर पुढील प्रत्येक वर्षास २० लाख अधिक ५ टक्के याप्रमाणे दरवर्षी ५ टक्के वाढ करून सदर CMC साठी आगाऊ रक्कम देण्यात यावी आणि सर्व्हीस टॅक्स वेगळा देण्यात यावा असे ठरले आहे.'

मे. सिमेन्स लि.,मुंबई,यांचेशी पुरवठा आदेशानुसार वॉरंटी कालावधी संपलेनंतर आजपावेतो चार वर्षात CMC चा करार करून वरील निर्णयाप्रमाणे रक्कम अदा करण्यात आली आहे.

कंपनीने मागिल वर्षी नियमीत व तातडीच्या दुरुस्ती व देखभालीकरीता एकुण ४४ वेळा भेटी देउन मागील एक वर्षांत अंदाजे रु. ४३,११,२२२/- इतक्या रकमेचे स्पेअर पार्ट बदलले आहेत (संदर्भ परीशिष्ट "अ").

सध्या दि. ०१/०६/२०१३ ते दि. ३१/०५/२०१४ या कालावधीसाठी MRI मशीनचे CMC करणेकरीता करारनाम्यानुसार मे. सिमेन्स ली. मुंबई यांना (+५% वाढ व सर्व्हीस टॅक्स १२.३६%सह) एकुण रू.२७,३१,४८६/- इतकी रक्कम देय होत आहे. कंपनीने त्यानुसार करारनामा पाठविला आहे.

सदर कालावधीत कंपनीचे इंजिनिअर वर्षातून ०४ नियमित भेटी देणार असून जेव्हा जेव्हा मशिन नादुरूस्त होईल तेव्हा तेव्हा येऊन दुरुस्ती व देखभाल आणि आवश्यकतेनुसार सॉफ्टवेअर/हार्डवेअर सेफ्टी अपडेट करणार आहेत. वरील कॉन्ट्रक्टमध्ये मशिनचे हेलीयम गॅस रिफीलींग व कोल्ड हेड सारख्या महागडया पार्टसह सर्व स्पेअर पार्टचा तसेच मशिनसोबत पुरविण्यात आलेल्या यु.पी.एस, चिलर प्लांट यांची देखील सर्व स्पेअर पार्टसह दुरूस्ती व देखभाल करणार आहे.

पुढील काळात ते व्यवस्थित कार्यान्वित राहणे कामी तसेच मागील चार वर्षात कंपनीस अदा केलेली रक्कम व त्यांनी केलेला अंदाजे खर्च या बाबींचा विचार करता संस्थानला सद्यस्थितीत मशिनचे कॉम्प्रेहेन्सीव्ह वार्षिक सर्व्हिस कॉन्ट्रॅक्ट करणे जास्त फायदेशीर राहील. कारण जसजसे मशिन जुने होत जाते तसतसे दुरूस्तीचा खर्च देखील वाढत जातो. कंपनीने वरील पुरवठा आदेशातील अटीनुसार CMC करणेसाठी एकूण १०० % रक्कमेची आगाउ मागणी केलेली आहे.

सदर मशिन नियमित वापरात असून दररोज अंदाजे ३६ रूग्णांची तपासणी करण्यात येते. यानुसार सदर मशीनवर दरवर्षी अंदाजे १३,०५० पेशंटचे एम.आर.आय. स्कॅन होत आहे (संदर्भ परीशिष्ट "ब"). त्याकरीता सदरचे मशीन नेहमी अद्यावत ठेवणे आवश्यक आहे.

तरी Magnetom Avanto MRI मशीनचे मे. सिमेन्स ली. मुंबई यांचेकडे दि. ०१/०६/२०१३ ते दि. ३१/०५/२०१४ या कालावधीसाठी कॉम्प्रेहेन्सीव्ह वार्षिक सर्व्हिस कॉन्ट्रॅक्ट करणेस व त्यासाठी येणाऱ्या सर्व करांसहीत एकुण रु. २७,३१,४८६/-च्या खर्चास आणि सदरची रक्कम कंपनीस आगाउ पाठविणेस मान्यता असावी.

**निर्णय क्र.६३५ यावर सविस्तर चर्चा होऊन, Magnetom Avanto MRI मशीनचे मे. सिमेन्स ली. मुंबई यांचेकडे दि. ०१/०६/२०१३ ते दि. ३१/०५/२०१४ या कालावधीसाठी कॉम्प्रेहेन्सीव्ह वार्षिक सर्व्हिस कॉन्ट्रॅक्ट करणेस व त्यासाठी येणाऱ्या सर्व करांसहीत एकुण रु. २७,३१,४८६/- मात्रचे खर्चास आणि सदरची रक्कम कंपनीस आगाउ पाठविणेस मान्यता देण्यात आली.**

(कार्यवाही- वैद्यकिय संचालक )

---

**विषय नं.२४ टिस्स्यू प्रोसेसर मशिनची मोटार खरेदीबाबत.**

**प्रस्ताव-** श्री साईनाथ रूग्णालयामधील पॅथोलॉजी लॅब विभागाकरीता मे.जे.एस.पी. सर्जीकल, नाशिक यांचेकडुन M/s. Labcon Scientific Instruments Pvt. Ltd. Mumbai या कंपनीचे एक Automatic Tissue Processor(Model- Microm STP१२०-१) मशिन एकुण रु. ९,४९,३७५/- इतक्या रकमेत खरेदी करण्यात आले आहे. सदर मशिन दि. २१/११/२००६ रोजी कार्यान्वीत करण्यात आले असून कंपनीने दिलेला एक वर्षाचा वॉरंटी कालावधी दि. २०/११/२००७ रोजी संपला आहे. सदर मशिनचे नियमीत दुरुस्ती व देखभाल करणेसाठी दि. ०१/०४/२०१३ ते दि. ३१/०३/२०१४ या कालावधीकरीता एकुण रू १४,२४६/- इतक्या रकमेत वार्षिक सर्व्हिस कॉन्ट्रॅक्ट करणेत आले आहे. सदर AMC कालावधीमध्ये दुरुस्ती व देखभालीकरीता आवश्यक असणारे स्पेअर पार्टस् व कंझ्युमेबल किंमत संस्थानला वेगळी अदा करावयाची आहे.

उपरोक्त मशिन व्यवस्थीत काम देत नसल्याचे सदर विभागाने त्याचे पत्र दि. ०८/०७/२०१३ अन्वये कळविले आहे. त्यानुसार कंपनी इंजिनीअर त्यांचे तातडीने भेटी करीता आले असता त्यांनी मशिनची तपासणी करून त्यांचे सर्व्हीस रिपोर्ट दि. १२/०६/१३ अन्वये Vertical Motor खराब झाल्यामुळे बदलण्याची आवश्यकता असल्याचे कळविले आहे. त्यासाठी कंपनीने त्यांचे पत्र क्र. LSIPL/Proforma /१७८/१३-१४, दि. २७/०६/२०१३ अन्वये सर्व करांसहीत एकुण रु. ६४,०१८/- (अक्षरी रु. चौसष्ट हजार अठरा मात्र) इतक्या रकमेचे कोटेशन पाठविले आहे. उपरोक्त मोटार करीता कंपनी सहा महिन्यांची वॉरंटी देत आहे. सदर Tissue Processor मशिनचे स्पेअर पार्ट करीता M/s. Labcon Scientific Instruments Pvt. Ltd. Mumbai, हे एकमेव पुरवठाधारक आहेत.

तरी M/s. Labcon Scientific Instruments Pvt. Ltd. Mumbai, यांचेकडुन Tissue Processor मशिनची मोटार बदलुन घेणेस व त्यासाठी येणाऱ्या एकुण रु. ६४,०१८/- चे खर्चास मान्यता असावी.

**निर्णय क्र.६३६ यावर सविस्तर चर्चा होऊन, श्री साईनाथ रूग्णालयाच्या पॅथोलॉजी लॅब विभागामधील टिस्स्यू प्रोसेसर मशिनची मोटार M/s. Labcon Scientific Instruments Pvt. Ltd. Mumbai यांचेकडून बदलुन घेणेस व याकामी येणाऱ्या रु.६४,०१८/- मात्रचे खर्चास मान्यता देण्यात आली.**

(कार्यवाही- वैद्यकिय संचालक)

---

**विषय नं.२५ श्री साईबाबा हॉस्पिटलमधील प्रयोगशाळा विभागातील Fully Automatic Biochemisty Analyser मशिनकरीता केमीकल्स खरेदीबाबत.**

**प्रस्ताव-** दि.०८/१२/२०१२ रोजीचे मा.त्रीसदस्य समिती सभेत श्री साईबाबा रुग्णालयातील प्रयोगशाळा विभागाकरीता Fully Automated Clinical Bio-Chemistry Analyzer Machine - 01 नग M/s. Trivitron Healthcare Pvt.Ltd., Mumbai यांचेकडून खरेदी करण्यास व याकामी येणाऱ्या रु.१०,३५,५००/- चे खर्चास मान्यता मिळालेली होती, त्यानुसार त्यांना इकडील पत्र क्र. ८६३० दि.०२/०२/२०१३ अन्वये पुरवठा आदेश देण्यात आला होता. त्यानुसार M/s. Trivitron Healthcare Pvt.Ltd., Mumbai यांनी मशिनचा पुरवठा केलेला असून मशिन कार्यान्वित करुन दिलेले आहे. सदर मशिनसोबत सदर मशिनसाठी लागणारी केमीकल्स मशिनसोबत मोफत प्राप्त झालेली होती. सदरचे केमीकल्स संपल्यामुळे प्रयोगशाळा विभागाने डी.पी.क्र.१०३६ दि.२९/०६/२०१३ अन्वये खालीलप्रमाणे केमीकल्सची मागणी केलेली आहे.

| Sr. No. | Name of Chemicals | Qty. |
|---|---|---|
| 1 | CS-Anti bacterial Phosphor free detergent 500ml/Bot | 25 |
| 2 | CS-Alkaline detergent 2Ltr/Bot | 25 |
| 3 | Reagent Pack + Septum | 30 |
| 4 | Cleaning Solution (50ml) | 6 |
| 5 | Conditioning Solution (100ml) | 6 |

वरीलप्रमाणे केमीकल्स खरेदीकामी अंदाजे खर्चासाठी M/s. Trivitron Healthcare Pvt. Ltd., Mumbai यांचेकडून दरपत्रक मागविण्यात आले होते. त्यांचे दरपत्रकानुसार तुर्तास खालीलप्रमाणे केमीकल्स खरेदीकामी अंदाजे रक्कम रु.४,३३,२००/- इतका खर्च अपेक्षित आहे. त्याचा तपशिल खालीलप्रमाणे-

| Sr. No. | Name of Chemicals | Qty. | App.Rate per in Rs. | Total Amt. in Rs. |
|---|---|---|---|---|
| 1 | CS-Anti bacterial Phosphor free detergent 500ml/Bot | 12 | 7750.00 | 93000.00 |
| 2 | CS-Alkaline detergent 2Ltr/Bot | 12 | 7750.00 | 93000.00 |
| 3 | Reagent Pack + Septum | 14 | 15300.00 | 214200.00 |
| 4 | Cleaning Solution (50ml) | 3 | 5500.00 | 16500.00 |
| 5 | Conditioning Solution (100ml) | 3 | 5500.00 | 16500.00 |
| | | **Total Amt. in Rs.** | | **4,33,200.00** |

तरी श्री साईबाबा हॉस्पिटलमधील प्रयोगशाळा विभागातील Fully Automatic Biochemisty Analyser मशिनकरीता केमीकल्स विहित पध्दतीने कोटेशन मागवून खरेदीस व याकामी येणाऱ्या रक्कम रु.४,३३,२००/- चे अंदाजे खर्चास मान्यता असावी.

**निर्णय क्र.६३७ यावर सविस्तर चर्चा होऊन, श्री साईबाबा हॉस्पिटलच्या प्रयोगशाळा विभागातील Fully Automatic Biochemisty Analyser मशिनकरीता आवश्यक असलेले केमीकल्स विहित पध्दतीने कोटेशन मागवून खरेदी करणेस व याकामी येणाऱ्या अंदाजे रक्कम रु.४,३३,२००/- मात्रचे खर्चास मान्यता देण्यात आली.** (कार्यवाही- वैद्यकिय संचालक)

---

**विषय नं.२६ श्री साईनाथ रुग्णालयाकरीता Medicine Trolley (Crash Cart Trolley) खरेदीबाबत.**

**प्रस्ताव- अधिनियम २००४ मधील तरतुद :-** १७ (२) ण

**प्रस्ताविक:-** श्री साईनाथ रुग्णालयातील ICCU विभागाने ०१ नग Medicine Trolley ची मागणी केलेली आहे. कारण त्यांच्याकडे असलेल्या Medicine Trolley चे व्हील हे वापरुन खराब झालेले आहे. त्यामुळे दैनंदिन कामकजाता अडचणी येतात. तसेच कॅज्युअल्टी विभागात Medicine Trolley नसल्यामुळे त्यांनी ०१ नवीन Trolley ची मागणी केलेली आहे.

मा. त्रिसदस्य समिती सभा दि. ०८/१२/२०१२ रोजी निर्णय क्र. ९६९ मंजुरीन्वये सध्या श्री साईबाबा रुग्णालयाकरिता अशाच प्रकारच्या ०१ नग Medicine Trolley ब्लड बँक विभागाकरिता M/s. Unitech Steel Engineering, Miraj यांचेकडुन प्रति नग रक्कम रु.२०३५०- याप्रमाणे खरेदीस मान्यता मिळालेली आहे. व त्यानुसार ०१ नग Medicine Trolley M/s. Unitech Steel Engineering, Miraj यांना इकडील पत्र क्र. ८८४१ दि.१६/०२/२०१३ अन्वये प्रति नग रु. २०३५०/- प्रमाणे पुरवठा आदेश देण्यात आलेल आहे. तेव्हा सदर विभागाकरिता लागणाऱ्या Medicine Trolley वरील मंजुर दराने खरेदी करता येतील.

उपरोक्त मंजुर दराने ०२ नग Medicine Trolley खरेदीकामी प्रति नग रु. २०३५०/- याप्रमाणे ०२ नग Medicine Trolley खरेदीकामी रक्कम रु. ४०७००/- इतका खर्च येईल.

**मागणी:-** सध्या ICCU विभागाकडे असलेल्या Medicine Trolley चे व्हील खराब झालेले असल्याने त्यांनी ०१ नगाची मागणी केलेली आहे तसेच Casualty विभागाकडे Medicine Trolley नसल्याने त्यांनी ०१ नग नवीन Medicine Trolley ची मागणी केलेली आहे.

**संस्थान अधिनियम/ ठराव यानुसार छाननी, शासन निर्देश, तांत्रिक, कायदेशीर तसेच आर्थिक विषय इ. छाननी करुन अनुमान:-** अधिनियमातील समितीचे कर्तव्ये व अधिकार क्र. १७-२ (ण) अन्वये मानवजातीच्या कल्याण करणाऱ्या किंवा मानवाला आपत्तीमध्ये साहय्य करणाऱ्या अन्य कोणत्याही उदात्त कार्यास चालना देईल असा आहे. त्यानुसार संस्थानतर्फे ०२ धर्मादाय रुग्णालय चालविण्यात येतात.

**विभागाचा अभिप्राय / स्पष्ट मत:-** दैनंदिन कामकाज करतांनी गैरसोय होऊ नये म्हणून वरील मागणी प्रमाणे मंजुर दराने Medicine Trolley ०२ नग खरेदी करता येईल.

तरी सदर प्रस्तावास मान्यता असावी.

**निर्णय क्र.६३८ यावर सविस्तर चर्चा होऊन, श्री साईनाथ रुग्णालयाकरीता आवश्यक असलेली ०२ नग Medicine Trolley (Crash Cart Trolley) खरेदी करणेस व याकामी येणाऱ्या रु.४०,७००/- मात्रचे खर्चास मान्यता देण्यात आली.** (कार्यवाही- वैद्यकिय संचालक)

---

**विषय नं.२७ तातडीने केलेल्या औषधांचे खरेदीस व खर्चास मंजूरी मिळणेबाबत. (माहे- मे- २०१३)**

**प्रस्ताव- व्यवस्थापन समितीचा ठराव क्र.:-** १) मा. व्यवस्थापन समिती सभा दि. २६/०३/२०११ निर्णय क्र.२५४ अन्वये वैद्यकिय संचालक यांना दरमहा रु.१,५०,०००/- पर्यंत तातडीचे औषधे खरेदी करुन बीले अदा करणेत यावी व रु.१,५०,०००/- पेक्षा जास्त रक्कम झाल्यास त्याचे खरेदी करुन बीले अदा करुन नोंद घेण्यासाठी मा. व्यवस्थापन समिती सभेपुढे ठेवावे असे ठरले आहे,

२) मा. त्रिसदस्य समिती सभा दि. १७/०४/२०१३ निर्णय क्र.३४१ अन्वये राजीव गांधी जीवनदायी योजने अंतर्गत अंतरुग्ण व बाह्यरुग्ण विभागात उपचार घेणाऱ्या रुग्णांसाठी उपलब्ध नसलेली औषधे संस्थान मार्फत स्थानिक विक्रेत्यांकडून खरेदी करुन द्यावे असे ठरले आहे.

**प्रस्ताविक :-** श्री साईबाबा व श्री साईनाथ रुग्णालयाचे ऑपरेशन थिएटर विभाग, प्रयोगशाळा विभाग इत्यादी विभागाकरीता सर्जिकल मटेरीयल, औषधे, केमीकल्स इत्यादीची तातडीने आवश्यकता होती. सदर मटेरीयल नाशिक, पुणे, कोपरगाव व श्रीरामपूर येथून खरेदी केलेली आहेत. सदर औषधे/ केमिकल/ सर्जिकल साहीत्य आपणाकडे उपलब्ध नसल्यामुळे ती तातडीने खरेदी करणे गरजेचे होते. त्यासाठी रु. ५६६९/- मात्र खर्च आलेला आहे. सदरची खरेदी ही माहे- मे मध्ये केलेली आहे.

सदरची खरेदी ही वैद्यकिय संचालक यांना दरमहा रु.१,५०,०००/- चे तरतूदी व्यतीरिक्त रक्कम रु. ५६६९/- इतक्या रक्कमेची औषधे खरेदी करण्यात आलेली आहे.

वार्षिक पुरवठा आदेशातील जी औषधे पुरवठाधारकांनी पुरवठा केलेली नाही ती तातडने दुसऱ्या पुरवठाधारकाकडून खरेदी करुन जास्तीची फरकाची रक्कम संबंधीत पुरवठाधारकाकडून वसूल केलेली आहे.

**मागणी :-**

| Sr. No. | Name of Party | Bill No. | Date | Total Amt. in Rs. | Requirement |
|---|---|---|---|---|---|
| 1 | M/s. Keps Pharma, Mumbai | 194 | 26/04/2013 | 5669.00 | All Ward Saibaba Hospital |
| | **Total Amt. in Rs.** | | | **5669.00** | |

**संस्थान अधिनियम/ ठराव यानुसार छाननी, शासन निर्देश, तांत्रिक, कायदेशीर तसेच आर्थिक विषय इ. छाननी करुन अनुमान:-**

अधिनियमातील समितीचे कर्तव्ये व अधिकार क्र. १७-२ (ण) अन्वये मानवजातीच्या कल्याण करणाऱ्या किंवा मानवाला आपत्तीमध्ये साहय्य करणाऱ्या अन्य कोणत्याही उदात्त कार्यास चालना देईल असा आहे. त्यानुसार संस्थानतर्फे दोन धर्मादाय रुग्णालय चालविण्यात येतात

**विभागाचा अभिप्राय/ स्पष्ट मत :-**राजीव गांधी योजने अंतर्गत असलेल्या रुग्णांना लागणारी सर्व औषधे संस्थान रुग्णालयातून पुरवली जातात त्यांना बाहेरील औषध दुकानातून औषधे लिहून दिली जात नाही. तसेच तातडीच्या प्रसंगी उपलब्ध नसलेली औषधे देखील स्थानिक विक्रेत्यांकडून खरेदी करावी लागतात. त्यानूसार सदर खरेदी करुन बीले अदा करण्यात आलेली आहे.

तरी नोंद घेण्यासाठी सविनय सादर.

**निर्णय क्र.६३९** **यावर सविस्तर चर्चा होऊन, उपरोक्त प्रस्तावाची नोंद घेण्यात येऊन, प्रस्तावास कार्योत्तर मान्यता देण्यात आली.** (कार्यवाही- वैद्यकिय संचालक)

---

**विषय नं.२८** **श्री साईबाबा रुग्णालयातील विविध वॉर्ड/ विभागाकरीता (Cupboard) कपाट खरेदीबाबत.**

**प्रस्ताव-** **प्रस्ताविक:-** श्री साईबाबा रुग्णालयातील विविध वॉर्ड / विभागात कार्यालयीन साहित्य लिनन साठा कंन्झमशन रजिष्टर इ. ठेवण्याकरिता (Cupboard) कपाटाची आवश्यकता असते. त्यामुळे सर्व वॉर्ड/ विभागाने दि.२२/०६/२०१३ (औषध भांडार प्राप्त दि.०५/०७/२०१३) रोजीचे मागणी पत्रान्वये मागणी केलेली आहे. सध्या त्यांचेकडे असलेले कपाट त्यांना साहित्य ठेवणेकामी अपुरे पडत आहे त्यामुळे त्यांनी नविन २० नग कपाटांची मागणी केलेली आहे.

| Sr. No. | Name of Items | Qty. | Rate Per in Rs. Incl. of all Taxes | Total Amt. in Rs. |
|---|---|---|---|---|
| **1.** | **S S Cupboard 6 Feet**- Cupboard Stainless Steel Storewel Plain with 4 shelves (Welded) Size:916W x 485D x 1981 H (mm) Gauge of Steel 18. | 20 | 16299.00 | **325980.00** |

उपरोक्त २० नग कपाट खरेदीकामी अंदाजे रु. ३,२५,९८०/- इतका खर्च अपेक्षित आहे.

**मागणी :-** सर्व वॉर्ड/ विभागाने दि.२२/०६/२०१३ (औषध भांडार प्राप्त दि.०५/०७/२०१३) रोजीचे मागणी पत्रान्वये २० नग कपाटाची मागणी केलेली आहे.

**संस्थान अधिनियम/ ठराव यानुसार छाननी, शासन निर्देश, तांत्रिक, कायदेशीर तसेच आर्थिक विषय इ. छाननी करुन अनुमान:-** अधिनियमातील समितीचे कर्तव्ये व अधिकार क्र. १७-२ (ण) अन्वये मानवजातीच्या कल्याण करणाऱ्या किंवा मानवाला आपत्तीमध्ये साहय्य करणाऱ्या अन्य कोणत्याही उदात्त कार्यास चालना देईल असा आहे. त्यानुसार संस्थानतर्फे ०२ धर्मादाय रुग्णालय चालविण्यात येतात, त्यासाठी आवश्यक आहे.

**विभागाचा अभिप्राय/ स्पष्ट मत:-** विविध वॉर्ड विभागात कार्यालयीन साहित्य लिनन साठा, कंन्झमशन रजिष्टर इ. ठेवणेकामी जागा अपुरी पडते त्यामुळे सदर कपाट खरेदी करण्यास हरकत नाही.

वरील मागणी प्रमाणे (Cupboard) कपाट २० नग विहीत पध्दतीने कोटेशन मागवुन खरेदीस व याकामी येणाऱ्या रक्कम रु. ३,२५,९८०/- चे खर्चाच्या प्रस्तावास मान्यता असावी.

**निर्णय क्र.६४० यावर सविस्तर चर्चा होऊन, श्री साईबाबा रुग्णालयातील विविध वॉर्ड/ विभागाकरीता आवश्यक असलेले २० नग कपाट (Cupboard) विहीत पध्दतीने कोटेशन मागवुन खरेदी करणेस व याकामी येणाऱ्या रक्कम रु. ३,२५,९८०/- मात्रचे खर्चास मान्यता देण्यात आली.**

(कार्यवाही- वैद्यकिय संचालक)

---

**विषय नं.२९ ब्लड बँक विभागातील विविध मशिन्सचे कॅलीब्रेशन करणेबाबत.**

**प्रस्ताव-** श्री साईनाथ रुग्णालयाच्या श्री साईनाथ ब्लड बँक विभागात विविध कंपन्याचे विविध मशिन्सचे कॅलिब्रेशन करणेकामी मा. व्य. समिती सभेच्या दि. ०८/०१/२०१३ चे सभेतील विषय क्र. २६ व निर्णय क्र. २६ अन्वये सविस्तर चर्चा होउन, ब्लड बँक विभागातील ४२ नग मशिन्सचे कॅलिब्रेशन विविध कंपन्याकडुन कोटेशन मागणी करून विहीत पध्दतीने कॅलिब्रेशन करणेस व त्यासाठी येणाऱ्या अंदाजे किंमत रु. ३६,५७९/-चे खर्चास मान्यता देण्यात आली आहे.

त्यानुसार कॅलिब्रेशन करणाऱ्या विविध एकुण ६ कंपन्यांना इकडील पत्र क्र. ९५७१/१३, दि. २३/०४/२०१३ अन्वये दि. १०/०४/२०१३ अखेर पत्र पाठवुन सिलबंद कोटेशनची मागणी करण्यात आली होती. त्यापैकी खालील प्रमाणे बंद कोटेशन प्राप्त झालेले आहेत.

१. मे. उद्यमश्री इंजिनीअर्स, सांगली
२. मे. करंदीकर लॅब प्रा. लि., नाशिक
३. मे. सर्व्हीस वन, ठाणे

सदर कोटेशन उघडण्याचा विषय सभा कामकाज विभागाकडे दि. ०७/०५/२०१३ रोजी देण्यात आला होता. परंतु चर्चा वाटाघाटीचे विषय सभेपुढे अदयाप पर्यत ठेवण्यात आले नव्हते. परंतु ब्लड बँक मधील मशिनचे कॅलिब्रेशन करणे अत्यंत गरजेचे आहे. त्यामुळे सदरचे कोटेशन मा. कार्यकारी अधिकारी साो. यांचे समक्ष दि. १८/०७/२०१३ रोजी उघडुन घेण्यात आलेले आहेत.

त्याचा तुलनात्मक तक्ता तयार करण्यात आला असुन तो सोबत सादर केला आहे. त्यामध्ये मे. सर्व्हीस वन, ठाणे यांचे दर हे निम्नतम आहेत. त्याचे दरानुसार सदरचे कॅलिब्रेशन करणेस एकुण रू. ३७,६००/- इतका खर्च येणार आहे

तरी त्यांचेकडुन पुढील एक वर्षाच्या कालावधीकरीता सर्व मशिनचे कॅलिब्रेशन करून घेणेस व त्यासाठी येणाऱ्या एकुण रू ३७,६००/- चे खर्चास मान्यता असावी तसेच सदर खर्चाची नोंद घेणेस मान्यता असावी.

**निर्णय क्र.६४१ यावर सविस्तर चर्चा होऊन, श्री साईनाथ रुग्णालयाच्या श्री साईनाथ ब्लड बँक विभागामधील विविध मशिन्सचे कॅलीब्रेशन करणेसाठी मे. सर्व्हीस वन, ठाणे यांचे निम्नतम दर स्विकारणेत यावे, असे ठरले.**

**तसेच याकामी येणाऱ्या रु.३७,६००/- मात्रचे खर्चास मान्यता देण्यात आली.**

(कार्यवाही- वैद्यकिय संचालक)

---

**विषय नं.३० निवासी वैद्यकिय अधिकारी (आर एम ओ) यांच्या ११ महिने कालावधीसाठी नेमणूका करणेबाबत.**

**प्रस्ताव-** श्री साईबाबा संस्थान विश्वस्तव्यवस्था, शिरडी अधिनियम २००४ मधील समितीचा कार्यकारी अधिकारी व इतर अधिकारी कलम १३ (४) मध्ये प्रामुख्याने खालीलप्रमाणे तरतूद आहे.

समितीस, संस्थान विश्वस्तव्यवस्थेचा कारभार कार्यक्षतेने चालविणेसाठी आणि या अधिनियमान्वये तिची कर्तव्ये व कामे पार पाडण्यासाठी आवश्यक वाटतील अशा अधिकाऱ्यांची (कार्यकारी अधिकाऱ्याव्यतिरिक्त) व कर्मचाऱ्यांची नेमणूक करता येईल:

परंतु, ज्या अधिकाऱ्याला किंवा कर्मचाऱ्याला दरमहा दोन हजार रुपयाहून अधिक वेतन देण्यात येत असेल किंवा द्यावयाचे असेल, अशा कोणत्याही अधिकाऱ्याची किंवा कर्मचाऱ्याची नेमणूक समितीकडून, असे पद शासनाने मान्य केलेल्या कर्मचारी आकृतीबंधानुसार मंजूर करण्यात येईपर्यंत, केली जाणार नाही अशी तरतूद आहे.

शासनाचे मंजूर केलेल्या आकृतीबंधातील अटी-शर्ती क्र. ३- सदर पदांवर नव्याने नियुक्ती करतांना समितीने सदर पदाची आवश्यकता व अर्हता याबाबत विस्तृत प्रसिध्दी देऊन सदर पदांवर स्पर्धात्मक परिक्षा घेऊन नियुक्ती करावी, असे नमूद केले आहे.

संस्थानचे दोन्ही रुग्णालयांसाठी वैद्यकिय संचालक, निवासी उपवैद्यकिय संचालक, वैद्यकिय अधिक्षक यापदांसहीत आणखी आवश्यक वैद्यकिय अधिकारी, आर एम ओ व इतर कर्मचारी भरणेच्या निर्णयास्तव मा. त्रिसदस्यीय समितीचे दि. २१/०६/२०१३ रोजीचे सभेमध्ये प्रस्ताव सादर करण्यात आला होता. त्यावर सविस्तर चर्चा होऊन निर्णय क्र. ४६० अन्वये

पुढीलप्रमाणे निर्णय घेण्यात आलेला आहे. ‍‍‍‍"संस्थानच्या दोन्ही रुग्णालयांमध्ये वैद्यकिय अधिकारी व इतर कर्मचारी ही पदे भरण्यासाठी मा. मुंबई उच्च न्यायालयाच्या औरंगाबाद खंडपीठाची मान्यता घेण्यात येऊन पुढील कार्यवाही करावी.

उपरोक्त निर्णयानुसार विधी विभागामार्फत मा. मुंबई उच्च न्यायालयाचे औरंगाबाद खंडपीठामध्ये सिव्हील ॲप्लीकेशन दाखल करण्यात आले होते. सदरचे ॲप्लीकेशनवर मा. मुंबई उच्च न्यायालय औरंगाबाद खंडपीठामध्ये दि. १३/०८/२०१३ रोजी सुनावणी होऊन दोन्ही रुग्णालयांमध्ये आवश्यक वैद्यकिय अधिकाऱ्यांची पदे भरणेस मान्यता दिलेली आहे.

सध्या दोन्ही रुग्णालयांत रुग्णांना वैद्यकिय सेवा पुरविणेकामी आर एम ओ कमी पडत आहे. श्री साईबाबा व श्री साईनाथ रुग्णालयासाठी आर एम ओ या पदाच्या ५६ जागा मंजूर असून त्यापैकी १७ जागा रिक्त आहे. कोर्टाच्या आदेशानुसार जाहिरातीव्दारे आर एम ओंची नेमणूक करणेच्या प्रक्रियेस काहीसा कालावधी लागणार असल्याने तात्पुरते स्वरुपात ११ महिने कालावधीसाठी आर एम ओंची नेमणूक करावी अशी मागणी प्र. वैद्यकिय संचालक, रुग्णालये यांनी केली आहे.

आर एम ओ या पदावर ११ महिने कालावधीसाठी काम करण्यास तयार असलेलबाबत खालील उमेदवारांनी अर्ज सादर केलेले असून सदर उमेदवारांच्या दि. २७/०८/२०१३ रोजी प्र. वैद्यकिय सचालक, रुग्णालये, यांनी मुलाखती घेतलेल्या आहेत. त्याचा तपशील पुढीलप्रमाणे-

| अ.नं. | उमेदवाराचे नाव | शैक्षणिक पात्रता | शेरा |
|---|---|---|---|
| १ | डॉ. देवरे अतुल अशोक | एमबीबीएस-२००३ | श्री साईबाबा हॉस्पीटल |
| २ | तांबडे अमरनाथ भागवत | एमबीबीएस-२०१२ | श्री साईबाबा हॉस्पीटल |

उपरोक्त उमेदवारांना श्री साईबाबा हॉस्पीटलकडे ११ महिने कालावधीसाठी आर एम ओ या पदावर कंत्राटी पध्दतीने मासिक रु. २७,०००/- मानधनावर नेमणूका देण्यात याव्यात, असे प्र. वैद्यकिय संचालक, रुग्णालये यांनी सुचविले आहे.

तरी, प्र. वैद्यकिय संचालक, रुग्णालये यांचे मागणीनुसार डॉ. देवरे अतुल अशोक व डॉ. तांबडे अमरनाथ भागवत यांना श्री साईबाबा हॉस्पीटलकडे ११ महिने कालावधीसाठी आर एम ओ या पदावर कंत्राटी पध्दतीने मासिक रु. २७,०००/- मानधनावर नेमणूका देणेबाबत निर्णय होणेस विनंती.

**निर्णय क्र.६४२ यावर सविस्तर चर्चा होऊन, प्र. वैद्यकिय संचालक, रुग्णालये यांचे मागणीनुसार डॉ. देवरे अतुल अशोक व डॉ. तांबडे अमरनाथ भागवत यांना ११ महिने कालावधीसाठी श्री साईबाबा हॉस्पीटलकडे कंत्राटी पध्दतीने आर एम ओ या पदावर मासिक रु. २७,०००/- मात्र मानधनावर नेमणूका देण्यात याव्यात, असे ठरले.** (कार्यवाही- वैद्यकिय संचालक)

---

**विषय नं.३१ मोबाईल क्लीनिकसाठी खाजगी वैद्यकिय व्यवसायीकांची नियुक्ती करणेबाबत.**

**निर्णय क्र.६४३ सदरहू विषयावरील चर्चा पुढे ढकलणेत आली.** (कार्यवाही- वैद्यकिय संचालक)

---

**विषय नं.३२ सन २०१२-१३ मधील वार्षीक खरेदीमधील मंजूर दराने औषधे, सर्जिकल, लॅबोरॅटरी साहित्य अतिरिक्त खरेदीबाबत.**

**प्रस्ताव-** **व्यवस्थापन समितीचा ठराव क्र.:-** मा. व्यवस्थापन समिती सभा दि.२५/०८/२०१२ निर्णय क्रमांक ७२० Clause No.६ अन्वये मागणी केलेल्या औषधांच्या साठ्यापैकी काही औषधांची अतिरिक्त मागणी करावयाची असल्यास ती मा. कार्यकारी अधिकारी यांचे मान्यतेने खरेदी करुन रु. २५,०००/- पेक्षा अधिक रक्कमेच्या औषधांची मागणी करावयाची झाल्यास दैनंदिन कामाची गैरसोय होऊ नये, म्हणून ती मा. कार्यकारी अधिकारी यांचे मंजुरीने खरेदी करुन केवळ नोंद घेण्यासाठी/ माहितीस्तव मा. व्यवस्थापन समिती सभेपुढे नोंद घेण्यासाठी सादर करण्यात यावे, असे ठरले आहे.

**प्रस्ताविक:-** श्री साईबाबा व श्री साईनाथ रुग्णालयात दैनंदिन वापरासाठी लागणाऱ्या औषधे, सर्जिकल व कन्झूमेबल साहित्याकरीता सन २०१२-२०१३ या वर्षाकरीता वार्षिक निविदेतील मंजूर दराने एकुण ११७ पुरवठा धारकांना एकुण रक्कम रु. २४,९२,४८,०३०/- चे दि.२६/११/२०१२ रोजी पुरवठा आदेश देण्यात आलेले आहे.

त्यानुसार पुरवठा आदेशाप्रमाणे मालाचा पुरवठा चालू आहे तर त्यातील काही मालाचा पुरवठा पुर्ण झालेला आहे. त्यापैकी सध्या सोबतच्या यादीतील औषधे, सर्जिकल, लॅबोरॅटरी व कन्झूमेबल साहित्यापैकी काही आयटमचा औषध भांडारात साठा शिल्लक नाही. सदरचे औषधे, सर्जिकल, लॅबोरॅटरी व कन्झूमेबल साहित्य दैनंदिन वापरासाठी आवश्यक आहे. तसेच दोन्ही रुग्णालयात राजीव गांधी जीवनदायी योजना कार्यान्वित झालेली आहे. सदर योजनेअंतर्गत होणाऱ्या शस्त्रक्रिया व उपचार चालु असताना पुर्ण बरा होऊन डिसचार्ज दिल्यानंतर १० दिवसांची औषधे मोफत दयावी लागतात त्यामुळे औषधांचा खप हा वाढलेला आहे, त्यामुळे जसाजसा खप वाढेल व जशी जशी लागेल तशी तशी औषधे, सर्जिकल, लॅबोरॅटरी व कन्झूमेबल साहित्य खरेदी करावी लागणार आहेत.

सदर औषधे, सर्जिकल, लॅबोरॅटरी साहित्य वार्षिक मंजुर दरानुसार वेगवेगळ्या मंजूर पुरवठा धारकांकडून सदरचे खरेदीकामी पुर्णांकित रक्कम रु. १६३०१९३.२१ इतका खर्च येणार आहे.

**संस्थान अधिनियम/ ठराव यानुसार छाननी, शासन निर्देश, तांत्रिक, कायदेशीर तसेच अर्थिक विषय इ. छाननी करुन अनुमानः-** अधिनियमातील समितीचे कर्तव्ये व अधिकार क्र. १७-२(ण) अन्वये मानवजातीच्या कल्याण करणाऱ्या किंवा मानवाला आपत्तीमध्ये साहय्य करणाऱ्या अन्य कोणत्याही उदात्त कार्यास चालना देईल. त्यासाठी संस्थानतर्फे ०२ धर्मादाय रुग्णालये चालविण्यात येते. सदर रुग्णालयकरिता औषधे / सर्जिकल / लॅबोरॅटरी साहित्य खरेदी करण्याचा प्रस्ताव आहे.

**विभागाचा अभिप्राय/ स्पष्ट मतः-** रुग्णांची वाढती संख्या व राजीव गांधी योजने अंतर्गत उपचार घेणारे रुग्णांकरीता खरेदी करणे आवश्यक आहे.

तरी सदरचे खरेदीकामी येणाऱ्या पुर्णांकित रक्कम रु. १६३०१९३/- चे खर्चाची नोंद घेण्यासाठी सविनय सादर.

**निर्णय क्र.६४४ यावर सविस्तर चर्चा होऊन, उपरोक्त प्रस्तावाची नोंद घेण्यात आली.**(कार्यवाही- वैद्यकिय संचालक)

---

**विषय नं.३३ श्री धनाजी जगन्नाथ बेडके, ऑडीओलॉजिस्ट, श्री साईनाथ रुग्णालय यांचे विनापरवागनी गैरहजेरीबाबत.**

**प्रस्ताव-** श्री बेडके हे संस्थानचे श्री साईनाथ रुग्णालयात ऑडिओलॉजीस्ट म्हणुन कार्यरत आहेत. त्यांनी दोन वर्षे अध्ययन रजेसाठी मागणी केली होती. परंतु दि. ०४.०९.२०१२ रोजीचे पत्राने श्री बेडके यांना कळविणेत आले आहे की, तुमची दोन वर्षे कालावधीची अध्ययन रजा नामंजूर करणेत आलेली आहे. तरी देखील श्री बेडके हे दि. ०३.०९.२०१२ ते दि. १२.०९.२०१२ अखेर १० दिवस अर्जित रजा उपभोगलेनंतर दि. १३.०९.२०१२ रोजी कामावर हजर होणे आवश्यक होते. परंतू श्री बेडके हे दि. १३.०९.२०१२ ते दि. १८.०९.२०१२ अखेर ०६ दिवस विनापरवानगी गैरहजर राहून दि. १९.०९.२०१२ रोजी कामावर हजर झाले.

त्यानंतर श्री बेडके दि. २०.०९.२०१२ पासुन सतत, सलग, विना परवानगी, रजा अर्जाशिवाय कामावरुन गैरहजर आहेत. त्यांच्या अशा वागण्यामुळे रुग्णालयातील दैनंदिन कामकाजात अडचणी येतात. रुग्ण सेवेत अडथळे येतात. याबाबत दि. ०३.१०.२०१२ व दि. १९.११.२०१२ रोजी रजिस्टर ए. डी. पोस्टाव्दारे पत्र पाठवून श्री बेडके यांना कळविण्यात आले होते की, सदरची नोटीस मिळताच दोन दिवसांच्या आत विनापरवानगी गैरहजेरी बाबतचा लेखी खुलासा सादर करुन कामावर हजर व्हावे, अन्यथा तुंम्हास संस्थान सेवेत स्वारस्य नाही असे समजून तुमचे नावं संस्थानचे हजेरी पटावरुन कमी करण्यात येईल. सदरचे पत्र प्राप्त होवून देखील श्री बेडके अदयापपर्यत कामावर हजर झालेले नाहीत किंवा खुलासाही सादर केलेला नाही.

दरम्यान दि. २३.१०.२०१२ रोजीचे फॅक्स व्दारे श्री बेडके यांनी दर रविवारी कामावर येण्याची तयारी दर्शविली. त्यांचे दि. २३.१०.२०१२ व दि. २६.१२.२०१२ रोजीचे विनंती अर्जाचा विचार करता येणार नाही असे त्यांना अनुक्रमे दि. २७.११.२०१२ व दि. २२.०१.२०१३ रोजीचे पत्रा अन्वये पोष्टामार्फत कळविण्यात आले आहे. तरी देखील ते अदयापपर्यंत कामावर हजर झालेले नाहीत.

मा. त्रीसदस्य समितीचे दि. १५.०९.२०१२ रोजीचे सभेत निर्णय क्र. ६८६ अन्वये श्री बेडके यांची विनंती अमान्य करणेत आली व अन्य व्हिजीटींग ऑडीओलॉजिस्टची नेमणूक करण्यात यावी असे ठरले. तसेच प्र. वैद्यकीय अधिक्षक यांनी दि. ०५.०७.२०१२ रोजीचे अहवालात असे म्हटले आहे की, श्री बेडके यांना कार्यमुक्त करुन ऑडिओलॉजिस्टची जागा भरण्यात यावी.

येणे प्रमाणे श्री बेडके संस्थानचे पत्रांची दखल घेत नाहीत. यावरुन त्यांना संस्थान सेवेत स्वारस्य नाही असे समजण्यास हरकत नाही. सबब, श्री बेडके यांचे नावं संस्थानचे हजेरीपटावरुन कमी करता येईल.

तरी प्रस्तावास मान्यता असावी.

**निर्णय क्र.६४५ यावर सविस्तर चर्चा होऊन, उपरोक्त प्रस्तावास मान्यता देण्यात आली.**

(कार्यवाही- वैद्यकिय संचालक)

---

**विषय नं.३४ श्री.संजय भास्करराव काळे यांचे दि.२५.०७.२०१३ रोजीचे पत्राबाबतचा अहवाल देणेबाबत.**

**प्रस्ताव-** श्री संजय भास्करराव काळे यांनी त्यांचे दि.२०/०६/२०१३ चे पत्रान्वये संस्थानकडे सन २०१२-१३ या वर्षात किती Stent वापरले व किती रुपयाचे Stent वापरले याबाबतची माहिती माहिती अधिकारात मागितलेली होती. त्यानुसार त्यांना एकुण किती प्रकारचे Stent व किती संख्या किती रक्कमेचे याबाबत माहिती औषध भांडार विभागाकडुन देण्यात आली होती.

त्यानुसार श्री संजय काळे यांनी त्यांचे उपरोक्त संदर्भीय पत्रा नमुद केल्या त्यांनी एकुण झालेल्या Angioplasty च्या शस्त्रक्रिया व वापरलेले Stent याचा भागाकार करुन रुग्णांना जास्त किंमती आकारले बाबत निष्कर्ष काढलेला आहे. त्यासंदर्भात खालील सर्व माहिती सादर करत आहोत.

१) श्री संजय काळे यांना दि.०१/०४/२०१२ ते दि.३१/०३/२०१३ अखेर वापरलेल्या Stent ची माहिती देण्यात आली होती.

२) सदर कालावधीत जे काही Stent वापरले ते सन २०११-१२ व सन २०१२-१३ या वार्षीक ऑर्डरमधील Stent चा समावेश आहे.

३) सन २०११-१२ या वर्षासाठी दि.११/११/२०११ रोजी पुरवठा आदेश देण्यात आला होता तर सन २०१२-१३ या वर्षाकरिता दि.२२/११/२०१२ रोजी पुरवठा आदेश देण्यात आले होते.

४) पुरवठा आदेश दिल्यानंतर सदर Stent चे दि. ११/११/२०१२ पासून केंद्रशासनाने (CGHS) वेळोवेळी प्राप्त परिपत्रकान्वये संबंधीत पुरवठा धारकाकडुन दर कमी करुन घेण्यात आलेले आहे. सदरचे दर कशा प्रकारे कमी झालेले आहे याबाबत सोबत सविस्तर तक्ता सादर केला आहे. त्या वरुन दिसुन येते की सुरुवातीस जे Drug Coating Stent रु. ५०,००० ते रु. ६०,०००/- पर्यंत खरेदी करण्यात येत होते ते नंतर रु. ४०,०००/- तर सध्या रु. २५,०००/- पर्यंत खरेदी करण्यात येत आहे. याच प्रमाणे Bare Metal Stent व Cobalt Chromium Stent चे देखील दर कमी झालेले आहे.

५) श्री संजय काळे यांनी वापरलेले Stent व झालेल्या शस्त्रक्रिया याचा भागाकार करुन जो निष्कर्ष काढला तो चुकीचा वाटतो कारण ३०२५ Angioplasty च्या शस्त्रक्रिया जरी झालेल्या असल्या तरी प्रत्येक रुग्णास एक किवा एकाच प्रकारचा Stent उदा. Drug Coating, Bare Metal, Cobalt Chromium वापरणेत येत नाही काही रुग्णास १ किंवा २ किंवा ३ Stent वापरले जातात त्यामध्ये सर्व Drug Coating किवा सर्वच Bare Metal किवा सर्वच Cobalt Chromium असे नसतात. रुग्णांचे असलेले Blockage असलेला आजार सर्व बाबींचा विचार करुन डॉक्टर Stent चा वापर ठरवत असतात. त्यामुळे वापरलेले Stent रुग्णांची संख्या व रक्कम याचा ताळमेळ कधीही बसु शकणार नाही असे मत आहे.

६) वार्षीक खरेदीमध्ये मा. व्यवस्थापन समितीचे सभेत चर्चा वाटाघाटी होऊन ज्या दराने खरेदी करणे बाबत निर्णय होतो त्याच दराने Stent खरेदी करण्यात येते त्याच दराने जीवनदायी योजने अंतर्गत रुग्णांना देखील बिलात दर आकारले जातात कमी किंवा जास्तीचा दर आकरण्याचा विषयच येत नाही.

७) वार्षीक खरेदीमध्ये Stent ची निवड करताना सदर Stent DCGI, CE, USFDA या दर्जाचे, पुरवठाधारकांच्या नियमीत पुरवठा, वापरणारे डॉक्टरांचे अभिप्राय इ. सर्व बाबींचा विचार करुन खरेदीसाठी निवड करण्यात येते Stent च्या quality मध्ये कुठलाही समझोता करण्यात येत नाही.

८) Stent च्या किंमती ठरवतांना इन्सेंटिव्ह व इतर कुठल्याही बाबींचा काही संबंध येत नाही.

तेव्हा श्री संजय काळे यांनी त्यांचे उपरोक्त पत्रात घेतलेले आक्षेप यात काही तथ्य दिसून येत नाही.

आपले माहितीसाठी सविनय सादर.

**निर्णय क्र.६४६ यावर सविस्तर चर्चा होऊन, उपरोक्त प्रस्तावाची नोंद घेण्यात आली.**

(कार्यवाही- वैद्यकिय संचालक)

---

**विषय नं.३५ अंतर्गत दुरध्वनी यंत्रणेच्या वार्षिक दुरुस्ती व देखभाल कराराचे नुतनीकरण करणेबाबत.**

**प्रस्ताव-** संस्थानची अंतर्गत दूरध्वनी व्यवस्था अधिक गतीमान व अत्याधुनिक होणेसाठी तत्कालीन मा. विश्वस्त मंडळाने घेतलेल्या निर्णयानुसार, Siemens Hipath ४००० IP ईपीएबीएक्स यंत्रणा मे. सिमेन्स एन्टरप्राईज कम्युनिकेशन्स प्रा. लि., मुंबई यांचेकडून खरेदी करुन, दिनांक २२ जुलै, २००४ रोजी कार्यान्वीत केलेली आहे.

मे. सिमेन्स एन्टरप्राईज कम्युनिकेशन्स प्रा. लि., मुंबई यांचेशी Siemens Hipath ४००० IP या डिजीटल अंतर्गत दूरध्वनी यंत्रणेचा दिनांक २२/०७/२०१२ ते दिनांक २१/०७/२०१३ या एक वर्षाचे कालावधीचा दुरुस्ती देखभाल करार करण्यात आलेला आहे. सदर कराराची मुदत दिनांक २१/०७/२०१३ रोजी संपुष्टात आलेली आहे.

पुढील कालावधीसाठी (दिनांक २२/०७/२०१३ ते दिनांक २१/०७/२०१४)अखेर दुरुस्ती देखभाल कराराचे नुतनिकरण करणेसाठी मे. सिमेन्स एन्टरप्राईज कम्युनिकेशन्स प्रा. लि., मुंबई यांनी दूरध्वनी यंत्रणा खरेदी किंमतीच्या ९.९ % रक्कम व त्यावरील सर्व करासह पुर्णांकित रक्कम रुपये ३,०५,२३९/- (रु.तिन लाख पाच हजार दोनशे एकोणचाळीस मात्र ) इतका खर्च कळविलेला आहे. परंतु सदर प्रस्ताव कंपनीने उशिरा पाठविलेला आहे. त्यामुळे दि.२२/०७/२०१३ ऐवजी आपण AMC चा कालावधी दि.०१/०९/२०१३ पासुन पुढे घेतला आहे.

मे. सिमेन्स एन्टरप्राईज कम्युनिकेशन्स प्रा. लि.,मुंबई यांचेशी Siemens Hipath ४००० IP या डिजीटल अंतर्गत दूरध्वनी यंत्रणेचे एका वर्षाकरिता (दिनांक ०१/०९/२०१३ ते दिनांक ३१/०८/२०१४) अखेर दुरुस्ती देखभाल कराराचे नुतनिकरण करण्यासाठी व येणाऱ्या रुपये ३,०५,२३९/- मात्र चे खर्चास मान्यता मिळणेस विनंती.

**निर्णय क्र.६४७ यावर सविस्तर चर्चा होऊन, मे. सिमेन्स एन्टरप्राईज कम्युनिकेशन्स प्रा. लि.,मुंबई यांचेशी Siemens Hipath ४००० IP या डिजीटल अंतर्गत दूरध्वनी यंत्रणेचे एका वर्षाकरिता (दिनांक ०१/०९/२०१३ ते दिनांक ३१/०८/२०१४) अखेर दुरुस्ती देखभाल कराराचे नुतनीकरण करणेस व याकामी येणाऱ्या रु. ३,०५,२३९/- मात्रचे खर्चास मान्यता देण्यात आली.** (कार्यवाही- विद्युत विभागप्रमुख)

---

**विषय नं.३६ श्री साई प्रसादालयाकरीता डिजीटल डिस्प्ले बोर्ड तयार करुन घेणेबाबत.**

**प्रस्ताव-** मा.व्यवस्थापन समितीचे दिनांक १९-०७-२००९ चे सभेतील निर्णय क्र.६५२ अन्वये साईभक्तांचे इच्छेनुसार स्वतःचे अथवा नातेवाईकांचे वाढदिवस किंवा स्मृती प्रित्यर्थ अन्य कारणास्तव रक्कम घेऊन प्रसादालयात भोजन घेणा-या भक्तांसाठी मोफत प्रसाद भोजन योजना सुरु झालेली आहे. सदर योजनेस देणगीदार भक्तांचा चांगला प्रतिसाद मिळत असून रक्कम जमा करीत आहोत.

सदर देणगी एकाच भक्ताकडून अथवा त्यापेक्षा अधिक भक्तांकडून स्विकारली जाते. दानशुर देणगीदार भक्तांची नावे प्रसाद भोजनाच्या दिवशी ४` x ३` मापाचे अल्कोसाईन बोर्डवर लिहून प्रसादालय परिसरामध्ये ०३ व साईबाबा भक्तनिवासस्थान येथे ०१ व श्री साईनाथ रुग्णालय येथील स्वयंसेवी प्रसाद कँटीन याठिकाणी ०१ असे एकुण ०५ नग अल्कोसाईन बोर्ड लावण्यात येतात. आता श्री साई प्रसादालय विभागाने सदरील अल्कोसाईन बोर्ड ऐवजी ०५ नग डिजीटल डिस्प्ले बोर्ड विद्युत विभागामार्फत तयार करुन मिळणेबाबत कळविले आहे.

**डिजीटल डिस्प्ले बोर्डचा तपशील:- (नमूना )**

दिनांक :- ३१/१२/२०११

श्री साईबाबा संस्थान विश्वस्तव्यवस्था,शिर्डी

**श्री साई प्रसादालय**

आज रोजी प्रसादभोजन घेणा-या सर्व भक्तांसाठी खालील साईभक्तांनी मोफत प्रसादभोजन योजने अंतर्गत देणगी दिल्याबद्दल श्री साईबाबा संस्थान विश्वस्तव्यवस्था,शिरडी त्यांचे आभारी आहे.

०१). श्री.दिपक ददलानी, मुंबई रु. २,००,०००/-

०२). कुमारी असीमा अरोण, दिल्ली रु. २,००,०००/-

SHREE SAIBABA SANSTHAN TRUST, SHIRDI

**SHRI SAI PRASADALAYA**

We are thankful to the following Sai deovotees for their kind donation under the FREE PRSAD BHOJAN SCHEME for free meals today to all Sai devotees.

01). SHRI DEEPAK DADLANI, MUMBAI Rs. 2,00,000/-

02). MISS AASHMA ARON, DELHI Rs. 2,00,000/-

उपरोक्तप्रमाणे ०५ नग डिजीटल डिस्प्ले बोर्ड तयार करणेकामी अंदाजे रक्कम रुपये ७,४५,७४०/- इतका खर्च येणे अपेक्षित आहे.

श्री साई प्रसादालयाकरीता ०५ नग डिजीटल डिस्प्ले बोर्ड तयार करणेकरीता ई-टेंडर व्दारे टेंडर मागविणेस व येणा-या रुपये ७,४५,७४०/- मात्र खर्चास मान्यता मिळणेस विनंती.

**निर्णय क्र.६४८ यावर सविस्तर चर्चा होऊन, श्री साई प्रसादालयाकरीता ०५ नग डिजीटल डिस्प्ले बोर्ड तयार करणेकरीता टेंडर मागविणेस व याकामी येणाऱ्या रु. ७,४५,७४०/- मात्रचे खर्चास मान्यता देण्यात आली.** (कार्यवाही- विद्युत विभाग प्रमुख)

---

**विषय नं.३७ श्री साईबाबा हॉस्पिटल व भक्तनिवासस्थान (५०० रुम) नविन लिफ्ट बसविणेकामास मुदतवाढ मिळणेकामी मा.व्यवस्थापन समितीची मान्यता मिळणेबाबत.**

**प्रस्ताव-** श्री साईबाबा हॉस्पीटल मधील ०३ व साईबाबा भक्तनिवासस्थान (५०० रुम) येथील एकुण ०४ नग अशा एकुण ०७ नग थायसेनकृप कंपनीच्या लिफ्ट काढून तेथे नवीन लिफ्ट बसविणेकामी मा.व्यवस्थापन समितीचे दिनांक १३/१४-०१-२०१२ चे सभेतील विषय नं.१७ निर्णय क्र.१७ अन्वये मे.जॉनसन लिफ्ट प्रा.लि.,पुणे यांना जा.क्र.एसएसएस / विद्युत /५७२९ /२०१२ दि.१३-०२-२०१२ अन्वये कार्यादेश देण्यात आलेला आहे. सदरच्या कार्यादेशामध्ये लिफ्ट बसविण्याच्या कामाची मुदत ही सहा महिने अथवा सिव्हिल काम पूर्ण झाल्यानंतर दोन महिने अशी देण्यात आली होती.

त्यानुसार थायसेनकृपची लिफ्ट काढून नविन लिफ्ट बसविण्याअगोदर करावी लागणारी सिव्हील कामे संस्थानचे बांधकाम विभागाकडून करुन मिळावे असे बांधकाम विभागास लेखी पत्राने कळविले होते. जॉनसन लिफ्ट प्रा.लि., पुणे यांनी श्री साईबाबा हॉस्पीटल येथील ०३ लिफ्ट पैकी ०२ नंबरची थायसेनकृप मेकची लिफ्ट काढून घेतली. त्यानंतर बांधकाम विभागाने सिव्हील वर्क काम करुन दिले. त्याठिकाणी जॉनसन कंपनीने नवीन जॉनसन कंपनीची लिफ्ट बसवून कार्यान्वित केलेली आहे. आता मे.जॉनसन लिफ्ट प्रा.लि., पुणे यांनी साईबाबा हॉस्पीटल येथील ०३ नंबरची (Deluxe Room) थायसेन कंपनीची लिफ्ट काढून घेतली आहे. बांधकाम विभागाने सिव्हील काम पूर्ण केले असून नवीन लिफ्ट बसविण्याचे काम चालू आहे.

त्यानंतर जॉनसन लिफ्ट, पुणे यांनी साईबाबा भक्तनिवासस्थान (५०० रुम) येथील C व D विंगच्या थायसेन कंपनीच्या लिफ्ट काढून घेतल्या. नवीन लिफ्ट बसविण्या अगोदर करावी लागणारी सिव्हील कामे बांधकाम विभागास कळविले. त्यानुसार त्यांनी सिव्हील काम चालू केलेले आहे. तसेच A व B विंगच्या थायसेन कंपनीच्या लिफ्ट काढून घेतल्या. नवीन जॉनसन लिफ्ट बसविण्याअगोदर सिव्हील कामाबाबत बांधकाम विभागास ०१). जा.नं.एसएसएस/ विद्युत/ २१२१/ २०१२ दि.२०-०८-२०१२, ०२).

जा.नं.एसएसएस/ विद्युत/ २१२२/ २०१२ दि.२०-०८-२०१२, ०३). जा.नं.एसएसएस / विद्युत / २४१० A/ २०१२ दि.१२-०९-२०१२, ०४). जा.नं.एसएसएस/विद्युत/२४१०B /२०१२ दि.१२-०९-२०१२, ०५). विद्युत विभागाचे दि.१५-०५-२०१३ चे पत्र., ०६). जा.नं.एसएसएसटी / विद्युत / २८ / २०१३ दि.०५-०६-२०१३ व ०७). जा.नं.एसएसएसटी/विद्युत/३५ / २०१३ दि.१४-०६-२०१३ लेखी पत्रान्वये कळविले आहे.

साईभक्तांची व रुग्णांची गैरसोय होऊ नये याकरीता सर्व लिफ्ट या एका वेळेस न खोलता टप्प्या-टप्प्याने काढलेल्या आहे. त्यामुळे लिफ्ट खोलणे, सिव्हील कामे यास पर्यायाने वेळ लागलेला आहे. त्यामुळे मे.जॉनसन लिफ्ट प्रा.लि., पुणे यांना जुन्या लिफ्ट काढून नवीन लिफ्ट बसविणे कामास उशीर होत आहे. यासाठी मे.जॉनसन लिफ्ट प्रा.लि., पुणे यांना काम पूर्ण करणेसाठी उशीर होत आहे. कामाची गती बांधकामाच्या गतीवर अवलंबून आहे. लिफ्टची शासकीय परवानगी, टेस्टींगसाठी वेळ लागणार आहे. यासाठी ड्रॉईंगची व आर्किटेक्ट सर्टिफिकेटची मागणी बांधकाम विभागाकडे ०१). विद्युत विभागाचे दि.१९-०४-२०१३ चे पत्र. व ०२). जा.नं.एसएसएसटी / विद्युत / ३६ / २०१३ दि.१४-०६-२०१३ अन्वये लेखी कळिविण्यात आली असून अद्याप ॲप्रव्हुड ड्रॉईंग व आर्किटेक्ट सर्टिफिकेट विद्युत विभागात प्राप्त झालेले नाही. त्यामुळे मे.जॉन्सन लिफ्ट प्रा.लि., पुणे यांनी सदर कामासाठी दि.३१-१२-२०१३ पर्यंत मुदतवाढ मिळणेस विनंती केलेली आहे.

मे.जॉन्सन लिफ्ट प्रा.लि., पुणे यांना साईबाबा हॉस्पीटल व भक्तनिवासस्थान (५०० रुम) नवीन लिफ्ट बसविणे कामास दिनांक ३१-१२-२०१३ पर्यंत मुदतवाढ मिळणेस विनंती.

उपरोक्त प्रस्तावावर विचार होऊन मान्यता मिळणेस विनंती.

**निर्णय क्र.६४९ यावर सविस्तर चर्चा होऊन, मे.जॉन्सन लिफ्ट प्रा.लि., पुणे यांना श्री साईबाबा हॉस्पिटल व भक्तनिवासस्थान (५०० रुम) येथे नविन लिफ्ट बसविणेचे कामास दि.३१.१२.२०१३ पर्यंत मुदतवाढ देणेत यावी, असे ठरले.** (कार्यवाही- विद्युत विभाग प्रमुख)

---

**विषय नं.३८ श्री साईबाबा संस्थानचे सर्व पॉवरींग स्टँडबाय जनसेटच्या डिझेल इंजिनचे वार्षिक सर्व्हिस कॉन्ट्रॅक्ट सन २०१३-१४ साठी देणेबाबत टेंडरींगची प्रक्रीया पुर्ण होईपर्यंत मागील सर्व्हिस कॉन्ट्रॅक्टर मे.ट्रिनिटी म्हाळसा दुर्गा, सेल्स ॲण्ड सर्व्हिसेस, औरंगाबाद यांना मागील दराप्रमाणे मुदतवाढ देणेकामी मान्यता मिळणेबाबत.**

**प्रस्ताव-** मा.व्यवस्थापन समितीचे दिनांक १४-०७-२०१२ चे सभेतील विषय नं.२९ निर्णय क्र.४७५ अन्वये श्री साईबाबा संस्थानचे सर्व पॉवरींग स्टँडबाय जनसेटच्या डिझेल इंजिनचे वार्षिक सर्व्हिस कॉन्ट्रॅक्ट सन २०१२-२०१३ साठी (दि.०१-०७-२०१२ ते दि.३०-०६-२०१३) करीता वर्तमानपत्रात जाहिरात देऊन टेंडर मागविण्यात आले होते. त्यानुसार त्यामध्ये निम्नतम दर दिलेले मे.ट्रिनिटी म्हाळसा दुर्गा सेल्स ॲण्ड सर्व्हिसेस, औरंगाबाद यांना संस्थान जा.क्र.एसएसएस / विद्युत / १८५१ / २०१२ दि.२५-०७-२०१२ अन्वये रक्कम रुपये २४,०८,२३६/- इतक्या रकमेचा कार्यादेश देण्यात आला होता. मे.ट्रिनिटी म्हाळसा दुर्गा सेल्स ॲण्ड सर्व्हिसेस, नाशिक हे मे.कमिन्स यांचे अहमदनगर, नाशिक, जळगांव व औरंगाबाद जिल्हयाकरीता एकमेव कंपनी मान्यताप्राप्त अधिकृत सर्व्हिस डिलर आहेत. या सर्व्हिस कॉन्ट्रॅक्ट कालावधीमध्ये त्यांनी उत्तमरित्या सर्व्हिस दिली असून सर्व जनसेट सुरळीत कार्यान्वित आहेत. आता या सर्व्हिस कॉन्ट्रॅक्टचा कालावधी दिनांक ३०-०६-२०१३ रोजी संपली आहे.

आता, श्री साईबाबा संस्थान विश्वस्त व्यवस्था, शिरडीच्या (०१) मंदिर परीसर, (०२) नविन भक्तनिवासस्थान, (०३) श्री साईबाबा हॉस्पिटल + साईनगर, (४) नविन धर्मशाळा + श्री साईनाथ रुग्णालय (०५) नविन प्रसादालय (०६) साई आश्रम भाग-०१ (०७) साई आश्रम भाग-०२ (०८) पाणीपुरवठा साठवण तलाव (०९) शांतिनिकेतन इमारत (१०) कनिष्ठ महाविद्यालय (११) रथपालखी जनरेटर या वेगवेगळ्या परीसरातील जनरेटरसेटच्या इंजिनचे सन २०१३-२०१४ या वर्षाकरीता वार्षिक सर्व्हिस कॉन्ट्रॅक्ट देणेकामी मा.व्यवस्थापन समितीचे मान्यतेसाठी प्रस्ताव सादर करण्यात आलेला आहे. प्रस्तावाला मान्यता मिळालेली असून विद्युत विभागाकडील दिनांक ०१-०८-२०१३ रोजीचे टिपणीनुसार टेंडर तयार करुन टेंडर मागविणेसाठी मान्यता मागितलेली आहे. या टिपणीस मान्यता मिळून त्यानंतर टेंडर बोलविणे आहे. टेंडर आल्यानंतर ते मा.व्यवस्थापन समितीसमोर चर्चा / वाटाघाटीसाठी सादर करणे आहे. तोपर्यंत सदरचे जनरेटरसेट कार्यान्वित ठेवणे अत्यावश्यक आहे. जनरेटरसेट व प्रतिमाह येणा-या खर्चाचा तपशील खालीलप्रमाणे :-

| अ.क्र. | जनरेटरसेट ठिकाण | जनसेट क्षमता | ईएसएन क्र. | मॉडेल क्र. | एकुण रक्कम |
|---|---|---|---|---|---|
| ०१) | श्री साई मंदिर परीसर (नविन) | ५०० केव्हीए | २५२६०००३ | व्हीटीए-२८-जी. | रु. २१,८७५.०० |
| ०२) | श्री साई मंदिर परीसर (जुना) | ५०० केव्हीए | २५१६७८०९ | व्हीटीए-१७१०-जी. | रु. २१,८७५.०० |
| ०३) | नविन भक्तनिवास (५०० रुम) | ५०० केव्हीए | २५२४२३१७ | व्हीटीए-२८-जी. | रु. २१,८७५.०० |
| ०४) | नविन भक्तनिवास (५०० रुम) | १०० केव्हीए | २५१८७२९६ | एनटी-४९५-जी. | रु. ८,७५०.०० |
| ०५) | श्री साईबाबा हॉस्पीटल | १०१० केव्हीए | २५३६५८०५ | केटीए-३८-जी-५ | रु. २४,१६५.०० |
| ०६) | श्री साईबाबा हॉस्पिटल | ५०० केव्हीए | २५३५०२८१ | केटीए-१९-जी-९ | रु. १९,२५०.०० |

| | | | | | |
|---|---|---|---|---|---|
| ०७) | धर्मशाळा | २५० केव्हीए | २५२४९०८५ | एनटीए-८५५-जी | रु. १३,१२५.०० |
| ०८) | धर्मशाळा | २५० केव्हीए | २५२४९२८५ | एनटीए-८५५-जी | रु. १३,१२५.०० |
| ०९) | श्री साई प्रसादालय | ५०० केव्हीए | २५३२०२७१ | केटीए-१९-जी-९ | रु. १९,२५०.०० |
| १०) | श्री साई प्रसादालय | २५० केव्हीए | २५२४९०८७ | एनटीए-८५५-जी. | रु. १३,१२५.०० |
| ११) | साईआश्रम भाग-०१ | ५०० केव्हीए | २५३६९१६६ | केटीए-१९-जी-९ | रु. ११,२२९.०० |
| १२) | साईआश्रम भाग-०१ | ५०० केव्हीए | २५३६७६०४ | केटीए-१९-जी-९ | रु. ११,२२९.०० |
| १३) | साईआश्रम भाग-०२ | ५०० केव्हीए | २५३५०९७० | केटीए-१९-जी-९ | रु. ११,२२९.०० |
| १४) | साईआश्रम भाग-०२ | ५०० केव्हीए | २५३०९०२८ | केटीए-१९-जी-९ | रु. ११,२२९.०० |
| १५) | पाणीपुरवठा साठवण तलाव | २५० केव्हीए | २५७६९५२९ | ६ सीटीएए८.३-६४ | रु. ५,४०७.०० |
| १६) | पाणीपुरवठा साठवण तलाव | १०० केव्हीए | २५१५४५१४ | एनटी -४९५-जी. | रु. ८,७५०.०० |
| १७) | कनिष्ठ महाविद्यालय | १० केव्हीए | SC२१३००६४५ | X१३G२ | रु. २,५१३.०० |
| १८) | रथपालखी (सिंगल फेज) | १५ केव्हीए | ३०९७४ | F१-७G१ | रु. ३,०६३.०० |
| १९) | शांतीनिकेतन इमारत | १५ केव्हीए | D२ १०२२-०३०००२२ | DM२० | रु. २,१८८.०० |
| | | | (०१ महिन्याकरीता) | एकुण :- | रु. २,४३,२५१.०० |
| | | | वजा डिस्काऊंट २% | | रु. ०,०४,८६५.०० |
| | | | **प्रतिमाह एकुण रक्कम :-** | | **रु. २,३८,३८६.००** |

उपरोक्तप्रमाणे संस्थानचे सर्व ठिकाणचे पॉवरींग स्टँडबाय जनसेटच्या डिझेल इंजिनचे वार्षिक सर्व्हिस कॉन्ट्रॅक्ट सन २०१३-२०१४ ची कार्यवाही होईपर्यंत दिनांक ०१-०७-२०१३ पासून पुढे मागील मंजूर दराने प्रतिमहा वार्षिक कॉन्ट्रॅक्ट देणेकामी रक्कम रु.२,३८,३८६/- (अक्षरी रक्कम रु.दोन लाख अडोतीस हजार तीनशे शेहाऐंशी ) मात्र खर्च येणार आहे.

श्री साईबाबा संस्थानचे सर्व पॉवरींग स्टँडबाय जनसेटच्या डिझेल इंजिनचे वार्षिक सर्व्हिस कॉन्ट्रॅक्ट सन २०१३-२०१४ या कालावधीसाठी देणेकरीता येणा-या खर्चास, कामास व वर्तमानपत्रात जाहिरात देऊन तसेच संस्थानचे वेबसाईटवर जाहिरात अपलोड करुन निविदा बोलविणेसाठी कामास साधारणतः तीन महिने इतका वेळ लागणार आहे. तोपर्यंत उपरोक्त जनरेटरसेट कार्यान्वित ठेवणेसाठी दि.०१-०७-२०१३ पासून पुढे मागील मंजूर दराने मे.ट्रिनिटी म्हाळसा दुर्गा सेल्स ॲण्ड सर्व्हिसेस, औरंगाबाद यांनी सादर केलेल्या प्रतिमाह येणा-या रक्कम रु.२,३८,३८६/- (अक्षरी रक्कम रु.दोन लाख अडोतीस हजार तीनशे शेहाऐंशी) मात्र याप्रमाणे पुढील वार्षिक सर्व्हिस कॉन्ट्रॅक्ट मंजूर होऊन त्यांना कार्यादेश देईपर्यंतच्या दिवसापर्यंत येणा-या खर्चास मान्यता मिळणेस विनंती.

**निर्णय क्र.६५० यावर सविस्तर चर्चा होऊन, उपरोक्त प्रस्तावास मान्यता देण्यात आली.**

(कार्यवाही- विद्युत विभाग प्रमुख)

---

**विषय नं.३९ ट्रान्सफॉर्मर करीता ट्रान्सफॉर्मर आईल खरेदी करणेबाबत.**

**प्रस्ताव-** श्री साईबाबा संस्थानचे विविध ठिकाणच्या विद्युत पुरवठयाकरीता एकुण १० ठिकाणी महाराष्ट्र राज्य वीज वितरण कंपनीकडून ११ KV एच.टी. वीजपुरवठा जोडून घेण्यात आलेला असून एकुण १० नग ट्रान्सफॉर्मर विद्युत पुरवठयाला जोडण्यात आलेले आहेत. महाराष्ट्र राज्य वीज वितरण कंपनीकडील ११००० व्होल्ट इतका उच्च दाब ४३३ व्होल्ट इतक्या लघु दाबात रुपांतर करण्याचे काम ट्रान्सफार्मर मार्फत केले जाते. ट्रान्सफॉर्मर मध्ये इन्सुलेटींग मटेरीअल म्हणून ट्रान्सफॉर्मर ऑईल वापरलेले असते.

या ट्रान्सफॉर्मरमध्ये वापरलेल्या ऑईलची इन्सुलेशन क्षमता ५० के.व्ही. ते ६० के.व्ही. इतकी असावी लागते. परंतु वातावरणातील धुळीमुळे, बाष्पामुळे इत्यादि कारणाने ऑईलची इन्सुलेशन क्षमता कमी होत जाते. शिवाय ऑईलमध्ये मॉईश्चर जाऊन इन्सुलेशन क्षमता ही किमान २६ के.व्ही. ते ३० के.व्ही. पर्यंत कमी होते. इन्सुलेशन क्षमता कमी झाल्यानंतर ऑईलने पेट घेणे , ट्रान्सफॉर्मर वाईडिंग जळणे असे प्रकार घडू शकतात. जर ट्रान्सफॉर्मर वायडींग जळाली तर ५०० के.व्ही.ए.ट्रान्सफॉर्मर रिवाईडिंगसाठी रू.१,५०,०००/- व १००० के.व्ही.ए. ट्रान्सफॉर्मर रिवाईडिंगसाठी रू.३,५०,०००/- इतका खर्च येऊ शकतो. एका १००० केव्हीएच्या ट्रान्सफॉर्मरमध्ये साधारणतः ८०० ते ९०० लिटर व एका ५०० केव्हीएच्या ट्रान्सफॉर्मरमध्ये साधारणतः ५०० ते ६०० लिटर इतके ऑईल असते. हे ऑईल प्रतिलिटर अंदाजे रू.१५०/- इतक्या भावाचे असते. आपण दि.०७-०७-२०१३ रोजी मे.ऊर्जा टेक्नीक्स (इंडिया) प्रा.लि., मुंबई यांचेकडून ऑईल फिल्टर करुन घेतलेले आहे. ऑईल फिल्टर करतेवेळी करण्यात आलेल्या टेस्टींगमध्ये खालील ठिकाणचे ट्रान्सफॉर्मरचे ऑईलची टेस्ट २५ केव्ही किंवा त्यापेक्षा कमी आल्याने ते बदलणे गरजेचे आहे.

| अ.क्र. | ठिकाण | ट्रान्सफॉर्मर कॅपॅसिटी | ऑईल टेस्ट (KV मध्ये) | एकुण ऑईल क्षमता | दर (रु.) | एकुण रक्कम |
|---|---|---|---|---|---|---|
| ०१) | मंदिर परीसर | १००० केव्हीए | २५ KV | ८२० लि. | १५०/- | रु. १,२३,०००.०० |
| ०२) | साईनगर | १००० केव्हीए | २५ KV | ८२८ लि. | १५०/- | रु. १,२४,२००.०० |
| ०३) | धर्मशाळा | ०५०० केव्हीए | २० KV | ४६५ लि. | १५०/- | रु. ०,६९,७५०.०० |

| | | | | | | |
|---|---|---|---|---|---|---|
| ०४) | ५०० रुम | ०५०० केव्हीए | १२ KV | ५३० लि. | १५०/- | रु. ०,७९,५००.०० |
| ०५) | साठवण तलाव | ०१०० केव्हीए | २३ KV | १९० लि. | १५०/- | रु. ०,२८,५००.०० |
| ०६) | टॉप अप लेव्हल करणेकरीता | | | १६७ लि. | १५०/- | रु. ०,२५,०५०.०० |
| | | | **एकुण :-** | **३००० लि.** | | **रु.४,५०,०००.००** |

उपरोक्त सहा ठिकाणचे ट्रान्सफॉर्मरमधील एकुण ३००० लिटर इतके ऑईल नविन खरेदी करुन जुने ऑईल काढून त्याठिकाणी नविन ऑईल फिल्टर करुन भरावे लागणार आहे. याकामी अंदाजे रक्कम रुपये ४,५०,०००/- इतका खर्च येणे अपेक्षित आहे.

याकरीता येणा-या खर्चास, कामास व वर्तमानपत्रात जाहिरात देऊन तसेच संस्थानचे वेबसाईटवर जाहिरात अपलोड करुन निविदा बोलविणेसाठी मान्यता मिळणेस विनंती.

**निर्णय क्र.६५१ यावर सविस्तर चर्चा होऊन, संस्थानला आवश्यक असणारे ट्रान्सफॉर्मर आईल वर्तमानपत्रामध्ये जाहिरात प्रसिध्द करुन तसेच संस्थानचे वेबसाईटवर जाहिरात अपलोड करुन निविदा मागवून खरेदी करणेस व याकामी येणाऱ्या अंदाजे रु.४,५०,०००/- मात्रचे खर्चास मान्यता देण्यात आली.**

(कार्यवाही- विद्युत विभाग प्रमुख)

---

**विषय नं.४० भांडार विभागामध्ये गव्हाचे/तांदळाचे पोते ठेवण्यासाठी लोखंडी स्टॅन्ड तयार करणेबाबत.**

**प्रस्ताव-** प्र.प्रशासकीय अधिकारी (भांडार विभाग) यांनी, जुन्या प्रसादालय हॉलमध्ये घेतलेल्या राऊंडमध्ये भांडार विभागामधील खरेदी केलेले धान्य (गहू) गोणी रास लावणेकरीता जुन्यातील तयार केलेल्या लोखंडी स्टँडप्रमाणे एम.एस.अँगलचे ९`` उंची असलेले २०० नग नविन लोखंडी स्टँड तयार करुन देण्याबाबत कळविलेले होते. त्यानुसार मा.व्यवस्थापन समितीचे सभेतील आयत्या वेळेचा विषय नं.०३ निर्णय क्र.६१० अन्वये २०० नग लोखंडी स्टँड तयार करुन देण्यात आलेले आहे.

भांडार विभागाने सन २०१३-२०१४ या सालाकरीता प्रसादालयातील गहू व तांदुळ खरेदी बाबतची प्रक्रिया पुरवठाधारक यांचेकडून सध्या चालू असल्याचे कळविले आहे. उपरोक्त तयार केलेले लोखंडी स्टँड अपुरे पडणार असल्याने पुन्हा एकुण २०० नग लोखंडी स्टँडची मागणी केलेली आहे.

२०० नग लोखंडी स्टँड त्वरीत बनवून घेणेकामी आवश्यक असणारे मटेरीअल शिल्लक नसल्याने तसेच सदरचे काम बाहेरील फॅब्रिकेटर्स / वर्कशॉपधारकांकडून करुन घ्यावे लागणार आहे. त्यासाठी खालीलप्रमाणे खर्च अपेक्षित आहे.

| अ.क्र | तपशील / साईज | मागणी | दर ( अंदाजे) | रक्कम |
|---|---|---|---|---|
| ०१) | एम.एस.अँगल,<br>साईज :- ५० X ५० X ५ एम.एम. | ३६००<br>कि.ग्रॅ. | रु. ७०/-<br>(प्रति कि.ग्रॅ.) | रु. २,५२,०००/- |
| ०२) | एम.एस.अँगल,<br>साईज :- ४० X ४० X ५ एम.एम. | ६००<br>कि.ग्रॅ. | रु. ७०/-<br>(प्रति कि.ग्रॅ.) | रु. ०,४२,०००/- |
| ०३) | एम.एस.फ्लॅट पट्टी,<br>साईज :- ५० X ५ एम.एम. | ३०००<br>कि.ग्रॅ. | रु. ७०/-<br>(प्रति कि.ग्रॅ.) | रु. २,१०,०००/- |
| | | | **एकुण रक्कम :-** | **रु. ५,०४,०००/-** |

उपरोक्तप्रमाणे भांडार विभागासाठी गहु व तांदळाचे पोते ठेवण्यासाठी २०० नग लोखंडी स्टँड तयार करुन घेणेकामी अंदाजे रक्कम रु. ५,०४,०००/- (अक्षरी रक्कम रु. पाच लाख चार हजार ) मात्र खर्च येणे अपेक्षित आहे.

उपरोक्त प्रस्तावावर विचार होऊन प्रस्तावास मान्यता मिळणेस विनंती.

**निर्णय क्र.६५२ यावर सविस्तर चर्चा होऊन, भांडार विभागामध्ये गव्हाचे/तांदळाचे पोते ठेवण्यासाठी आवश्यक असणारे २०० नग लोखंडी स्टॅन्ड घेणेसाठी विहीत पध्दतीने कोटेशन मागविणेस व याकामी येणाऱ्या अंदाजे रु.५,०४,०००/- मात्रचे खर्चास मान्यता देण्यात आली.**

(कार्यवाही- विद्युत विभागप्रमुख)

---

**विषय नं.४१ सोने व चांदी नाण्यांच्या विक्री किंमतीचे बदलाबाबत.**

**प्रस्ताव-** मा.व्यवस्थापन समितीचे निर्णयानुसार श्रींची प्रतिमा असलेली सोन्याची ५ ग्रॅम, १० ग्रॅम वजनाची व चांदीची २० ग्रॅम वजनाची नाणी तसेच २.५ ग्रॅम सोन्याचे पेंडन्टस साईभक्तांसाठी उपलब्ध करुन देण्यात आलेली आहेत. मा.व्यवस्थापन समितीचे दिनांक २८ जुलै, २००७ रोजीचे सभेतील निर्णय क्रमांक ५९८ अन्वये, सोने-चांदीच्या बाजाराभावात वेळोवेळी जसजशी वाढ अथवा घट होईल त्याप्रमाणात यांच्या विक्री मुल्यात वाढ अथवा घट करण्याचे अधिकार कार्यकारी अधिकारी यांना प्रदान करण्यात आले आहेत.

उपरोक्त निर्णयान्वये, दिनांक १६ एप्रिल, २०१३ ते ३० जुलै, २०१३ या कालावधीत सोने व चांदीचे बाजारभावात वाढ तथा घट (संदर्भ:- दैनिक सकाळ) झाल्याने मा.कार्यकारी अधिकारी यांचे

अधिकारात वेळोवेळी, सोने-चांदी नाणी व पैडंन्टसच्या विक्री मुल्यात बदल करण्यात आलेला आहे. उपरोक्त प्रमाणे विक्री मुल्यात केलेल्या बदलाचे विवरण खालील प्रमाणे-

| अ. क्र. | दरात बदल केल्याचा दिनांक | सोने २.५ ग्रॅम | सोने ५ ग्रॅम | सोने १० ग्रॅम | चांदी २० ग्रॅम |
|---|---|---|---|---|---|
| ०१. | १६.०४.२०१३ | ७१००/- | १४०००/- | २७८००/- | ११००/- |
| ०२. | ११.०५.२०१३ | ७३००/- | १४,४००/- | २८,६००/- | १,१००/- |
| ०३. | ३०.०७.२०१३ | ७५००/- | १४,९००/- | २९,६००/- | १,०००/- |

तरी सोने-चांदीच्या बाजारभावात झालेल्या बदलाच्या पार्श्वभुमीवर सोने व चांदीचे नाणी व पेंडंन्टसच्या विक्रीमुल्यामध्ये दिनांक १६ एपिल, २०१३ ते ३० जुलै, २०१३ या कालावधीत वेळोवेळी केलेल्या बदलास कार्यात्तर मंजुरी मिळणेस विनंती.

**निर्णय क्र.६५३ यावर सविस्तर चर्चा होऊन, सोने-चांदीच्या बाजारभावात झालेल्या बदलाच्या पार्श्वभुमीवर सोने/ चांदीचे नाणी व पेंडंन्टसच्या विक्रीमुल्यामध्ये दिनांक १६ एपिल, २०१३ ते ३० जुलै, २०१३ या कालावधीत वेळोवेळी केलेल्या बदलाची नोंद घेण्यात येऊन त्यास कार्योत्तर मान्यता देण्यात आली.**

(कार्यवाही-मुख्यलेखाधिकारी)

---

**विषय नं.४२ भक्तांचे निवासी खोल्यांसाठी सुरु करण्यात आलेल्या विशेष स्वरुपाच्या देणगी योजनेबाबत.**

**विषय नं.४३ युनियन बँक ऑफ इंडियाच्या विस्तारीत कक्षासाठी दिलेल्या जागेच्या करारनाम्याचे पुढील एक वर्षासाठी नुतनीकरण करणेबाबत.**

**निर्णय क्र.६५४ विषय नं.४२ व ४३ वरील चर्चा पुढे ढकलणेत आली.** (कार्यवाही- मुख्य लेखाधिकारी)

---

**विषय नं.४४ ग्रुप गॅच्युटी योजना नुतनीकरण... २०१३-२०१४**

**प्रस्ताव-** मा.व्यवस्थापन मंडळ निर्णय क्रमांक ४१८ दि.२२-२३/०९/२००१ अन्वये दिनांक ०१ ऑक्टोबर, २००१ पासून संस्थान कर्मचाऱ्यासाठी एल.आय.सी. ग्रुप ग्रॅच्युटी योजना लागु करण्यात आलेली आहे. सदर योजनेचे दरवर्षी ऑक्टोबर महिन्यात नुतनीकरण करण्यात येते.

**अ)** नुतनीकरण करताना त्या वर्षाच्या अंशदानाची रक्कम, लाईफ कव्हर प्रिमीयम आदा करण्यात येतो. चालू वर्षासाठी एल.आय.सी.ऑफ इंडीया, पुणे यांनी दि.२१.०८.२०१३ चे ई-मेलद्वारे खालीलप्रमाणे रक्कम ग्रुप ग्रॅच्युटी योजनेत डिपॉझिट करणेबाबत कळविलेले आहे.

| Sr. | Premium Details | Amount |
|---|---|---|
| 1 | Current Year Contribution | 1,92,32,338.00 |
| 2 | Life Cover Premium | 18,36,123.00 |
| 3 | Service Tax | 2,26,945.00 |
| 4 | Additional Contribution to Gratuity Fund | 1,24,38,222.00 |
| | **Total Amount Payable** | **3,37,33,628.00** |

**ब)** संस्थानचे वैधानिक लेखापरिक्षक कोचर अॅन्ड असोसीएटस्, चार्टर्ड अकौंटंट, मुंबई यांनी दि.३१.०३.२०१३ अखेर प्रत्यक्ष ग्रॅच्युटी फंडातील शिल्लक रक्कम रु.२८,०७,४०,३९९/- व दि.३१.०३.२०१२ अखेर ग्रॅच्युटीची तरतुदीची एकुण रक्कम रु.२९,३२,२८,९५७/- यातील फरक रु.१,२४,८८,५५८/- मात्र एल.आय.सी पुणे यांचेकडील ग्रॅच्युटी फंडात गुंतविणेबाबत निर्देशित केलेले आहे.

**क)** उपरोक्त अ व ब मध्ये नमूद केल्याप्रमाणे एल.आय.सी. ऑफ इंडीया, पुणे यांचेकडील ग्रुप ग्रॅच्युटी योजनेचे चालू वर्षाकरीता नुतनीकरण करणेकामी अंशदान, Life Cover Premium (Including Service Tax) व वैधानिक लेखापरिक्षक यांनी सुचविल्याप्रमाणे दि.३१.०३.२०१३ अखेर ग्रॅच्युटी फंडात कमी जमा दिसत असलेली रक्कम, डिपॉझिट म्हणून एलआयसी ऑफ इंडीया, पुणे यांचेकडे जमा करणे आवश्यक आहे. ग्रुप ग्रॅच्युटी योजनेअंतर्गत जमा असलेले रकमेवर एल.आय.सी. ऑफ इंडीया, पुणे यांचेकडून दरवर्षी **९.४०%** या दराने संस्थानला व्याज मिळते. चालू वर्षाचे नुतनीकरणाकरीता खालीलप्रमाणे रक्कम ग्रुप ग्रॅच्युटी योजनेत डिपॉझिट करण्यात यावी असे नम्र मत आहे.

| Sr. | Premium Details | Amount |
|---|---|---|
| 1 | Current Year Contribution | 1,92,32,338.00 |
| 2 | Life Cover Premium *(Including Service Tax)* | 20,63,068.00 |
| 3 | Difference between Gratuity amount & Gratuity Fund (*As per audit report)* | 1,24,88,558.00 |
| | **Total Amount Payable** | **3,37,83,964.00** |

**ड)** उपरोक्त रक्कम ही योजनेचे नुतनीकरण होण्यासाठी दि.०१.१०.२०१३ अखेर भरणे आवश्यक आहे. अन्यथा योजनेचे नुतनीकरण LIC of India, पुणे यांना रक्कम प्राप्त झालेनंतर होईल. या कालावधीत एखाद्या कर्मचाऱ्याचे आकस्मीक निधन झाल्यास त्या कर्मचाऱ्याला या योजनेचा लाभ मिळणार नाही व तो या लाभापासून वंचीत होईल.

सदर रक्कम ही संस्थानच्या ग्रुप ग्रॅच्युटी या योजनेमध्ये संथानच्या नांवे डिपॉझीट होत असून त्यावर संस्थानला ९.४० % या दराने दरवर्षी व्याज मिळते. हा संस्थानचा खर्च नसुन सदर रक्कम डिपॉझीट म्हणुन LIC कडे ठेवण्यात येते.

वर नमुद केल्याप्रमाणे रक्कम रु.३,३७,८३,९६४/-मात्र एवढी होते. परंतु त्यावर वार्षिक ९.४०% दराने व्याज मिळत असल्याने पुर्णांकीत रक्कम रु.३,५०,००,०००/- (तीन कोटी, पन्नास लाख) मात्र एल.आय.सी. ऑफ इंडीया, पुणे यांचेकडे RTGS द्वारे आदा करणेच्या मान्यतेसाठी सादर.

**निर्णय क्र.६५५ यावर सविस्तर चर्चा होऊन, ग्रुप गॅच्युटी योजना सन २०१३-२०१४ नुतनीकरणासाठी पुर्णांकीत रक्कम रु.३,५०,००,०००/- मात्र एल.आय.सी. ऑफ इंडीया, पुणे यांचेकडे RTGS द्वारे आदा करणेस मान्यता देण्यात आली.** (कार्यवाही- मुख्यलेखाधिकारी)

---

**विषय नं.४५ माहे सप्टेंबर-२०१३ अखेर गुंतवणुकीविषयी निर्णय घेणेबाबत.**

**प्रस्ताव-** माहे सप्टेंबर, २०१३ अखेर गुंतवणूकीसाठी उपलब्ध रकमांचा तपशील पुढीलप्रमाणे : -

| अ.नं. | तपशील | मुदतपूर्तीचा दिनांक | रक्कम |
|---|---|---|---|
| १) | सेंट्रल बँक ऑफ इंडिया शिर्डी | ०७/९/२०१३ | २,७३,९३,९५९/- |
| २) | कॉर्पोरेशन बँक, शिर्डी | ०७/९/२०१३ | २,७३,९३,९५०/- |
| ३) | बँक ऑफ इंडिया, शिर्डी | ०७/९/२०१३ | ९८,६१,८२५/११ |
| ४) | बँक ऑफ इंडिया, शिर्डी | ०७/९/२०१३ | ९८,६१,८२५/११ |
| ५) | बँक ऑफ इंडिया, शिर्डी | ०७/९/२०१३ | ७६,७०,३०८/४२ |
| ६) | बँक ऑफ बरोडा,नाशिक | ०७/९/२०१३ | २,७३,९३,९५९/- |
| ७) | आंध्रा बँक, शिर्डी | ०७/९/२०१३ | २,७३,९३,९५९/- |
| ८) | सेंट्रल बँक ऑफ इंडीया, शिर्डी | १८/९/२०१३ | २२,७९,१९,५१०/- |
| ९) | सेंट्रल बँक ऑफ इंडीया, शिर्डी | १८/९/२०१३ | २३,०२,२१७/- |
| १०) | सेंट्रल बँक ऑफ इंडीया, शिर्डी | २६/९/२०१३ | १५,१९,४६,३४०/- |
| ११) | सेंट्रल बँक ऑफ इंडीया, शिर्डी | २७/९/२०१३ | ६,५१,१९,८६०/- |
| १२) | सेंट्रल बँक ऑफ इंडीया, शिर्डी | २७/९/२०१३ | २१,९२,५८८/- |
| १३) | दैनंदिन खर्च वजा जाता माहे ऑगष्ट २०१३ अखेर गुंतवणूकीसाठी उपलब्ध होऊ शकणारी अंदाजे रक्कम | | १०,००,००,०००/- |
| | | **एकूण रक्कम** | **६८,६४,५०,३०९/६४** |

वरील तपशीलानुसार साधारणतः रक्कम रु. ६८ कोटी गुंतवणूकीसाठी उपलब्ध आहेत.

उपलब्ध होणारी रक्कम ही नियमित सेवा देणा-या राष्ट्रीयीकृत बँकेकडे उच्चतम व्याजदराने गुंतविल्यास त्यांचेकडून संस्थानला जास्तीत-जास्त सेवाही मिळविता येतील. विश्वस्तव्यवस्थेचे वैधानिक लेखापरिक्षण करतेवेळी गुंतवणूकीसाठी उपलब्ध होत असलेली रक्कम ही स्थानिक राष्ट्रीयीकृत/सेवा देणा-या बँकेकडेच जास्तीत-जास्त व्याजदराने गुंतविण्यात यावी असे लेखापरिक्षक यांनी सुचविले असल्याने, संस्थानला प्रामुख्याने सेवा देणा-या खालील बँकांकडून व्याजदर मागवुन जास्तीत-जास्त व्याजदर देणा-या बँकेकडे सदरची गुंतवणूक करता येईल असे नम्र मत आहे :-

१ ) आंध्र बँक, शिर्डी
२) बँक ऑफ बरोडा, नासिक
३) बँक ऑफ इंडीया, शिर्डी
४) कॅनरा बँक, शिर्डी
५) सेंट्रल बँक ऑफ इंडीया, शिर्डी
६) कॉर्पोरेशन बँक, शिर्डी
७) स्टेट बँक ऑफ इंडीया, शिर्डी
८) युको बँक, शिर्डी
९) युनियन बँक ऑफ इंडीया, शिर्डी
१०) बँक ऑफ महाराष्ट्र, शिर्डी
११) विजया बँक, शिर्डी
१२) इंडीयन बँक, शिर्डी
१३) ओरीएंटल बँक ऑफ कॉमर्स, शिर्डी
१४) स्टेट बँक ऑफ हैद्राबाद, शिर्डी

तरी अ.नं. १ ते १४ या बँकांकडून जसजशी गुतवणूकीसाठी रक्कम उपलब्ध होईल तसतसे व्याजदर मागवून जास्तीत-जास्त व्याजदर देणा-या बँकेकडे उपरोक्तप्रमाणे उपलब्ध होणारी रक्कम रु.६८ कोटींची टप्प्या-टप्प्याने गुंतवणूक करण्याच्या मान्यतेसाठी सादर.

**निर्णय क्र.६५६ यावर सविस्तर चर्चा होऊन, प्रस्तावात नमुद केलेप्रमाणे अ.नं. १ ते १४ या स्थानिक राष्ट्रीयीकृत सेवा देणाऱ्या बँकांकडून व्याजदर मागवुन जास्तीत-जास्त व्याजदर देणाऱ्या बँकेकडे उपरोक्तप्रमाणे उपलब्ध होणारी रक्कम रु.६८ कोटी मात्रची टप्प्या-टप्प्याने गुंतवणूक करणेस मान्यता देण्यात आली.** (कार्यवाही-मुख्यलेखाधिकारी)

---

**विषय नं.४६ श्री सद्‌गुरु साईनाथ सगुणोपासना मराठी (आरती) या पुस्तकाचा ओडीया भाषेत अनुवाद करणेस मान्यता मिळणेबाबत.**

**प्रस्ताव-** सन २००४ चा महाराष्ट्र अधिनियम क्र.१४ मधील १७ (२) (ठ) मधे खालीलप्रमाणे तरतूद आहे.

श्री साईबाबांचे जीवन, त्यांचे कार्य, त्यांच्या लीला व त्यांची शिकवण याबाबतच्या उपयुक्त माहितीचा प्रचार-प्रसार करील आणि श्री साई साहित्य ग्रंथालय चालवील व त्याचा विस्तार करील.

यानुसार संस्थानद्वारा भारतातील १७ भाषांमध्ये श्री साईचरित्र व इतर संस्थान प्रकाशने विक्रीस उपलब्ध आहेत.

श्री सत्य खडगराय, कटक यांनी दि.०१.०७.२०१३ चे पत्रान्वये श्री साईनाथ सगुणोपासना (आरती) मराठी या संस्थान प्रकाशित पुस्तकाचा ओडीया भाषेत अनुवाद करणेस अनमुती मागितली आहे. अनुवाद करुन ते संस्थानला सीडी देणार असून त्याचे प्रकाशन संस्थानने करावे अशी इच्छा त्यांनी प्रदर्शीत केली आहे. त्याकामी पुस्तकाचे सर्वाधिकार ते संस्थानला विनामुल्य देणार आहेत.

सध्या खालील भाषांमध्ये सगुणोपासना (आरती) पुस्तक प्रकाशित असून विक्रीस उपलब्ध आहे.
१) मराठी २) हिंदी ३) इंग्रजी ४) तेलगू ५) तामिळ ६) गुजराथी ७) पंजाबी ८) सिंधी ९) बंगाली १०) जर्मन

उपरोक्त सन २०१४ चे महाराष्ट्र अधिनियमातील तरतूदीनुसार अधिकाधिक भाषेत आरती पुस्तकाचा अनुवाद झाल्यास सर्व भाषिकांना त्याचा लाभ होईल.

श्री सत्य खडगराय,कटक यांनी यापूर्वी संस्थानचे मान्यतेने श्री साई सतचरित्र इंग्रजीचा ओडीया भाषेत अनुवाद केला असून सदर पुस्तक संस्थानद्वारा प्रकाशित केले आहे. श्री साईबाबांचे जीवन कार्याचा प्रचार- प्रसार सर्व भाषेत व्हावा म्हणून त्यांनी प्रस्तावित केलेप्रमाणे सगुणोपासना मराठी (आरती) पुस्तकाचा ओडीया भाषेत अनुवाद करणेस मान्यता देणेस हरकत नाही असे नम्र मत आहे.

तथापि संस्थानचे नियमाप्रमाणे पुस्तक प्रकाशनापूर्वी, केलेला अनुवाद मुळ पुस्तकाबरहूकूम असलेबाबत व अनुवाद करतांना त्याचे अर्थात कोणताही बदल केला नसल्याबाबत पुणे विद्यापीठाचे प्रमाणपत्र सादर करणेबाबत त्यांना सांगता येईल सर्व बाबींची पूर्तता झाल्यानंतरच पुस्तकाचे संस्थानद्वारा प्रकाशन करणेबाबत कार्यवाही करणेत येईल.

सबब श्री सत्य खडगराय, कटक यांना श्री साईनाथ सगुणोपासना (मराठी) पुस्तकाचा ओडीया भाषेत अनुवाद करणेस अनुमती देणेकामी तसेच संस्थानचे नियमाप्रमाणे कागदपत्रांची पूर्तता पूर्ण केलेनंतर त्याचे संस्थानद्वारा प्रकाशन करणेस मान्यतेसाठी सादर

**निर्णय क्र.६५७ यावर सविस्तर चर्चा होऊन, उपरोक्त प्रस्तावास मान्यता देण्यात आली.**

(कार्यवाही- अधिक्षक, प्रकाशने विभाग)

---

**विषय नं.४७ श्री साईलीला द्वैमासिक मराठी व हिंदी- इंग्रजी सप्टेंबर- ऑक्टोबर- २०१३ च्या अंकांची मागील दराने छपाई करणेस मान्यता मिळणेबाबत.**

**प्रस्ताव-** सन २००४ चा महाराष्ट्र अधिनियम क्र.१४ मधील कलम नं.१७ (२) (ठ) मध्ये खालीलप्रमाणे तरतुद आहे.

श्री साईबाबांचे जीवन, त्यांचे कार्य, त्यांच्या लीला व त्यांची शिकवण याबाबतच्या उपयुक्त माहितीचा प्रचार-प्रसार करील आणि श्री साई साहित्य ग्रंथालय चालविल व त्याचा विस्तार करील.

यानुसार श्री साईबाबांच्या शिकवणूकीचा प्रचार-प्रसार करण्याच्या उद्देशाने श्री साईलीला-मराठी/ हिंदी-इंग्रजी द्वैमासिक प्रकाशित केले जाते. मे.टॅको व्हीजन्स प्रा.लि., मुंबई यांना इकडील जा.नं.२३५२/ २५.०८.२०१२ अन्वये माहे सप्टेंबर- ऑक्टोबर २०१२ ते माहे जुलै-ऑगस्ट २०१३ अखेर मासिके छपाईचा कार्यादेश होता.

माहे सप्टेंबर-ऑक्टोबर २०१३ ते माहे जुलै-ऑगष्ट २०१४ अखेर छपाई कामाच्या निविदा काढणे, तसेच छपाईकामी येणा-या अंदाजे रु.३४,१०,००० चे खर्चास व विहीत पद्धतीने छपाईची कार्यवाही करणेस मान्यता मिळणेसाठी मा.मुंबई उच्च न्यायालयाचे औरंगाबाद खंडपीठाकडे अर्ज दाखल असून अद्याप पावेतो मान्यता मिळालेली नाही. मागील कार्यदेशाची मुदत ऑगष्ट २०१३ अखेर संपत असून, वर्गणीदारांना पुढील द्वैमासिक अंक वेळेत पाठविता यावा म्हणून माहे सप्टेंबर-ऑक्टोबर २०१३ या मराठी व हिंदी-इंग्रजी द्वैमासिकाची छपाई मागील वर्षाच्या मंजूर दराने करुन घेणे क्रमप्राप्त आहे. मे.टॅको

व्हीजन्स प्रा.लि. यांना दूरध्वनीवरुन याबाबत विचारणा केली असता,त्यांनी मागील मंजूर दराने छपाई करुन देणेस संमती दर्शविली आहे. याकामी खालीलप्रमाणे खर्च अपेक्षीत आहे.

| अ.नं | तपशिल | छपाई संख्या | मागिल मंजूर दर रुपये पैसे | अपेक्षित खर्च |
|---|---|---|---|---|
| ०१ | श्री साईलीला अंक- मराठी द्वैमासिक (माहे सप्टेंबर-ऑक्टोबर २०१३)<br>दसरा विशेषांक<br>६४ + ४ = ६८ पाने | १५,००० नग | २०.८८ | ३,१३,२००.०० |
| ०२ | साईलीला हिंदी-इंग्रजी द्वैमासिक (माहे सप्टेंबर-ऑक्टोबर २०१३)<br>दसरा विशेषांक<br>६४+४ =६८ पाने | १७,००० नग | २०.८२ | ३,५३,९४०.०० |
| | | | **एकूण रुपये** | **६,६७,१४०.००** |

दरम्यानचे काळात मा.उच्च न्यायालयाची मान्यता मिळाल्यास विहीत पद्धतीने निविदा मागवून कार्यवाही केली जाईल.

सबब प्रस्तावित केलेप्रमाणे श्री साईलीला द्वैमासिक (दसरा विशेषांक) मराठी /हिंदी-इंग्रजी माहे सप्टेंबर- ऑक्टोबर २०१३ मागील मंजूर दराने मे.टॅको व्हीजन्स प्रा.लि.,मुंबई यांचेकडून छपाई करुन घेणेस व त्याकामी येणा-या रु.६,६७,१४०/- चे खर्चास मंजूरी मिळणेस सादर.

**निर्णय क्र.६५८ यावर सविस्तर चर्चा होऊन, उपरोक्त प्रस्तावात नमुद केलेप्रमाणे श्री साईलीला द्वैमासिक (दसरा विशेषांक) मराठी/ हिंदी-इंग्रजी, माहे सप्टेंबर-ऑक्टोबर २०१३, मे.टॅको व्हीजन्स प्रा.लि.,मुंबई यांचेकडून मागील मंजूर दराने छपाई करुन घेणेस व त्याकामी येणाऱ्या रु.६,६७,१४०/- मात्रचे खर्चास मान्यता देण्यात आली.** (कार्यवाही- अधिक्षक, प्रकाशने विभाग)

---

**विषय नं.४८ मुलांचे श्री साईबाबा इंग्रजी (विकास मेहता) या पुस्तकातील चुकांचे दुरुस्तीबाबत.**

**प्रस्ताव-** सन २००४ चा महाराष्ट्र अधिनियम क्र.१४ च्या कलम १७ (२) (ठ) मध्ये खालीलप्रमाणे तरतूद आहे. श्री साईबाबांचे जीवन, त्यांचे कार्य, त्यांच्या लीला व त्यांची शिकवण याबाबतच्या उपयुक्त माहितीचा प्रचार-प्रसार करील आणि साहित्य ग्रंथालय चालवील व त्याचा विस्तार करील.

यानुसार संस्थानद्वारा CHILDRENS SHRI SAIBABA हे श्री विकास मेहता, दिल्ली यांनी लिहीलेले पुस्तक प्रकाशित करण्यात आले असून विक्रीसाठी सध्या ५ वे संस्करण उपलब्ध आहे.

श्री आनंद मनोजकुमार शेठ,जमखंडी यांनी दि.०४.०४.२०१३ चे पत्रान्वये सूचीत केले होते की, सदर पुस्तकातील बराच मजकूर च्श्री साईसच्चरित्र ग्रंथाबरहुकूम नसल्याने मुलांचे मनात श्री साईंचे जीवन चरित्राबाबत गोंधळ होऊन चुकीचा संदेश जात आहे. असे होऊ नये म्हणून त्यांनी सदर पुस्तकात खूप दुरुस्त्या सुचविल्या होत्या.

त्यांनी सुचविलेल्या दुरस्त्या योग्य आहेत किंवा कसे ? याबाबत इंग्रजी भाषा तज्ज्ञाचा अभिप्राय घेऊन पुढील कार्यवाही करावी असे निर्देश मा.कार्यकारी अधिकारी साहेब यांनी दि.१७.०४.१३ चे टिपणीवर दिले आहेत.

त्यानुसार साईभक्त श्री सुबोध अग्रवाल डी.लिट,(इंग्रजी),डेहराडून कॉलेज इंग्रजी विभाग प्रमुख यांचेशी संपर्क साधून श्री आनंद शेठ यांनी सुचविलेल्या दुरुस्त्या श्री साईचरित्र ग्रंथाबरहुकूम आहेत किंवा कशा याचे परिक्षण करुन मुळ पुस्तकाशी मिळतेजुळते तथापि श्री साई सच्चरित्राबरहुकूम लेखन करुन द्यावे असे समक्ष सांगण्यात आले होते. त्यांनीही दि.२०.०५.२०१३ चे पत्रान्वये सदर काम श्रींची सेवा म्हणून विनामूल्य करुन देणेस तयार असल्याचे कळविले आहे. त्यांना अभ्यासासाठी संस्थान प्रकाशित श्री साई चरित्र मराठी, हिंदी, इंग्रजी पुस्तके पुरविण्यात आली आहेत. त्यांनी उक्त पुस्तकाचे परिक्षण करुन सुधारित पुस्तक तयार करुन दिले आहे. त्याचे अवलोकन करता सदर पुस्तकातील लिखाण संस्थान प्रकाशित श्री साई सच्चरितग्रंथाबर हूकूम व श्री विकास मेहता (मुळ लेखक) यांनी लिहीलेल्या लिखाणाशी मिळतेजुळते आहे. त्यात आक्षेपार्ह मजकूराचा समावेश केलेला नाही.

श्री आनंद मनोजकुमार शेठ, जमखंडी यांनीही दि.१०.०८.२०१३ रोजी ई-मेल द्वारा त्यांनी लिहीलेले पुस्तक पाठविले आहे.

दोन्ही पुस्तकांचे तुलनात्मक अवलोकन करता श्री सुबोध अग्रवाल यांनी लिहीलेल्या पुस्तकात श्री साईसच्चरित्रातील आशय योग्य प्रकारे मांडलेला दिसतो. त्यांनी दिलेल्या पत्रातील त्यांची शैक्षणिक पात्रता, शैक्षणिक क्षेत्रातील प्रदिर्घ अनुभव पाहता त्यांचे लिखाण योग्य वाटते.

सदर पुस्तकाचे मुळ लेखक श्री विकास मेहता, दिल्ली यांनी पुस्तकाचे सर्वाधिकार (Copy right) संस्थानला दिले आहेत.

सबब श्री सुबोध अग्रवाल,डेहराडून यांनी परिक्षण करुन तयार केलेप्रमाणे मुलांचे साईबाबा इंग्रजी (मुळ लेखक) विकास मेहता या पुस्तकाची सुधारित आवृत्ती संस्थानद्वारा प्रकाशित करणेस व

त्याच प्रमाणे मुलांचे साईबाबा (हिंदी) (मुळ लेखक) विकास मेहता या पुस्तकाचे परिक्षण करुन सुधारित आवृत्ती प्रकाशित करणेस निर्णयार्थ सादर.

**निर्णय क्र.६५९** **यावर सविस्तर चर्चा होऊन, श्री सुबोध अग्रवाल, डेहराडून यांनी परिक्षण करुन तयार केलेले मुलांचे साईबाबा इंग्रजी (मुळ लेखक) विकास मेहता, या पुस्तकाची सुधारित आवृत्ती संस्थानद्वारा प्रकाशित करणेस व त्याच प्रमाणे मुलांचे साईबाबा (हिंदी) (मुळ लेखक) विकास मेहता या पुस्तकाचे परिक्षण करुन सुधारित आवृत्ती प्रकाशित करणेस मान्यता देण्यात आली.**

(कार्यवाही- अधिक्षक, प्रकाशने विभाग)

---

**विषय नं.४९** **दैनंदिन कामकाजासाठी संगणके व संगणकीय साहित्य खरेदी करणेबाबत.**

**विषय नं.५०** **रुग्णालय विभागाकरिता अद्ययावत संगणकीकरण (H.M.I.S.) करणेकामी तांत्रिक सल्लागारांचे नेमणूकीबाबत.**

**विषय नं.५१** **भारत पेट्रोलियम कार्पो. लि. यांचेकडून गॅस खरेदीस व त्याकामी अॅडव्हान्स रकमेत वाढ करणेबाबत.**

**निर्णय क्र.६६०** **विषय नं.४९ ते ५१ वरील चर्चा पुढे ढकलणेत आली.**

---

**विषय नं.५२** **चपाती मशिनचे CMC कॉन्ट्रॅक्टबाबत.**

**प्रस्ताव-** **सन २००४ चा महाराष्ट्र अधिनियम क्रं. १४ (भाग ४)** मध्ये महाराष्ट्र विधान मंडाळाचे अधिनियम व राज्यपालांनी प्रस्तापित केलेले अध्यादेश व केलेले विनीयम मधील १४(२-घ) नुसार भक्तांना सोयीसाठी आवश्यक ते दुरुस्तीचे काम व २१ (१- घ) नुसार भक्तांना जेवन पुरवणे व अन्नछत्र चालवणे.

**मा. व्यवस्थापन समिती** दिनांक १४.७.२०१२ रोजीचे सभेतील निर्णय क्रं. ४५७

**प्रस्ताविक**:- मा. व्यवस्थापन समिती दिनांक १४.७.२०१२ चे सभेतील निर्णय क्रं. ४५७ अन्वये श्री राजेंद्र सोमन द्वारा पुर्णब्रम्हा, मुंबई यांना एकूण पाच मशिनची वार्षिक सी.एम.सी. (Comprehensive Maintenance Contract) दिनांक ६.९.२०१२ ते दि. ५.९.२०१३ अखेर एक वर्षासाठी रक्कम रु. ९,१६,६६७/- रुपयात देणेत आलेले आहे. पुर्णब्रम्हा, मुंबई यांचे तसेच दोन टेक्नीशियन हे पुर्णवेळ शिर्डी येथे असून पाचही चपाती मशिन्स मेन्टेनंन्स विनातक्रार व्यवस्थीत करत आहे. पुर्णब्रम्हा, मुंबई यांचे CMC कॉन्टक्टची मुदत दिनांक ५.९.२०१३ रोजी संपणार आहे.

प्रसादालयाकडील दिनांक १९.७.२०१३ रोजीचे मंजूर टिपणीने पुढिल दोन वर्षाकरीता श्री राजू सोमन द्वारा पुर्णब्रम्हा, मुंबई यांचेकडून CMC कॉन्ट्रक्टचा प्रस्ताव मागविणेस मान्यता मिळालेली आहे. त्यानुसार जा. नं. एसएसएस/वशि/प्रसादा/ १९५२/२०१३ दिनांक २४.७.२०१३ रोजी पुर्णब्रम्हा, मुंबई यांना पुढिल दोन वर्षाकरीता प्रस्ताव पाठविणेस पत्र देणेत आलेले होते.

पुर्णाब्रम्हा, मुंबई यांनी दिनांक १.८.२०१३ रोजीचे पत्राने प्रस्ताव पाठविलेला आहे. त्यांनी प्रस्तावात प्रती वर्षाकरीता पाच चपाती मशिन्सकरीता रक्कम रु. १०,७५,०००/- + सर्व्हिस टॅक्स कळविलेला आहे. तसेच CMC कॉन्ट्रक्ट कालावधीमध्ये दोन टेक्नीशियनची निवास व भोजन व्यवस्था विनामुल्य करणेचे कळविलेले आहे.

**मागणी:-** श्री प्रसादालयातील पाच चपाती मशिन्सचे CMC कॉन्ट्रक्ट पुर्णब्रम्हा, मुंबई यांना दिलेले असून त्यांची मुदत दिनांक ५.९.२०१३ रोजी संपणार आहे. मशिन्स सुस्थितीत ठेऊन कार्यान्वित राहणेसाठी कॉम्प्रेहेसीव्ह मेन्टेंनन्स कॉन्ट्रॅक्ट देणे गरजेचे आहे. त्यामुळे दिनांक ६.९.२०१३ नंतर पुढिल दोन वर्षासाठी CMC कॉन्ट्रक्ट देणेकामी श्री राजेंद्र सोमन द्वार पुर्णब्रम्हा, मुंबई यांनी दिलेला प्रस्ताव मा. व्यवस्थापन समिती सभेसमोर ठेऊन त्यांचे सोबत मा. व्यवस्थापन समिती सभेमध्ये चर्चा / वाटाघाटीद्वारे निर्णय होणे आवश्यक आहे.

**संस्थान अधिनियम/ ठराव यानुसार नुसार अनुमान :-** तांत्रिक.

**विभागाचा अभिप्राय /स्पष्ट मत:-** तरी दिनांक ६.९.२०१३ नंतर पुढील दोन वर्षाकरीता पाच चपाती मशिन्सचे कॉम्प्रेन्हेसीव्ह मेन्टनंन्स कॉन्ट्रॅक्ट पुर्णब्रम्हा, मुंबई यांनी त्यांचे सर्व्हिस कालावधीत चांगली सेवा पुरवली असल्याने त्यांनी पाठविलेला प्रस्ताव मा. व्यवस्थापन समिती सभेपुढे सादर करुन चर्चा/ वाटाघाटीद्वारे निर्णय होणेकामी सदरचा विषय मा. व्यवस्थापन समिती सभेपुढे निर्णयार्थ सादर.

**निर्णय क्र.६६१** **यावर सविस्तर चर्चा होऊन, श्री साईप्रसादालयामधील पाच चपाती मशिन्सचे कॉम्प्रेन्हेसीव्ह मेन्टनंन्स कॉन्ट्रॅक्ट दिनांक ६.९.२०१३ नंतर पुढील दोन वर्षाकरीता पुर्णब्रम्हा, मुंबई यांचेकडून करुन घेण्यात यावे व याकामी त्यांना प्रतिवर्षी रु.१०,७५,०००/- + सर्व्हिस टॅक्स तसेच CMC कॉन्ट्रक्ट कालावधीमध्ये त्यांच्या दोन टेक्नीशियनची निवास व भोजन व्यवस्था विनामुल्य करणेत यावी, असे ठरले.** (कार्यवाही- अधिक्षक, श्री साई प्रसादालय)

---

**विषय नं.५३** **स्वयंसेवी भोजन व्यवस्थेसाठी आवश्यक असणारे साहित्य खरेदीबाबत.**

**प्रस्ताव-** **अधिनियम २००४ मधील तरतुद:-** सन २००४ चा महाराष्ट्र अधिनियम क्रं.१४ (भाग-४) मध्ये महाराष्ट्र विधान मंडळाचे अधिनियम व राज्यपालांनी प्रस्थापीत केलेले अध्यादेश व केलेले विनीयम

मधील १४ (२ घ) नूसार भक्तांना सोयीसाठी आवश्यक ते उपाययोजना हाती घेण्याचे. तसेच २१ (१ घ) नूसार भक्तांना जेवण पुरविणे आणि अन्नछत्र चालविणे याबाबतची तरतुद केलेली आहे.

**प्रस्तावना:-** श्री साई प्रसादालय विभागामार्फत साईभक्तांची प्रसादभोजन अभावी गैरसोय होऊ नये म्हणून, व्दारावती भक्तनिवासस्थान (धर्मशाळा) येथे सन २००८ पासून साईबाबा भक्तनिवासस्थान (५००रुम) येथे सन २००६ पासून स्वयंसेवी प्रसादभोजन व्यवस्था सुरु करणेत आलेली आहे. तसेच श्री साईनाथ रुग्णालय व श्री साईबाबा हॉस्पीटल येथील रुग्णांना मोफत भोजन देणेची व्यवस्था करणेत आलेली आहे.

व्दारावती भक्तनिवासस्थान व साईबाबा भक्तनिवासस्थान येथील प्रसादभोजन व्यवस्थेकामी लागणारे उदा. फायबर कॅन, स्टे.स्टील टिप, इन्सुलेटेड बॉक्स, टेबल, फायबर खुर्च्या, बस्कर पट्टी, स्टे.स्टील सर्व्हीस टेबल,अॅल्युमिनियम पातेले इत्यादी साहित्य हे सततच्या वापरामुळे खराब झालेले आहे. त्यामुळे सदर साहित्य नविन खरेदी करणे गरजेचे आहे.

तसेच मा.अध्यक्ष साहेब यांनी दि.०२/०७/२०१३ रोजी दूरध्वनीवरुन केलेल्या सुचनेनुसार साईआश्रम भाग-१ येथे स्वयंसेवी भोजन व्यवस्था सुरु करावयाची असल्याने इकडील दि.०४/०७/२०१३ रोजीचे मंजूर टिपणीनूसार साईआश्रम करीता १० नग फायबर कॅन व १० नग स्टे.स्टील टिप विहीत पध्दतीने खरेदी केलेले आहे. मात्र उर्वरीत साहित्य हे सध्या वापरात असलेल्या साहित्यामधून वापरुन शनिवार दिनांक २०/०७/२०१३ पासून साईआश्रम येथे साईभक्तांसाठी प्रायोगिक तत्वावर स्वयंसेवी प्रसादभोजन व्यवस्था सुरु करणेत आलेली आहे. परंतू साई आश्रम येथे अंदाजे १०,००० ते १२,००० साईभक्तांची राहण्याची व्यवस्था असल्याने गर्दीचे प्रमाणात प्रसादभोजन व्यवस्था पुरविणेस अडचण निर्माण होवू नये याकरीता फायबर कॅन, स्टे.स्टील टिप व उर्वरीत इतर साहित्य खरेदी करणे गरजेच आहे. स्वयंसेवी भोजनासाठी खालीलप्रमाणे साहित्याची आवश्यकता भासणार आहे.

| अ. नं. | साहित्याचा तपशिल | भक्तनिवास स्थान | धर्मशाळा | रुग्णालये | साई आश्रम | एकुण |
|---|---|---|---|---|---|---|
| १. | फायबर कॅन | १५ नग | १५ नग | ०६ नग | १० नग | ४६ नग |
| २. | स्टेनलेस स्टील टिप- झाकणासह, उंची २४" | १० नग | १० नग | ०२ नग | १० नग | ३२ नग |
| ३. | चपाती/पुरी ठेवणेसाठी इन्सुलेटेड बॉक्स- निलकमल/नामांकित कंपनी | १० नग | १० नग | ०२ नग | १० नग | ३२ नग |
| ४. | फायबर खुर्च्या-निलकमल/नामांकित कं. | १० नग | १० नग | ०२ नग | १० नग | ३२ नग |
| ५. | स्टेनलेस स्टील टेबल (सर्व्हीस टेबल) ७२cmx१७५cmx८५cm | -- | -- | -- | ०४ नग | ०४ नग |
| ६. | बस्कर पट्टी -१५ फुटी | -- | -- | -- | ६० नग | ६० नग |
| ७. | बुकींगसाठी टेबल-ड्रॉवरसह | -- | -- | -- | ०१ नग | ०१ नग |
| ८. | बुकींगसाठी रिव्हॉल्व्हींग खुर्ची | -- | -- | -- | ०१ नग | ०१ नग |
| ९. | अॅल्यु.पातेले, व्यास ५०० mm, उंची २६० mm | ०४ नग | ०३ नग | -- | ०३ नग | १० नग |

उपरोक्तप्रमाणे साहित्य स्वयंसेवी भोजनासाठी आवश्यक असल्याने त्यासाठी येणारा अंदाजे खर्च खालीलप्रमाणे-

| अ.नं. | साहित्याचा तपशिल | मागणी | अंदाजे दर | रक्कम रुपये |
|---|---|---|---|---|
| १. | फायबर कॅनझाकणासह ४० लि.क्षमता, निलकमल कंपनी | ४६ नग | रु.१२००/- | ५५,२००/- |
| २. | स्टेनलेस स्टील टिप- झाकणासह | ३२ नग | रु.१२००/- | ३८,४००/- |
| ३. | चपाती/पुरी ठेवणेसाठी इन्सुलेटेड बॉक्स- निलकमल/नामांकित कंपनी | ३२ नग | रु.३०००/- | ९६,०००/- |
| ४. | फायबर खुर्च्या - निलकमल/सेलो कंपनी | ३२ नग | रु.४००/- | १२,८००/- |
| ५. | स्टेनलेस स्टील टेबल (सर्व्हीस टेबल) | ०४ नग | रु.८०००/- | ३२,०००/- |
| ६. | बस्कर पट्टी -१५ फुटी | ६० नग | रु.३००/- | १८,०००/- |
| ७. | बुकींगसाठी टेबल-ड्रॉवरसह | ०१ नग | रु.६०००/- | ६,०००/- |
| ८. | बुकींगसाठी रिव्हॉल्व्हींग खुर्ची | ०१ नग | रु.५०००/- | ५,०००/- |
| ९. | अॅल्यु.पातेले साईज | १० नग | रु.५०००/- | ५०,०००/- |
| | | | **एकुण रक्कम रुपये-** | **३,१३,४००/-** |

**मागणी:-** प्रस्तावित केलेप्रमाणे व्दारावती भक्तनिवासस्थान, साईबाबा भक्तनिवास्थान, साईनाथ हॉस्पीटल, साईबाबा हॉस्पीटल इत्यादी ठिकाणी प्रसादभोजन व्यवस्था पुरविणेकामी आवश्यक असणारे

साहित्य सततच्या वापरामुळे खराब झालेले असल्याने व नव्याने सुरु करणेत आलेल्या साई आश्रम भाग-१ येथे साईभक्तांना स्वयंसेवी प्रसादभोजन व्यवस्थेकामी आवश्यक असणारे साहित्य खरेदी करणे गरजेचे आहे. सदर साहित्य खरेदी विभागामार्फत खरेदी करणेस व त्यासाठी येणाऱ्या अंदाजे रक्कम रु.३,१३,४००/- चे खर्चास मान्यता घेणेकामी सदरचा विषय मा.व्यवस्थापन त्रिसदस्यीय समिती सभेपुढे सादर करणेस मान्यता असावी.

सदर फर्निचर खरेदीकामी अंदाजपत्रकात रक्कम रुपये ५०,००,०००/- शिल्लक आहे. तसेच भांडी खरेदीकामी अंदाजपत्रकात रक्कम रुपये ९,७८,०००/- शिल्लक आहे.

संस्थान अधिनियम /ठराव यानूसार अनुमानः- आर्थिक

विभागाचा अभिप्राय/स्पष्ट मतः- साईभक्तांची प्रसादभोजन अभावी गैरसोय होवू नये म्हणून सदर साहित्य खरेदी करणे गरजेचे असल्याने सदर साहित्य खरेदीबाबतचा प्रस्ताव मा.व्यवस्थापन समिती सभेपुढे निर्णयाथ सादर करता येईल.

तरी साईबाबा भक्तनिवासस्थान, साईनाथ रुग्णालय स्वयंसेवी प्रसादभोजन कक्ष, रुग्णालये व साईआश्रम येथे प्रसादभोजन व्यवस्थेकामी आवश्यक असणारे साहित्य खरेदी विभागामार्फत खरेदी करणेस व त्यासाठी येणाऱ्या अंदाजे रक्कम रु.३,१३,४००/- मात्रचे खर्चास मान्यता मिळणेकामी निर्णयार्थ सादर.

**निर्णय क्र.६६२ यावर सविस्तर चर्चा होऊन, श्री साईबाबा भक्तनिवासस्थान, साईनाथ रुग्णालय स्वयंसेवी प्रसादभोजन कक्ष, रुग्णालये व साईआश्रम येथे प्रसादभोजन व्यवस्थेकामी आवश्यक असणारे साहित्य खरेदी करणेस व त्यासाठी येणाऱ्या अंदाजे रक्कम रु.३,१३,४००/- मात्रचे खर्चास मान्यता देण्यात आली.**

(कार्यवाही- अधिक्षक, श्री साई प्रसादालय)

---

**विषय नं.५४ साईआश्रम भाग- ०२ या नावऐवजी साई धर्मशाळा असा बदल होणेबाबत.**

**प्रस्ताव-** साई धर्मशाळा- २ हा विभाग १८/०७/२०१३ रोजी पासून भक्तांचे निवासव्यवस्थेसाठी सुरु करण्यात आलेला आहे. या ठिकाणी पदयात्री, पालखीधारक व सहलीमध्ये सहभागी होणाऱ्या साईभक्तांची निवासव्यवस्था उपलब्ध हॉलमध्ये करण्यात येत आहे.

दिनांक ०९/१०/२०१२ रोजी बांधकाम विभाग यांनी साई आश्रम भाग १ व साई आश्रम भाग २ परिसराचे प्रवेशद्वाराजवळ प्रकल्पाच्या नावाचे एलइडी बोर्ड (LED Board) लावणेबाबत टिपणी सादर केली होती. सदर टिपणीमध्ये बोर्डाच्या मजकुरामध्ये साई आश्रम -२ चे ऐवजी साई धर्मशाळा अशा नावाचा एलइडी बोर्ड तयार करणे कामी मान्यता घेण्यात आलेली आहे. सदर टिपणीवर मा. कार्यकारी अधिकारी यांनी "साई धर्मशाळाबाबत व्यवस्थापन समितीत मान्यता घ्यावी लागेल" असे निर्देश दिले होते.

दिनांक ०८/१२/२०१२ रोजीचे मा. व्यवस्थापन समितीचे सभेतील विषय क्र. १२ नुसार व निर्णय क्र. ९६४ अन्वये - यावर सविस्तर चर्चा होऊन, साई आश्रम भाग १ व २ परिसराचे प्रवेशद्वाराजवळ प्रकल्पाच्या नावाचे एलइडी बोर्ड बनवून लावणेकामी श्री. गणेश डिजीटल प्रा. लि., पुणे यांचे रू. १०,९०,०००/- मात्रचे (सॅमसंग कंपनीचे LED Lights सह) निम्नतम दर स्वीकारण्यात येऊन, त्यांना कार्यादेश देण्यात यावा, असे ठरले. त्यानुसार दिनांक २२/०३/२०१३ रोजी श्री गणेश डिजीटल प्रा. लि. पुणे यांना एलइडी बोर्ड बनविणेकामी आदेश पारित करण्यात आला होता. त्यानुसार त्यांनी साई आश्रम १ व साई धर्मशाळा असे एलइडी बोर्ड तयार करण्यात आले असून बांधकाम विभागामार्फत मुख्य प्रवेशद्वारावर लावण्यात आलेले आहेत. (यापुर्वी साईआश्रम - १ व साईआश्रम - २ चे बांधकाम प्रोजेक्ट चालु असताना विषयांकित नावे ज्या-त्या इमारतीला ठेवण्यात आले होते. सदरचा प्रोजेक्ट पुर्ण झालेनंतर साईआश्रम - १ ला साईआश्रम व साईआश्रम - २ ला साई धर्मशाळा असे नामकरण करुन दोन्ही विभागाचे नावाचे LED बोर्ड बांधकाम विभागामार्फत मुख्य प्रवेशद्वारावर लावण्यात आलेले आहेत.)

साईआश्रम - २ ऐवजी साई धर्मशाळा असे नामकरण करावयाचे ठरल्यास खाली ठिकाणी बदल करणे अपेक्षित आहे.

१. माहिती व तंत्रज्ञान विभागामार्फत प्रथमतः संस्थानचे संकेतस्थळावर,

२. मुख्य प्रवेशद्वारावर साई धर्मशाळा नावाचा LED बोर्ड लावलेला आहे. त्यानुसार उत्तर प्रवेशद्वाराचे जागा निश्चित करुन बांधकाम विभागामार्फत ज्या कंपनीकडून बोर्ड तयार करुन घेतले त्या कंपनीकडुन अगर स्थानिक LED तयार करणारे पेंटरकडून तयार करुन घेता येईल.

३. सदर होणारा बदल सामान्य प्रशासन कार्यासन नं. १ मार्फत आदेश पारित करता येईल.

मा. कार्यकारी अधिकारी साहेब यांचे दिनांक ०९/१०/२०१२ रोजीचे टिपणीतील निर्देशानुसार साईआश्रम- २ ऐवजी साई धर्मशाळा असे नामकरण करणेबाबतचे मान्यतेसाठी सादर.

**निर्णय क्र.६६३ यावर सविस्तर चर्चा होऊन, उपरोक्त प्रस्तावास मान्यता देण्यात आली.**

(कार्यवाही- प्र.अधिक्षक, साई धर्मशाळा)

---

**विषय नं.५५ साईधर्मशाळा निवासासाठी श्रींचे फोटो १९२ नग खरेदी करणेबाबत व साईभक्तांकडून देणगीव्दारे स्वीकारणेबाबत.**

**प्रस्ताव-** संस्थानचे साई धर्मशाळा इमारतीमध्ये साई भक्तांना निवासासाठी दिनांक १८/०७/२०१३ रोजी पासून सुरु करण्यात आलेली आहे.

दिनांक १६/०८/२०१३ रोजी मा. अध्यक्ष साहेब यांचेशी दुरध्वनीवरुन चर्चा झाली. त्यावेळी मा. अध्यक्ष सो. यांनी साई धर्मशाळेमधील प्रत्येक हॉलमध्ये श्री साईबाबांचा एक फोटो लावणेबाबत निर्देश दिलेले असुन त्यानुसार श्री साईबाबांचे फोटो खरेदीकामी टिपणी सादर करणेस सांगितले आहे.

साई धर्मशाळेमध्ये ए ते एफ अशा एकूण ६ इमारती असून प्रत्येक इमारतीमध्ये ३२ हॉल आहेत. ६ इमारती मिळून एकूण १९२ हॉल आहेत. (त्यापैकी डी इमारत (३२ हॉल) ही श्री साईबाबा संस्थान संचलित कनिष्ठ महाविद्यालयाला वापरण्यास दिलेली आहे.) प्रत्येक हॉल मध्ये १ फोटो याप्रमाणे एकूण १९२ फोटो खरेदी करावे लागतील. साधारणपणे हॉलमध्ये १६ इंच x २० इंच या आकाराचा फोटो लावणे योग्य होईल असे नम्र मत आहे. यामध्ये साधारणपणे श्री साईबाबांचा दगडावर बसलेला कृष्णधवल फोटो लावणेबाबत विचार करता येईल. बाजारात उपरोक्त आकाराच्या फोटोच्या किंमतीची चौकशी केली, त्याचा तपशील खालीलप्रमाणे:-

| अ.न. | फोटो फ्रेमचे वर्णन | साईज | किंमत | नग | एकूण किंमत |
|---|---|---|---|---|---|
| १ | ब्लॅक ब्रॉड नाडा | १६ इंच x २० इंच | १,०००/- | १९२ | १,९२,०००/- |
| २ | रस्सी फ्रेम नाडा | १६ इंच x २० इंच | १,०००/- | १९२ | १,९२,०००/- |
| ३ | ब्राऊन मिनी ब्रॉड नाडा | १६ इंच x २० इंच | ६५०/- | १९२ | १,२४,८००/- |
| ४ | मिनी नाडा | १६ इंच x २० इंच | ४१०/- | १९२ | ७८,७२०/- |
| ५ | ३४५ ब्लॅंक | १६ इंच x २० इंच | ३६०/- | १९२ | ६९,१२०/- |
| ६ | लॅमिनेशन | १६ इंच x २० इंच | ३५०/- | १९२ | ६७,२००/- |

यापुर्वी द्वारावती इमारतीमध्ये १२ इंच x १५ इंच आकाराचा श्री साई बाबांचा दगडावर बसलेला कृष्णधवल फोटो प्रत्येकी रु. १४०/- प्रमाणे ३३० नग फोटो श्री. प्रशांत व श्वेता डियुथी, विजयनगर, बॅंगलोर यांनी श्री साईबाबा संस्थान, शिर्डी यांना देणगी म्हणून दिलेले आहेत.

तरी उपरोक्त प्रमाणे साई धर्मशाळामधील ६ इमारतीमध्ये एकूण १९२ फोटो खरेदी करण्यास व त्या कामी येणाऱ्या खर्चाबाबत किंवा उपरोक्त १९२ फोटो देणगी म्हणून स्वीकारणेबाबत मान्यतेसाठी सादर.

**निर्णय क्र.६६४ यावर सविस्तर चर्चा होऊन, साई धर्मशाळामधील ६ इमारतींच्या प्रत्येक हॉलमध्ये बसविणेसाठी आवश्यक असलेले एकूण १९२ नग फोटो देणगीदार साईभक्तांमार्फत देणगी मिळाल्यास ते स्वीकारणेत यावे, अन्यथा संस्थानमार्फत खरेदी करणेत यावे. याकामी येणाऱ्या अपेक्षित खर्चास मान्यता देण्यात आली.** (कार्यवाही- प्र.अधिक्षक, साई धर्मशाळा)

---

**विषय नं.५६ सन २०१२- १३ ऐवजी सन २०१३-१४ या वर्षाकरीता साईआश्रम-०१ व ०२ इमारतीमधील खोल्या/ हॉलमध्ये ढेकुण, झुरळे इत्यादी करीता पेस्ट- कंट्रोल व उंदीर, घुस इत्यादीचे प्रतिबंधासाठी रोडेंट कंट्रोल करण्याचे वार्षीक कॉन्ट्रॅक्टचे कार्यादेशाचे कार्योत्तर मंजुरीबाबत.**

**प्रस्ताव-** मा. त्रिसदस्यीय समितीचे दि.२८/०४/२०१२ रोजीचे सभेत झालेला निर्णय क्रं.३६७ नुसार, सन २०१२ - १३ या वर्षाकरीता साईआश्रम- १ व साईआश्रम- २ करीता पेस्ट कंट्रोल व रोडेंट कंट्रोल करणेकामी निविदा सुचनाची जाहीरात दि.०२/०७/२०१२ रोजीचे दै.सामना या वर्तमानपत्रात प्रसिध्द करण्यात आलेली होती.

तद्नंतर टेंडरबाबतची संपुर्ण प्रक्रिया (प्री.बीड मिटींग, समक्ष चर्चा वाटाघाटी ) पुर्ण झाल्यावर, मा. त्रीसदस्य समितीचे दि.०८/१२/२०१२ रोजीचे सभेत झालेला निर्णय क्रं.१००९ नुसार, सन २०१२-१३ करीता साईआश्रम -१ व साईआश्रम -२ विभागासाठी पेस्ट कंट्रोल व रोडेंट कंट्रोल करणेकामी तुलनात्मक तक्यातील निम्नतम दर स्विकारण्यात येऊन मे. जी. टी. पेस्ट कंट्रोल प्रा. लि. पुणे शाखा- नाशिक , यांना कार्यादेश देण्यात यावा, असा निर्णय झालेला आहे.

मा. मुंबई उच्च न्यायालयाचे औरंगाबाद खंडपीठाचे सिव्हील ॲप्लीकेशन १२६९४ /२०१२ व १२६९५ /२०१२ पी.आय.एल. नं.१८/२०११ मध्ये दि.२१/११/२०१२ रोजी केलेल्या हुकूमानुसार साईआश्रम भाग- १ व २ कडील सर्व कामे टेक्नीकल एक्सपर्ट यांचेकडून पडताळणी करुन घ्यावयाची असल्यामुळे टेक्नीकल एक्सपर्ट यांची नेमणुक झाल्यानंतर पडताळणी करण्यात आली.

प्रस्तुत प्रकरण दि.०१/०४/२०१२ ते दि .०८/१०/२०१२ या कालावधीत मा. व्यवस्थापन समितीने घेतलेल्या निर्णयाबाबतचे होते. पेस्ट कंट्रोल कामाचे कॉन्ट्रॅक्ट देणेबाबतचा समावेश सदर कालावधीत नव्हता. तद्नंतर मा. त्रीसदस्य समितीचे दि.०८/१२/२०१२ रोजीचे सभेत निर्णय क्रं. १००९ अन्वये मे. पेस्ट कंट्रोल कामाचे कॉन्ट्रॅक्ट मे.जी. टी. पेस्ट कंट्रोल, प्रा.लि. पुणे यांना कार्यादेश देणेबाबत निर्णय झालेला आहे.

दि.०१/०४/२०१२ ते दि .०८/१०/२०१२ या कालावधीचे प्रकरण मा. मुंबई उच्च न्यायालयाचे औरंगाबाद खंडपीठात न्यायप्रविष्ठ होते. त्यामुळे साईआश्रम- १/ २ चालु करण्यास परवानगी न मिळाल्याने मे.जी. टी. पेस्ट कंट्रोल, प्रा.लि. पुणे यांना सन २०१२-१३ चा कार्यादेश देण्यात आलेला नव्हता.

आता मा.उच्च न्यायालय मुंबई, खंडपीठ औरंगाबाद यांनी दि.२०/०२/२०१३ रोजी केलेल्या ऑर्डरनुसार परवानगी मिळालेली आहे.

उपरोक्त आदेश संस्थानला प्राप्त झालेनंतर साईआश्रम- १ सुरु करण्यात आले. तद्नंतर दि.१८/०७/२०१३ पासुन साई धर्मशाळा ही सुरु करण्यात आली. त्या अनुषंगाने साईआश्रम- १ व साईआश्रम- २ विभागातील पेस्ट कंट्रोल व रोडेंट कंट्रोल इत्यादी कामे करण्यासाठी तुलनात्मक तक्यातील निम्नतम दर स्विकारण्यात येऊन संदर्भ क्रं. २ निर्णय क्रं. १००९ अन्वये मे. जी. टी. पेस्ट कंट्रोल प्रा. लि. पुणे शाखा- नाशिक, यांना कार्यादेश देणेबाबतचा कालावधी/ वर्ष सन २०१२-१३ हे संपुष्टात येत असुन, आता नव्याने दि.१०/०८/२०१३ रोजीचे मंजूर टिपणीनुसार सन २०१३ - १४ करीता ( दि.०१/०८/२०१३ ते दि.३१/०७/२०१४) या १ वर्षाचे कालावधीसाठी साई धर्मशाळासाठी जा.न. एसएसएसटी/वशी - साईधर्मशाळा/२२९१/२०१३ दि. १५/०८/२०१३ अन्वये एकूण वार्षिक रक्कम रुपये २,१३,८८५/- चा कार्यादेश देण्यात आलेला आहे.

सदरचा विषय कार्योत्तर मान्यतेसाठी सादर.

**निर्णय क्र.६६५ यावर सविस्तर चर्चा होऊन, उपरोक्त प्रस्तावास कार्योत्तर मान्यता देण्यात आली.**

(कार्यवाही- प्र.अधिक्षक, साई धर्मशाळा)

---

**विषय नं.५७ सन २०१२- १३ ऐवजी सन २०१३- १४ या वर्षाकरीता साईआश्रम- ०१ व ०२ विभागातील यांत्रिकीकरणासह, हाऊसकिपींग, विद्युत, प्लबींग इ. मेन्टनेन्स/ स्वच्छता कामाबाबत.**

**प्रस्ताव-** मा. व्यवस्थापन समिती दि.१९/०२/२०१२ रोजीचे सभेत झालेला निर्णय क्रं.२४४ नुसार, सन २०१२ - १३ या वर्षाकरीता साईआश्रम- १ व साईआश्रम- २ विभागातील यांत्रिकीकरणासह, हाऊसकिपींग, विद्युत, प्लंबींग इ. मेन्टनेन्स् कामाबाबत दैनिक वृत्तपत्रात जाहीरात देऊन को-या निविदा विक्री करुन निविदा मागविण्यास मान्यता देण्यात आल्याने, दि. ०९/०३/२०१२ रोजी महाराष्ट्र टाईम्स या दैनिक वृत्तपत्रात " हाऊसकिपींग सेवेकरीता निविदा सूचना " अशी जाहीरात प्रसिध्द करण्यात आलेली होती.

तदनंतर टेंडरबाबतची संपुर्ण प्रक्रिया ( प्री.बीड मिटींग, सादरीकरण, कॅग रिपोर्टनुसार दिलेले गुण व समक्ष चर्चा वाटाघाटी) पुर्ण झाल्यावर, मा. व्यवस्थापन समितीचे दि.०८/१०/२०१२ रोजीचे सभेत झालेला निर्णय क्रं.८०० (०३) नुसार, सन २०१२-१३ करीता साईआश्रम -१ व साईआश्रम -२ विभागातील यांत्रिकीकरणासह, हाऊसकिपींग, विद्युत, प्लंबींग इ. मेन्टनेन्स् / स्वच्छता कामाबाबतचे Successful Bidder ( SB-१) मे. बी. व्ही. जी. इंडिया लि. पुणे. यांना कार्यादेश देण्यात यावा असा निर्णय झालेला आहे.

मा. व्यवस्थापन समितीचे दि.३०/११/२०१२ रोजीचे सभेत झालेला निर्णय क्रं.८८४ नुसार, निर्णय क्रं. ८०० (०३) मध्ये, साईआश्रम - १ व २ विभागासाठी प्रशासकीय इमारती, रुम बुकींग कांऊटर व पार्कींग परिसरासाठी आवश्यक लागणारे दररोजचे मनुष्यबळ व मशिनरी संख्या तसेच इमारतीनुसार मनुष्यबळ व मशिनरी संख्या पुरविणेबाबत अट घालण्यात यावी, त्यानुसार दरमहा देय रक्कमेची विभागणी करुन आकारण्यात यावी, असे चर्चेअंती ठरले.

याऐवजी खालील प्रमाणे वाचण्यात यावे.

मा. मुंबई उच्च न्यायालयाचे औरंगाबाद खंडपीठाचे सिव्हील ॲप्लीकेशन १२६९४ /२०१२ व १२६९५ /२०१२ पी.आय.एल. नं.१८/२०११ मध्ये दि.२१/११/२०१२ रोजी केलेल्या हुकूमानुसार साईआश्रम भाग ३ १ व २ कडील सर्व कामे टेक्नीकल एक्सपर्ट यांचेकडून पडताळणी करुन घ्यावयाची असल्यामुळे टेक्नीकल एक्सपर्ट यांची नेमणुक झाल्यानंतर सदरचा प्रस्ताव त्यांचेकडुन पडताळणी करुन घेण्यात यावे असे ठरले.

प्रस्तुत प्रकरण मा. मुंबई उच्च न्यायालयाचे औरंगाबाद खंडपीठात न्यायप्रविष्ठ होते. आता मा.उच्च न्यायालय मुंबई, खंडपीठ औरंगाबाद यांनी दि.२०/०२ /२०१३ रोजी केलेल्या ऑर्डरनुसार परवानगी मिळालेली आहे. सदरचे ऑर्डरमध्ये पा.नं ०८ वर अ.नं. ११ मध्ये Both the civil applications are allowed. The permission as sought, is granted. व अ.नं. १२ मध्ये To make it further clear, we hereby permit the Trust to spend amount as per Exhibit - C to Civil Application No. १२६९५ of २०१२. असे नमुद केले आहे.

साईआश्रम- १ व साईआश्रम- २ विभागातील यांत्रिकीकरणासह, हाऊसकिपींग, विद्युत, प्लंबींग इ. मेन्टनेन्स्/ स्वच्छता कामाबाबत. मे.बी. व्ही. जी. इंडिया लि. पुणे. यांना कार्यादेश देणेबाबतचा कालावधी/ वर्ष सन २०१२- १३ हे संपुष्टात येत असुन, आता नव्याने सन २०१३- १४ ( दि.१६/०७/२०१३ ते दि.१५/०७/२०१४) या १ वर्षाचे कालावधी करिता साईआश्रम- २ साठी कार्यादेश जा.न. एसएसएस / वशी- साईधर्मशाळा /१७९३/२०१३ दि.१५/०७/२०१३ अन्वये देण्यात आलेला आहे.

याकामी मा. व्यवस्थापन समितीचे कार्योत्तर मंजुरीसाठी निर्णयास्तव सादर,

**निर्णय क्र.६६६ यावर सविस्तर चर्चा होऊन, उपरोक्त प्रस्तावास कार्योत्तर मान्यता देण्यात आली.**
(कार्यवाही- प्र.अधिक्षक साईआश्रम/ प्र.अधिक्षक, साई धर्मशाळा)

---

**विषय नं.५८ साईआश्रम भक्तनिवास विभागातील टॉवेल धुण्याचे प्रती नग दर रु.४/- चे वार्षीक कामाबाबत.**

**प्रस्ताव-** मा. व्यवस्थापन समितीचे दि.१५/०९/२०१२ रोजीचे सभेत झालेला निर्णय क्रं ७३९ नुसार, साईआश्रम भाग १ व २ कडील बेडशीट, उशीकव्हर व चादरी धुणे इस्त्री करणेकामी श्री विजय अशोकराव चव्हाण, सावळीविहीर यांचे द्वितीय निम्मतम दर स्विकारण्यात येऊन त्यांना कार्यादेश देण्यात यावा असे ठरले. त्यानुसार जा.न. एसएसएस/ वशी- साभनि/५८०४/२०१३ दि.२०/०३/२०१३ कार्यादेश देण्यात आलेला आहे.

त्यानुसार श्री विजय अशोकराव चव्हाण यांनी दि. १२/०४/२०१३ पासुन साईआश्रम भाग १ कडील बेडशीट, उशीकव्हर व चादरी धुणे इस्त्री करणेचे कामकाजास सुरुवात केलेली आहे. परंतु याकामाचे निविदा मागवितांना टॉवेल धुण्याचे दराची मागणी करण्यात आलेली नसल्याने सदरच्या कार्यादेशात टॉवेलचा दर देण्यात आलेला नाही.

भांडार विभागाकडुन देणगी मिळालेले टॉवेल नग ६४६२ हे या विभागातील ३८४ एसी रुममधील निवासासाठी येणारे भक्तांचे वापरासाठी टॉवेलचा वापर सुरु केलेला आहे. सदरचे टॉवेल एकदा वापरलेनंतर परत भक्तांचे वापरासाठी देतांना स्वच्छ धुऊन देणेसाठी सदरचे टॉवेल धुणे गरजेचे आहे. त्यामुळे टॉवेलचा वापर सुरु झाल्याने श्री विजय अशोकराव चव्हाण यांना बेडशीट, उशी कव्हर, धुणे, इस्त्री करणे व चादर धुण्याचे वार्षिक काम देण्यात आलेले असल्याने त्यांचेकडुन हे काम करुन घेण्यात येत आहे.

याकामी श्री विजय अशोकराव चव्हाण यांनी दिलेल्या पत्रात विनंती केलेली आहे की, साईआश्रम भक्तनिवास भाग- १ विभागाकडील बेडशीट, उशी कव्हर, धुणे, इस्त्री करणे व चादर धुण्याचे वार्षिक काम देण्यात आलेले आहे. साईआश्रम भक्तनिवास भाग - १ विभागाकडील टॉवेल धुण्याचे काम दि. २४/०६/ २०१३ पासुन काम देण्यात येत आहे. सदर कामाचे दर निविदेत नसल्यामुळे निश्चित करण्यात आलेले नाही. बेडशिट, उशीकव्हर, चादरचे दर चर्चा वाटाघाटी मध्ये आम्ही निविदेत भरलेल्या दरामध्ये सरासरी ३०% ने दर कमी करुन ते मान्य करण्यात आलेले आहे. त्यानुसार आम्हाला कार्यादेश मिळालेला आहे.

आमचे टॉवेल धुण्याचे मार्केट मधील / हॉटेल व्यवसायकरीताचे प्रति नग रुपये ६/- प्रमाणे असुन चर्चा वाटाघाटीमध्ये आम्ही ज्याप्रमाणे सरासरी ३०% दर कमी केलेले आहे. त्याचप्रमाणात टॉवेलचे ही ३० % ने दर आम्ही याकामी कमी करुन प्रति नग टॉवेल धुण्याचे दर रु. ४.२० पै. इतका होतो. त्यासाठी पुर्णांकित दर रु. ४ /- प्रती नग प्रमाणे दर मान्य होणेस विनंती. येणेप्रमाणे अर्ज असे.

या विभागात एकूण ३८४ रुम ए.सी असुन दररोज १००% एसी रुमचा वापर झाल्यास एका दिवसाला ३८४ नग टॉवेल धुण्यासाठी राहील. त्यानुसार वर्षाला १,४०,१६० टॉवेलला रु. ४/- प्रती नग प्रमाणे रु. ५,६०,६४०/- इतका खर्च अपेक्षीत आहे. श्री विजय अशोकराव चव्हाण, सावळीविहीर यांना बेडशीट, उशी कव्हर, धुणे, इस्त्री करणे व चादर धुण्याचे वार्षिक काम देण्यात आलेले असुन याकामी त्यांनी दिलेले मुळ दर व चर्चावाटाघाटीमध्ये कमी करुन दिलेल्या दराचा तुलनात्मक तक्ता पहाता संबंधीत पार्टीने ३०% दर कमी करुन, मा. व्यवस्थापन समिती दि.१५/०९/२०१२ रोजीचे सभेत झालेला निर्णय क्रं ७३९ ने मान्य करण्यात आलेला आहे. त्यानुसार श्री विजय चव्हाण यांनी टॉवेलचे मुळ दर रु.६/- दिलेले असुन ३०% ने दर कमी केल्यास प्रती दर रु. ४.२० पै. येतो. त्यानुसार पुर्णांकित दर रु.४/- प्रती नगास येत आहे. त्यानुसार या विभागाकडील टॉवेल धुण्याचे दर रु.४ /- प्रती नग प्रमाणे देण्यास हरकत नाही असे नम्र मत आहे.

टॉवेल धुण्याचे दर रु ४/- (प्रती नग) व त्याकामी येणारा वार्षिक खर्च रु.५,६०,६४०/- तसेच श्री विजय अशोकराव चव्हाण, सावळीविहीर यांचेकडून हे काम करुन घेण्यास व त्याप्रमाणे त्यांना कार्यादेश देणेस मान्यता असावी.

**निर्णय क्र.६६७ यावर सविस्तर चर्चा होऊन, साईआश्रम भक्तनिवास विभागातील टॉवेल धुण्याचे कामासाठी वार्षिक कोटेशन्स मागविणेत यावे, असे ठरले.** (कार्यवाही- प्र.अधिक्षक, साईआश्रम भक्तनिवास)

---

**विषय नं.५९ प्लास्टीक खुर्च्या खरेदी करणेबाबत.**

**प्रस्ताव-** **अधिनियम २००४ मधील तरतुद- २१ (ग)** भक्तांना मंदिरात देवतेच्या दर्शनासाठी व प्रार्थनेसाठी किंवा धार्मिक सेवा किंवा समारंभ करण्यासाठी सोयी व सुविधा पुरविणे.

या अधिनियम व तरतुदीनुसार श्री साईबाबा संस्थान विश्वस्तव्यवस्थेमार्फत भक्तांची निवासव्यवस्था व सुविधा करण्यात येते. त्या अनुषंगाने साईआश्रम भक्तनिवासमधील खोल्या साईभक्तांचे निवासासाठी दि.११/०४/२०१३ पासुन सुरु करण्यात आलेल्या असुन या ठिकाणी १२ इमारती मधुन १५३६ खोल्या आहेत.

साईभक्तांना खोलीमध्ये बसण्यासाठी दोन प्लॅस्टिक खुर्च्या ठेवण्यात आलेल्या आहेत. १५३६ खोल्यांकरीता ३१७५ नग प्लॅस्टिक खुर्च्या खरेदी करण्यात आल्या होत्या. त्याप्रमाणे ३०७२ नग प्लॅस्टिक खुर्च्यांचा वापर होऊन १०३ खुर्च्या स्टोअर मध्ये शिल्लक होत्या. नव्याने विभाग सुरु झाल्या पासुन ४९

नग खुर्च्यांची फुटतुट होऊन त्यापैकी काही खुर्च्यांची नुकसान भरपाई भक्तांकडुन घेण्यात आली. ती रक्कम वेळोवेळी संस्थान खाती जमा करण्यात आलेली आहे.

सबब शिल्लक १०३ नग खुर्च्यामधुन ४९ खुर्च्या वापरास काढण्यात आलेल्या आहेत. आता फक्त ५४ नग प्लॅस्टिक खुर्च्या शिल्लक असून त्याचा वापर पुढील तीन ते चार महिन्यात होईल. त्यामुळे पुढील खराब होणा-या खुर्च्यांच्या जागी नविन प्लॅस्टिक खुर्च्यांची आवश्यकता असल्याने २०० नग प्लॅस्टिक खुर्च्या खरेदी कराव्या लागतील. यासाठी अंदाजे प्रति नगास रु.३००/- याप्रमाणे २०० नग खुर्च्यांसाठी रु.६०,०००/- ( अक्षरी रुपये साठ हजार मात्र) खर्च अपेक्षित आहे.

तरी Cello कंपनीच्या प्लॅस्टिक खुर्च्या २०० नग खरेदी कामी अंदाजे रक्कम रु.६०,०००/- चे खर्चास व मान्यतेनंतर विहीत पध्दतीने खरेदी विभागामार्फत खरेदी करणेबाबतची कार्यवाही करता येईल. त्यास मान्यता असावी.

**निर्णय क्र.६६८** **यावर सविस्तर चर्चा होऊन, साईआश्रम भक्तनिवासमधील खोल्यामध्ये ठेवण्यासाठी आवश्यक असलेल्या २०० नग प्लॅस्टीक खुर्च्या विहीत पध्दतीने खरेदी करणेस व याकामी येणाऱ्या अंदाजे रु.६०,०००/- मात्रचे खर्चास मान्यता देण्यात आली.**(कार्यवाही- प्र.अधिक्षक, साईआश्रम भक्तनिवास)

---

**विषय नं.६०** **साईनिवास अतिथीगृहातील मा.अध्यक्ष व उपाध्यक्ष यांचे रुम्सकरीता नवीन सोफे खरेदी करणेबाबत.**

**प्रस्ताव-** साईप्रसाद निवासस्थान विभागाअंतर्गत साईनिवास अतिथीगृह (ए.सी. रुम) इमारतीचे कामकाज पाहीले जाते. या इमारती मधील रुम्स मध्ये वेळोवेळी संस्थानचे मा. अध्यक्ष, उपाध्यक्ष, विश्वस्त तथा अतिमहत्वाच्या व्यक्ती (व्ही.आय.पी.) निवासासाठी थांबतात. सदरील रुम मध्ये त्यांना अथवा त्यांचे कोणी पाहुणे आल्यास त्यांना बसण्यासाठी रुम मध्ये सोफे ठेवण्यात आलेले आहेत.

साईनिवास अतिथीगृह इमारतीचे रुममध्ये यापुर्वी दि.२३/१२/२००३ रोजी २७ नग थ्री सिटर व ५४ नग सिंगल सिटर याप्रमाणे सोफे खरेदी करुन सर्व रुममध्ये ठेवण्यात आले आहेत. मा. अध्यक्ष महोदय यांचे रुम नं.० व उपाध्यक्ष साहेब यांचे रुम नं. १ मधील सोफे खराब झालेले असून सोफ्यांवर व्यवस्थीत बसता येत नाही. त्यामुळे सदर सोफे बदलवून तेथे नवीन सोफे खरेदी करुन ठेवणे आवश्यक आहे. या करिता थ्री सिटरचे ०४ सोफासेट व सिंगल सीटचे ०८ सोफ्यांची आवश्यकता आहे. या खरेदीकामी अंदाजे रक्कम रुपये २,००,०००/- मात्र (अक्षरी दोन लाख रुपये मात्र) खर्च अपेक्षित आहे.

तरी उपरोक्त खर्चास मान्यता मिळून बांधकाम विभागामार्फत नामांकित कंपनीचे चॉकलेटी अथवा कॉफी कलरचे सोफे विहीत पध्दतीने खरेदी करुन मिळणेकामी सदर प्रस्ताव मा.त्रिसदस्यीय समितीचे सभेत चर्चा होऊन निर्णय होणेस्तव सादर.

**निर्णय क्र.६६९** **यावर सविस्तर चर्चा होऊन, साईनिवास अतिथीगृहातील मा.अध्यक्ष व उपाध्यक्ष यांचे रुम्सकरीता विहीत पध्दतीने नामांकित कंपनीचे नवीन सोफे खरेदी करणेस व याकामी येणाऱ्या अंदाजे रु.२,००,०००/- मात्रचे खर्चास मान्यता देण्यात आली.**(कार्यवाही- अधिक्षक, साईप्रसाद निवासस्थान)

---

**विषय नं.६१** **कापड खरेदी तथा पडदे शिवून घेणेस मान्यता मिळणेबाबत.**

**प्रस्ताव-** साईनिवास बैठक कक्ष तथा साईनिवास अतिथीगृहातील सर्व खोल्यांमधील पडदे जुने झाल्यामुळे (सन - २००५ पासून सतत वापरात असल्याने) खराब झालेले आहेत. वारंवार धुतल्यामुळे सदर पडदे जीर्ण झालेले असून त्यांचा रंगही गेलेला आहे.

या करिता दोन्हीही साईनिवास मधील पडद्यांची जुन्या वापरात असलेल्या पडद्यांवरुन मापे घेतली असता एका सेट साठी १४८.२५ मीटर कापड आवश्यक होते. त्यानुसार दोन सेट करिता एकूण २९७ मीटर्स कापडाची आवश्यकता भासणार होती.

एक मीटर कापडासाठी अंदाजे ५०० रुपये खर्च (शिलाईसह) अपेक्षित असल्याने अंदाजे रक्कम रुपये १,५०, ०००/- (अक्षरी रुपये एक लाख पन्नास हजार मात्र) पर्यंतचा खर्च अपेक्षित धरला होता. त्याप्रमाणे संदर्भ क्र ०१ व ०२ चे मंजुरी अन्वये दोन्हीही साईनिवास मधील खिडक्या व दारांना पडदे बसविणेकामी विहीत पद्धतीने कापड खरेदीस व याकामी येणाऱ्या अंदाजे रु.१,५०,०००/- मात्रचे खर्चास संदर्भ क्र. ०२ नुसार मान्यता मिळालेली आहे.

दोन्हीही साईनिवास मधील सध्या वापरात असलेले पडदे साध्या पद्धतीचे आहेत. तथापि, दि.२१/०६/२०१३ रोजीचे मा.व्यवस्थापन समिती सभेच्या वेळी मा.कार्यकारी अधिकारी साहेब यांनी नवीन पडदे खरेदी करतेवेळी आकर्षक स्वरुपाचे शिवून घ्यावेत. अशा सूचना देऊन परिसरातील पडद्यांचे नामांकित दुकानदार श्री व्यंकटेश फर्निशिंग, राहाता यांनी आणलेले पडद्यांचे कापडाचे नमुने बघून काही नमुने choose केले होते.

सदरील दुकानदार यांनी स्वतः दोन्हीही साईनिवास येथील पडद्यांची मापे घेवून खिडकी पडदे १० नग व दरवाजा पडदे ०२ नग असे एकूण १२ नग पडदे मा.का.अ.साहेब यांचे सूचनेनुसार नमुन्या दाखल शिवून दिलेले आहेत. सदरील नमुना पडद्यांनुसार दोन्हीही साईनिवास येथील पडद्यांच्या एका सेटसाठी अंदाजे ९५० मीटर कापड व अंदाजे रु. ८०,०००/- मात्र शिलाई खर्च वेगळा लागेल.

उपरोक्त कामी D-Decor अशा नामांकित कंपनीचे एक मीटर कापड खरेदीस अंदाजे ४०० रुपये पर्यंत खर्च अपेक्षित असून ९५० मीटर कापडासाठी अंदाजे रक्कम रुपये ३,८०,०००/- मात्र खर्चास तथा वेगळया शिलाईस अंदाजे रक्कम रुपये १,००,०००/- मात्र असा एकूण अंदाजे रुपये ४,८०, ०००/- मात्र (अक्षरी रुपये चार लाख ऐंशी हजार मात्र) खर्च अपेक्षित आहे.

यापुर्वी मा.व्यवस्थापन मंडळाचे दि. ३०/०३/२०१३ रोजीचे सभेमध्ये संदर्भ क्र. ०२ नुसार कापड खरेदी तथा पडदे शिवून घेणे कामी रक्कम रुपये १,५०,०००/- (एक लाख पन्नास हजार मात्र ) मान्यता देण्यात आली आहे. परंतू पडदे कापड व शिलाई कामी एकूण खर्च रुपये ४,८०,०००/- मात्र अपेक्षित असलेने आणखी रक्कम रुपये ३,३०,०००/- मात्रचे खर्चास मान्यता मिळून

**अ)** खरेदी विभागामार्फत D-Decor कंपनी Stanza Sr. No. १५ चे कापड विहीत पद्धतीने खरेदी करुन मिळणेस तथा

**ब)** कापड खरेदी नंतर विहीत पद्धतीने इकडील विभागामार्फत पडदे शिवून घेणेस मान्यता मिळणेस.

उपरोक्त **अ** व **ब** चे मान्यतेसाठी सदर प्रस्ताव मा. त्रिसदस्यीय समिती सभेपुढे फेर सादर होऊन चर्चा होऊन निर्णय होणेस विनंती.

**निर्णय क्र.६७० यावर सविस्तर चर्चा होऊन, प्रस्तावात नमुद केलेले अ, ब प्रमाणे व याकामी येणारा रु.४,८०,०००/- मात्रचे खर्चास मान्यता देण्यात आली.**(कार्यवाही- अधिक्षक, साईप्रसाद निवासस्थान)

---

**विषय नं.६२ ए.सी.खोल्यांसाठी वूलन ब्लॅकेट खरेदी करणेबाबत.**

**प्रस्ताव-** द्वारावती निवासस्थान इमारत दि.०५/०३/२००९ रोजी पासुन साईभक्तांचे निवासासाठी सुरु करण्यात आली आहे. या इमारती मध्ये २३६ नॉन एसी व ८० एसी खोल्या आहेत. ए.सी खोल्यामध्ये भक्तांना वापरणे करीता दि.७/५/२००९ रोजी कॅमल कंपनीचे ५५० नग व एम्रीड कंपनीचे ३०० नग असे एकूण ८५० नग वुलन ब्लॅकेट खरेदी करण्यात आले.सदरचे ब्लॅकेट भक्तांना खोल्यांमध्ये टप्या टप्याने वापरावयास देण्यात आले आहे.संदर्भ क्र.०१ चे मा.व्यवस्थापन समिती दि.६/०८/२००५ चे सभेमध्ये, गादी, चादर व बेडशीट जास्तीत जास्त तीन वर्षाचे धरण्यात यावे व दर तीन वर्षानी गादी, चादर व बेडशीट बदलण्यात यावे असा निर्णय झालेला आहे.

त्यानुसार तीन वर्ष सततच्या वापरामुळे जिर्ण झालेले,फाटलेले,जास्तप्रमाणात डाग पडलेले व वापरावयास अयोग्य असलेले २०० नग ब्लॅकेट संदर्भ क्र.०२ चे दि.११/०२/२०१३ च्या मंजुरीने अभिलेख कक्षामार्फत मंजुर वार्षिक दराने चिंधी म्हणून विक्री करण्यात आलेले आहे.

उर्वरित ६५० नगा पैकी वापरात असलेले ब्लॅकेट ब-याच अंशी खराब झाले असल्याने २०० नग ब्लॅकेट संदर्भीय मंजूर टिपणीनुसार ड्रायक्लीन करण्यात आलेले आहे.त्यातील अंदाजे २५० नग ब्लॅकेट पुढील ६ ते ७ महिन्यांपर्यंत वापरण्यास योग्य आहे.

तसेच शिल्लक असलेल्या स्टॉकमधील २०० नग ब्लॅकेट नव्यानेच भक्तांना खोल्यांमध्ये वापरावयास देण्यात आलेले आहे. ते ब्लॅकेट चांगल्या स्थितीत असल्याने पुढील दोन ते अडीच वर्षापर्यंत वापरता येतील. तथापी संदर्भीय टिपणीवर नविन ब्लॅकेट खरेदीचा प्रस्ताव ठेवण्यात यावा असे निर्देश दिलेले आहे. भक्तांना वापरावयास देण्यात आलेले चांगले ब्लॅकेट कमी पडत असल्याने नवीन ब्लॅकेट खरेदी करणे आवश्यक आहे.

त्यानुसार एका एसी खोलीसाठी ३ नग व त्यामध्ये जादा दोन बेडसाठी २ नग असे ८० खोल्यांकरीता ४०० नग वुलन ब्लॅकेट खरेदी करणे आवश्यक आहे.चांगल्या प्रतीचे १ नग वुलन ब्लॅकेटसाठी रु.५००/- प्रमाणे ४०० नगासाठी रु.२,००,०००/- मात्र अंदाजे खर्च अपेक्षित आहे.

तरी नवीन ४०० नग वुलन ब्लॅकेट खरेदीसाठी अंदाजे येणा-या रु.२,००,०००/- पर्यंतच्या खर्चास मान्यता मिळणेस व विविध पुरवठाधारकांकडून दरपत्रके मागविणे बाबतचा प्रस्ताव मान्यतेसाठी सादर

**निर्णय क्र.६७१ यावर सविस्तर चर्चा होऊन, द्वारावती निवासस्थान इमारतीमधील वातानुकुलीत खोल्यांसाठी आवश्यक असलेले ४०० नग वुलन ब्लँकेट विहीत पध्दतीने खरेदी करणेस व याकामी येणाऱ्या अंदाजे रु.२,००,०००/- मात्रचे खर्चास मान्यता देण्यात आली.**

(कार्यवाही- अधिक्षक, द्वारावती निवासस्थान)

---

**विषय नं.६३ स्टिल जग खरेदी करणेबाबत.**

**प्रस्ताव-** द्वारावती निवासस्थान इमारतीमध्ये २३६ नॉन एसी व ८० एसी अशा एकूण ३१६ खोल्या आहेत. या सर्व खोल्यामध्ये भक्तांना पिण्याचे पाण्यासाठी प्रत्येक खोलीमंध्ये एक जग व दोन ग्लास देण्यात आलेले आहे.

दि.७/०५/२०११ रोजी सेलो कंपनीचे सिरॅमिक जग ३३० नग व ग्लास ६६० नग खरेदी करण्यात आले होते.दोन वर्षाच्या सततच्या वापरणे २०० नग जगांची तुटफुट होऊन वापरास अयोग्य झालेले आहे. असल्याने त्याठिकाणी प्रसादालय विभागाकडून मिळालेले २०० नग स्टिल जगांचा वापर सध्या चालु

आहे.परंतु सदरचे स्टिल जगांचे दाडे तुटलेले आहे. त्यामुळे भंक्तांना रूम मध्ये वापरासाठी नवीन चांगल्या प्रतिचे (१.५ लि) स्टिलचे बंद झाकणाचे जग ३५० नग खरेदी करणे आवश्यक आहे.

उपरोक्त चांगले उच्च प्रतिचे स्टिल जग खरेदी करणेसाठी प्रती नग रु २५०/- प्रमाणे ३५० नगास रु.८७,५००/- मात्र अंदाजे खर्च अपेक्षित आहे.

तरी नवीन ३५० नग स्टील जग खरेदीसाठी अंदाजे येणा-या रु.८७,५००/- मात्रच्या खर्चास मान्यता मिळणेस व विविध पुरवठाधारकांकडून नमुन्यासह दरपत्रके मागविणे बाबतचा प्रस्ताव मान्यतेसाठी सादर.

**निर्णय क्र.६७२ यावर सविस्तर चर्चा होऊन, द्वारावती निवासस्थान इमारतीमधील खोल्यांमध्ये साईभक्तांना पिण्याचे पाण्यासाठी आवश्यक असलेले ३५० नग स्टील जग खरेदीकामी विविध पुरवठाधारकांकडून नमुन्यासह दरपत्रके मागविणेस व याकामी येणाऱ्या अंदाजे रु.८७,५००/- मात्रचे खर्चास मान्यता देण्यात आली.** (कार्यवाही- अधिक्षक, द्वारावती निवासस्थान)

---

**विषय नं.६४ साईबाबा भक्तनिवासस्थान व श्री साईबाबा संस्थान रुग्णालये लॉण्ड्रीकरीता केमिकल/ डिटर्जन्ट खरेदी करणेबाबत.**

**प्रस्ताव-** **अधिनियम २००४ मधील तरतुद-** २१ (१) (क) मंदिराची व विश्वस्तव्यवस्थेच्या मालमत्तेची देखभाल, व्यवस्थापन व प्रशासन.

**प्रस्ताविक-** साईबाबा भक्तनिवासस्थान विभागाकडील लॉण्ड्रीमध्ये साईप्रसाद निवासस्थान, द्वारावती भक्तनिवास, साईबाबा भक्तनिवासस्थान, वाहन, मंदीर.इ. विभागांचे व साईनाथ रुग्णालयाकडील लॉण्ड्रीमध्ये दोन्ही रुग्णालयांचे कपडे धुवून इस्त्री केले जातात.

दि.२६/०३/२०११ रोजी झालेल्या मा.व्यवस्थापन समितीचे बैठकी मधील विषय नं.३२ व निर्णय क्र.२३२ नुसार संस्थानची भक्तनिवासस्थाने, रुग्णालये व इतर विभागांचा लॉण्ड्री केमिकल खरेदीकामी एकत्रित प्रस्ताव मान्यतेसाठी सादर करण्यात यावा, असे ठरले. त्यास अनुसरुन संस्थानचे साईबाबा भक्तनिवासस्थान व संस्थान रुग्णालये या दोन्ही लॉण्ड्री विभागांकरीता केमिकल / डिटर्जेन्ट खरेदी करता येईल.

**मागणी-** साईबाबा भक्तनिवासस्थान व संस्थान रुग्णालये या दोन्ही लॉण्ड्रींकरीता या सोबत सादर केलेल्या परिशिष्ट अ मध्ये दर्शविल्याप्रमाणे ऑक्टोंबर -२०१३ ते सप्टेंबर -२०१४ या एक वर्षाच्या कालावधी करीता केमिकल/डिटर्जेन्टची आवश्यकता भासणार आहे.

**संस्थान अधिनियमानुसार छाननी करुन अनुमान-** साईभक्तांना चांगल्या सोयी - सुविधा पुरविणे तसेच रुग्णांना स्वच्छ लिनेन पुरविणेकामी धुलाई केमिकल/डिटर्जेन्ट वापरावे लागेल.

**विभागाचा अभिप्राय-** सदर केमिकल/डिटर्जेन्ट खरेदीकामी अंदाजे ९,२०,०००/- (अक्षरी रुपये नऊ लाख वीस हजार मात्र) खर्च अपेक्षित आहे. सदर खर्चाची तरतूद उभय विभागांचे सन २०१३/२०१४ चे अंदाजपत्रकांमध्ये करण्यात आलेली आहे.

तरी उपरोक्त प्रमाणे केमिकल/डिटर्जेन्ट खरेदीकामी येणा-या रुपये ९,२०,०००/- (अक्षरी रुपये नऊ लाख वीस हजार मात्र) चे खर्चास मान्यता मिळून सदरची खरेदी, खरेदी विभागामार्फत विहित पध्दतीने खरेदी करुन मिळणेकामी मान्यतेस्तव मा.त्रिसदस्यीय समितीपुढे निर्णयार्थ सादर.

**निर्णय क्र.६७३ यावर सविस्तर चर्चा होऊन, श्री साईबाबा भक्तनिवासस्थान व श्री साईबाबा संस्थान रुग्णालये लॉण्ड्रीकरीता केमिकल/ डिटर्जन्ट विहीत पध्दतीने खरेदी करणेस व याकामी येणाऱ्या अंदाजे रु.९,२०,०००/- मात्रचे खर्चास मान्यता देण्यात आली.**

(कार्यवाही- अधिक्षक, श्री साईबाबा भक्तनिवासस्थान)

---

**विषय नं.६५ कनकुरी साठवण तलाव ते संस्थानचे गट नं.१८२ पैकीचे क्षेत्रातील विहीरीपर्यंत टाकावयाच्या पाईपलाईन बाबत.**

**प्रस्ताव-** दिनांक १५/०७/२०१३ रोजी मा.कार्यकारी अधिकारी साहेब, उपकार्यकारी अभियंता (बांधकाम विभाग) व पाणी पुरवठा विभाग प्रमुख यांनी साईआश्रम प्रकल्प पॅकेज-२ येथे राऊंड घेवून पाहणी केली असता, साईआश्रम प्रकल्प पॅकेज-२ येथील रुम व हॉल साईभक्तांचे वापरासाठी सुरु करावयाचे असल्याने सदर ठिकाणी पाणी पुरवठा सुरळीत करणेबाबत मा.कार्यकारी अधिकारी साहेब यांनी निर्देश दिलेले आहेत.

याबाबत मौजे निमगांव-कोऱ्हाळे शिवारात संस्थानने खरेदी केलेल्या गट नं.१८२ पैकीचे क्षेत्रातील विहीर आहे. सदर विहीरीतून साईआश्रम प्रकल्प पॅकेज-२ चे अंतर १४०० मिटर आहे. सदरच्या विहीरीत मुबलक पाणी असल्याने सदर विहीरीतून पाणी उचलून पी.व्ही.सी.सायफनव्दारे साईआश्रम प्रकल्प पॅकेज-२ चे पाण्याचे टाकीत साठविणेकरीता ४" व्यासाचे जैन कंपनीचे पी.व्ही.सी.पाईप खरेदी करणेसाठी व जे.सी.बी.मशिनव्दारे ३ फुट खोलीपर्यंत नाली खोदणे व पाईप टाकल्यानंतर नाली पुर्ववत बुजविणे इ. तत्सम कामे मा.व्यवस्थापन समितीचे मान्यतेने पुर्ण करण्यात आलेली आहेत. याकरीता

एकुण रुपये २,०७,६६७/- मात्र खर्च आलेला आहे. सदरच्या पाईपलाईनव्दारे साईआश्रम प्रकल्प पॅकेज-२ करीता पाणी पुरवठा करण्यात येत आहे.

कनकुरी साठवण तलाव येथून संस्थानने खरेदी केलेल्या गट नं. १८२ पैकीचे क्षेत्रातील विहीरीपर्यंत नव्याने ४" पि.व्ही.सी पाईपलाईन टाकल्यास कनकुरी साठवण तलाव येथून थेट साईआश्रम प्रकल्प पॅकेज-२ पर्यंत पाणी नेता येईल.

**तसेच** गट नं. १८२ पैकीचे क्षेत्राजवळच संस्थानचे गट नं.१९८,१९९,२००,२०१ पैकीचे नियोजित साईगार्डन प्रकल्पाचे क्षेत्रात ३०० फुट खोल दोन बोअरवेल घेण्यात आलेले आहेत. सदरच्या दोन्ही बोअरवेलला चांगल्या प्रमाणात पाणी उपलब्ध आहे. सदर विहीरीतून व दोन्ही बोअरवेल मधील पाणी उचलून पी.व्ही.सी.पाईपलाईनव्दारे कनकुरी साठवण तलाव येथे नेवून, शुध्दीकरणानंतर सदरच्या पाण्याचा उपयोग पिण्यासाठी करता येईल.

अशा प्रकारे कनकुरी साठवण तलाव येथून गट नं.१८२ पैकीचे क्षेत्रातील विहीरीपर्यंत पी.व्ही.सी. पाईपलाईन टाकल्यास कनकुरी साठवण तलाव येथून थेट साईआश्रम प्रकल्प पॅकेज-२ पर्यंत पाणी नेता येईल तसेच गट नं. १८२ पैकीचे क्षेत्रातील विहीरीचे पाणी व गट नं. १९८,१९९,२००,२०१ पैकीचे क्षेत्रातील दोन बोअरवेलचे पाणी कनकुरी साठवण येथे नेवून त्यावर पाणी शुध्दीकरणानंतर सदरच्या पाण्याचा उपयोग पिण्यासाठी करता येईल.

सदर पाईपलाईन करणेसाठी खालीलप्रमाणे खर्च अपेक्षित आहे.

| अ.नं. | कामाचा तपशिल | परिमाण | एकक | दर | रक्कम |
|---|---|---|---|---|---|
| ०१ | जे.सी.बी.मशिनव्दारे ३ फुट खोलीपर्यंत नाली खोदणे व पाईप टाकल्यानंतर नाली पूर्ववत बुजविणे. | १०० | तास | ७००/- | ७०,०००.०० |
| ०२ | ४" व्यासाचे पि.व्ही.सी.पाईप. (६ के.जी) (जैन कंपनी) | २५० | नग | १३०० | ३,२५,०००.०० |
| ०३ | पि.व्ही.सी. सोल्युशन | ५ | लिटर | २७०/- | १३५०.०० |
| ०४ | ऐअर व्हॉल. (सर्व्हिस सॅडल व स्टँडसह) | ६ | नग | १,५००/- | ९,०००.०० |
| ०५ | ४" पि.व्ही.सी.बेन्ड. | २० | नग | २४०/- | ४८००.०० |
| ०६ | ४" नॉन रिटर्न व्हॉल | ०१ | नग | ४०००/- | ४०००.०० |
| | | | | एकुण रुपये- | ४,१४,१५०.०० |
| | | | | अधिक ५% कन्टेनजन्सीज- | २०,७०७.५० |
| | | | | **एकुण-** | **४,३४,८५७.५०** |
| | | | | **पुर्णांकित-** | **४,३४,८५८.००** |

उपरोक्तप्रमाणे कनकुरी साठवण तलाव ते गट नं. १८२ मधील विहीरीपर्यंत पाईपलाईन टाकणेकामी रु. ४,३४,८५८/- मात्र अंदाजे खर्च येणार असून सदरचे काम पाणी पुरवठा विभागांतर्गत करुन घेता येईल.

तरी सदरची पाईपलाईन करणेस व त्यासाठी येणारे अंदाजे रु.४,३४,८५८/- मात्रचे खर्चास मान्यता मिळावी ही विनंती.

**निर्णय क्र.६७४ यावर सविस्तर चर्चा होऊन, कनकुरी साठवण तलाव ते गट नं. १८२ मधील विहीरीपर्यंत विभागांतर्गत पाईपलाईन टाकणेस व याकामी मटेरीयल खरेदीसाठी येणाऱ्या रु.४,३४,८५८/- मात्रचे खर्चास मान्यता देण्यात आली.** (कार्यवाही- पाणी पुरवठा विभागप्रमुख)

---

**विषय नं.६६ साईभक्तांना लाडूप्रसादाचे, मोफत वाटप करणेकामी तयार केलेल्या नियमावलीस मान्यता मिळणेबाबत.**

**प्रस्ताव-** **अधिनियम २००४ मधील तरतुद:-** सन २००४ चा महाराष्ट्र अधिनियम क्रं.१४ (भाग-४) मध्ये महाराष्ट्र विधान मंडळाचे अधिनियम व राज्यपालांनी प्रस्थापीत केलेले अध्यादेश व केलेले विनियम मधील १७ (१) नूसार भक्तांना आवश्यक त्या सोयी व सुविधा उपलब्ध करुन देणे.

**प्रस्तावना:-** मा.व्यवस्थापन समिती दि.२६/०७/२०१३ रोजीचे सभेत, साईभक्त दर्शन घेवून बाहेर पडल्यानंतर दर्शन रांगेतून आलेल्या प्रत्येक साईभक्तास २ लाडूचे १ पाकिट या प्रमाणे लाडू प्रसादाचे मोफत वाटप करण्यात यावे असा निर्णय झालेला आहे.

त्यानूसार श्रींचे दर्शन घेतलेनंतर साईभक्त गुरुस्थान मंदिराचे पाठीमागील गेटमधून व समाधी मंदीरातील नंदीजवळील दक्षिणेकडील गेटमधून बाहेर पडतील. गुरुस्थान मंदिराचे जागेतील रिलींगमध्ये दोन्ही गेट मधुन बाहेर येणारे साईभक्त गुरुस्थान मंदीराचे रिलींगमध्ये एकत्रीत आलेनंतर साईभक्तांना गुरुस्थान मंदीराचे समोरील रिलींगमध्ये मोफत लाडू प्रसाद देणेचे नियोजीत आहे. मात्र मोफत लाडू प्रसाद वाटपाकरीता नियमावली असणे गरजेचे आहे. त्यासाठी नियमावली तयार करुन त्यास मान्यता घेणे आवश्यक आहे.

१. साईभक्त दर्शन घेवून बाहेर पडल्यानंतर प्रत्येक साईभक्तास २लाडूचे (प्रत्येकी ५० ग्रॅमचा १ लाडू) १ पॅकेट लाडूप्रसाद दिला जाईल.

२. फक्त दर्शन रांगेतून आलेल्या साईभक्तांनाच लाडू प्रसाद दिला जाईल.

३. साईभक्तांसोबत असलेल्या ५ वर्षाचे पुढील मुलास लाडूप्रसाद दिला जाईल ते दर्शन रांगेतून चालत आले पाहिजेत.

४. दर्शन रांगेतून आलेल्या साईभक्तास फक्त एकदाच लाडू प्रसाद दिला जाईल.

५. दर्शन रांगेव्यतिरीक्त बाहेरील कोणत्याही साईभक्तास लाडूप्रसाद दिला जाणार नाही.

६. अपंग व्यक्तीना दर्शनासाठी संरक्षण कार्यालयातून टोकन दिले जाईल दर्शन झालेनंतर सदरचे टोकन लाडू प्रसाद वाटप करणाऱ्या कर्मचाऱ्याकडे जमा केलेनंतरच अपंग व्यक्तींना लाडू प्रसाद देण्यात येईल.

७. लाडू घेतलेनंतर साईभक्तांनी त्वरीत दर्शनरांगेतून बाहेर जाण्याचे करावे.

८. साईभक्तांनी जादा लाडूप्रसादाची आग्रही मागणी करु नये.

९. ज्या साईभक्तांना जादा लाडू पाकिटे पाहिजे असेल त्यासाठी साईप्रसाद इमारतीचे उत्तर बाजूस नेहमीचे ठिकाणी एका भक्तास ०३ लाडूचे १ पाकिट याप्रमाणे २ पाकिटे देता येतील.मात्र त्यांची प्रत्येकी किंमत रुपये २०/- प्रमाणे रोख भरावी लागेल.

१०. जादा लाडूची विक्री त्या त्या दिवसाच्या लाडू पुरवठयावर अवलंबून राहिल लाडू पुरवठा संपलेनंतर विक्री बंद करणेत येईल, तसा बोर्ड लावता येईल.

११. दर्शन रांगेत मोफत लाडू वाटप सुरु केल्यानंतर साईबाबा भक्त निवासस्थान (५०० रुम), व्दारावती निवासस्थान, साईआश्रम-१ येथील लाडू विक्री काऊंटर बंद करता येईल.

१२. दर्शन रांगेतील मोफत लाडूचे वितरण सुरु झालेनंतर अनुभवाअंती किती लाडू लागतील त्याप्रमाणे लाडूचा पुरवठा वाढवून घ्यावा लागेल. त्यासाठी कच्चा मालाची जादा मागणी करावी लागेल.

१३. गुंरुस्थान जवळ मोफत लाडू वाटप करणेत येणार असल्याने त्या ठिकाणी साईभक्तांनी लाडू प्रसाद म्हणून सेवन केल्यास त्या भागात लाडूचे रॅपर पडतील त्यासाठी स्वच्छतेबाबत काळजी घ्यावी लागेल.

ज्या साईभंक्ताना लाडू प्रसाद पाकिटे विकत घ्यावयाची असतील अशा साईभक्तांसाठी लाडू काउटंरवर रुपये २०/- प्रति नग (०३ लाडू पाकिट) नग या दराने लाडूप्रसाद पाकिटांची विक्री चालू ठेवणेही आवश्यक आहे.

**मागणी:-** प्रस्तावित केलेप्रमाणे मोफत लाडू प्रसाद वाटपाकरीता वरीलप्रमाणे नियमावली असणे गरजेचे असल्यामुळे सदर नियमावलीस मान्यता घेणे आवश्यक आहे.

**संस्थान अधिनियम/ठराव यानूसार अनुमान :-** आर्थिक

**विभागाचा अभिप्राय/स्पष्ट मत :-** मा.व्यवस्थापन समिती दि.२६/०७/२०१३ रोजीचे सभेत, साईभक्त दर्शन घेवून बाहेर पडल्यानंतर दर्शन रांगेतून आलेल्या प्रत्येक साईभक्तास २ लाडूचे (५० ग्रॅम वजनाचा १ लाडू) १ पाकिट या प्रमाणे लाडू प्रसादाचे मोफत वाटप करण्यात यावे असा निर्णय झालेला आहे. त्यानूसार प्रस्तावित केलेप्रमाणे अ.नं.१ ते १३ ची नियमावली असणे गरजेचे आहे.

तरी दर्शन रांगेतून दर्शन घेणाऱ्या साईभक्तांना मोफत लाडू प्रसादाचे वाटप व विक्री काऊंटरवर लाडू प्रसादांची विक्री करणेबाबत प्रस्तावित केलेप्रमाणे अ.नं.१ ते १३ ची नियमावलीस मान्यता मिळणेकामी निर्णयार्थ सादर.

**निर्णय क्र.६७५ यावर सविस्तर चर्चा होऊन, प्रस्तावात नमुद केलेल्या अ.नं.०१ ते १३ नियमांपैकी खालील नियमांमध्ये बदल करणेत येऊन नियमावलीस मान्यता देण्यात आली.**

**अ.नं.०३ कडेवरील मुलास वगळून दर्शन रांगेमध्ये चालत येणाऱ्या सर्व साईभक्तांस लाडू प्रसाद पाकिट देण्यात यावे.**

**अ.नं.१३ मंदिर परिसरात दर्शनरांगेमध्ये ज्या ठिकाणी लाडू प्रसाद पाकिट वाटप करणेत येणार आहे, त्या ठिकाणी साईभक्तांनी लाडूप्रसाद म्हणून सेवन केल्यास त्या भागात लाडूचे रॅपर पडतील त्यासाठी स्वच्छतेबाबत काळजी घ्यावी लागेल.** (कार्यवाही- अधिक्षक, कॅन्टीन विभाग)

---

**विषय नं.६७ साईआश्रम ०१ व ०२ येथे चहा कॅन्टीन सुरु करणेकामी फर्निचर साहित्य खरेदी करणेसाठी प्राप्त दरपत्रकांचा तुलनात्मक तक्त्याची नोंद घेणेबाबत.**

**प्रस्ताव-** साईआश्रम १ व २ इमारतीमध्ये चहा कॅन्टीन सुरू करणे कामी साहीत्य खरेदी करणेस व याकामी येणारे रक्कम रु.२,४१,२८०/- (अक्षरी रुपये दोन लाख तेहतीस हजार तीनशे आठरा) मात्रचे खर्चास मान्यता मिळालेली आहे. सदरचा प्रस्ताव दि.११.०६.२०१३ रोजी पुढील कार्यवाहीसाठी खरेदी विभागास प्राप्त झालेला होता.

सदरचे खरेदीकामी संस्थानचे नियमीत पुरवठा धारक यांचे कडून इकडील जा.क्र एस एस एस खरेदी-कन्टीन/१६७७/१३ दि.०९.०७.२०१३ अन्वये कोटेशन मागणी फॉर्म पाठवून त्यांचेकडून साईआश्रम १ व २ येथे चहा कॅन्टीन चालू करणेकामी साहीत्य खरेदी करणेसाठी दरपत्रके मागणी करण्यात आलेले होते. दरपत्रके स्विकारण्याची अंतीम मुदत दि.२५.०७.२०१३ अशी होती. त्यानुसार मुदतीअंती सहा कोटेशन प्राप्त झालेली आहेत. मुदतीनंतर एक कोटेशन प्राप्त झालेले होते. प्राप्त झालेली दरपत्रके दि.०५.०८.२०१३ रोजी कार्यकारी अधिकारी यांचे समक्ष उघडली असता त्यातील दरांचा तुलनात्मक तपशिल सोबत जोडलेला आहे.

साईआश्रम १ व २ इमारतीमध्ये चहा कॅन्टीन सुरू करणे कामी साहीत्य खरेदी करणेकामी प्राप्त कोटेशन उघडून तुलनात्मक तक्ता तयार केला असता अ.न. १,,३,४,५,६,७ साहीत्यासाठी मे. सोमनाथ गंगाधर रासने, संगमनेर यांचे दर न्युनतम आहेत. सदरचे साहीत्य खरेदी कामी रुपये ७५,८९०/- मात्र खर्च येईल. तसेच अ.न. २ या साहीत्यासाठी मे. साई एंटरप्रायझेस, श्रीरामपूर यांचे दर न्युनतम आहेत. सदरचे साहीत्य खरेदीकामी रु. ८४,४६४/- खर्च येईल. एकूण साहीत्य खरेदी कामी रु. १,६०,३५४/- मात्र खर्च येईल.

उपरोक्त प्रमाणे प्राप्त सहा कोटेशन उघडून तुलनात्मक तक्ता तयार केला असता अ.न. १,३,४,५,६,७ साहीत्यासाठी मे. सोमनाथ गंगाधर रासने, संगमनेर यांचे दर न्युनतम आहेत. तसेच अ.न. २ या साहीत्यासाठी मे. साई एंटरप्रायझेस, श्रीरामपूर यांचे दर न्युनतम आहेत. एकूण साहीत्य खरेदी कामी रुपये १,६०,३५४/- मात्र खर्च येईल. तरी तुलनात्मक तक्त्याची नोंद घेऊन न्युनतम दरधारकास पुरवठा आदेश देणेकामी निर्णय होणेस विनंती.

**निर्णय क्र.६७६ यावर सविस्तर चर्चा होऊन, उपरोक्त प्रस्तावास मान्यता देण्यात येऊन, प्रस्तावात नमुद केलेल्या न्युनतम दरधारकास पुरवठा आदेश देण्यात यावा, असे ठरले.** (कार्यवाही- अधिक्षक, कॅन्टीन विभाग)

---

**विषय नं.६८ साईआश्रम ०१ व ०२ येथे चहा कॅन्टीन सुरु करणेकामी भांडी खरेदीकामी प्राप्त दर पत्रकांचा तुलनात्मक तक्त्याची नोंद घेणेबाबत.**

**प्रस्ताव-** साईआश्रम १ व २ इमारतीमध्ये चहा कॅन्टीन सुरू करणे कामी साहीत्य खरेदी करणेस व याकामी येणारे रक्कम रु.२,३३,३१८/- (अक्षरी रुपये दोन लाख तेहतीस हजार तीनशे आठरा ) मात्रचे खर्चास मान्यता मिळालेली आहे. सदरचा प्रस्ताव दि.११.०६.२०१३ रोजी पुढील कार्यवाहीसाठी खरेदी विभागास प्राप्त झालेला होता.

सदरचे खरेदीकामी संस्थानचे नियमीत पुरवठा धारक यांचे कडून इकडील जा.क्र एस एस एस खरेदी-कन्टीन/१६७८/१३ दि.०९.०७.२०१३ अन्वये कोटेशन मागणी फॉर्म पाठवून त्यांचेकडून साईआश्रम १ व २ येथे चहा कॅन्टीन चालू करणेकामी साहीत्य खरेदी करणेसाठी दरपत्रके मागणी करण्यात आलेले होते. दरपत्रके स्विकारण्याची अंतीम मुदत दि.२५.०७.२०१३ अशी होती. त्यानुसार मुदतीअंती दोन कोटेशन प्राप्त झालेली आहेत. मुदतीनंतर एक कोटेशन प्राप्त झालेले होते. प्राप्त झालेली दरपत्रके दि.०५.०८.२०१३ रोजी कार्यकारी अधिकारी यांचे समक्ष उघडली असता त्यातील दरांचा तुलनात्मक तपशिल खालीलप्रमाणे -

| अ.न | साहीत्याचा तपशिल | मागणी | मे. सोमनाथ गंगाधर रासने, संगमनेर दर प्रती नग व्हॅटसह | मे. चाणाक्य टेक्नो टर्न, संगमनेर दर प्रती नग व्हॅटसह | श्री. बालाजी एंटरप्रायझेस, अहमदनगर दर प्रती नग व्हॅटसह |
|---|---|---|---|---|---|
| १. | स्टेनलेस स्टील टी-जार २५ लिटर्स् क्षमता | ५० नग | **<u>२,०६९.५५</u>** | क्लासिक-२,३७०/-<br>नॅशनल-२,२०७/- | २,४६७.५० |
| २. | स्टेनलेस स्टील टी-जार २० लिटर्स् क्षमता | २१ नग | **<u>१,७९५.५०</u>** | क्लासिक-२,१८६/-<br>नॅशनल-२,०३७/- | २,१००/- |
| ३. | स्टेनलेस स्टील टी-जार १५लिटर्स् क्षमता | १५ नग | **<u>१,५६८.७०</u>** | क्लासिक-१,९१५/-<br>नॅशनल-१,५८४/- | १,७३२.५० |
| ४. | स्टेनलेस स्टील टी-जार १० लिटर्स् क्षमता | ६ नग | **<u>१,२२८.५०</u>** | क्लासिक-१,५५१/-<br>नॅशनल-१,४४३/- | १,४१७.५० |
| ५. | स्टेनलेस स्टील टी-जार ५ लिटर्स् क्षमता | ६ नग | **<u>९,९२.२५</u>** | क्लासिक-१,२७८/-<br>नॅशनल-१,१८८/- | १,१४४.५० |
| ६. | ॲल्युमिनियम पातेले १५०लि क्षमतेचे, ॲल्यु. झाकणीसह (एका पातेल्याचे वजन अंदाजे ३० किग्रॅ) | ५नग | २३१.५२ रु. प्रति किलो | **<u>२२५/-</u>** रु. प्रति किलो | २६२.५०रु. प्रति किलो |
| ७. | ॲल्युमिनियम पातेले दांडीचे २ लि. क्षमता | ८ नग | २५५.१५ रु. प्रति किलो | **<u>१३५/-</u>** रु. प्रति नग | २८३.५०रु. प्रति किलो |

साईआश्रम १ व २ इमारतीमध्ये चहा कॅन्टीन सुरू करणे कामी साहीत्य खरेदी करणेकामी प्राप्त कोटेशन उघडून तुलनात्मक तक्ता तयार केला असता अ.न. १,२,३,४,५ साहीत्यासाठी मे. सोमनाथ

गंगाधर रासने, संगमनेर यांचे दर न्युनतम आहेत. सदरचे साहीत्य खरेदी कामी रुपये १,७८,०३८/- मात्र खर्च येईल. तसेच अ.न. ६ व ७ या साहीत्यासाठी मे. चाणाक्य टेक्नो टर्न, संगमनेर यांचे दर न्युनतम आहेत. सदरचे साहीत्य खरेदीकामी रुपये ३४,८३०/- खर्च येईल. एकूण साहीत्य खरेदी कामी रुपये २,१२,८६८/- मात्र खर्च येईल.

उपरोक्त प्रमाणे प्राप्त तीन कोटेशन उघडून तुलनात्मक तक्ता तयार केला असता अ.न. १,२,३,४,५ साहीत्यासाठी मे. सोमनाथ गंगाधर रासने, संगमनेर यांचे दर न्युनतम आहेत. तसेच अ.न. ६ व ७ या साहीत्यासाठी मे. चाणाक्य टेक्नो टर्न, संगमनेर यांचे दर न्युनतम आहेत. एकूण साहीत्य खरेदी कामी रुपये २,१२,८६८/- मात्र खर्च येईल. तरी तुलनात्मक तक्त्याची नोंद घेऊन न्युनतम दरधारकास पुरवठा आदेश देणेकामी निर्णय होणेस विनंती.

**निर्णय क्र.६७७ यावर सविस्तर चर्चा होऊन, उपरोक्त प्रस्तावास मान्यता देण्यात येऊन, प्रस्तावात नमुद केलेल्या न्युनतम दरधारकास पुरवठा आदेश देण्यात यावा, असे ठरले.** (कार्यवाही- अधिक्षक, कॅन्टीन विभाग)

---

**विषय नं.६९ श्रींच्या समाधी चौथऱ्यावर स्नान, पुजा, अर्चना व श्रृंगार झाल्यानंतर पुजारी/ चोपदार थांबण्याची प्रथा बंद करणेबाबत.**

**निर्णय क्र.६७८ सदरहू विषयावरील चर्चा पुढे ढकलणेत आली.** (कार्यवाही- अधिक्षक, मंदिर विभाग)

---

**विषय नं.७० श्री पुण्यतिथी उत्सव- २०१३ पुजारी व चोपदार यांचे गणवेशाबाबत.**

**प्रस्ताव-** सालाबादप्रमाणे श्री साईबाबा पुण्यतिथी उत्सवाचे वेळी मंदिर विभागातील पुजारी व चोपदार यांना नवीन गणवेष शिवण्यात येतात. याही वर्षी श्री साईबाबा पुण्यतिथी उत्सव-२०१३ मध्ये पुजारी व चोपदार यांना गणवेष तयार करुन घेणे आवश्यक आहे. तरी खालीलप्रमाणे खरेदीसाठी रु.४,२४,९२५/- मात्र खर्च अपेक्षित आहे. खालीलप्रमाणे खर्चाचा अंदाज सादर करीत आहोत-

**-: अंदाजपत्रक :-**

| अ.क्र | तपशील | अंदाजे एकूण रुपये |
|---|---|---|
| ०१ | १४ पुजारी व सहाय्यक पुजारी, १० कंत्राटी पुजारी<br>प्रत्येकी ०२ सोवळे, ०१उपरणे, ०१ सुती शॉल याप्रमाणे- | ५३,०४०/- |
| ०२ | एक गवई ०२ धोतरपान, ०२ उपरणे, ०२ नेहरुशर्ट या प्रमाणे - | ३,११०/- |
| ०३ | ३८ चोपदार :- संख्या प्रत्येकी ०२ झगे, ०२ सलवार पायजामा, ०१ पगडी, ०२पट्टा, ०२ रुमाल व ०२ पिवळे सोवळे व उपरणे असा संच एकूण ७६ नग - | १,८४,८००/- |
| ०४ | १९ कंत्राटी मदतनीस/चोपदार प्रत्येकी ०१ झगा, ०१ सलवार, ०१ पगडी, ०१ पट्टा, ०१ रुमाल असा संच एकूण १९ नग - | ४४,३३५/- |
| ०५ | लाल नेहरु शर्ट व पांढरा पायजमा ड्रेस (कंत्राटी कर्मचारीकरीता) १९ कंत्राटी कर्मचारी प्रत्येकी ०२ नेहरु शर्ट, ०२ पायजमा असा संच एकूण ३८ नग - | २२,०००/- |
| ०६ | पालखी व वाजंत्री सेवेकरी गणवेष<br>०४ पालखी धारक, ०१ अब्दागिरी धारक यांनाः- प्रत्येकी ०१ झगा, ०१ सलवार, ०१ फेटा, ०१ केशरी शेला<br>तसेच ०६ वाजंत्रीवाले यांनाः- प्रत्येकी ०१ नेहरु शर्ट, ०१ सलवार पायजमा, याप्रमाणे | १४,९८५/- |
| ०७ | ०२ चोपदार काठ्यांसाठी ०५ मीटर केशरी कापड खरेदी खर्च - | ९७५/- |
| ०८ | स्त्री मदतनीस साड्या ०९वार ०२ नग, ०६ वार ०४ नग, ब्लाऊज पीस ०८ नग (प्रत्येकी ०२ नग याप्रमाणे):- | ५,९२०/- |
| ०९ | शिवणावळः- चोपदार झगे, सलवार, पट्टे, रुमाल, इ. | ४७,७००/- |
| १० | शिवणावळ- लाल ड्रेस ड्रेस व पायजमा | ३,८००/- |
| ११ | शिवणावळः- पालखी सेवेकरी व वाजंत्री ड्रेस. | ३,६८०/- |
| १२ | आराधना विधीनंतर ब्राह्मण व सुवासिनींना वस्त्रदान करणेसाठी वस्त्र खरेदी खर्च | ४०,५८०/- |
| | **एकूण रुपये** | **४,२४,९२५/-** |

उपरोक्तप्रमाणे मंदिर विभागातील पुजारी व सहाय्यक पुजारी, चोपदार, पालखी सेवेकरी, वाजंत्री सेवेकरी, स्त्री बत्तीधारक तसेच आराधना विधीनंतर ब्राह्मण व सुवासिनींना वस्त्रदान करणे कामी कापड खरेदी करणे, चोपदार व मदतनीस यांचे गणवेष शिवणे आवश्यक आहेत. करीता कापड खरेदी व शिवणावळ खर्चास मंजूरी मिळणेस विनंती आहे. तथापी मागील वर्षी श्रीसाईबाबा पुण्यतिथी उत्सव-२०१२ मध्ये मंदिर कर्मचाऱ्यांसाठी लागणारे कापड खरेदी करुन व शिवणावळ करुन देण्याची इच्छा देणगीदार श्री रमेशभाई संहेता, मुंबई यांनी प्रर्दशित केली होती. त्यानुसार खर्च देणगीदार श्री रमेशभाई संहेता, मुंबई यांनी देणगीदाखल करुन दिला होता.

तरी यंदाहि वस्त्र खरेदी व शिवणावळ करुन घेणेस व यासाठी येणारा खर्च देणगीदार श्री रमेशभाई संहेता, मुंबई हे देणगी देण्यास तयार आहेत. तरी त्यांचेकडून देणगी रुपाने स्विकारणेस अथवा

थेट खरेदीस मंजूरी असावी व खरेदी खर्चाची बीले लेखाशाखेमार्फत आदा करणेस मान्यता मिळणेस विनंती आहे. तरी याबाबत निर्णय होणेस विनंती आहे.

**निर्णय क्र.६७९ यावर सविस्तर चर्चा होऊन, उपरोक्त प्रस्तावास मान्यता देण्यात आली.**

(कार्यवाही- अधिक्षक, मंदिर विभाग)

---

**विषय नं.७१ साईआश्रम ०१ व ०२ करीता जुने मॉडेल बंद झाल्याने नविन मॉडेलचे LED TV खरेदी करणेबाबत.**

**विषय नं.७२ शिरडी ते कोपरगांव रेल्वेस्टेशन बससेवा सुरु करणेबाबत.**

**निर्णय क्र.६८० विषय नं.७१ व ७२ वरील चर्चा पुढे ढकलणेत आली.**

---

**विषय नं.७३ नविन टायर्स खरेदीकरणेबाबत.**

**प्रस्ताव-** वाहन विभागाकडील वापरात असलेल्या खालील तीन बसेसचे सध्याचे टायर्स खराब झालेने त्यांना नवीन टायर्स (टयुब, फ्लॅपसह) खरेदी करणे आवश्यक आहे. त्यांचा तपशिल खालील प्रमाणे आहे.

| अ.नं. | वाहन क्रं. | वाहन प्रकार/ वापर | सध्याचे टायरचा एकूण वापर | आवश्यक टायर्स साईज | टायरची कंपनी | टायर्स नग |
|---|---|---|---|---|---|---|
| ०१. | MH-१७-T-७१०९ | नगरसुल बस | ९०,००० | १०-००-२० | अपोलो | ०४ |
| ०२. | MH-१७-T-७११० | नगरसुल बस | ९०,००० | १०-००-२० | अपोलो | ०४ |
| ०३. | MH-१७-T-८५०४ | भक्तनिवास बस | ८७१६० | १०-००-२० | अपोलो | ०२ |
| | | | | | **एकुण टायर्स** | **१०** |

वरील बसेसचे टायर्स वेळोवेळी खराब झालेनंतर दोन वेळा रिमोल्डींग करुन वापरण्यात आलेले आहे. त्यामुळे तिन्ही बसेस करीता (१०:००:२०) या साईजचे एकुण १० टायर्स (टयुब, फ्लॅपसह) खरेदी करणे आवश्यक आहे. या कामी सध्याचे मार्केटमधील दरानुसार रु.१,९०,०००/- (अक्षरी रक्कम रु. एक लाख नव्वद हजार) मात्र खर्च अपेक्षीत आहे.

उपरोक्त बसेसकरीता नवीन टायर्स अपोलो कंपनीचे अधिकृत डिलर यांचेकडून कोटेशन बोलावुन खरेदी करण्यात येतील.

तरी वरील प्रमाणे तीन बसेसकरीता नवीन १० टायर्स (टयुब, फ्लॅपसह) खरेदी करणेस व या कामी येणारे अंदाजे रु.१,९०,०००/- (अक्षरी रक्कम रु. एक लाख नव्वद हजार) मात्रचे खर्चास प्रशासकीय मान्यता मिळणेस विनंती.

**निर्णय क्र.६८१ यावर सविस्तर चर्चा होऊन, उपरोक्त प्रस्तावात नमुद केलेप्रमाणे तीन बसेसकरीता नवीन १० टायर्स (टयुब, फ्लॅपसह) खरेदी करणेस व याकामी येणारे अंदाजे रु.१,९०,०००/- मात्रचे खर्चास मान्यता देण्यात आली.** (कार्यवाही- वाहन विभागप्रमुख)

---

**विषय नं.७४ श्री साईनाथ रक्तपेढीकरीता मोबाईल ब्लड डोनेशन व्हॅन खरेदी करणेबाबत.**

**प्रस्ताव-** श्री साईनाथ रक्तपेढी ही सन २००० साली सुरु झाली असुन, आजपर्यंत रक्तपेढीच्या कामाचा आलेख वाढतच आहे. श्री साईनाथ रुग्णालय, श्री साईबाबा रुग्णालय व बाहेरगावची साधारण ७० किमी परिघातील इतर रुग्णालये यांना श्री साईनाथ रक्तपेढीमार्फत रक्त पुरविले जाते. श्री साईबाबा रुग्णालयातील वाढत्या शस्त्रक्रिया, अपघाताचे वाढते प्रमाण यामुळे रक्ताची जास्त प्रमाणात गरज भासत आहे. त्यामुळे सर्व रक्तगटांचे रक्त उपलब्ध असणे गरजेचे आहे. रक्ताबरोबरच सर्व रक्ताचे घटकही पुरविण्याचे रक्तपेढीमार्फत केले जाते.

रक्तपेढीमध्ये रक्ताचा साठा योग्य त्या प्रमाणात उपलब्ध असणे आवश्यक आहे. त्यामध्ये दुर्मिळ रक्तगटांचे रक्तही उपलब्ध असणे आवश्यक आहे. त्या दृष्टीने मंदीर परिसरात आठवडयातुन तीन दिवस रक्तदान शिबीर घेतले जातात. तसेच गावोगावी विविध ट्रस्ट, मंडळे, सेवाभावी संस्था यामार्फत ठिकठिकाणी रक्तदान शिबीरे आयोजित केली जातात.

मागणी वाढल्याने शिबिरांची संख्याही दिवसेंदिवस वाढतच आहे. मागील तीन वर्षात झालेली शिबीरे व त्यातुन उपलब्ध झालेल्या रक्तदात्यांची संख्या यांचा तुलनात्मक तक्ता खालील प्रमाणे.

| वर्ष | शिबीरांची संख्या | रक्तदात्यांची संख्या |
|---|---|---|
| २०१०-११ | ७८ | १९१४ |
| २०११-१२ | १३२ | ३६९६ |
| २०१२-१३ | १४७ | ४६३९ |

शिबीरासाठी लागणारे सर्व सामान हे रक्तपेढीतुन घेवुन जावे लागते व शिबीर संपल्यानंतर परत आणावे लागते. सध्या शिबीराकरीता पाठविण्यात येत असलेल्या वाहनात आवश्यक सुविधा (रक्तपेढीच्या मशीन, मोबाईल फ्रिज, डोनर बेड, जनरेटर) उपलब्ध नसलेने रक्त संकलन करणेस अडचणी येतात. शिबीराची तसेच रक्तदात्यांची संख्या विचारात घेता श्री साईनाथ रक्तपेढीकरीता मोबाईल ब्लड डोनेशन व्हॅन असणे आवश्यक आहे. व सदरची व्हॅन रक्त संकलन अधिकारी यांचेशी स्पेशिफिकेशन बाबत चर्चा करुन खरेदी करणेस व त्याबाबतची पुढील कार्यवाही वाहन विभागामार्फत होणेस श्री साईनाथ रक्तपेढीकडील टिपणीस मा. कार्यकारी अधिकारी कार्यालय आवक क्र.२९७३/१, दि.२५/०६/२०१३ ने मान्यता देण्यात आलेली आहे.

रक्तसंकलन अधिकारी यांचेशी स्पेशिफिकेशन बाबत झालेल्या चर्चेनुसार, वाहनात आवश्यक असलेल्या बाबींचा विचारकरता मोबाईल ब्लड डोनेशन व्हॅन बनविणे कामी टाटा कंपनीचे LP९१२/४९ या मॉडेलची बस चेसी खरेदी करुन आपणास आवश्यक त्याप्रमाणे बॉडीबांधणी करुन घेता येईल.

नवीन टाटा कंपनीचे LP९१२/४९ या मॉडेलची बस चेसी खरेदी करणे व त्यावर मोबाईल ब्लड डोनेशन व्हॅनची बॉडी बांधणी करुन घेणे या कामी अंदाजे रु.३०,००,०००/- (अक्षरी रक्कम रु. तीस लाख मात्र) खर्च अपेक्षीत आहे.

तरी नवीन मोबाईल ब्लड डोनेशन व्हॅन बनविणे कामी टाटा कंपनीचे अधिकृत डिलर्स यांचेकडून LP९१२/४९ या मॉडेलच्या बस चेसी खरेदीकामी तसेच सदर वाहनावर बॉडी बांधणीचे कामाकरीता बॉडीबिल्डर्स यांचेकडून कोटेशन बोलाविणेस व या कामी येणाऱ्या रु.३०,००,०००/- (अक्षरी रक्कम रु. तीस लाख मात्र) चे खर्चास प्रशासकीय मान्यता मिळणेस विनंती.

**निर्णय क्र.६८२** **यावर सविस्तर चर्चा होऊन, श्री साईनाथ रक्तपेढीकरीता नवीन मोबाईल ब्लड डोनेशन व्हॅन बनविणे कामी टाटा कंपनीचे अधिकृत डिलर्स यांचेकडून LP९१२/४९ या मॉडेलच्या बस चेसी खरेदी करणेस तसेच सदर वाहनावर बॉडी बांधणीचे कामाकरीता बॉडीबिल्डर्स यांचेकडून कोटेशन बोलाविणेस व या कामी येणाऱ्या अंदाजे रु.३०,००,०००/- मात्रचे खर्चास मान्यता देण्यात आली.**

(कार्यवाही- वाहन विभागप्रमुख)

---

**विषय नं.७५** **श्रीमती निता हिरामण परदेशी व इतर तीन, सहाय्यक शिक्षक/ शिक्षिकांना प्राथमिक विभागाकडे श्री साईबाबा इंग्लिश मिडीयम स्कुलमध्ये संस्थान सेवेत कायम करणेबाबत.**

**प्रस्ताव-** श्रीमती निता हिरामण परदेशी व इतर तीन सहा. शिक्षक/ शिक्षिकां उमेदवार यांची जा.नं.एसएसएस/ वशी-०१/ २४५४, २४५८, २४५३, २४५६ /२०१२ दि. ३ सप्टें२०१२ चे नेमणूक आदेशान्वये श्री साईबाबा संस्थान विश्वस्तव्यवस्था, शिर्डी संचलीत श्री साईबाबा इंग्लिश मिडीयम स्कूल, शिर्डीकडे सहाय्यक शिक्षिका ( प्राथमिक विभाग ) या पदावर तीन वर्षाचे परिवीक्षाधीन कालावधीसाठी दरमहा एकत्रीत मानधन रु.६०००/- (अक्षरी रुपये सहा हजार मात्र ) वर नियुक्ती करण्यात आली असून त्यांचा सर्वसाधारण तपशिल खालीलप्रमाणे आहे.

| अ.नं | कर्मचारी नांव व हुद्दा | शिक्षण | प्रत्यक्ष कामावर हजर झालेची तारीख | परिवीक्षाधीन कालावधी संपुष्टात येत असल्याची तारीख | वैद्यकीय अधिक्षक यांचे वैद्यकिय दृष्टया पात्र असलेबाबत प्रमाणपत्र |
|---|---|---|---|---|---|
| ०१ | ०२ | ०३ | ०४ | ०५ | ०६ |
| ०१ | श्रीमती निता हिरामण परदेशी सहा. शिक्षक | एच.एस.सी. डी.एड. | ०१/०९/२०१० | ३१/०८/२०१३ | दि.११.०९.२०१० प्रमाणपत्रानुसार पात्र |
| ०२ | श्रीमती ज्योती अरुण बोधक सहा. शिक्षक | एच.एस.सी. डी. टी. एड. | ०१/०९/२०१० | ३१/०८/२०१३ | दि.०९.०९.२०१० प्रमाणपत्रानुसार पात्र |
| ०३ | श्रीमती सोनिया प्रकाश ठोकळ सहा. शिक्षक | एच.एस.सी. डी.एड. | ०७/०९/२०१० | ०६/०९/२०१३ | दि.०७.१०.२०१० प्रमाणपत्रानुसार पात्र |
| ०४ | श्री रावसाहेब रामभाऊ राशिनकर, सहा. शिक्षक | एच.एस.सी. डी.एड. | २८/०९/२०१० | २७/०९/२०१३ | दि.२२.१०.२०१० प्रमाणपत्रानुसार पात्र |

उपरोक्त अ. नं. ०१ ते ०४ वरील सहा. शिक्षक यांचे काम व वर्तणूक चांगली असून ते प्रमाणिक आहेत. त्यांचे काम समाधानकारक असुन ते हुकूमाप्रमाणे व योग्य रीतीने कामे करतात. त्यांचे बाबतीत कोणतीही प्रकरणे चालू अथवा प्रस्तावित नाहीत. त्यांना वेतनश्रेणी देऊन संस्थान सेवेत कायम करण्यास हरकत नाही.

**दि महाराष्ट्र एम्प्लॉईज ऑफ प्रायव्हेट स्कूल्स, कंडीशन्स ऑफ रेग्युलेशन ॲक्ट,१९७७ व रुल्स १९८१ मधील कलम नं.५ मध्ये कायम करणेबाबत खालीलप्रमाणे तरतूद आहे.**

CERTAIN OBLIGATIONS OF MANAGEMEN OF PRIVATE SCHOOL.

(2) Every person appointed to fill a permanent vacancy shall be on probation for a period of two years. Subject to the provisions of sub section on (3) & (4) he shall, on completion of this probation period of two years, be deemed to have been confirmed.

(3) if in the opinion of the management, the work or behavior of any probationer during the period of his probation, is not satisfactory, the management may terminate his services at any time during the said period after giving him one month's notice (or salary of one month in lieu of notice )

उपरोक्त नियमातील तरतूदीनुसार तसेच प्राचार्या, श्री साईबाबा इंग्लिश मिडीयम स्कूल,शिर्डी व प्रभारी प्रशासकीय अधिकारी (शैक्षणिक संकुल ) यांचे अभिप्राय विचारात घेता अ.न. ०१ ते ०४ वरील सहा. शिक्षक/ शिक्षिकां यांना त्यांचे नांवांसमोर दर्शविलेल्या (कॉलम नं. ०५) तारखेपासून सुधारीत वेतन बँड ५२००-२०२०० + ग्रेड वेतन रु.२८०० नुसार देऊन संस्थान सेवेत कायम करणेबाबतच्या प्रस्तावावर निर्णय होणेस विनंती.

**निर्णय क्र.६८३ यावर सविस्तर चर्चा होऊन, उपरोक्त प्रस्तावास मान्यता देण्यात आली.**

(कार्यवाही- प्राचार्या, इंग्लिश मिडीयम स्कुल)

---

**विषय नं.७६ उत्तरपत्रिका छपाईबाबत.**

**प्रस्ताव-** श्री साईबाबा कन्या विद्या मंदिरकडील नवीन शैक्षणिक वर्ष २०१३-१४ मध्ये इ.५ वी ते इ.१० वीच्या घटक चाचण्या २१ ऑगष्ट पासूना सुरु होणार आहेत. तसेच सत्र परीक्षा देखील सुरु होणार असल्यामुळे परीक्षाकामी खालील तक्त्यात दर्शविल्याप्रमाणे उत्तरपत्रिका तातडीने छपाई करणे गरजेचे आहे.

| अ.नं. | तपशील | नग | अंदाजे दर | अंदाजे खर्च |
|---|---|---|---|---|
| ०१ | हाफ साईज उत्तरपत्रिका १२ पेजेस ६ पानी | ५००० | १.५० | ७,५००/- |
| ०२ | हाफ साईज उत्तरपत्रिका ०८पेजेस ४ पानी | २००० | १.१५ | २,३००/- |
| ०३ | हाफ साईज उत्तरपत्रिका ०४पेजेस २ पानी | ५००० | ०.७५ | ३,७५०/- |
| ०४ | फुल साईज उत्तरपत्रिका १२ पेजेस ६ पानी | ५००० | ३.१० | १५,५००/- |
| ०५ | फुल साईज उत्तरपत्रिका ०८ पेजेस ४ पानी | ६००० | २.७५ | १६,५००/- |
| ०६ | फुल साईज उत्तरपत्रिका ०४ पेजेस २ पानी | १०००० | १.२० | १२,०००/- |
| ०७ | ड्राईंग पेपर | २००० | ६.०० | १२,०००/- |
| | | | **अंदाजे खर्च-** | **६९,५५०/-** |

उपरोक्तप्रमाणे उत्तरत्रिका छपाई करणेकामी व ड्राईंग पेपर खरेदीकामी अंदाजे ७०,०००/- मात्र खर्च अपेक्षित आहे.

तरी उत्तरपत्रिका व ड्राईंग पेपर प्रचलित पध्दतीने कोटेशन मागवून छपाई व करणेस व त्याकामी येणा-या रु.७०,०००/- मात्रचे खर्चास मान्यता मिळणेस विनंती.

**निर्णय क्र.६८४ यावर सविस्तर चर्चा होऊन, उपरोक्त प्रस्तावास मान्यता देण्यात आली.**

(कार्यवाही- प्राचार्या, कन्या विद्या मंदिर)

---

**विषय नं.७७ कनिष्ठ महाविद्यालयाकरीता प्रयोग वह्या छपाई करणेबाबत.**

**प्रस्ताव-** **अधिनियम २००४ मधील तरतुद:-** क्र.१७ (१) व १७ (२) (ढ) मध्ये सर्व प्रकारच्या धर्मनिरपेक्ष शिक्षणास चालना देईल किवा तसे करण्यास सहाय्य करील. तसेच शिर्डी येथे वा अन्य ठिकाणी शैक्षणिक संस्था स्थापन करील.

**प्रास्तविक:-** कनिष्ठ महाविद्यालयातील इ.११ विज्ञान शाखेत२४० विद्यार्थी व १२ वी विज्ञान १६० विद्यार्थी शिक्षण घेत आहेत. या वर्गातील विद्यार्थ्यांना भौतिक शास्त्र, रसायणशास्त्र, जीवशास्त्र व माहिती तंत्रज्ञान, व गणित या विषयासाठी प्रयोग वहयांची आवश्यकता आहे.

**मागणी:-** खालील प्रमाणे प्रयोग वहयांची छपाई करणे आवश्यक आहे.

| अ.नं. | तपशिल | छपाई संख्या | अंदाजे दर | रक्कम |
|---|---|---|---|---|
| ०१ | भौतिक शास्त्र जर्नल | २५० | १७५.०० | १८७५०.०० |
| ०२ | रसायनशास्त्र | २५० | ६५.०० | १६२५०.०० |
| ०३ | जीवशास्त्र | २७५ | ८०.०० | २२०००.०० |
| ०४ | माहिती तंत्रज्ञान | २५० | ६०.०० | १५०००.०० |
| ०५ | गणित | १५० | ७०.०० | १०५००.०० |
| | | | **एकूण रुपये-** | **८२,५००.००** |

**संस्थान अधिनियम/ठराव यानुसार अनुमान :-** खर्चाचा विषय आहे.

**विभागाचा अभिप्राय/स्पष्ट मत :-** वरील प्रमाणे प्रयोग वहयांची छपाई करणे आवश्यक आहे.

तरी वरीलप्रमाणे प्रयोग वहयांची प्रचलीत पध्दतीने कोटेशन मागवून छपाई करणेस तसेच त्याकामी येणाऱ्या अंदाजे रु.८२,५००/- (अक्षरी रुपये- ब्याऐंशी हजार पाचशे) चे मात्रचे खर्चाचा प्रस्ताव निर्णयास्तव सादर.

**निर्णय क्र.६८५ यावर सविस्तर चर्चा होऊन, कनिष्ठ महाविद्यालयातील विद्यार्थ्यांकरीता आवश्यक असलेल्या प्रयोग वह्यांची प्रचलीत पध्दतीने कोटेशन मागवून छपाई करणेस व याकामी येणाऱ्या अंदाजे रु.८२,५००/- मात्रचे खर्चास मान्यता देण्यात आली.** (कार्यवाही- प्र.प्राचार्य, कनिष्ठ महाविद्यालय)

---

**विषय नं.७८ आर्थिक मदतीची मागणी करणाऱ्या अर्जदारांना त्यांच्या अर्जाबाबतची सद्यस्थिती कळविणेबाबत.**

**निर्णय क्र.६८६ सदरहू विषयावरील चर्चा पुढे ढकलणेत आली.** (कार्यवाही- सामान्य प्रशासन/ वशी-०३)

---

**विषय नं.७९ श्री साईबाबा पुण्यतिथी उत्सव- २०१३ साजरा करणेस व त्यास येणारे खर्चाचे अंदाजपत्रकास मान्यता मिळणेबाबत.**

**प्रस्ताव-** महाराष्ट्र शासन सन २००४ च्या अधिनियम क्र.१४ च्या कलम नं. १७(१) मध्ये खालीलप्रमाणे तरतुद आहे.

राज्य शासनाच्या कोणत्याही सर्वसाधारण किंवा विशेष आदेशास अधीन राहून संस्थान विश्वस्तव्यवस्थेच्या मालमत्तेची व कामकाजाची कार्यक्षमतेने व्यवस्था पाहणे, मंदिरामध्ये रुढी व प्रथेनुसार धार्मिक विधी पूजा-अर्चा, समारंभ व उत्सव आयोजित करण्यासाठी आणि पार पाडण्यासाठी योग्य ती व्यवस्था करणे, भक्तगणांना आवश्यक त्या सोयी व सुविधा उपलब्ध करुन देणे आणि या अधिनियमान्वये विश्वस्तव्यवस्थेचा कारभार ज्या प्रयोजनार्थ चालवावयाचा आहे. ती उद्दिष्टे साध्य करण्यासाठी विश्वस्तव्यवस्थेचे उत्पन्न कामी लावणे. ही समितीची कर्तव्ये असतील.

त्याप्रमाणे रुढी परंपरेनुसार धार्मिक पूजा विधी, उत्सव साजरे केले जातात. सालाबाद प्रमाणे यावर्षी श्री साईबाबांचा ९५ वा पुण्यतीथी उत्सव शनिवार दि.१२/१०/२०१३ ते सोमवार दि.१४/१०/२०१३ असा तीन दिवस साजरा करण्यात येणार आहे.

या उत्सवासाठी पुढील प्रमाणे तयारी करावी लागणार आहे.

| अ.नं. | तपशील | उत्सवासाठी करावयाची तयारी व कामे |
|---|---|---|
| १ | उत्सव निमंत्रण पत्रिका व प्रसाद | संस्थानचा कारभार चालविणेसाठी तयार करण्यात आलेल्या योजनेच्या तरतुदीमध्ये दुरुस्ती झाल्याप्रमाणे भक्त मंडळाचे आजीव व आश्रयदाते सभासदांना उत्सवाच्या निमंत्रण पत्रिका व उदीप्रसाद पाठवावा लागतो.<br>यंदाचे श्री साईबाबा पुण्यतीथी उत्सवात सभासदांची वाढती संख्या धरुन १९५००० निमंत्रण पत्रिका तसेच नेहमीप्रमाणे प्रेस नोट ( न्यूज अॅटम ) म्हणून वर्तमान पत्रातून प्रसिध्दी देण्यात येईल. |
| २ | उत्सव व्यवस्था | **अ) कलाकार कार्यक्रम** |
| | शनिवार दि.१२/१०/२०१३<br>( प्रारंभ दिवस) | सायंकाळी ७.३० ते रात्रौ. १०.३० पर्यंत निमंत्रित कलाकारांचा कार्यक्रम साईनगर मैदान स्टेजवर |
| | रविवार<br>दि.१३/१०/२०१३<br>( मुख्य दिवस) | १) सायंकाळी ०७.३० ते रात्रौ. ११.०० पर्यंत निमंत्रित कलाकारांचा कार्यक्रम (साईनगर मैदान स्टेजवर.)<br>२) रात्री ११.०० ते सकाळी ०५.०० पर्यंत कलाकारांची सेवा हजेरी कार्यक्रम. या मुख्य दिवशी समाधी मंदिर दर्शनासाठी रात्रभर उघडे राहिल. |
| | सोमवार<br>दि.१४/१०/२०१३<br>( तृतीय दिवस) | सायंकाळी ०७.३० ते ११.०० पर्यंत निमंत्रित कलाकारांचा कार्यक्रम (साईनगर मैदान स्टेजवर) |
| | | **ब) कीर्तन कार्यक्रम** |
| | शनिवार दि.१२/१०/२०१३ ते सोमवार दि.१४/१०/२०१३ या कालावधीत नेहमीच्या वेळेप्रमाणे किर्तन कार्यक्रम होतील. | श्री साईबाबा पुण्यतिथी उत्सवासाठी तीन दिवस कीर्तन कार्यक्रम ठेवावयाचा आहे. निमंत्रीत कीर्तनकारांची व कलाकारांची निवास व्यवस्था संस्थानमार्फत मोफत करण्यात येईल. निमंत्रीत कीर्तनकारांचे व कलाकारांचे मानधन मंदिर विभागामार्फत अदा करण्यात येईल. किर्तनकार निश्चीती करावयाची आहे. |
| | | **क) विविध पुजा व आराधना विधी** |
| | शनिवार दि.१२/१०/२०१३ ते सोमवार दि.१४/१०/२०१३ | भिक्षा झोळी मिरवणूक, त्यात सदस्यांचा सहभाग, पालखी व रथ मिरवणूक, आराधना विधी, विणा, व पोथी त्यातील सदस्यांचा सहभाग, सिमोल्लंघन, इ. कार्यक्रम नेहमीचे प्रथेप्रमाणे करण्यात येतील. |
| ३ | श्री साईसत्यव्रत (सत्यनारायण ) पूजा व अभिषेक पूजा | उत्सवकाळात शनिवार दि.१२/१०/२०१३ ते सोमवार दि.१४/१०/२०१३ अखेर श्री साईसत्यव्रत पूजा व अभिषेक पूजा बंद राहतील. |
| ४ | | उत्सव काळात दिनांक १२/१०/२०१३ रोजी सकाळी ०५.१५ वाजता श्री |

| | | |
|---|---|---|
| | | द्वारकामाई मंदिरात श्री साईचरित्राचे अखंड पारायणास सुरुवात होईल. दिनांक १३/१०/२०१३ रोजी सकाळी ०५.०० वाजता पारायण समाप्ती होईल. मा.त्रिसदस्य समितीचे ३ सदस्य पहिले तीन अध्याय वाचतील व राहिलेले ५० अध्याय प्रत्येकी एक असे ५० साईभक्त वाचतील. इच्छुक भक्तांची नांवे दिनांक ११/१०/२०१३ रोजी अनाऊंसमेंट सेंटर मधील मंदिर कर्मचा-याकडे नोंदविली जातील व त्याच दिवशी सायंकाळी त्यांच्या नावाच्या चिठ्ठया काढून पारायणा करीता नांवे निश्चित केली जातील. पारायणात भाग घेणा-या प्रत्येक भक्तास प्रसाद म्हणून एक श्रीफळ देण्यात येईल.<br>या उत्सवात पोथी, वीणा, प्रतिमा, अध्याय वाचन, रुद्राभिषेक, पाद्यपूजा या कार्यक्रमाकरीता त्रिसदस्य समितीचे सदस्य राहातील. तसेच श्री गुरुपौर्णिमा उत्सव सन २०१३ मध्ये पोथी, विणा, प्रतिमा, अध्याय वाचन, रुद्राभिषेक, पाद्यपूजा घेतलेल्या मा. त्रिसदस्य समितीचे सदस्याचे नावाचा तक्ताही सोबत जोडलेला आहे. |
| ५ | पालखी व रथ मिरवणूक | उत्सवाचे पहिले दिवशी दिनांक १२/१०/२०१३ रोजी श्रींचे पालखीची गांवातून रात्रौ ९.१५ वाजता मिरवणूक होईल, दि.१३/१०/२०१३ रोजी रात्रौ ०९.१५ वाजता रथाची गांवातून मिरवणूक होईल. |
| ६ | विद्युत रोषणाई | समाधी मंदिर, द्वारकामाई , चावडी, गुरुस्थान व मंदिर परिसरात सोईप्रमाणे विद्युत रोषणाई करण्यात येईल. श्री पुण्यतिथी उत्सवात व्दारकामाई मंडळ,मुंबई विनामुल्य रोषणाई करीत असतात. त्यांची शिर्डी येथे निवास, भोजन व चहा-नाष्ट्याची व्यवस्था संस्थानमार्फत विनामुल्य करण्यात येते. मात्र ट्रक भाडे व जाणे - येण्याचा खर्च देण्याची प्रथा आहे. यावेळी विद्युत विभागामार्फत त्यांना पत्र देण्यात आलेले आहे. ते न आल्यास संस्थान मार्फत विद्युत रोषणाई करण्यात येईल. |
| ७ | संरक्षण व्यवस्था | उत्सव काळात समाधी मंदिर व मंदिर परिसरात बंदोबस्त ठेवणेकामी संरक्षण विभागात ठेकेदारी पध्दतीने जादा गार्ड नेमण्यात येतील. तसेच शांतता व सुव्यवस्था राखणेसाठी पुरेसा बंदोबस्त ठेवणेकामी मा.पोलीस अधिक्षक, अहमदनगर यांना तसेच कार्यक्रमासाठी ध्वनीक्षेपणचे परवानगीबाबत मा.पोलीस निरीक्षक, शिर्डी यांना विनंती करण्यात येईल. |
| ८ | प्रसाद - भोजन व्यवस्था | उत्सव काळात प्रसादाल्यात मिष्टांन्नासह रुपये १०/- या दराने भक्तांना प्रसाद भोजन दिले जाते. मा.त्रिसदस्यीय समितीचे सदस्यांचे कुटुंबिय व - नातेवाईक तसेच इतर सन्माननीय व्यक्ती , निमंत्रीत कलाकर, पोलीस कर्मचारी, उत्सवात काम करणेकरीता मदतीस येणा-या व्यक्तींची प्रसाद भोजनाची व्यवस्था स्वतंत्र केली जाईल. साईभक्तांचे सोईसाठी अन्नपाकिटे, चहा, कॉफी, दूध व बिस्कीटे इत्यादी कॅटींनमध्ये २४ तास सुविधा उपलब्ध आहे. लाडू प्रसाद तसेच तीनही दिवस मिष्टांन्न प्रसाद नेहमीचे दराने देण्यात येईल. तसेच श्री गुरुपौर्णिमा उत्सवात पालखीधारकांना आलेल्या दिवशी एकवेळचे जेवण संस्थानमार्फत कुपन्स वाटुन दिले होते, त्यानुसार श्री पुण्यतीथी उत्सवात येणा-या पालखीधारकांना एकवेळचे जेवण संस्थानमार्फत कुपन्स वाटुन द्यावयाचे आहे.<br>श्री गुरुपौर्णिमा उत्सवात सन २०१३ तिनही दिवसाचे मिष्टांन्न पदार्थ म्हणून बुंदी ठेवण्यात आली होती.<br>या उत्सवामध्ये तीनही दिवसात मिष्टांन्न म्हणून बुंदी देता येईल. |
| ९ | गावजेवण | उत्सवाचे शेवटचे दिवशी नेहमीप्रमाणे गावजेवण देण्यात येईल. |
| १० | लिलाव | श्रींना अर्पण केलेली वस्त्रे व इतर वस्तूंची प्रसाद रुपाने जाहिर लिलावाने विक्री तीनही दिवस करण्यात येईल . |
| ११ | देणगी काऊंटर | उत्सवाचे मुख्य दिवशी मंदिर रात्रभर उघडे असल्याने देणगी काऊटर्स तीन शिफ्टमध्ये ठेवण्यात येतील. |
| १२ | जादा कंत्राटी कर्मचारी | उत्सवाचे पूर्व तयारी करणेकामी व उत्सव पार पाडणेकरीता लागणा-या जादा कर्मचारी वर्ग आवश्यकतेनुसार ज्या त्या खात्यास नेमण्यात येईल. याकामी कामगार अधिकारी विविध खात्याकडून आलेल्या मागणीची छाननी करुन योग्य ते आदेश पारीत करतील. |
| १३ | भक्तांची प्रासंगिक निवास व्यवस्था | संस्थानचे साईआश्रम नं. २ मध्ये पालखी पदयात्रींसाठी व साईआश्रम १ , द्वारावती , भक्तनिवासस्थान, इ. इमारती मधून पालखी पदयात्रींसाठी व भक्तांची निवास व्यवस्था करण्यात येईल. उत्सवात समाधी मंदिर परिसर व इतर ठिकाणी तसेच आवश्यकतेनुसार मंडप/शामियाने व कलाकारांसाठी स्टेज इ. व मंडपही टाकावयाचे आहेत. |
| १४ | रुग्णालय व्यवस्था | संस्थानमार्फत दोन ठिकाणी चोवीस तास प्रथमोपचार केंद्र सुरु करण्यात येतील.तसेच सुसज्ज अशी रुग्णवाहिका मंदिर परिसरात ठेवण्यात येईल. |

| | | |
|---|---|---|
| १५ | पालखी व्यवस्था | श्री पुण्यतीथी उत्सवात ब-याच ठिकाणाहून पालख्या येत असतात. उत्सवात येणा-या पालख्या ठेवण्याची व्यवस्था साईआश्रम २ मध्ये करण्यात येईल. येणा-या पालख्यांचा तक्ता अलहिदा सादर केला जाईल. दोन-तीन वर्षापासून पालखीधारकांतील पदयात्रींना संस्थानमार्फत शिर्डी येथे आलेवर एकवेळचे भोजन प्रसाद म्हणून देण्यात येत आहे. त्यानुसार यावर्षीही एकवेळचे भोजन प्रसाद म्हणून देण्यात येईल. |
| १६ | पाणीपुरवठा | पाटबंधारे खात्यास उत्सवकाळात कॅनॉल चालू ठेवणे बाबत विनंती करण्यात येईल. नियमित पाणीपुरवठा राहिल, याची व्यवस्था करण्यात येईल. |
| १७ | कार्यक्रमाची सांगता | गोपाळ काल्याचे कीर्तनाने उत्सवाची सांगता होईल. काल्याचे कीर्तन निमंत्रित कीर्तनकार करतील. |
| १८ | खर्चाचे अंदाज पत्रक | श्री साईबाबा पुण्यतीथी उत्सव -२०१२ मध्ये अंदाजपत्रकीय रु.७३,४००००/- (अक्षरी रु. त्र्याहत्तर लाख चाळीस हजारमात्र) इतक्या रकमेस मंजूरी देण्यात आली होती. प्रत्यक्ष खर्च रुपये ४९,३७,७९३/- (अक्षरी रु. एकोण पन्नास लाख सदवतीस हजार सातशे त्र्यान्नव मात्र) इतका खर्च झाला होता.<br>श्री साईबाबा पुण्यतीथी उत्सव २०१३ करीता अंदाजपत्रकीय रक्कम रुपये ५५,२०,०००/- मंजूरीसाठी सादर केलेले आहे.<br>अंदाजपत्रकाचा तपशिलवार माहिती तक्ता सोबत माहिती करीता जोडला आहे. |

तरी श्री साईबाबा पुण्यतीथी उत्सव -२०१३ साजरा करणेस, त्यासाठी वरीलप्रमाणे कार्यवाही करणेस व त्यासाठी येणा-या अंदाजे रक्कम रुपये ५५,२०,०००/- (अक्षरी रु.पंचावन्न लाख वीस हजार मात्र) चे खर्चास मान्यता असावी.

अवलोकनार्थ व निर्णयार्थ सविनय सादर,

**निर्णय क्र.६८७ यावर सविस्तर चर्चा होऊन, उपरोक्त प्रस्तावास मान्यता देण्यात आली.**

(कार्यवाही- सामान्य प्रशासन/ वशी-०५)

---

**विषय नं.८० श्री साईबाबा संस्थान कर्मचाऱ्यांच्या पाल्यांचा शैक्षणिक शुल्काचा परतावा.**

**प्रस्ताव-** दरवर्षी संस्थान कर्मचाऱ्यांना त्यांच्या पाल्यांचा शैक्षणिक शुल्काचा परतावा देण्यात येतो. पुर्वी मा.कोर्ट रिसीव्हर यांचे मान्यतेने व तद्नंतर मा.व्यवस्थापन मंडळाचे मान्यतेने आज तागायत शैक्षणिक शुल्काचा परतावा देण्यात आलेला आहे.

मा.व्यवस्थापन मंडळाचे दि.२१.०४.१९९६ चे सभेतील निर्णय क्र.८९ अन्वये, शैक्षणिक शुल्काच्या परताव्याबाबत नियमावली वजा मार्गदर्शक तत्वे ठरविण्यात आलेले आहेत. त्यानुसार शासकीय/ शासन अनुदानित अभ्यासक्रमासाठी आकारण्यात येणाऱ्या शुल्काच्या मर्यादेपर्यंत शैक्षणिक शुल्क रक्कमेचा परतावा अदा केला जातो.

शासन पत्र क्र.सासंवि २००७/२४२/(६०)-का.सोळा, मंत्रालय मुंबई दि.१६/०७/२००९ अन्वये, सदर योजना संस्थानच्या सन १९९६ च्या निर्णयाप्रमाणे संस्थान कर्मचाऱ्यांना लागू आहे, त्याच धर्तीवर ती यापुढेही प्रचलित पध्दतीने चालू राहील. असे निर्देश दिलेले आहे. त्याप्रमाणे कार्यवाही चालु आहे.

मा.त्रिसदस्य समितीचे दि.०८.११.२०१२, रोजीचे सभेतील निर्णय क्र.८६२.अन्वये, सन २०१२-२०१३ चा संस्थान कर्मचाऱ्यांचे पाल्यांचे शैक्षणिक शुल्क परताव्यासाठी अपेक्षित खर्च रु. ३१,६५,४३४/- मात्रचे खर्चास मान्यता देण्यात आलेली होती. तपशिल खालील खालीलप्रमाणे.

| तपशिल | सन २०११-२०१२ | सन २०१२-२०१३ | सन २०१३-२०१४ |
|---|---|---|---|
| झालेला खर्च रुपये | ३५,२९,२७८/- | ३६,८३,७३५/- | मंजुर बजेट<br>४५,००,०००/- (रक्कम दिलेली नाही) |

तरी मा.व्यवस्थापन समितीचे निर्णय व शासन मंजुरीस अनुसरुन प्रचलित पध्दतीप्रमाणे सदर योजना यापुढे चालु ठेवण्यास, व त्यासाठी येणाऱ्या खर्चास मान्यता मान्यता असावी.

**निर्णय क्र.६८८ यावर सविस्तर चर्चा होऊन, उपरोक्त प्रस्तावास व येणाऱ्या रु.४५,००,०००/- मात्रचे खर्चास मान्यता देण्यात आली.**

(कार्यवाही- सामान्य प्रशासन/ वशी-०६)

---

**विषय नं.८१ परिविक्षाधीन कालावधीसाठी लिपीक-टंकलेखक, कुपन विक्रेता, तारतंत्री व इतर तांत्रिक पदावर पदस्थापना केलेल्या कर्मचाऱ्यांचा परिविक्षाधीन कालावधी संपुष्ठात आल्याने त्यांना संस्थान सेवेत कायम करणेबाबत.**

**निर्णय क्र.६८९ सदरहू विषयावरील चर्चा पुढे ढकलणेत आली.** (कार्यवाही- अधिक्षक, सामान्य प्रशासन)

---

**विषय नं.८२ दहशतवाढ विरोधी पथक, नाशिक यांचा निःशुल्क रुम मिळणेबाबतच्या अर्जाबाबत.**

**प्रस्ताव-** पोलीस निरिक्षक, दहशतवाद विरोधी पथक, नाशिक, यांनी दि.१४/०६/२०१३ चे पत्राने खालीलप्रमाणे विनंती केलेली आहे.

" दहशतवाद विरोधी पथक, मुंबई अंतर्गत नाशिक युनिट मध्ये शिर्डी साई संस्थान आहे. अतिरेकी संघटनांनी प्रमुख शहरांसह महत्वाचे देवस्थान देखील लक्ष्य केलेले आहे. शिर्डी देवस्थान हे अतिशय महत्वाचे व अतिसंवेदनशिल ठिकाण आहे त्यादृष्टीने दहशतवाद विरोधी पथकातील मुंबई व नाशिक येथील अधिकारी व कर्मचारी यांना शासकीय कामानिमित्त नेहमी तसेच देवस्थानचा भविष्यातील संभाव्य अतिरेकी हल्ल्याचा धोका विचारात घेता दहशतवाद विरोधी पथकातील अधिकारी व कर्मचारी यांचे शिर्डी येथील इतरत्र वास्तव्यातुन गोपनियतेस बाधा येत असल्याने वरील सर्व बाबींचा सर्वांगीण विचार करुन शिर्डी साईबाबा संस्थानकडील कायमस्वरुपी एक रुम निशुल्क मिळणेस विनंती आहे."

मा.व्यवस्थापन समितीचे दि.०७/०७/२००८ चे सभेतील निर्णयानुसार पोलीस इन्स्पेक्टर, शिर्डी, मुख्याधिकारी, नगरपंचायत,शिर्डी, तहसिलदार, राहाता, उपविभागीय पोलीस अधिकारी, शिर्डी यांना शासनाकडून मिळत असलेला प्रतिमहा घरभाडे भत्ता तसेच नियमाप्रमाणे होणारा विद्युत आकार संस्थानकडे जमा करुन घेण्याच्या अटीवर निवासस्थाने देण्यात आलेली आहेत. तसेच मा.व्यवस्थापन समितीचे निर्णयानुसार बॉम्ब शोधक व नाशक पथक, शिर्डी, राज्य गुप्तवार्ता विभाग, शिर्डी व ट्रॉफिक पोलीस, शिर्डी यांचे कार्यालयासाठी निवासस्थाने देण्यात आलेली आहेत.

वरिलप्रमाणे दहशतवाद विरोधी पथक, नाशिक यांना त्यांचे विनंती अर्जानुसार कार्यालयासाठी निःशुल्क एक रुम देणेबाबतच्या प्रस्तावावर निर्णय होणेस विनंती.

**निर्णय क्र.६९० यावर सविस्तर चर्चा होऊन, दहशतवाढ विरोधी पथक, नाशिक यांचे कार्यालयासाठी निःशुल्क रुमदेणेसाठी विधी व न्याय विभाग, मंत्रालय, मुंबई यांची मान्यता घेण्यात यावी, असे ठरले.**

(कार्यवाही- अधिक्षक, सामान्य प्रशासन)

---

**विषय नं.८३ आयटी मॅनेजर पदनाम व वेतनश्रेणी मिळणेबाबत.**

**विषय नं.८४ श्री.जयंत विश्वनाथ वझे, वरिष्ठ लेखापाल यांचा लेखाधिकारी पदावर पदोन्नती मिळणेबाबतचा अर्ज.**

**विषय नं.८५ सुधारित सेवांतर्गत आश्वासित प्रगती योजना पहिला लाभ लागू करणेबाबत.**

**विषय नं.८६ सुधारित सेवांतर्गत आश्वासित प्रगती योजना दुसरा लाभ लागू करणेकामी गोपनीय अभिलेख्याच्या सरासरी प्रतवारीमध्ये शिथीलता देणेबाबत.**

**निर्णय क्र.६९१ विषय नं.८३ ते ८६ वरील चर्चा पुढे ढकलणेत आली.**

---

**विषय नं.८७ मयत अनुकंपा तत्वावर कंत्राटदारामार्फत कंत्राटी पध्दतीने संस्थानमध्ये नोकरी मिळणेबाबत श्री. आनंद शरद ताकवाले यांचा अर्ज.**

**प्रस्ताव-** श्री आनंद शरद ताकवाले, रा.शिर्डी यांनी त्यांचे वडील कै.शरद दौलत ताकवाले यांचे संस्थान सेवेत असतांना निधन झालेने अनुकंपा तत्वावर कंत्राटदारामार्फत कंत्राटी पध्दतीने नोकरी मिळणेबाबत दि.२०/०६/२०१३ रोजी अर्ज सादर केलेला आहे. अर्जाचा सुधारीत विहीत नमुना तयार करण्यात आलेला आहे त्यास अनुसरुन अर्जदाराने अर्ज सादर केला आहे. सदर अर्जासोबत त्यांनी खालीलप्रमाणे कागदपत्रे सादर केलेली आहेत.

१) दिवंगत शरद दौलत ताकवाले यांचे मृत्यू प्रमाणपत्र

२) श्री आनंद शरद ताकवाले यांनी प्रवरा एज्युकेशन सोसायटीचे आर्ट, सायन्स, कॉमर्स कॉलेज, राहाता यांचेकडील बोनाफाईड प्रमाणपत्रानुसार नुसार त्यांची जन्मतारीख २८/०२/१९९२अशी असल्याने त्यांचे आजमितीस वय २१ वर्ष ०५ म.आहे.

३) श्री आनंद शरद ताकवाले यांनी इ.१२ वी चे बोनाफाईड प्रमाणपत्र.

४) श्री आनंद ताकवाले यास कामावर घेणेबाबत श्रीमती इंदूबाई ताकवाले व श्री राहूल ताकवाले यांनी सादर केलेले

मा.तहसिलदार, राहाता यांचेकडील दि.१७/०६/२०१३ चे प्रतिज्ञापत्र

शरद दौलत ताकवाले हे संस्थानचे संरक्षण विभागाकडे वर्ग ४ कर्मचारी या पदावर सेवेत होते. त्यांचे दि.३०/०५/२०१३ रोजी निधन झालेले असून त्यांच्या झालेल्या सेवेबाबतची माहिती खालील प्रमाणे

| | |
|---|---|
| ०१) दिवंगत कर्मचाऱ्यांचे नांव | :- शरद दौलत ताकवाले |
| ०२) मृत्युचे वेळी हुद्या व विभाग | :- वर्ग ४ कर्मचारी, संरक्षण |
| ०३) संस्थानमधील सेवेचा कालावधी | :- दि. १०/०६/१९९३ ते दि.२९/०५/२०१३ एकूण सेवा २० वर्षे |
| ०४) मृत्यु दिनांक | :- ३०/०५/२०१३ |

अनुकंपा तत्वावर नेमणूक देतांना मयत कर्मचाऱ्याचे पत्नीचे वय ४५ वर्ष असल्यास त्यांना प्राधान्याने नोकरीवर घेतले जाते. या करीता कर्मचाऱ्याने त्याच्या हयातीत करुन दिलेले विहीत नमून्यातील नॉमिनेशन (Form 'F' See Sub - Rule (१) of Rule ६ - " Nomination made herein invalidates my previous nomination.") फॉर्ममध्ये संबंधीत व्यक्तीचे नांव असलेबाबत व त्याबाबत खातरजमा करुन अशा नेमणूका दिल्या जातात.

दिवंगत ताकवाले हे हयात असतांना त्यांची ग्रॅच्यूएटी ॲक्ट १९७२ चे नियम नं.६ (१) नुसारचे नॉमीनेशन पत्रात श्रीमती इंदूबाई शरद ताकवाले (दिवंगत पवार यांनी पत्नी) यांची (Nominees) वारसदार म्हणून नेमणूक केलेली आहे.

श्रीमती इंदूबाई शरद ताकवाले (वय-४८) व श्री राहुल शरद ताकवाले (वय-१८) यांनी माझा मुलगा / भाऊ श्री आनंद शरद ताकवाले यांस वडीलांचे जागी अनुकंपा तत्वावर नोकरी घेणेकामी आमची कोणतीही हरकत राहणार नाही असे आशयाचे मा.तहसिलदार, राहाता यांचेकडील दि.१७/०६/२०१३ चे प्रतिज्ञापत्र सादर केले आहे.

महाराष्ट्र शासन निर्णय क्र.अकंपा-१०००-प्र.क्र.२०/२०००,आठ मंत्रालय मुंबई ३२ दि.२८/०३/२००१ व महाराष्ट्र शासन निर्णय क्र.अकंपा-१००४-प्र.क्र.५१/२००४,आठ मंत्रालय मुंबई ३२ दि.२२/०८/२००५ सुधारीत शासन निर्णय २ (२) नुसार शासकीय सेवेत असतांना दिवंगत झालेल्या कर्मचाऱ्यांचे एका पात्र नातेवाईकांस अनुकंपा कारणास्तव शासकीय सेवेत घेण्याची तरतूद आहे. त्यास अनुसरुन संस्थान सेवेत असतांना दिवंगत झालेल्या कर्मचाऱ्यांचे एका पात्र नातेवाईकास मानवतेच्या दृष्टीकोणातून यापुर्वी अनुकंपाकारणास्तव संस्थान सेवेत घेण्यात आलेले आहे. त्यानुसार त्यांचा मुलगा नामे श्री आनंद शरद ताकवाले हे उपरोक्त निर्णयानुसार पात्र आहेत. तथापी -

शासन निर्णय क्र.सासंवि-२००९/४३३/(३७/०९) का.सोळा मुंबई-३२ दि.०७/०८/२००९ श्री साईबाबा संस्थान विश्वस्तव्यवस्था,शिर्डीचे कर्मचारी आकृतीबंधास मान्यता मिळाली आहे. त्यात वर्ग ४ च्या कर्मचाऱ्यांची १२३९ स्थायी पदे मंजूर आहेत. सद्य स्थितीनुसार वर्ग ४ चे पदावर १३३५ इतके कर्मचारी भरलेले आहेत. त्यानुसार सध्या वर्ग ४ चे ९४ कर्मचारी अतिरिक्त आहेत.

मा.व्यवस्थापन समितीचे दि.१९/११/२०११ चे सभेतील निर्णय क्र.७६५ खालीलप्रमाणे झालेला आहे.

" सध्या संस्थान आस्थापनेवर वर्ग ४ ची पदे रिक्त नाहीत. त्यामुळे संस्थान सेवेत असतांना मयत झालेल्या कर्मचाऱ्यांचे नातेवाईकांना तूर्त लेबर कॉन्ट्रॅक्टरमार्फत संस्थानमध्ये कामास घेण्यात यावे व त्यांना कॉन्ट्रॅक्टरमार्फत किमान वेतनाप्रमाणे वेतन देण्यात यावे. "

उपरोक्त निर्णयानुसार यापूर्वीच्या अर्जदारांना लेबर कॉन्ट्रॅक्टरमार्फत प्रसादालय विभागाकडे कंत्राटी पध्दतीने कामावर घेण्यात आलेले आहे.

उपरोक्त शासन निर्णय व दिवंगत ताकवाले यांचा मुलगा नामे श्री आनंद शरद ताकवाले यांचा लेखी अर्ज विचारात घेता, दिवंगत ताकवाले यांचे जागेवर त्यांचा मुलगा नामे श्री आनंद शरद ताकवाले यांना लेबर कॉन्ट्रॅक्टरमार्फत कामास घेणेबाबतच्या प्रस्तावावर निर्णय होणेस विनंती.

**निर्णय क्र.६९२** **यावर सविस्तर चर्चा होऊन, शासन निर्णय व दिवंगत शरद दौलत ताकवाले यांचा मुलगा नामे श्री. आनंद शरद ताकवाले यांचा लेखी अर्ज विचारात घेता, दिवंगत शरद ताकवाले यांचे जागेवर त्यांचा मुलगा श्री. आनंद शरद ताकवाले यांना सध्या संस्थानचे लेबर कॉन्ट्रॅक्टरमार्फत कंत्राटी पध्दतीने, किमान वेतन देणेत येवून कामावर घेणेत यावे, असे ठरले.**

(कार्यवाही- अधिक्षक, सामान्य प्रशासन/ कामगार अधिकारी)

---

**विषय नं.८८** **मयत अनुकंपा तत्वावर कंत्राटदारामार्फत कंत्राटी पध्दतीने संस्थानमध्ये नोकरी मिळणेबाबत कु.सरला बाळगीर गोसावी यांचा अर्ज.**

**प्रस्ताव-** कु.सरला बाळगीर गोसावी, रा.जेऊर कुभांरी यांनी त्यांचे वडील कै.बाळगीर शिवगीर गोसावी यांचे संस्थान सेवेत असतांना निधन झालेने अनुकंपा तत्वावर कंत्राटदारामार्फत कंत्राटी पध्दतीने नोकरी मिळणेबाबत दि.०२/०७/२०१३ रोजी अर्ज सादर केलेला आहे. अर्जाचा सुधारीत विहीत नमुना तयार करण्यात आलेला आहे त्यास अनुसरुन अर्जदाराने अर्ज सादर केला आहे. सदर अर्जासोबत त्यांनी खालीलप्रमाणे कागदपत्रे सादर केलेली आहेत.

१) दिवंगत बाळगीर शिवगीर गोसावी यांचे मृत्यू प्रमाणपत्र

२) कु.सरला बाळगीर गोसावी यांनी ओम गुरुदेव माध्यमिक व उच्च माध्यमिक गुरुकूल, कोकमठाण, ता. कोपरगांव यांचेकडील शाळा सोडल्याच्या प्रमाणपत्रानुसार त्यांची जन्मतारीख १३/०३/१९९५अशी असल्याने त्यांचे आजमितीस वय १८ वर्ष ०४ म.आहे.

३) कु.सरला बाळगीर गोसावी यांचा इ.१२ वी पास असल्याचा शाळा सोडल्याचे प्रमाणपत्र

४) श्रीमती विजया बाळगीर गोसावी यांची शाळा सोडल्याच्या दाखल्यावर ०१/०६/१९६३ अशी जन्मतारीख असलेने त्यांचे आजमितीस वय ५० वर्षे ०२ महिने असे आहे.

बाळगीर शिवगीर गोसावी हे संस्थानचे प्रसादालय विभागाकडे वर्ग ४ कर्मचारी या पदावर सेवेत होते. त्यांचे दि.०२/०५/२०१३ रोजी निधन झालेले असून त्यांच्या झालेल्या सेवेबाबतची माहिती खालील प्रमाणे-

०१) दिवंगत कर्मचाऱ्यांचे नांव :- बाळगीर शिवगीर गोसावी
०२) मृत्युचे वेळी हुद्या व विभाग :- वर्ग ४ कर्मचारी, प्रसादालय
०३) संस्थानमधील सेवेचा कालावधी :- दि. ०४/१२/२००६ ते दि.०१/०५/२०१३ एकूण सेवा ०५ वर्षे
०४) मृत्यु दिनांक :- ०२/०५/२०१३

अनुकंपा तत्वावर नेमणूक देतांना मयत कर्मचाऱ्याचे पत्नीचे वय ४५ वर्ष असल्यास त्यांना प्राधान्याने नोकरीवर घेतले जाते. या करीता कर्मचाऱ्याने त्याच्या हयातीत करुन दिलेले विहीत नमून्यातील नॉमिनेशन (Form 'F' See Sub - Rule (१) of Rule ६ - " Nomination made herein invalidates my previous nomination.") फॉर्ममध्ये संबंधीत व्यक्तीचे नांव असलेबाबत व त्याबाबत खातरजमा करुन अशा नेमणूका दिल्या जातात.

दिवंगत गोसावी हे हयात असतांना त्यांची ग्रॅच्यूएटी ॲक्ट १९७२ चे नियम नं.६ (१) नुसारचे नॉमीनेशन पत्रात श्रीमती विजया बाळगीर गोसावी (दिवंगत गोसावी यांनी पत्नी) यांची (Nominees) वारसदार म्हणून नेमणूक केलेली आहे.

श्रीमती विजया बाळगीर गोसावी यांचे आजमितीस वय ५० वर्षे असल्याने त्या शासन निर्णयानुसार अनुकंपा नोकरीस पात्र ठरत नाही.

महाराष्ट्र शासन निर्णय क्र.अकंपा-१०००-प्र.क्र.२०/२०००,आठ मंत्रालय मुंबई ३२ दि.२८/०३/२००१ व महाराष्ट्र शासन निर्णय क्र.अकंपा-१००४-प्र.क्र.५१/२००४,आठ मंत्रालय मुंबई ३२ दि.२२/०८/२००५ सुधारीत शासन निर्णय २ (२) नुसार शासकीय सेवेत असतांना दिवंगत झालेल्या कर्मचाऱ्यांचे एका पात्र नातेवाईकांस अनुकंपा कारणास्तव शासकीय सेवेत घेण्याची तरतूद आहे. त्यास अनुसरुन संस्थान सेवेत असतांना दिवंगत झालेल्या कर्मचाऱ्यांचे एका पात्र नातेवाईकास मानवतेच्या दृष्टीकोणातून यापुर्वी अनुकंपाकारणास्तव संस्थान सेवेत घेण्यात आलेले आहे. त्यानुसार त्यांची मुलगी नामे कु.सरला बाळगीर गोसावी हया उपरोक्त निर्णयानुसार पात्र आहेत. तथापी

शासन निर्णय क्र.सासंवि-२००९/४३३/(३७/०९) का.सोळा मुंबई-३२ दि.०७/०८/२००९ श्री साईबाबा संस्थान विश्वस्तव्यवस्था,शिर्डीचे कर्मचारी आकृतीबंधास मान्यता मिळाली आहे. त्यात वर्ग ४ च्या कर्मचाऱ्यांची १२३९ स्थायी पदे मंजूर आहेत. सद्य स्थितीनुसार वर्ग ४ चे पदावर १३३५ इतके कर्मचारी भरलेले आहेत. त्यानुसार सध्या वर्ग ४ चे ९४ कर्मचारी अतिरिक्त आहेत.

मा.व्यवस्थापन समितीचे दि.१९/११/२०११ चे सभेतील निर्णय क्र.७६५ खालीलप्रमाणे झालेला आहे.

"सध्या संस्थान आस्थापनेवर वर्ग ४ ची पदे रिक्त नाहीत. त्यामुळे संस्थान सेवेत असतांना मयत झालेल्या कर्मचाऱ्यांचे नातेवाईकांना तूर्त लेबर कॉन्ट्रॅक्टरमार्फत संस्थानमध्ये कामास घेण्यात यावे व त्यांना कॉन्ट्रॅक्टरमार्फत किमान वेतनाप्रमाणे वेतन देण्यात यावे."

उपरोक्त निर्णयानुसार यापूर्वीच्या अर्जदारांना लेबर कॉन्ट्रॅक्टरमार्फत प्रसादालय विभागाकडे कंत्राटी पध्दतीने कामावर घेण्यात आलेले आहे.

उपरोक्त शासन निर्णय व दिवंगत गोसावी यांची मुलगी नामे कु.सरला बाळगीर गोसावी यांचा लेखी अर्ज विचारात घेता, दिवंगत गोसावी यांचे जागेवर त्यांची मुलगी नामे कु.सरला बाळगीर गोसावी यांना लेबर कॉन्ट्रॅक्टरमार्फत अकुशल कामगार म्हणून प्रसादालय विभागाकडे कामास घेणेबाबतच्या प्रस्तावावर निर्णय होणेस विनंती.

**निर्णय क्र.६९३** **यावर सविस्तर चर्चा होऊन, शासन निर्णय व दिवंगत बाळगीर शिवगीर गोसावी यांची मुलगी नामे कु.सरला बाळगीर गोसावी यांचा लेखी अर्ज विचारात घेता, दिवंगत बाळगीर शिवगीर गोसावी यांचे जागेवर त्यांची मुलगी कु.सरला बाळगीर गोसावी यांना सध्या संस्थानचे लेबर कॉन्ट्रॅक्टरमार्फत कंत्राटी पध्दतीने, किमान वेतन देणेत येवून कामावर घेणेत यावे, असे ठरले.**

(कार्यवाही- अधिक्षक, सामान्य प्रशासन/ कामगार अधिकारी)

---

**विषय नं.८९** **गाय दुध दरवाढ देणेबाबत.**

**प्रस्ताव-** संस्थानचे कॅन्टीन विभागाकरिता जा.एसएसएस-वशी-खरेदी-कॅन्टीन-३७४० दि. १९.११.२०१२ नुसार सन २०१२-१३ साठी (नोव्हेंबर२०१२ ते मार्च २०१३ अखेर ) प्रति लिटर रु.२२.९० दराने दररोज अंदाजे १४०० लिटर्स गाय दुध होमीजीनाईज्ड व पाश्चराईज्ड पुरवठा करणेकामी श्री स्वामी समर्थ डिस्ट्रीब्युटर्स, तिसगांव यांना वार्षिक पुरवठा आदेश देण्यात आलेले होते.

श्री स्वामी समर्थ डिस्ट्रीब्युटर्स, तिसगांव यांनी दि.१७.०६.२०१३ चे पत्राने "महाराष्ट्र शासनाने गायीचे दूधात दि. २५.०५.२०१३ पासून रु.२/- दरवाढ केलेली आहे. त्यानुसार दि.२५.०५.२०१३ पासून रु.२/- दरवाढ देणेबाबत." विनंती केलेली आहे.

करारनाम्यातील अट क्र. ५ मध्ये "महाराष्ट्र शासनाने दुध खरेदी दरात दरवाढ केल्यास व संबंधीतांनी शासन निर्णयाची प्रत सादर केल्यानंतर मा.व्यवस्थापन समिती त्याबाबत निर्णय घेईल." असे नमुद केलेले आहे.

महाराष्ट्र शासन कृषी, पशुसंवर्धन, दूग्धव्यवसाय विकास व मत्सव्यवसाय विभाग मंत्रालय, मुंबई-३२ यांचेकडील शासन निर्णय क्र. एमएलके/२०१३/प्र.क्र.४५/प्रदुम-८, दिनांक २२ मे, २०१३ चे आदेशाने शासकीय दूध योजनेमार्फत बृहन्मुंबई व ग्रामिण योजनांमार्फत होणा-या दूध विक्रीसाठी गाय दूध आणि टोण्ट दूध विक्री दरात प्रति लिटर रु.२/- मात्रने वाढ होत असल्याची शासन निर्णयाची प्रत दिली आहे.

तरी उपरोक्त पुरवठाधारकांना पुरवठा आदेशातील प्रति लिटर रु.२२.९० पैसे दरात शासन निर्णयानुसार प्रति लिटर दर रु.२/- वाढ देण्यात येऊन दि.२५.०५.२०१३ पासून गायीचे दूधाचा दर प्रति लिटर रु.२४.९० (अक्षरी रू.चोवीस पैसे नव्वद मात्र) मात्र दि.२५.०६.२०१३ पासून देणेबाबत व यापुढे शासन निर्णयाप्रमाणे गाय दूध दरात वाढ झाल्यास त्या दराप्रमाणे वेळोवेळी दरवाढ ससंबंधीत पुरवठाधारक यांना देणेकामी निर्णयार्थ सादर.

**निर्णय क्र.६९४** **यावर सविस्तर चर्चा होऊन, श्री स्वामी समर्थ डिस्ट्रीब्युटर्स, तिसगांव यांची गाय दूध दरात वाढ मिळणेबाबतची विनंती अमान्य करणेत आली.** (कार्यवाही- अधिक्षक, खरेदी विभाग)

---

**विषय नं.९०** **चहा पावडर व कॉफी पुरवठयाबाबत.**

**प्रस्ताव-** **अधिनियम २००४ मधील तरतुद :-** २१ (१) (घ) भक्तांना जेवण पुरविणे व अन्नछत्र चालविणे.

**व्यवस्थापन समितीचा ठराव क्र.:-** मा.व्यवस्थापन समितीचे दि.२.६.१३ चे सभेतील निर्णय क्र.४३२ (११)

**प्रस्ताविक :-** सन २०१२ - १३ (नोव्हें.-१२ ते मार्च-१३) साठी प्रसादालय, कॅन्टीन व मंदिर विभागांसाठी आवश्यक किराणा माल खरेदी मा.उच्च न्यायालयाचे आदेशानुसार ई-निविदा प्रक्रियेद्वारे करण्यात आलेली आहे. सदर ई-निविदेमध्ये चहा पावडर व कॉफीकरिता मे.शैला एंटरप्रायझेस, नाशिक या एकाच निविदाधारकांनी निविदा भरलेली होती. मात्र त्यांची निविदा Technical Bid मध्ये अपात्र ठरल्याने चहा पावडर व कॉफीचे खरेदीबाबत दुसऱ्या एकाही पुरवठाधारकाचे दर आलेले नव्हते.

त्यामुळे मा.व्यवस्थापन समितीचे दि.०२.०६.२०१३ चे सभेतील निर्णय क्र.४३३ (११) अन्वये "चहा पावडर व कॉफी खरेदीकामी मंजुर निविदांपैकी एकाही निविदाधारकाने दर न दिल्याने सदर खरेदीकामी मागील पुरवठाधारक मे.शैला एंटरप्रायझेस, नाशिक यांचेकडून मागील मंजुर दराने तुर्त तीन महिन्यांसाठी चहा पावडर व कॉफी खरेदी करण्यात यावे. त्यानुसार मे.शैला एंटरप्रायझेस, नाशिक यांना दुरध्वनीद्वारे मागील मंजुर दराने पुरवठा करणेस त्यार आहेत अगर कसे, याबाबत विचारणा केली असता, त्यांनी मागील मंजुर दराने पुढील दोन महिन्यांसाठी चहा पावडर व कॉफी पुरविण्याची तयारी दर्शविलेली असून तसे त्यांचे लेखी पत्रही घेण्यात यावे," असा निर्णय झालेला होता.

त्यानुसार मे.शैला एंटरप्रायझेस, नाशिक यांनी त्यांचेकडील दि.३ जुन, २०१३ चे पत्रान्वये दोन महिन्यांसाठी मागील मंजुर दराने चहा (प्रति क्विंटल रु.१८,९००/-) व कॉफी (प्रति क्विंटल रु.२८,५००/-) पुरविणेबाबत तयारी दर्शविलेली आहे. त्यानुसार त्यांनी माहे जुन - व जूलै-१३ मध्ये मागील मंजुर दराने मालाचा पुरवठा केलेला आहे.

मात्र दि.१६.०८.२०१३ रोजीचे ई-मेल द्वारे त्यांनी मागील मंजुर दर प्रति क्विंटल रु.१८,९००/- मात्र प्रमाणे ब्रुक बॉण्ड रेड लेबल चहा पावडर ऐवजी ब्रुक बॉण्ड ताजा स्पेशल हॉटेल ब्लेण्ड चहा पावडरचा पुरवठा करु असे कळविलेले आहे. तसेच त्यांनी ब्रुक बॉण्ड रेड लेबल चहा पावडराचा पुरवठा करण्याचे बंद केलेले आहे. पुढील कालावधीसाठी चहा पावडर व कॉफी बरोबरच गावरान तुप, पॅकेज्ड ड्रिकींग वॉटर खरेदीकामी ई-निविदा काढावयाचे काम बाकी आहे. गावरान तुप व पॅकेज्ड ड्रिकींग वॉटर खरेदीकामी मा.उच्च न्यायालयाची मान्यता मिळालेनंतर उपरोक्त सर्व साहित्यासाठी ई-निविदा काढता येईल.

तरी दरम्यानचे काळात श्री साईभक्तांना चहाची सेवा देणेकामी चहा पावडर नसल्यामुळे अडचण निर्माण होऊ नये याकरिता मा.कार्यकारी अधिकारी सो. यांचे सुचनेनुसार दि.१७.०८.२०१३ रोजी चहा पावडरचे स्थानिक पुरवठाधारक तसेच वार्षिक किराणा माल खरेदीतील पुरवठाधारकांना दुरध्वनीद्वारे दोन महिन्यांसाठी आवश्यक २० क्विंटल लिफ चहा पावडर पुरविणेकामी ई-मेलद्वारे दर मागणी करण्यात आले.

त्यानुसार खालील पुरवठाधारकांनी लिफ चहा पावडर पुरविणेबाबत ई-मेलद्वारे दर दिलेले आहेत.

| अ.नं. | पुरवठाधारकाचे नांव | कंपनीचे/ब्रॅण्डचे नांव | दर प्रति किलो व्हॅटसह |
|---|---|---|---|
| ०१. | मे.आर.मुथ्था राईस हाऊस, औरंगाबाद | टाटा अग्नी | रु.२२५/- |
| ०२. | मे.शिवसाई केटरर्स अॅण्ड लेबर कॉन्ट्रॅक्टर, शिर्डी | टाटा अग्नी | **रु.१८५/-** |
| ०३. | मे.डी.जे.अॅण्ड सन्स, पुणे | टाटा अग्नी | रु.२०७/- |
| | | ब्रुक बॉण्ड रेड लेबल | रु.२५१/- |
| ०४. | मे.शैला एटरप्रायझेस, नाशिक | ब्रुक बॉण्ड रेड लेबल | रु.२५५/- |
| | | ब्रुक बॉण्ड A१ | **रु.१८५/-** |
| | | ब्रुक बॉण्ड BB | रु.२००/- |
| | | ब्रुक बॉण्ड ताजा स्पे. | रु.२१६/- |
| ०५. | मे.रामनाथ जगन्नाथ अँड कंपनी,नाशिक | टाटा अग्नी | रु.२०५/- |
| ०६. | मे.जयहिंद किराणा स्टोअर्स, नाशिक रोड | ब्रुक बॉण्ड रेड लेबल | रु.३५५/- |
| | | टाटा प्रिमियम | रु.३५५/- |
| | | टाटा अग्नी | रु.२१०/- |
| ०७. | कुणाल टी सेंटर, शिर्डी | **सपट सह्याद्री डस्ट** | **रु.१८५/-** |

उपरोक्त तुलनात्मक तक्ता पाहाता लिफ चहा पावडर करिता मे.शिवसाई केटरर्स अॅण्ड लेबर कॉन्ट्रॅक्टर, शिर्डी यांचे टाटा अग्नी कंपनीचा व मे.शैला एंटरप्रायझेस, नाशिक यांचे ब्रुक बॉण्ड A१ कंपनीचा व मे.कुणाल टी सेंटर, शिर्डी यांचे सपट सह्याद्री डस्ट चहा पावडरचा दर प्रति किलो रु.१८५/- व्हॅटसह (प्रति क्विंटल रु.१८,५००/-) मात्र न्युनतम आहेत. मात्र मे.कुणाल टी सेंटर, शिर्डी यांनी लिफ चहा पावडर ऐवजी डस्ट चहा पावडरचे दर दिलेले आहेत, त्यामुळे त्यांचे दरांचा विचार करता येणार नाही.

प्रति क्विंटल रु.१८,५००/- मात्र या न्युनतम दराने दोन महिन्यासाठी आवश्यक २० क्विंटल चहा पावडर खरेदी करणेस अंदाजे ३,७०,०००/- मात्र खर्च येईल. सदरचा खर्च सन २०१३-१४ चे वार्षिक किराणा माल खरेदीचे अंदाजपत्रकातून करता येईल.

**मागणी :-** तरी चहा पावडर खरेदीचे निविदेची कार्यवाही पुर्ण होईपर्यंत तातडीची आवश्यकता म्हणून मे.शिवसाई केटरर्स अॅण्ड लेबर कॉन्ट्रॅक्टर, शिर्डी यांचेकडून टाटा अग्नी व मे.शैला एंटरप्रायझेस, नाशिक यांचेकडून ब्रुक बॉण्ड A१ लिफ चहा पावडर प्रति क्विंटल रु.१८,५००/- व्हॅटसह या दराने प्रत्येकी १० क्विंटल खरेदी करणेस व त्याकामी येणारे रक्कम रु.३,७०,०००/- मात्रचे खर्चास व सदरचा खर्च सन २०१३-१४ चे वार्षिक किराणा माल खरेदीचे अंदाजपत्रकातून करणेस मान्यता मिळणेस विनंती.

**निर्णय क्र.६९५ यावर सविस्तर चर्चा होऊन, उपरोक्त प्रस्तावास व येणाऱ्या खर्चास मान्यता देण्यात आली.**

(कार्यवाही- अधिक्षक, खरेदी विभाग)

---

**विषय नं.९१ मे.जयहिंद किराणा स्टोअर्स, नाशिक रोड यांची सुरक्षा अनामत रक्कम कमी करणेबाबत.**

**निर्णय क्र.६९६ सदरहू विषयावरील चर्चा पुढे ढकलणेत आली.** (कार्यवाही- अधिक्षक, खरेदी विभाग)

---

**पुरवणी**

**विषय नं.०१ आयकर कायद्यातील तरतूदींन्वये सन २०१२ -२०१३ या आर्थिक वर्षातील अखर्चीत उत्पन्नाच्या विनियोगाबाबत..**

**प्रस्ताव-** श्री साईबाबा संस्थान विश्वस्तव्यवस्था, शिर्डी यास सर्व माध्यमांव्दारे मिळणारे उत्पन्न हे आयकर कायदा १९६१ चे कलम १०(२३)(सी)(v) अन्वये संपूर्ण करमुक्त आहे. या कलमांतर्गत तरतूदींमध्ये सन २००२ मध्ये सुधारणा झालेल्या असून, सुधारित तरतूद पुढीलप्रमाणे आहे : -

"Provided also that the fund of trust or institution [or any university or other educational institution or any hospital or other medical institution] referred to in sub-clause (iv) or sub-clause (v) [ or sub-clause (vi) or sub-clause (VIA) ]

a) applied its income, or accumulates it for application, wholly and exclusively to the objects for which it is established and in a case where more than fifteen percent of its income is accumulated on or after the 1st day of April-2002, the period of the accumulation of the amount exceeding fifteen percent of its income shall in no case exceed five years."

उपरोक्त सुधारीत तरतुदीनुसार एका आर्थिक वर्षात मिळालेल्या एकूण उत्पन्नापैकी ८५ % उत्पन्न हे त्याच आर्थिक वर्षात खर्च करणे बंधनकारक आहे. तथापि ते शक्य न झाल्यास या ८५ % उत्पन्नापैकी अखर्चित राहिलेली रक्कम त्यापुढील ५ आर्थिक वर्षामध्ये खर्च करता येईल व दरम्यान या रकमेची आयकर कलम ११ अन्वये विहित पध्दतीने गुंतवणूक करावी लागेल. पुढील ५ वर्षाच्या मुदतीत ही अखर्चित रक्कम पूर्णपणे खर्च न झाल्यास सहाव्या आर्थिक वर्षात ती करपात्र म्हणून हिशोबात धरली जाईल व त्या रकमेवर आयकर कायदयातील तरतूदीनुसार त्या आर्थिक वर्षासाठी लागू असलेल्या महत्तम आकारणी दराने आयकर आकारणी केली जाईल.

संस्थानचे सन २०१२-२०१३ या आर्थिक वर्षाचे आयकर विवरण आयकर कार्यालयाकडे दि.३० सप्टेंबर, २०१३ पर्यंत दाखल करावयाचे आहे. सदर आयकर विवरणासोबत सन २०१२-१३ या आर्थिक वर्षातील अखर्चित उत्पन्नाची रक्कम कशी व कोणत्या उद्दीष्टांसाठी खर्च करण्यात येईल या बाबतचा मा.व्यवस्थापन समितीचा निर्णय सोबत जोडणे बंधनकारक आहे.

सन २०१२-१३ आर्थिक वर्षाच्या अखर्चित उत्पन्नाच्या ५ वर्षाच्या खर्चाचे नियोजनाचा ढोबळ मसुदा खालीलप्रमाणे.

*(Rs. In Crores)*

| Sr.No. | Particulars | Amount |
|---|---|---|
| 1 | To Construct internal roads in Shirdi Nagarpanchayat area for Internal Road Development Project to facilitate Sai Devotees. | 40.00 |
| 2 | To Redevelop Temple Complex to facilitate Saidevotees darshan & queue. | 60.00 |
| 3 | To construct additional buildings for multipurpose services, Staff quarters and provide residential accommodations to medical, technical, educational, professional & other staff of sansthan | 50.00 |
| 4 | To purchase additional & modern machinery, Furniture, Equipments, Instruments, apparatus etc. for educational purposes and other various departments of the Sansthan. | 35.00 |
| 5 | To purchase additional & modern medical machinery, Furniture, Equipments, Instruments, apparatus etc. for Hospitals. | 45.00 |
| 6 | To provide integrated infrastructural facilities to Saidevotees for forthcoming Shri Saibaba Punyatithi Centenary Ceremony - 2018. | 150.00 |
| 7 | Due to increased need of water, new water supply scheme | 120.00 |
| 8 | Sai Garden Project | 25.00 |
| 9 | To Redevelop existing education complex and construction of additional new buildings for education complex. | 50.00 |
| | **TOTAL** | **575.00** |

तरी संस्थानचे सन २०१२-२०१३ या आर्थिक वर्षाचे आयकर विवरणपत्रक आयकर कार्यालयाकडे दि.३० सप्टेंबर, २०१३ पर्यंत दाखल करावयाचे असल्याने आणि त्यासोबत उपरोक्त नमुद अखर्चित उत्पन्नाच्या ५ वर्षांच्या नियोजनाचा ढोबळ मसुदा जोडणे बंधनकारक असल्याने, सदर मसुदा मा. त्रीसदस्सीय समितीचे सभेसमोर मान्यतेसाठी सादर.

**निर्णय क्र.६९७ यावर सविस्तर चर्चा होऊन, खालीलप्रमाणे निर्णय घेण्यात आला.**

श्री साईबाबा संस्थान विश्वस्तव्यवस्था, शिर्डी यास सर्व माध्यमांव्दारे मिळणारे उत्पन्न हे आयकर कायदा १९६१ चे कलम १०(२३)(सी)(v) अन्वये संपूर्ण करमुक्त आहे. या कलमांतर्गत तरतूदींमध्ये सन २००२ मध्ये सुधारणा झालेल्या असून, सुधारित तरतूद पुढीलप्रमाणे आहे : -

"Provided also that the fund of trust or institution [or any university or other educational institution or any hospital or other medical institution] referred to in sub-clause (iv) or sub-clause (v) [or sub-clause (vi) or sub-clause (VIA) ]

a) applied its income, or accumulates it for application, wholly and exclusively to the objects for which it is established and in a case where more than fifteen percent of its income is accumulated on or after the 1st day of April-2002, the period of the accumulation of the amount exceeding fifteen percent of its income shall in no case exceed five years."

उपरोक्त सुधारीत तरतुदीनुसार एका आर्थिक वर्षात मिळालेल्या एकूण उत्पन्नापैकी ८५ % उत्पन्न हे त्याच आर्थिक वर्षात खर्च करणे बंधनकारक आहे. तथापि ते शक्य न झाल्यास या ८५ % उत्पन्नापैकी अखर्चित राहिलेली रक्कम त्यापुढील ५ आर्थिक वर्षामध्ये खर्च करता येईल व दरम्यान या रकमेची आयकर कलम ११ अन्वये विहित पध्दतीने गुंतवणूक करावी लागेल. पुढील ५ वर्षाच्या मुदतीत ही अखर्चित रक्कम पूर्णपणे खर्च न झाल्यास सहाव्या आर्थिक वर्षात ती करपात्र म्हणून हिशोबात धरली जाईल व त्या रकमेवर आयकर कायदयातील तरतूदीनुसार त्या आर्थिक वर्षासाठी लागू असलेल्या महत्तम आकारणी दराने आयकर आकारणी केली जाईल.

संस्थानचे सन २०१२-२०१३ या आर्थिक वर्षाचे आयकर विवरण आयकर कार्यालयाकडे दि.३० सप्टेंबर, २०१३ पर्यंत दाखल करावयाचे आहे. सदर आयकर विवरणासोबत सन २०१२-१३ या आर्थिक

वर्षातील अखर्चित उत्पन्नाची रक्कम कशी व कोणत्या उद्दीष्टांसाठी खर्च करण्यात येईल या बाबतचा मा.व्यवस्थापन समितीचा निर्णय सोबत जोडणे बंधनकारक आहे.

सन २०१२-१३ आर्थिक वर्षाच्या अखर्चित उत्पन्नाच्या ५ वर्षाच्या खर्चाचे नियोजनाचा ढोबळ मसुदा खालीलप्रमाणे-

Shri Saibaba Sansthan Trust is contemplating to take up various project towards the fulfillment of its objects. The execution of these projects would take a period of 4-5 years.

The Trust is likely to generate a surplus for the accounting year ended on 31st March, 2013. Such surplus could be expended for the fulfillment of these projects.

It is therefore, recommended that such surplus be set aside out of the surplus for the year, to be spent on the projects as resolved hereinafter.

An application in this regard be also made to the Income Tax Assessing Officer, to set aside the funds in terms of section 11(2) of the Income Tax Act, 1961.

**RESOLUTION**

" Resolved that such surplus as is available for the year ending 31st March,2013 shall be accumulated or set apart as per requirements of section 11(2) of the Income Tax Act, 1961 and shall be spent on the following objects and activities of the Trust :

*(Rs. In Crores)*

| Sr. No. | Particulars | Amount |
|---|---|---|
| 1 | To Construct internal roads in Shirdi Nagarpanchayat area for Internal Road Development Project to facilitate Sai Devotees. | 40.00 |
| 2 | To Redevelop Temple Complex to facilitate Saidevotees darshan & queue. | 60.00 |
| 3 | To construct additional buildings for multipurpose services, Staff quarters and provide residential accommodations to medical, technical, educational, professional & other staff of sansthan | 50.00 |
| 4 | To purchase additional & modern machinery, Furniture, Equipments, Instruments, apparatus etc. for educational purposes and other various departments of the Sansthan. | 35.00 |
| 5 | To purchase additional & modern medical machinery, Furniture, Equipments, Instruments, apparatus etc. for Hospitals. | 45.00 |
| 6 | To provide integrated infrastructural facilities to Saidevotees for forthcoming Shri Saibaba Punyatithi Centenary Ceremony – 2018. | 150.00 |
| 7 | Due to increased need of water, new water supply scheme | 120.00 |
| 8 | Sai Garden Project | 25.00 |
| 9 | To Redevelop existing education complex and construction of additional new buildings for education complex. | 50.00 |
| | **TOTAL-** | **575.00** |

FURTHER RESOLVED THAT an application be made to the Income Tax Office seeking permission U/s 11(2) of the Income Tax Act' 1961 and a copy of this Resolution be provided along with the application for the purpose of their record ." (कार्यवाही- मुख्य लेखाधिकारी)

---

**पुरवणी**

**विषय नं.०२** **सन २०१२-१३ या अर्थिक वर्षाच्या लेखापरिक्षण अहवालाची नोंद घेवुन लेखापरिक्षीत लेख्यांसह शासनास सादर करणेस मान्यता मिळणेबाबत.**

**प्रस्ताव-** महाराष्ट्र राज्य शासनाने श्री साईबाबा संस्थान विश्वस्तव्यवस्था शिर्डी अधिनियम-२००४ संस्थानसाठी लागु केलेला असुन, त्या अनुषंगाने संस्थानचे कामकाज सुरु आहे.

अधिनियम-२००४ मधील कलम १७(२)(ग) मधील तरतुदीनुसार, विश्वस्तव्यवस्थेच्या हिशोबाची, राज्यशासन निर्देश देईल. अशा व्यक्तीकडून पुढील लगतवर्षातील अशा तारखेपर्यत वार्षिक लेखापरिक्षण करण्याची व्यवस्था करील. तसेच कलम २९ (१) मधील तरतुदीनुसार समिती त्या

विश्वस्तव्यवस्थेची आर्थिक स्थिती व जमा खर्चाचा तपशिल दर्शविणारा, दिनांक ३१ मार्च रोजी संपणाऱ्या प्रत्येक वित्तीय वर्षाचा लेखापरिक्षणाचा अहवाल, तसेच ज्यांना विश्वस्तव्यवस्थेकडून आर्थिक सहाय्य देण्यात आले अशा देणगी स्वीकारणाऱ्या संस्थांची (संपुर्ण पत्त्यासह) तपशिलवार यादी व आर्थिक सहाय्य मागण्यामागील उद्देश व सहाय्याची रक्कम याबाबतची माहिती सोबत जोडलेल्या छाननी समितीचा अहवाल, यांसह वार्षिक अहवाल तयार करवुन घेईल आणि त्या अहवालाची एक प्रत राज्य शासनाला व एक प्रत धर्मादाय आयुक्ताला, त्या वर्षाच्या ३० जुनच्या आत सादर करील, अशी तरतुद आहे.

महाराष्ट्र शासन विधी व न्याय विभाग यांनी, जा.क्र.सां.सं.वि-२०१२/५९७/प्र.क्र.७९/का.१६ दिनांक २८मार्च,२०१३ अन्वये कोचर ॲण्ड असोसिएटस्, चार्टर्ड अकौंटट, मुंबई यांची वैधानिक लेखापरिक्षक म्हणुन नेमणुक केलेली असुन, त्यांचे कडुन वैधानिक लेखापरिक्षण करून घेणे बाबत मान्यता देण्यात आलेली आहे. वैधानिक लेखापरिक्षक यांनी लेखापरिक्षणाचे कामकाज पूर्ण केलेले असुन, त्यांचा अहवाल दि.१६/०९/२०१३ रोजी संस्थानला प्राप्त झाला आहे.

लेखापरिक्षण अहवाल अंतिम होऊन शासनास सादर केल्यानंतर त्यामधील दोष दुरूस्ती बाबतचा अहवाल तयार करण्याची कार्यवाही हाती घेण्यात येईल.

तरी कृपया सदर अहवालाची नोंद घेणेस व लेखापरिक्षीत लेख्यांसह शासनाकडे सादर करणेस त्याच प्रमाणे संस्थानचे आयकर विवरण पत्र आयकर कार्यालयाकडे दाखल करणेकामी, तसेच श्री साईबाबा संस्थान विश्वस्तव्यवस्था, शिर्डी या संस्थेला अधिनियम २००४ कलम २९(१) व (२) अन्वये दरवर्षी संस्थानचा वार्षिक अहवाल (प्रशासकीय व लेखापरिक्षण अहवाल) राज्याच्या विधीमंडळाच्या सभागृहाच्या पटलावर ठेवणे बंधनकारक आहे. यासाठी अहवालाच्या १२०० प्रती छपाई करण्यास व त्यासाठी येणाऱ्या आवश्यक त्या खर्चास मान्यता मिळणेकामी मा.त्रिसदस्सीय समिती सभेपुढे सविनय सादर.

**निर्णय क्र.६९८** **सन २०१२-१३ च्या लेखापरिक्षण अहवालावर चर्चा करणेसाठी आजचे सभेमध्ये संस्थानचे वैधानिक लेखापरिक्षक व अंतर्गत लेखापरिक्षक उपस्थित होते. सदरहू अहवालावर त्यांचेशी समितीने सविस्तर चर्चा केली व सन २०१२-२०१३ या आर्थिक वर्षाच्या लेखापरिक्षण अहवालाची नोंद घेऊन लेखापरिक्षण अहवाल शासनास सादर करणेत यावा, असे ठरले.**

**संस्थानचे आयकर विवरण पत्र, आयकर कार्यालयाकडे दाखल करणेस, संस्थानचे अधिनियमानुसार प्रस्तावात नमुद केलेप्रमाणे सदर अहवालावर पुढील कार्यवाही करणेस तसेच सन २०१२-१३ च्या वार्षिक अहवालाच्या १२०० प्रती छपाई करणेस व त्यासाठी येणाऱ्या सर्वसमावेशक खर्चास मान्यता देण्यात आली.** (कार्यवाही- मुख्यलेखाधिकारी)

---

**यानंतर मा.अध्यक्ष महोदय यांचे परवानगीने आयत्या वेळेच्या विषयांवर चर्चा करणेत आली.**

**आयत्या वेळेचा**
**विषय नं.०१** **रुग्णालयांसाठी वैद्यकिय संचालक, निवासी उपवैद्यकिय संचालक, वैद्यकिय अधिक्षक व इतर वैद्यकिय अधिकाऱ्यांची पदे भरणेबाबत.**

**प्रस्ताव-** रुग्णालयांसाठी वैद्यकिय संचालक, निवासी उपवैद्यकिय संचालक, वैद्यकिय अधिक्षक व इतर वैद्यकिय अधिकाऱ्यांची पदे प्रसिध्द करण्यात आलेल्या जाहिरातीस अनुसरुन भरणेकामी उमेदवारांच्या मुलाखती घेणेबाबत त्रिसदस्यीय समितीचे दि. २६/०२/२०१३ रोजीचे सभेत प्रस्ताव सादर करण्यात आला होता. यावर सविस्तर चर्चा होऊन, निर्णय क्र. २३० नुसार पुढीलप्रमाणे प्रमाणे निर्णय घेण्यात आलेला आहे. प्रस्तावात नमूद केलेली भरावयाची पदे ही हॉस्पीटलच्या आकृतीबंधानुसर रिक्त पदांपैकी (Regular Vacancies) असल्याने ही पदे भरणेकामी मा. मुंबई उच्च न्यायालयाचे औरंगाबाद खंडपीठाची पुर्व मान्यता घेऊन, मान्यतेनंतर सदरची कार्यवाही करणेत यावी.

त्यानंतर संस्थानचे दोन्ही रुग्णालयांसाठी वैद्यकिय संचालक, निवासी उपवैद्यकिय संचालक, वैद्यकिय अधिक्षक यापदांसहीत आणखी आवश्यक वैद्यकिय अधिकारी व इतर कर्मचारी भरणेच्या निर्णयास्तव मा. त्रिसदस्यीय समितीचे दि. २१/०६/२०१३ रोजीचे सभेमध्ये प्रस्ताव सादर करण्यात आला होता. त्यावर सविस्तर चर्चा होऊन निर्णय क्र. ४६० अन्वये पुढीलप्रमाणे निर्णय घेण्यात आलेला आहे. च्संस्थानच्या दोन्ही रुग्णालयांमध्ये वैद्यकिय अधिकारी व इतर कर्मचारी ही पदे भरण्यासाठी मा. मुंबई उच्च न्यायालयाच्या औरंगाबाद खंडपीठाची मान्यता घेण्यात येऊन पुढील कार्यवाही करावी.छ

उपरोक्त निर्णयानुसार विधी विभागामार्फत मा. मुंबई उच्च न्यायालयाचे औरंगाबाद खंडपीठामध्ये सिव्हील ॲप्लीकेशन दाखल करण्यात आले होते. सदर ॲप्लीकेशनमध्ये दि. २७/०९/२०१२ रोजी वैद्यकिय संचालक, उपवैद्यकिय संचालक, वैद्यकिय अधिक्षक व वैद्यकिय

अधिकारी यांची पदे भरणेबाबत जाहिरात प्रसिध्द करण्यात आली असून सदरचे जाहिरातीस अनुसरुन अर्ज प्राप्त झालेले आहे. परंतु, सदरची प्रक्रिया पूर्ण होऊ शकली नाही. आता या पदांसहीत खालील पदे भरणे आवश्यक आहे.

| SR. NO. | NAME OF POST | NO. OF POST |
|---|---|---|
| 1 | MEDICAL DIRECTOR | 01 |
| 2 | RESIDENT DEPUTY MEDICAL DIRECTOR | 01 |
| 3 | MEDICAL SUPERINTENDENT | 01 |
| 4 | NEUROLOGIST | 01 |
| 5 | NEUROSURGEON | 02 |
| 6 | MEDICAL OFFICER (PHYSICIAN) | 01 |
| 7 | MEDICAL OFFICER (ORTHOPAEDIC SURGEON) | 01 |
| 8 | MEDICAL OFFICER (SONOLOGIST) | 01 |
| 9 | MEDICAL OFFICER (PATHOLOGY) | 01 |
| 10 | JUNIOR ANAESTHESIOLOGIST | 01 |
| 11 | SENIOR INTENSIVIST | 02 |
| 12 | JUNIOR INTENSIVIST | 02 |
| 13 | SENIOR RADIOLOGIST | 01 |
| 14 | JUNIOR RADIOLOGIST | 01 |
| 15 | SENIOR MICROBIOLOGIST | 01 |
| 16 | PAEDATRICIAN | 01 |
| 17 | MEDICAL OFFICER (GENERAL SURGERY) | 01 |
| 18 | CLINICAL ASSISTANTS | 04 |
| 19 | CASUALTY MEDICAL OFFICER | 05 |
| 20 | RESIDENT MEDICAL OFFICER | 15 |

**Remaining 09 post also.**

असे सिव्हील ॲप्लीकेशनमधील परिच्छेद ५ मध्ये नमूद केलेले आहे.

सदरचे सिव्हील ॲप्लीकेशनवर मा. उच्च न्यायालयाचे औरंगाबाद खंडपीठासमोर दि. १३/०८/२०१३ रोजी सुनावणी होऊन खालीलप्रमाणे निर्णय दिलेला आहे.

We have considered the submissions of learned counsel appearing for the parties. **The advertisement by following procedure to fill up the posts mentioned in para no. 5 of the application.**

The applicant shall take steps to constitute three members committee, consisting of Director of Health Services, Government of Maharashtra, Director of Medical Education and Research, Government of Maharashtra and third member shall be selected by the Administrative committee of the applicant who shall be expert in the field. Three member committee of these expert shall interview the candidates. The applicant shall follow appropriate established procedure in this regard.

The civil Application is disposed of in the above terms.

| अ. नं. | पद , पे -बँड व ग्रेड -पे | शैक्षणिक पात्रता | मंजुर पदे | | भरलेली पदे | | आवश्यक पदे | | एकूण |
|---|---|---|---|---|---|---|---|---|---|
| | | | साईबाबा | साईनाथ | साईबाबा | साईनाथ | साईबाबा | साईनाथ | |
| | १ | २ | ३ | ४ | ५ | ६ | ७ | ८ | ९ |
| १ | Medical Director<br>वैद्यकिय संचालक<br>PB 15600-39100<br>GP 7600 | **By Nomination**<br>1) Age not more than 50 years;<br>2) MBBS / MD / MS from any Government recognized University;<br>3) DHA / MHA / M Phil in Hospital Management from recognized university;<br>4) Experience minimum 10 years in similar capacity. | ०१ | ०० | ०० | ०० | ०१ | ०० | **०१** |

| | | | | | | | | | |
|---|---|---|---|---|---|---|---|---|---|
| २ | Resident Dy.Medical Director<br>उपवैद्यकीय संचालक<br>PB 15600-39100<br>GP 7600 | **By Nomination**<br>1) Age not more than 50 years;<br>2) MBBS / MD / MS from any Government recognized University;<br>3) DHA / MHA / M Phil in Hospital Management from recognized university;<br>4) Experience minimum 7 years in Hospital Administration. | ०१ | ०० | ०० | ०० | ०१ | ०० | **०१** |
| ३ | Medical Superintendent<br>वैद्यकीय अधिक्षक<br>PB 15600-39100<br>GP 6600 | **By Nomination**<br>1) Age not more than 45 years;<br>2) MBBS from any Government recognized University;<br>3) DHA / MHA / M Phil in Hospital Management from recognized university;<br>4) Experience minimum 5 years in similar capacity. | ०१ | ०१ | ०० | ०० | ०० | ०१ | **०१** |
| ४ | Neurologists<br>मेंदू विकार उपचार तज्ञ<br>PB 15600-39100<br>GP 6600 | **By Nomination**<br>1) Age not more than 45 years;<br>2) DM or DNB from any Government recognized University;<br>3) Experience minimum 2 years in similar capacity. | ०२ | ०० | ०० | ०० | ०१ | ०० | **०१** |
| ५ | Neurosurgeons<br>मेंदू शल्य विशारद<br>PB 15600-39100<br>GP 6600 | **By Nomination**<br>1) Age not more than 45 years;<br>2) MCH / DNB from any Government recognized University<br>3) Experience minimum 2 years in similar capacity. | ०२ | ०० | ०१ | ०० | ०२ | ०० | **०२** |
| ६ | Medical Officer (Physician)<br>मेडीकल ऑफिसर (फिजिशियन)<br>PB 15600-39100<br>GP 6600 | **By Nomination**<br>1) Age not more than 45 years;<br>2) MD / DNB from any Government recognized University;<br>3) Experience minimum 2 years similar capacity. | ०४ | ०२ | ०३ | ०१ | ०० | ०१ | **०१** |
| ७ | Medical Officer (Orthopaedic Surgeon)<br>मेडीकल ऑफिसर (ऑर्थोपेडीक सर्जन)<br>PB 15600-39100<br>GP 6600 | **By Nomination**<br>1) Age not more than 45 years;<br>2) MS / DNB from any Government recognized University;<br>3) Experience minimum 2 years in similar capacity. | ०३ | ०२ | ०२ | ०१ | ०० | ०१ | **०१** |
| ८ | Medical Officer (Sonologist)<br>मेडीकल आफिसर (सोनोलॉजिस्ट)<br>PB 15600-39100<br>GP 5400 | **By Nomination**<br>1) Age not more than 45 years;<br>2) M.B.B.S. Degree / Diploma in Radiology / Sonography from any Government recognized University ;<br>3) Experience minimum 2 years in similar capacity. | ०० | ०१ | ०० | ०० | ०० | ०१ | **०१** |
| ९ | Medical Officer (Pathology)<br>मेडिकल ऑफिसर (पॅथॉलॉजी)<br>PB 15600-39100<br>GP 6600 | **By Nomination**<br>1) Age not more than 45 years;<br>2) MD / DNB from any Government recognized University;<br>3) Experience minimum 2 years in similar capacity. | ०२ | ०१ | ०१ | ०१ | ०० | ०१ | **०१** |

| | | | | | | | | | |
|---|---|---|---|---|---|---|---|---|---|
| १० | Junior Anaesthesio-logists<br>कनिष्ठ भुलतज्ञ<br>PB 15600-39100<br>GP 5400 | **By Nomination**<br>1) Age not more than 45 years;<br>2) Degree of MD / DNB / DA from any Government recognized University ;<br>3) Experience minimum 2 years in similar capacity. | ०९ | ०३ | ०२ | ०३ | ०१ | ०० | **०१** |
| ११ | Senior Intensivist<br>वरिष्ठ अतिदक्षता तज्ञ<br>PB 15600-39100<br>GP 6600 | **By Nomination**<br>1) Age not more than 45 years;<br>2) MD / DNB in Medicine or Anesthesia from any Government recognized University;<br>3) Experience minimum 2 years in similar capacity. | ०३ | ०० | ०१ | ०० | ०२ | ०० | **०२** |
| १२ | Junior Intensivist<br>कनिष्ठ अतिदक्षता तज्ञ<br>PB 15600-39100<br>GP 5400 | **By Nomination**<br>1) Age not more than 45 years;<br>2) Degree of MD (Anes / medi) / DA from any Government recognized University ;<br>3) Experience minimum 2 years in similar capacity. | ०६ | ०० | ०१ | ०० | ०२ | ०० | **०२** |
| १३ | Senior Radiologists<br>वरिष्ठ क्ष-किरण शास्त्रज्ञ<br>PB 15600-39100<br>GP 6600 | **By Nomination**<br>1) Age not more than 45 years;<br>2) MD / DNB from any Government recognized University;<br>3) Experience minimum 2 years in similar capacity. | ०२ | ०१ | ०१ | ०० | ०१ | ०० | **०१** |
| १४ | Junior Radiologists<br>कनिष्ठ क्ष-किरण शास्त्रज्ञ<br>PB 15600-39100<br>GP 5400 | **By Nomination**<br>1) Age not more than 45 years;<br>2) Degree of MD / Diploma in Radiology from any Government recognized University ;<br>3) Experience minimum 2 years in similar capacity. | ०२ | ०० | ०१ | ०० | ०१ | ०० | **०१** |
| १५ | Senior Microbiologist<br>सिनियर मायक्रोबायोलॉजीस्ट<br>PB 15600-39100<br>GP 6600 | **By Nomination**<br>1) Age not more than 45 years;<br>2) MD / DNB in Microbiology from any Government recognized University ;<br>3) Experience minimum 2 years in similar capacity. | ०१ | ०० | ०० | ०० | ०१ | ०० | **०१** |
| १६ | Paedatricians<br>बालरोग तज्ञ<br>PB 15600-39100<br>GP 6600 | **By Nomination**<br>1) Age not more than 45 years;<br>2) MD / DNB from any Government recognized University;<br>3) Experience minimum 2 years in similar capacity. | ०३ | ०१ | ०० | ०१ | ०१ | ०० | **०१** |
| १७ | Medical Officer (General Surgery)<br>मेडिकल ऑफिसर (जनरल सर्जरी)<br>PB 15600-39100<br>GP 6600 | **By Nomination**<br>1) Age not more than 45 years;<br>2) MS / DNB from any Government recognized University;<br>3) Experience minimum 2 years in similar capacity. | ०४ | ०२ | ०२ | ०२<br>डॉ. बिजवे यांचा राजीनामा | ०० | ०१ | **०१** |
| १८ | Clinical Assistants<br>तपासणी सहाय्यक<br>PB 15600-39100<br>GP 6600 | **By Nomination**<br>1) Age not more than 45 years;<br>2) MD / MS / DNB / MCH / DM from any Government recognized University. | १० | ०० | ०१ | ०० | ०४ | ०० | **०४**<br>(cvts- 2 Nuro- 1 Ortho-1) |

| | | | | | | | | | |
|---|---|---|---|---|---|---|---|---|---|
| १९ | Casualty Medical Officer<br>अपघात कक्ष अधिकारी<br>PB 15600-39100<br>GP 5400 | **By Nomination**<br>1) Age not more than 45 years;<br>2) MBBS from any Government recognized University;<br>3) Experience minimum 2 years in similar capacity. | ०६ | ०६ | ०३ | ०४ | ०३ | ०२ | **०५** |
| २० | R.M.O<br>निवासी वैद्यकीय अधिकारी<br>PB 15600-39100<br>GP 5400 | **By Nomination**<br>1) Age not more than 45 years;<br>2) MBBS from any Government recognized University. | ४० | १६ | २८ | ११ | १० | ०५ | **१५** |
| | | | | | | | | **एकूण-** | **४४** |

### उर्वरीत ०९ पदे खालील प्रमाणे-

| अ. नं. | पद, पे -बँड व ग्रेड -पे | शैक्षणिक पात्रता | मंजुर पदे | | भरलेली पदे | | आवश्यक पदे | | एकूण |
|---|---|---|---|---|---|---|---|---|---|
| | | | साईबाबा | साईनाथ | साईबाबा | साईनाथ | साईबाबा | साईनाथ | |
| १ | २ | ३ | ४ | ५ | ६ | ७ | ८ | | ९ |
| १ | Matron<br>अधिसेविका<br>PB 9300-34800<br>GP 4400 | **By Nomination**<br>1) Age not more than 45 years;<br>2) B.Sc.Nursing recognized by the Indian Nursing Council **OR** G.N.M. registered with Maharashtra Nursing Council;<br>3) MS-CIT or Government prescribed equivalant Computer Operating Course;<br>4) Experience of 10 years as Assistant Matron. | ०१ | ०१ | ०० | ०० | ०१ | ०१ | **०२**<br>(SC-1, OPEN-1) |
| २ | Perfusionists<br>परफ्युजिनिस्ट<br>PB 9300-34800<br>GP 4400 | **By Nomination**<br>1) Age not more than 33 years;<br>2) B.Sc. and Diploma / Certificate Course in related subject from any Government recognized University / Institute;<br>3) Experience minimum 5 years in similar capacity. | ०३ | ०० | ०१ | ०० | ०२ | ०० | **०२**<br>(SC-1, OPEN-1) |
| ३ | CSSD Technician<br>मध्यवर्ती निर्जंतुकीकरण तंत्रज्ञ<br>PB 5200-20200<br>GP 2400 | **By Nomination**<br>1) Age not more than 33 years;<br>2) Higher Secondary Certificate Examination passed and Diploma **OR** Certificate Course in CSSD from any Government recognized University / Institute;<br>3) Similar experience minimum 3 years. | १०<br>स्थायी<br>४<br>मानधन<br>६ | ०० | ०० | ०० | ०२ | ०० | **०२**<br>OPEN |
| ४ | Jr.Stress / ECHO Technician<br>कनिष्ठ स्ट्रेस / एको तंत्रज्ञ<br>PB 5200-20200<br>GP 2400 | **By Nomination**<br>1) Age not more than 33 years;<br>2) Higher Secondary Certificate Examination passed and Diploma **OR** Certificate Course in relevent Subject from any recognized University / Institute;<br>3) Similar experience minimum 3 years. | ०१ | ०० | ०० | ०० | ०१ | ०० | **०१**<br>OPEN |
| ५ | Histopath Technicians<br>उतीविक्रुती तंत्रज्ञ<br>PB 9300-34800<br>GP 4200 | **By Nomination**<br>1) Age not more than 33 years;<br>2) B.Sc.and DMLT / Diploma in relevent Subject from any Government recognized University / Institute;<br>3) Similar experience minimum 3 years. | ०२ | ०० | ०१ | ०० | ०१ | ०० | **०१**<br>SC |
| ६ | Audiologist<br>ऑडिओलॉजिस्ट<br>PB 9300-34800<br>GP 4200 | **By Nomination**<br>1) Age not more than 33 years;<br>2) Degree / Diploma in Audiology from any Government recognized University / Institute;<br>3) MS-CIT or Government prescribed equivalant Computer Operating Course; 4) Experience minimum 5 years in similar capacity. | ०० | ०१ | ०० | ०१ | ०० | ०१<br>(श्री बेडके कामावर सतत गैरहजर ) | **०१**<br>OPEN |

| | | | | | | | | | |
|---|---|---|---|---|---|---|---|---|---|
| ७ | X-ray Technician<br>एक्स-रे टेक्निशियन<br>PB 9300-34800<br>GP 4200 | **By Nomination**<br>1) Age not more than 33 years;<br>2) B.Sc. + Diploma / Certificate Course in X-Ray from Government recognized Institute;<br>4) MS-CIT or Government prescribed equivalant computer operating course; 5) Experience minimum 5 years in similar capacity. | ०१ | ०४ | ०० | ०३ | ०० | ०१ | **०१**<br>SC |
| ८ | Purchase Manager<br>खरेदी व्यवस्थापक<br>PB 9300-34800<br>GP 4400 | **By Nomination**<br>1) Age not more than 33 years;<br>2) B.Pharm and MBA (Materials & Logistics) / Diploma in Materials Management from any recognized University;<br>3) MS-CIT or Government prescribed equivalant computer operating course.<br>4) Similar experience of minimum 5 years. | ०१ | ०० | ०० | ०० | ०१ | ०० | **०१**<br>OPEN |
| ९ | Store Keeper<br>भांडारपाल<br>PB 5200-20200<br>GP 2800 | **By Nomination**<br>1) Age not more than 33 years;<br>2) Graduate from any recognized University with 2nd Class **OR** Diploma in Material Management;<br>3) MS-CIT **OR** Government prescribed equivalant computer operating course;<br>4) Government Commercial certificate of Typing English 40 w.p.m.and Marathi 30 w.p.m. speed;<br>5) Experience minimum 3 years in Store Keeping. | ०० | ०१ | ०० | ०० | ०० | ०१ | **०१**<br>OPEN |
| | | | | | | **एकूण** | | | **१२** |

मा. मुंबई उच्च न्यायालयाचे औरंगाबाद खंडपीठाने उपरोक्त सर्व पदांचे मुलाखती घेणेकरीता तीन सदस्यांची समिती स्थापन केली असून त्यात १) संचालक, आरोग्य विभाग महाराष्ट्र शासन. २) संचालक, वैद्यकिय शिक्षण व संशोधन महाराष्ट्र शासन ३) संस्थानचे त्रिसदस्यीय समितीने तज्ञ नेमावा, अशी समिती स्थापन केलेली आहे.

सदरचे सिव्हील ॲप्लीकेशनवर मा. उच्च न्यायालयाचे औरंगाबाद खंडपीठासमोर दि. १३/०८/२०१३ रोजी सुनावणीच्या वेळी संस्थानचे वकील ॲड. श्री संजय चौकीदार, मा. कार्यकारी अधिकारी, विधी अधिकारी व वैद्यकीय संचालक उपस्थित होते. प्रतिवादी वकीलांनी सध्या श्री साईबाबा हॉस्पिटलमध्ये दोन कार्डीओलॉजीस्ट कार्यरत असून सदरचे कार्डीओलॉजीस्ट यांना प्रतिमाह चाळीस लाख व वार्षीक चार कोटी रूपये संस्थान देत असून इतकी मोठी रक्कम दोनच वैद्यकीय अधिकारी यांचेवर खर्च होत आहे व रूग्णालयात येणाऱ्या हृदयविकारांच्या रूग्णाची संख्या फार मोठ्या प्रमाणावर असून आणखी दोन वैद्यकीय अधिकारी नेमावेत असे म्हणणे मांडले. यावर मा कार्यकारी अधिकारी यांनी सांगितले की, कार्डीओलॉजीस्ट यांना देण्यात येत असलेला इन्सेन्टीव्ह रिव्हाईज करू. यावर मा. न्यायाधीश यांनी यापेक्षा कमी मानधनात हृदयविकार तज्ञ उपलब्ध होत असल्यास त्यांचाही विचार करावा. तसेच वैद्यकीय अधिकारी यांना चांगले निवासस्थान व सुविधा उपलब्ध करून द्याव्यात अशा सूचना केल्या आहेत.

उपरोक्त अ.नं. १ ते ९ चे पदांपैकी अ.नं. ६ चे (Audiologist) पदावर श्री धनाजी जगन्नाथ बेडके यांची नेमणूक करण्यात आलेली असून ते दि. ०१/०८/२०१२ पासून विनापरवानगी गैरहजर आहेत. यांबाबतची कार्यवाही कामगार विभागामार्फत (वशी-७बी) चालू आहे. त्यामुळे या व्यतिरिक्त उर्वरित पदांची जाहिरात देशातील प्रमुख शहरांमध्ये टाईम्स ऑफ इंडिया, इंडियन एक्सप्रेस, महाराष्ट्र टाईम्स, सकाळ या वर्तमान पत्रांमध्ये व संस्थान वेबसाईटवर जाहिरात प्रसिध्द करता येईल. सदरची पदे भरतांना तज्ञ वैद्यकिय अधिकारी यांचेसाठी एक व पॅरामेडिकल व प्रशासकीय पदे भरणेसाठी एक अशा दोन वेगवेगळ्या जाहिराती प्रसिध्द करुन मुलाखती घेणेकामी तिसरा सदस्य हा दोन्ही जाहिरातींसाठी वेगवेगळे असावे. तज्ञ वैद्यकिय अधिकाऱ्यांच्या मुलाखती घेणेसाठी संबंधीत क्षेत्रातील (रेडिओलॉजी, आर्थो, न्यूरो इ.) तज्ञांना तज्ञ सदस्य म्हणून बोलविता येईल व पॅरामेडिकल व प्रशासकीय पदांच्या मुलाखती घेणेसाठी सिव्हील सर्जन यांना तज्ञ सदस्य म्हणून बोलविता येईल, असे वैद्यकिय संचालक यांनी सुचविले आहे.

तसेच मा न्यायाधीश यांचे सूचनेनुसार कार्यवाही करावयाची असल्यास दोन क्लिनीकल असिस्टंट (इन्टरव्हेन्शनल कार्डीओलॉजीस्ट) या पदाचा जाहीरातीमध्ये समावेश करण्याचा विचार करता येईल, असे मत आहे.

तरी, मा. मुंबई उच्च न्यायालयाचे औरंगाबाद खंडपीठाचे आदेशानुसार जाहिराती प्रसिध्द करणेकामी येणाऱ्या प्रत्यक्ष खर्चास मान्यतेस्तव व उपरोक्तप्रमाणे प्र. वैद्यकिय संचालक, रुग्णालये यांनी सुचविलेनुसार कार्यवाही करणेबाबत निर्णय होणेस विनंती.

**निर्णय क्र.६९९** **यावर सविस्तर चर्चा होऊन, मा. मुंबई उच्च न्यायालयाचे औरंगाबाद खंडपीठाचे निर्णयाप्रमाणे कार्यवाही करणेत यावी, असे ठरले.**

**तसेच याकामी जाहिरात प्रसिध्द करणेकामी येणाऱ्या प्रत्यक्ष खर्चास मान्यता देण्यात आली.** (कार्यवाही- वैद्यकिय संचालक)

---

**आयत्या वेळेचा**

**विषय नं.०२** **सी.टी.स्कॅन (६४ Slice) मशिनचे वार्षीक सर्व्हीस कॉन्ट्रॅक्ट करणेबाबत.**

**प्रस्ताव-** श्री साईबाबा हॉस्पिटलचे रेडीओलॉजी विभागात मे. सिमेन्स लि. मुंबई या कंपनीचे Somatom Sensation ६४ CT Scanner हे मशीन पुरवठा आदेश क्र. २८३३/२००५, दि. १५/०३/२००५ अन्वये एकुण रू. ३,९८,३७,८३५/- इतक्या रकमेत खरेदी करण्यात आले असुन सदर मशिन करीता कंपनीने दिलेला एक वर्षाचा वॉरंटी कालावधी दि. १६/०७/२००६ रोजी पूर्ण झालेला आहे. सदर सि. टी. स्कॅन मशिनची दि. ३१/०३/२०१३ रोजी घसारा वजा किंमत रू. ४६,५२,९९५.४२ इतकी आहे. सदर मशीन खरेदी करतेवेळी मा. व्यवस्थापन समितीच्या दि. १३/०३/२००४ च्या सभेतील निर्णय क्र.९५ अन्वये पुढील कालावधीतील सि. टी. स्कॅन मशिनसह खरेदी करण्यात आलेल्या Medrad Pressure Injector, Colour Printer, १५० KVA Stabilizer यांचे दुरुस्ती व देखभालीकरीता वार्षिक CMC (Comprehensive Maintenance Contract) करणेबाबत निर्णय झालेला आहे. त्यानुसार कंपनीस देण्यात आलेल्या दि.१५/०३/०५ च्या पुरवठा आदेशातील अ.क्र.१५ अन्वये-

Comprehensive Maintenance Contract (CMC) price for the second year is Rs.30 Lacs. For subsequent years the escalation of 5% will be applicable. The service tax will be extra.

The CMC includes even the Tube of the CT. Under this contract all parts & labor will be given free of cost. Payment for CMC to be done at start of each year after the demand of company.

मे. सिमेन्स लि.,मुंबई,यांचेशी पुरवठा आदेशानुसार वॉरंटी कालावधी संपलेनंतर आजपावेतो सात वर्षात CMC चा करार करून वरील निर्णयाप्रमाणे रक्कम अदा करण्यात आली आहे.

कंपनीने मागिल वर्षी नियमीत व तातडीच्या दुरुस्ती व देखभालीकरीता एकुण ५७ वेळा भेटी देउन मागील एक वर्षांत अंदाजे रु.६०,८९,६७३/-इतक्या रकमेचे स्पेअर पार्ट बदलले आहेत (संदर्भ परीशिष्ट "अ").

सध्या दि. १७/०७/२०१३ ते दि. १६/०७/२०१४ या कालावधीसाठी CT Scan मशीनचे CMC करणेकरीता करारनाम्यानुसार मे. सिमेन्स ली. मुंबई यांना (+५% वाढ व सर्व्हीस टॅक्स १२.३६%सह) एकुण रू.४७,००,४५२/- इतकी रक्कम देय होत आहे. कंपनीने त्यानुसार करारनामा पाठविला आहे.

सदर कालावधीमध्ये कंपनी इंजिनीअर एकुण ४ वेळा नियमित सर्व मशिन्सची सर्व्हीसींग करून मशिन ब्रेकडाऊनचे वेळी दुरूस्ती करीता आवश्यक असणारे सर्व स्पेअर पार्ट (एक्स-रे टयुबसह) बदलणार आहेत आणि आवश्यकतेनुसार सॉफ्टवेअर/हार्डवेअर सेफ्टी अपडेट करणार आहेत.

पुढील काळात ते व्यवस्थित कार्यान्वित राहणे कामी तसेच मागील सात वर्षात कंपनीस अदा केलेली रक्कम व त्यांनी केलेला अंदाजे खर्च या बाबींचा विचार करता संस्थानला सद्यस्थितीत मशिनचे कॉम्प्रेहेन्सीव्ह वार्षिक सर्व्हिस कॉन्ट्रॅक्ट करणे जास्त फायदेशीर राहील. कारण जसजसे मशिन जुने होत जाते तसतसे दुरूस्तीचा खर्च देखील वाढत जातो. कंपनीने वरील पुरवठा आदेशातील अटीनुसार CMC करणेसाठी एकूण १०० % रक्कमेची आगाउ मागणी केलेली आहे.

सदर मशिन नियमित वापरात असून दररोज अंदाजे ३६ रूग्णांची तपासणी करण्यात येते. यानुसार सदर मशीनवर दरवर्षी अंदाजे ९,३०६ पेशंटचे सी.टी. स्कॅन होत आहे (संदर्भ परीशिष्ट "ब"). त्याकरीता सदरचे मशीन नेहमी अद्यावत ठेवणे आवश्यक आहे.

तरी CT Scan मशीनचे मे. सिमेन्स ली. मुंबई यांचेकडे दि. १७/०७/२०१३ ते दि. १६/०७/२०१४ या कालावधीसाठी कॉम्प्रेहेन्सीव्ह वार्षिक सर्व्हिस कॉन्ट्रॅक्ट करणेस व त्यासाठी येणाऱ्या सर्व करांसहीत एकुण रु. ४७,००,४५२/- च्या खर्चास आणि सदरची रक्कम कंपनीस आगाउ पाठविणेस मान्यता असावी.

**निर्णय क्र.७०० यावर सविस्तर चर्चा होऊन, श्री साईबाबा हॉस्पिटलचे रेडीओलॉजी विभागातील CT Scan मशीनचे दि. १७/०७/२०१३ ते दि. १६/०७/२०१४ या कालावधीसाठी मे. सिमेन्स ली. मुंबई यांचेकडून कॉम्प्रेहेन्सीव्ह वार्षिक सर्व्हिस कॉन्ट्रॅक्ट करुन घेणेस व याकामी येणाऱ्या सर्व करांसहीत एकुण रु. ४७,००,४५२/- मात्रचे खर्चास तसेच, सदरची रक्कम कंपनीस आगाउ पाठविणेस मान्यता देण्यात आली.** (कार्यवाही- वैद्यकिय संचालक)

------------------------------------------------------------------------------------------------------------

**आयत्या वेळेचा**

**विषय नं.०३ श्री साईबाबा हॉस्पीटलमध्ये ज्यू. रेडिओलॉजीस्ट पदावर ११ महिने कालावधीसाठी तात्पुरती नेमणूक करणेबाबत.**

**प्रस्ताव-** श्री साईबाबा संस्थान विश्वस्तव्यवस्था, शिरडी अधिनियम २००४ मधील समितीचा कार्यकारी अधिकारी व इतर अधिकारी कलम १३ (४) मध्ये प्रामुख्याने खालीलप्रमाणे तरतूद आहे.

समितीस, संस्थान विश्वस्तव्यवस्थेचा कारभार कार्यक्षतेने चालविणेसाठी आणि या अधिनियमान्वये तिची कर्तव्ये व कामे पार पाडण्यासाठी आवश्यक वाटतील अशा अधिकाऱ्यांची (कार्यकारी अधिकाऱ्याव्यतिरिक्त) व कर्मचाऱ्यांची नेमणूक करता येईल:

परंतु, ज्या अधिकाऱ्याला किंवा कर्मचाऱ्याला दरमहा दोन हजार रुपयाहून अधिक वेतन देण्यात येत असेल किंवा द्यावयाचे असेल, अशा कोणत्याही अधिकाऱ्याची किंवा कर्मचाऱ्याची नेमणूक समितीकडून, असे पद शासनाने मान्य केलेल्या कर्मचारी आकृतीबंधानुसार मंजूर करण्यात येईपर्यंत, केली जाणार नाही अशी तरतूद आहे.

शासनाचे मंजूर केलेल्या आकृतीबंधातील अटी-शर्ती क्र. ३- सदर पदांवर नव्याने नियुक्ती करतांना समितीने सदर पदाची आवश्यकता व अर्हता याबाबत विस्तृत प्रसिध्दी देऊन सदर पदांवर स्पर्धात्मक परिक्षा घेऊन नियुक्ती करावी, असे नमूद केले आहे.

श्री साईबाबा हॉस्पीटलचे आकृतीबंधामध्ये ज्यू. रेडिओलॉजीस्टची ०२ पदे मंजूर असून, शैक्षणिक पात्रता १) Age not more than ४५ years; २) Degree of MD/ Diploma in Radiology from any Government recognized University; ३) Experience minimum २ years in similar capacity. अशी आहे. तसेच वेतनबॅन्ड रु. १५६००-३९१०० व ग्रेड पे रु. ५४०० असा आहे.

डॉ. वैशाली बापुसाहेब नागरगोजे यांनी दि. १२/०९/२०१३ रोजी अर्ज सादर करुन त्यात पुढीलप्रमाणे नमूद केले आहे. चI undersigned Dr. Vaishali B. Nagargoje is currently working as a Radiologist in Civil Hospital A, Nagar since last one year. I have completed D.M.R.E. I wish to work as a Radiologist in your Institute. So, I request you to give me opportunity.

Kinldy, do the needful and let me know accrordingly.

संस्थानचे दोन्ही रुग्णालयांसाठी वैद्यकिय संचालक, निवासी उपवैद्यकिय संचालक, वैद्यकिय अधिक्षक यापदांसहीत आणखी आवश्यक वैद्यकिय अधिकारी, आर एम ओ व इतर कर्मचारी भरणेच्या निर्णयास्तव मा. त्रिसदस्यीय समितीचे दि. २१/०६/२०१३ रोजीचे सभेमध्ये प्रस्ताव सादर करण्यात आला होता. त्यावर सविस्तर चर्चा होऊन निर्णय क्र. ४६० अन्वये पुढीलप्रमाणे निर्णय घेण्यात आलेला आहे. च्संस्थानच्या दोन्ही रुग्णालयांमध्ये वैद्यकिय अधिकारी व इतर कर्मचारी ही पदे भरण्यासाठी मा. मुंबई उच्च न्यायालयाच्या औरंगाबाद खंडपीठाची मान्यता घेण्यात येऊन पुढील कार्यवाही करावी.छ

उपरोक्त निर्णयानुसार विधी विभागामार्फत मा. मुंबई उच्च न्यायालयाचे औरंगाबाद खंडपीठामध्ये सिव्हील ॲप्लीकेशन दाखल करण्यात आले होते. सदरचे ॲप्लीकेशनवर मा. मुंबई उच्च न्यायालय औरंगाबाद खंडपीठामध्ये दि. १३/०८/२०१३ रोजी सुनावणी होऊन दोन्ही रुग्णालयांमध्ये आवश्यक वैद्यकिय अधिकाऱ्यांची पदे भरणेस मान्यता दिलेली असून सदर पदांमध्ये ज्यू. रेडिओलॉजीस्ट या पदाचा समावेश आहे.

सध्या श्री साईबाबा हॉस्पीटलमध्ये ज्यू. रेडिओलॉजीस्ट या पदावर डॉ. नितीन दिलीपराव आहेर दि. ०१/०९/२०१२ पासून कार्यरत आहेत. परंतु त्यांनी दि. ३१/०८/२०१३ रोजीचे अर्जान्वये दि. ०१/१०/२०१३ रोजी पासून राजीनामा मंजूर करणेस विनंती केली आहे. डॉ. आहेर यांचे राजीनाम्यानंतर श्री साईबाबा हॉस्पीटलमध्ये रुग्ण सेवेसाठी ज्यू. रेडिओलॉजीस्टची आवश्यकता आहे.

कोर्टाच्या आदेशानुसार जाहिरातीव्दारे रुग्णालयांसाठी आवश्यक पदे भरणेच्या प्रक्रियेस काहीसा कालावधी लागणार असल्याने ११ महिने कालावधीसाठी तात्पुरते स्वरुपात ज्यू. रेडिओलॉजीस्टची नेमणूक करण्यात यावी, असे प्र. वैद्यकिय संचालक, रुग्णालये यांनी सुचविले आहे.

ज्यू. रेडिओलॉजीस्टचे पदासाठी डॉ. वैशाली बापुसाहेब नागरगोजे यांचा दि. १२/०९२०१३ रोजीचा अर्ज प्राप्त झालेला असून सदरचे पदावर ११ महिने कालावधीसाठी तात्पुरते स्वरुपात ज्यू. रेडिओलॉजीस्टची म्हणून काम करण्यास डॉ. वैशाली नागरगोजे तयार आहे. त्यानुसार वैद्यकिय संचालक रुग्णालय यांनी त्याची दि. १२/०९/२०१३ रोजी मुलाखत घेतली आहे.

| अ. नं. | नाव | शैक्षणिक पात्रता | शेरा |
|---|---|---|---|
| १ | डॉ. वैशाली बापुसाहेब नागरगोजे, अहमदनगर | एमबीबीएस-२००५<br>डी.एम.आर.ई. सी.पी.एस. मुंबई-२०१२ | श्री साईबाबा हॉस्पीटल कडे नेमणूक करणेकामी. |

श्री साईबाबा हॉस्पीटलकडे कनिष्ठ वैद्यकिय अधिकारी पदावर एक वर्ष कालावधीसाठी तात्पुरती नेमणूक केलेल्या वैद्यकिय अधिकारी यांना एकत्रित रु.३२,०००/- मासिक वेतन व नियमाप्रमाणे इन्सेंटीव्ह देण्यात येतो.

उपरोक्त नमुद केलेप्रमाणे प्र.वैद्यकिय संचालक, रुग्णालये यांचे मागणीनुसार डॉ. वैशाली बापुसाहेब नागरगोजे यांना श्री साईबाबा हॉस्पीटलकडे ११ महिने कालावधीसाठी ज्यू. रेडिओलॉजीस्ट या पदावर कंत्राटी पध्दतीने मासिक रु. ३२,०००/- मानधनावर नेमणूक देऊन त्यांना नियमाप्रमाणे इन्सेंटीव्ह देणेबाबत निर्णय होणेस विनंती.

**निर्णय क्र.७०१ यावर सविस्तर चर्चा होऊन, उपरोक्त प्रस्तावास मान्यता देण्यात आली.**

(कार्यवाही- वैद्यकिय संचालक)

---

**आयत्या वेळेचा**

**विषय नं.०४ साईटेक प्रकल्पाअंतर्गत Online Server ची साठवण क्षमता (Capacity) वाढविणेबाबत.**

**प्रस्ताव-** साईटेक प्रकल्पाची कार्यवाही Cognizant Technology Pvt. Ltd., Pune यांचेमार्फत सुरु आहे. साईटेक प्रकल्पाअंतर्गत श्री साई भक्तांना दर्शन, आरती पास व रुम रिझर्वेशनची सुविधा ऑनलाईन सेवेव्दारे उपलब्ध करुन देण्यात आलेली आहे. सदर सुविधेचा लाभ घेणाऱ्या भक्तांची संख्या दिवसेंदिवस वाढत आहे. सदर सुविधेसाठी बसविण्यात आलेल्या सर्व्हरची साठवण क्षमता (Capacity) ९९ % वापरात आलेली असलेबाबत कॉग्नीझंट टेक्नॉलॉजी, पुणे यांनी दिनांक १९/०८/२०१३ रोजीचे पत्रान्वये कळविलेले आहे. त्यामुळे सदर सर्व्हरची Hard Disk ची साठवण क्षमता वाढविणे आवश्यक आहे.

दिनांक १९/०८/२०१३ रोजीचे पत्रान्वये कॉग्नीझंट टेक्नॉलॉजी, पुणे यांनी Hard Disk ची साठवण (Capacity) क्षमता वाढविणे कामी २TB च्या दोन Hard Disk खरेदी करणेस रक्कम रुपये ७५,३९५/- + टॅक्स इतका खर्च अपेक्षित असल्याचे कळविलेले आहे. तसेच दिनांक २०/०८/२०१३ रोजीचा ई-मेल नुसार आयटी कमिटीचे अध्यक्ष मा. श्री. के. व्ही. रमणी यांनी २TB च्या दोन नग Hard Disk खरेदी करणेस दिनांक ३१/०७/२०१३ रोजचे कॉन्फरन्स कॉलमध्ये मान्यता दिलेली आहे.

मागणी: Online सुविधेकामी वापरात असलेल्या सर्व्हर करीता २TB ची साठवण (Capacity) क्षमतेच्या Hard Disk खरेदी करणेबाबत आयटी कमिटीचे अध्यक्ष मा. श्री. के. व्ही. रमणी सो. यांनी मान्यता दिलेली आहे. त्यानुसार दोन नग २TB ची साठवण (Capacity) क्षमता असलेली Hard Disk अंदाजे रक्कम रुपये ७५,३९५/- + टॅक्स इतक्या रक्कमेस कॉग्नीझंट टेक्नॉलॉजी, पुणे यांचेमार्फत Dell या कंपनीकडून खरेदी करण्यात याव्यात, असे नम्र मत आहे.

संस्थान अधिनियम/ ठराव यानुसार छाननी, शासन निर्देश, तांत्रिक, कायदेशीर तसेच आर्थिक विषय इ. छानणी करुन अनुमान :

विभागाचा अभिप्राय/ स्पष्ट मत: Online सुविधेच्या सर्व्हर करीता २TB ची साठवण (Capacity) क्षमतेच्या दोन नग Hard Disk कॉग्नीझंट टेक्नॉलॉजी, पूणे यांचेकडून खरेदी करणेस व त्याकामी येणारे अंदाजे रक्कम रुपये ७५,३९५/- + टॅक्स चे खर्चास मान्यता मिळणेसाठी सदरचा प्रस्ताव मा. त्रिसदस्य समितीचे सभेपुढे सविनय सादर.

**निर्णय क्र.७०२ यावर सविस्तर चर्चा होऊन, उपरोक्त प्रस्तावास मान्यता देण्यात आली.**

(कार्यवाही- माहिती तंत्राज्ञान विभागप्रमुख)

---

**आयत्या वेळेचा**

**विषय नं.०५ श्री अजय मोरे, उपविभागीय अधिकारी, शिर्डी यांचा निवासस्थान मिळणेबाबत दि.०२/०९/२०१३ चे अर्जाबाबत**

**प्रस्ताव-** श्री अजय मोरे, उपविभागीय अधिकारी, शिर्डी यांनी दि.०२/०९/२०१३ चे अर्जात "त्यांनी दि.१५/०८/२०१३ रोजी उपविभागीय अधिकारी, शिर्डी पदभार स्विकारलेला असून संस्थानच्या सदनिकातून साईस्मरण ०२/०६ सदनिका मिळावी व नियमाप्रमाणे होणारी सर्व रक्कम/ भाडे भरण्यास ते तयार आहे." असे नमूद केलेले आहे.

मा.व्यवस्थापन समितीचे दि.०७/०७/२००८ चे सभेत खालीलप्रमाणे निर्णय झालेला आहे.

"संस्थान कर्मचारी व रुग्णालयाचे वैद्यकीय अधिकारी यांना निवासस्थानाची आवश्यकता असल्याने तसेच संस्थान मार्फत पोलीस कर्मचाऱ्यांना स्वतंत्र निवासस्थाने बांधून देण्यात आलेले असल्याने त्यांना देण्यात आलेले संस्थान निवासस्थाने त्वरीत खाली करुन घेण्यात यावीत. उपविभागीय पोलीस अधिकारी श्री यशोद यांना दिलेल्या निवासस्थानात ते स्वतः राहत नसल्याचे समजते सबब त्यांचे निवासस्थान खाली करुन घ्यावे तसेच फक्त पोलीस इन्पेक्टर, शिर्डी, मुख्याधिकारी, नगरपंचायत,शिर्डी व तहसिलदार, राहाता यांना निवासस्थाने उपलब्ध करुन देण्यात यावी. मात्र त्यांचेकडून त्यांना शासनाकडून मिळत असलेला प्रतिमहा घरभाडे भत्ता तसेच नियमाप्रमाणे विद्युतआकार संस्थानमध्ये जमा करुन घेण्यात यावा. "

उपरोक्त निर्णयानुसार पोलीस निरिक्षक, शिर्डी,पोलीस स्टेशन, तहसिलदार, राहाता, उपविभागीय पोलीस अधिकारी, शिर्डी यांना संस्थानचे साईबाबा भक्तनिवासस्थान शेजारील कर्मचारी वसाहतीमधील साईसहवास इमारत नं.३ मध्ये तात्पुरती निवासस्थाने देण्यात आलेली आहेत.

सध्या स्थायी पदावर एकूण २२४१ कर्मचारी आहेत. स्थायी पदावरील कर्मचाऱ्यांसाठी संस्थानकडे एकूण ३४० कर्मचारी निवासस्थाने आहेत व निवासस्थान मिळणेबाबतचे प्रतिक्षायादीवर एकूण २०० कर्मचारी आहेत. त्यामुळे संस्थान कर्मचाऱ्यांनाच निवासस्थाने देणेकामी सदरची निवासस्थाने अपुरी पडत आहेत.

श्री साईबाबा संस्थान विश्वस्तव्यवस्था,शिरडीचे कर्मचारी निवासस्थानामध्ये वरिष्ठ वैद्यकिय अधिकारी/ वरिष्ठ-अधिकारी/ कर्मचारी यांना निवासासाठी देणेकामी एका इमारती मध्ये सहा फ्लॅट अशा एकूण-४ इमारतीमध्ये २४ फ्लॅट तयार करण्यात आलेले आहेत. पैकी -वरिष्ठ-वैद्यकिय अधिकारी, तसेच तहसीलदार राहाता, पोलीस निरीक्षक, शिरडी पोलीस स्टेशन, उपविभागीय पोलीस अधिकारी शिर्डी उपविभाग असे एकूण-२० फ्लॅट निवासासाठी देण्यात आलेले आहेत. पैकी सध्या -०४ फ्लॅट रिक्त आहेत.

संस्थानकडे वरिष्ठ-वैद्यकिय अधिकारी यांचे रिक्त पदे भरणेकामी श्री साईबाबा हॉस्पीटल मार्फत कार्यवाही चालू आहे. ज्यावेळी सदर पदावर वरिष्ठ-वैद्यकिय अधिकारी हजर होतील त्यावेळी त्यांना संस्थानची निवासस्थाने उपलब्ध करुन द्यावी लागणार आहेत.

आता, महाराष्ट्र शासना मार्फत शिरडी उपविभाग शिरडी हा नव्याने निर्माण करण्यात आलेला आहे. सदर उपविभागाकडे श्री.अजय मोरे, उपविभागीय अधिकारी यांची नेमणूक करण्यात आलेली आहे. त्यांनी संस्थानचे निवासस्थानामध्ये निवासस्थान मिळणेबाबत विनंती केली आहे. संस्थानचे सोयीचे दृष्टीने तसेच अडीअडचणीचे वेळी तसेच गरजेनुसार उपलब्ध होण्याचे दृष्टीने श्री. मोरे उपविभागीय अधिकारी, शिर्डी यांना निवासस्थान देणे आवश्यक वाटते.

मा.व्यवस्थापन समितीचे निर्णयानुसार पोलीस निरिक्षक, शिर्डी,पोलीस स्टेशन, तहसिलदार, राहाता, उपविभागीय पोलीस अधिकारी, शिर्डी यांना संस्थानचे साईबाबा भक्तनिवासस्थान शेजारील कर्मचारी वसाहतीमधील साईसहवास इमारत नं.३ मध्ये तात्पुरती निवासस्थाने देण्यात आलेली आहेत.

मा.व्यवस्थापन समितीचा निवासस्थानाबाबतचा उपरोक्त निर्णय तसेच उपरोक्त परिस्थती विचारात घेता श्री. अजय मोरे उपविभागीय अधिकारी, शिर्डी उपविभाग शिर्डी यांना साईसहवास या इमारतीमधील एक फ्लॅट त्यांना शासनाकडून मिळत असलेला प्रतिमहा घरभाडे भत्ता तसेच नियमाप्रमाणे विद्युत आकार संस्थानकडे जमा करुन घेणेचे अटीवर देणेबाबतचे प्रस्तावावर निर्णय होणेस विनंती.

**निर्णय क्र.७०३ यावर सविस्तर चर्चा होऊन, श्री अजय मोरे, उपविभागीय अधिकारी, शिर्डी यांना निवासस्थान देणेकामी मान्यता देण्यात आली. त्यासाठी मा.मुंबई उच्च न्यायालयाचे औरंगाबाद खंडपीठाची मान्यता घेणेकामी संस्थान वकीलामार्फत अर्ज सादर करणेत येऊन, मान्यतेनंतर कार्यवाही करणेत यावी, असे ठरले.** (कार्यवाही- अधिक्षक, सामान्य प्रशासन/ विधी अधिकारी)

---

**आयत्या वेळेचा**

**विषय नं.०६ श्री संपत ज्ञानोबा भोसले, पोलीस निरिक्षक, शिर्डी पोलीस स्टेशन यांचा निवासस्थान मिळणेबाबत दि.२९/०८/२०१३ चे अर्जाबाबत.**

**प्रस्ताव-** श्री संपत ज्ञा.भोसले, पोलीस निरिक्षक, शिर्डी पोलीस स्टेशन, शिर्डी यांनी दि.२९/०८/२०१३ चे अर्जात "त्यांनी दि.२८/०८/२०१३ रोजी शिर्डी पोलीस स्टेशनचा पदभार स्विकारलेला असून शिर्डी पोलीस स्टेशन येथे अधिकारी निवासस्थान हे एकच असल्याने तेथे सध्या पोलीस उपनिरिक्षक श्री धोंगडे हे रहावयास असल्याने त्यांना रहाण्यासाठी श्री साईबाबा संस्थान कडून अधिकारी निवासस्थान मिळावे" असे नमूद केलेले आहे. मा.व्यवस्थापन समितीचे दि.०७/०७/२००८ चे सभेत खालीलप्रमाणे निर्णय झालेला आहे.

"संस्थान कर्मचारी व रुग्णालयाचे वैद्यकीय अधिकारी यांना निवासस्थानाची आवश्यकता असल्याने तसेच संस्थान मार्फत पोलीस कर्मचाऱ्यांना स्वतंत्र निवासस्थाने बांधून देण्यात आलेले असल्याने त्यांना देण्यात आलेले संस्थान निवासस्थाने त्वरीत खाली करुन घेण्यात यावीत. उपविभागीय पोलीस अधिकारी श्री यशोद यांना दिलेल्या निवासस्थानात ते स्वतः राहत नसल्याचे समजते सबब त्यांचे निवासस्थान खाली करुन घ्यावे तसेच फक्त पोलीस इन्पेक्टर, शिर्डी, मुख्याधिकारी, नगरपंचायत,शिर्डी व तहसिलदार, राहाता यांना

निवासस्थाने उपलब्ध करुन देण्यात यावी. मात्र त्यांचेकडून त्यांना शासनाकडून मिळत असलेला प्रतिमहा घरभाडे भत्ता तसेच नियमाप्रमाणे विद्युतआकार संस्थानमध्ये जमा करुन घेण्यात यावा. "

उपरोक्त निर्णयानुसार पोलीस निरिक्षक, शिर्डी,पोलीस स्टेशन, तहसिलदार, राहाता, उपविभागीय पोलीस अधिकारी, शिर्डी यांना संस्थानचे साईबाबा भक्तनिवासस्थान शेजारील कर्मचारी वसाहतीमधील साईसहवास इमारत नं.३ मध्ये तात्पुरती निवासस्थाने देण्यात आलेली आहेत.

सध्या स्थायी पदावर एकूण २२४१ कर्मचारी आहेत. स्थायी पदावरील कर्मचाऱ्यांसाठी संस्थानकडे एकूण ३४० कर्मचारी निवासस्थाने आहेत व निवासस्थान मिळणेबाबतचे प्रतिक्षायादीवर एकूण २०० कर्मचारी आहेत. त्यामुळे संस्थान कर्मचाऱ्यांनाच निवासस्थाने देणेकामी सदरची निवासस्थाने अपुरी पडत आहेत.

श्री साईबाबा संस्थान विश्वस्तव्यवस्था,शिरडीचे कर्मचारी निवासस्थानामध्ये वरिष्ठ वैद्यकिय अधिकारी/ वरिष्ठ-अधिकारी/ कर्मचारी यांना निवासासाठी देणेकामी एका इमारती मध्ये सहा फ्लॅट अशा एकूण-४ इमारतीमध्ये २४ फ्लॅट तयार करण्यात आलेले आहेत. पैकी वरिष्ठ-वैद्यकिय अधिकारी, तसेच तहसीलदार राहाता, पोलीस निरीक्षक, शिरडी पोलीस स्टेशन, उपविभागीय पोलीस अधिकारी शिर्डी उपविभाग असे एकूण-२० फ्लॅट निवासासाठी देण्यात आलेले आहेत. पैकी सध्या- ०४ फ्लॅट रिक्त आहेत.

संस्थानकडे वरिष्ठ-वैद्यकिय अधिकारी यांचे रिक्त पदे भरणेकामी श्री साईबाबा हॉस्पीटल मार्फत कार्यवाही चालू आहे. ज्यावेळी सदर पदावर वरिष्ठ-वैद्यकिय अधिकारी हजर होतील त्यावेळी त्यांना संस्थानची निवासस्थाने उपलब्ध करुन द्यावी लागणार आहेत.

श्री साईबाबांचे दर्शनासाठी येणारे भक्तांचे सुरक्षेसाठी मा.व्यवस्थापन समितीचे मागणीनुसार संस्थान परिसरात पोलीस अधिक्षक अहमदनगर यांचे मार्फत पोलीस निरीक्षक पद स्वतंत्रपणे निर्माण करण्यात आले आहे. व सदर ठिकाणी शिरडी पोलीस स्टेशन येथे नेमणूकीस असलेले श्री. दत्तात्रय पवार, पोलीस निरीक्षक यांची बदली होऊन सदर जागी ते हजर झालेले आहेत. त्यांना यापूर्वीच निवासस्थान देण्यात आलेले आहे. श्री पवार पोलीस निरीक्षक हे संस्थान व श्री साईभक्तांचे सुरक्षेच्या दृष्टीने गर्दीचे वेळी, तसेच उत्सव काळामध्ये उपलब्ध्द होणेकामी त्यांना देण्यात आलेले निवासस्थान त्यांचेकडे ठेवावे लागेल.

आता, श्री संपत ज्ञानोबा भोसले, पोलीस निरीक्षक यांचे शिर्डी स्टेशन येथे बदली झालेली आहे व त्यांनी संस्थानकडे निवासस्थान मिळणेबाबत विनंती केली आहे.

मा.व्यवस्थापन समितीचा निवासस्थानाबाबतचा उपरोक्त निर्णय तसेच उपरोक्त परिस्थती विचारात घेता श्री. संपत ज्ञानोबा भोसले, पोलीस निरीक्षक शिर्डी यांना साईसहवास या इमारतीमधील एक फ्लॅट त्यांना शासनाकडून मिळत असलेला प्रतिमहा घरभाडे भत्ता तसेच नियमाप्रमाणे विद्युत आकार संस्थानकडे जमा करुन घेणेचे अटीवर देणेबाबतचे प्रस्तावावर निर्णय होणेस विनंती.

**निर्णय क्र.७०४** **यावर सविस्तर चर्चा होऊन, श्री.संपत ज्ञानोबा भोसले, पोलीस निरिक्षक, शिर्डी पोलीस स्टेशन यांना निवासस्थान देणेकामी मान्यता देण्यात आली. त्यासाठी मा.मुंबई उच्च न्यायालयाचे औरंगाबाद खंडपीठाची मान्यता घेणेकामी संस्थान वकीलामार्फत अर्ज सादर करणेत येऊन, मान्यतेनंतर कार्यवाही करणेत यावी, असे ठरले.** (कार्यवाही- अधिक्षक, सामान्य प्रशासन/ विधी अधिकारी)

---

**आयत्या वेळेचा**

**विषय नं.०७** **विश्वस्तांच्या सुचनांबाबत.**

**निर्णय क्र.७०५** मा.विश्वस्तांनी सभेत खालीलप्रमाणे सुचना मांडल्या त्या मान्य करण्यात आल्या-

**(१)** मा.श्री.के.व्ही.रमणी, चेन्नई हे माहिती तंत्रज्ञान क्षेत्रामधील नामांकित व्यक्ती व एक निस्सीम साईभक्त असून त्यांची दि.०६.०९.२००८ रोजीचे सभेतील निर्णय क्र.७३४ अन्वये संस्थानमध्ये राबविले जात असलेल्या साईटेक प्रकल्पाच्या तांत्रिक सल्लागार समितीचे अध्यक्ष म्हणून दि.३०.०९.२०१३ पर्यंत कोणत्याही प्रकारचे मानधन न देता नेमणूक करण्यात आलेली आहे. सदरहू मुदत संपुष्टात येत असून साईटेक प्रकल्पाचे काम अद्याप बाकी असल्याने मा.श्री.के.व्ही.रमणी, अध्यक्ष, तांत्रिक सल्लागार समिती यांना दि.३०.०९.२०१३ पासून पुढे दोन वर्ष मुदतवाढ देणे विचाराधीन आहे.

परंतु विधी व न्याय विभाग, मंत्रालय, मुंबई यांनी दि.२८.०२.२०१३ चे पत्रान्वये "श्री साईबाबा संस्थानने श्री.के.व्ही.रमणी यांची आय.टी. ॲडव्हायझरी कमिटीच्या अध्यक्षपदी नियुक्ती करताना त्यास शासनाची मान्यता घेणे उचित ठरले असते. तथापि संस्थानने शासनाची मान्यता न घेता परस्पर नियुक्ती करण्याचा निर्णय घेतला होता. भविष्यात अशाप्रकारे नियुक्ती करण्यापुर्वी त्यास शासनाची मान्यता घेण्याची दक्षता घेण्यात यावी," असे सुचविले आहे.

मा.श्री.के.व्ही.रमणी, चेन्नई यांची तांत्रिक सल्लागार समितीच्या अध्यक्ष पदाची नवीन नेमणूक नसून त्यांच्या नेमणूकीस मुदतवाढ द्यावयाची आहे. तसेच, या प्रकल्पासाठी वाढीव खर्च येत असल्यास, तांत्रिक वस्तुंच्या मुल्यांकनासाठी आवश्यकतेनुसार स्वतंत्र कन्सल्टंट नेमण्यात यावा.

यास अनुसरुन पुढीलप्रमाणे कार्यवाही करणेत यावी.

मा.श्री.के.व्ही.रमणी, चेन्नई यांची तांत्रिक सल्लागार समितीच्या अध्यक्ष पदाची मुदत दि.३०.०९.२०१३ रोजी संपुष्टात येत असून साईटेक प्रकल्पाचे काम बाकी असल्याने मा.श्री.के.व्ही.रमणी, चेन्नई यांना त्यांची मुदत संपुष्टात येत असलेच्या कालावधीपासून पुढे दोन वर्षाकरिता आहे त्याच अटी/ शर्तीवर मुदतवाढ देण्यात यावी. (कार्यवाही- माहिती तंत्रज्ञान विभागप्रमुख)

---

वरील निर्णय क्र. ६१३ ते ७०५ सर्वानुमते घेण्यात आले.
यानंतर रात्री ०९.०० वाजता सभा समाप्तीची घोषणा करण्यात आली.

| | | |
|---|---|---|
| स्वाक्षरित/- | स्वाक्षरित/- | स्वाक्षरित/- |
| (डॉ.यशवंतराव माने) | (डॉ.संजीवकुमार) | (जयंत कुलकर्णी) |
| कार्यकारी अधिकारी | जिल्हाधिकारी, अहमदनगर | मुख्य जिल्हा न्यायाधीश |
| | सदस्य | अध्यक्ष |

श्री साईबाबा संस्थान विश्वस्त व्यवस्था, शिर्डी

## दि.१७.०९.२०१३ चे सभेतील निर्णयाची नक्कल-

**आयत्या वेळेचा**

**विषय नं.०७** **विश्वस्तांच्या सुचनांबाबत.**

**निर्णय क्र.७०५** मा.विश्वस्तांनी सभेत खालीलप्रमाणे सुचना मांडल्या त्या मान्य करण्यात आल्या-

**(१)** मा.श्री.के.व्ही.रमणी, चेन्नई हे माहिती तंत्रज्ञान क्षेत्रामधील नामांकित व्यक्ती व एक निस्सीम साईभक्त असून त्यांची दि.०६.०९.२००८ रोजीचे सभेतील निर्णय क्र.७३४ अन्वये संस्थानमध्ये राबविले जात असलेल्या साईटेक प्रकल्पाच्या तांत्रिक सल्लागार समितीचे अध्यक्ष म्हणून कोणत्याही प्रकारचे मानधन न देता नेमणूक करण्यात आलेली आहे. त्यांना दिलेल्या नेमणूक आदेशामध्ये दि.३०.०९.२०१३ पर्यंत अध्यक्षपदाची मुदत देण्यात आलेली आहे. सदरहू मुदत संपुष्टात येत असून साईटेक प्रकल्पाचे काम अद्याप बाकी असल्याने मा.श्री.के.व्ही.रमणी, अध्यक्ष, तांत्रिक सल्लागार समिती यांना दि.३०.०९.२०१३ पासून पुढे दोन वर्ष मुदतवाढ देणे विचाराधीन आहे.

परंतु विधी व न्याय विभाग, मंत्रालय, मुंबई यांनी दि.२८.०२.२०१३ चे पत्रान्वये "श्री साईबाबा संस्थानने श्री.के.व्ही.रमणी यांची आय.टी. ॲडव्हायझरी कमिटीच्या अध्यक्षपदी नियुक्ती करताना त्यास शासनाची मान्यता घेणे उचित ठरले असते. तथापि संस्थानने शासनाची मान्यता न घेता परस्पर नियुक्ती करण्याचा निर्णय घेतला होता. भविष्यात अशाप्रकारे नियुक्ती करण्यापुर्वी त्यास शासनाची मान्यता घेण्याची दक्षता घेण्यात यावी," असे सुचविले आहे.

मा.श्री.के.व्ही.रमणी, चेन्नई यांची तांत्रिक सल्लागार समितीच्या अध्यक्ष पदाची नवीन नेमणूक नसून त्यांच्या नेमणूकीस मुदतवाढ द्यावयाची आहे. तसेच, या प्रकल्पासाठी वाढीव खर्च येत असल्यास, तांत्रिक वस्तुंच्या मुल्यांकनासाठी आवश्यकतेनुसार स्वतंत्र कन्सल्टंट नेमण्यात यावा.

यास अनुसरुन पुढीलप्रमाणे कार्यवाही करणेत यावी.

मा.श्री.के.व्ही.रमणी, चेन्नई यांची तांत्रिक सल्लागार समितीच्या अध्यक्ष पदाची मुदत दि.३०.०९.२०१३ रोजी संपुष्टात येत असून साईटेक प्रकल्पाचे काम बाकी असल्याने मा.श्री.के.व्ही.रमणी, चेन्नई यांना त्यांची मुदत संपुष्टात येत असलेच्या कालावधीपासून पुढे दोन वर्षाकरिता आहे त्याच अटी/ शर्तीवर मुदतवाढ देण्यात यावी. (कार्यवाही- माहिती तंत्रज्ञान विभागप्रमुख)

---

**आयत्या वेळेचा**

**विषय नं.०७ विश्वस्तांच्या सुचनांबाबत.**

**निर्णय क्र.७०५** मा.विश्वस्तांनी सभेत खालीलप्रमाणे सुचना मांडल्या त्या मान्य करण्यात आल्या-

**(१)** मा.श्री.के.व्ही.रमणी, चेन्नई हे माहिती तंत्रज्ञान क्षेत्रामधील नामांकित व्यक्ती व एक निस्सीम साईभक्त असून त्यांची दि.०६.०९.२००८ रोजीचे सभेतील निर्णय क्र.७३४ अन्वये संस्थानमध्ये राबविले जात असलेल्या साईटेक प्रकल्पाच्या तांत्रिक सल्लागार समितीचे अध्यक्ष म्हणून कोणत्याही प्रकारचे मानधन न देता नेमणूक करण्यात आलेली आहे. त्यांना दिलेल्या नेमणूक आदेशामध्ये दि.३०.०९.२०१३ पर्यंत अध्यक्षपदाची मुदत देण्यात आलेली आहे. सदरहू मुदत संपुष्टात येत असून साईटेक प्रकल्पाचे काम अद्याप बाकी असल्याने मा.श्री.के.व्ही.रमणी, अध्यक्ष, तांत्रिक सल्लागार समिती यांना दि.३०.०९.२०१३ पासून पुढे दोन वर्ष मुदतवाढ देणे विचाराधीन आहे.

परंतु विधी व न्याय विभाग, मंत्रालय, मुंबई यांनी दि.२८.०२.२०१३ चे पत्रान्वये "श्री साईबाबा संस्थानने श्री.के.व्ही.रमणी यांची आय.टी. ॲडव्हायझरी कमिटीच्या अध्यक्षपदी नियुक्ती करताना त्यास शासनाची मान्यता घेणे उचित ठरले असते. तथापि संस्थानने शासनाची मान्यता न घेता परस्पर नियुक्ती करण्याचा निर्णय घेतला होता. भविष्यात अशाप्रकारे नियुक्ती करण्यापुर्वी त्यास शासनाची मान्यता घेण्याची दक्षता घेण्यात यावी," असे सुचविले आहे.

त्यास अनुसरुन विधी व न्याय विभाग, मंत्रालय मुबई यांचेकडे मुदतवाढीसाठी प्रस्ताव दाखल करुन त्यास मान्यता दिल्यास पुढीलप्रमाणे कार्यवाही करणेत यावी.

मा.श्री.के.व्ही.रमणी, चेन्नई यांची तांत्रिक सल्लागार समितीच्या अध्यक्ष पदाची मुदत दि.३०.०९.२०१३ रोजी संपुष्टात येत असून साईटेक प्रकल्पाचे काम बाकी असल्याने मा.श्री.के.व्ही.रमणी, चेन्नई यांना त्यांची मुदत संपुष्टात येत असलेच्या कालावधीपासून पुढे दोन वर्षाकरिता आहे त्याच अटी/ शर्तीवर मुदतवाढ देण्यात यावी. (कार्यवाही- माहिती तंत्रज्ञान विभागप्रमुख)

---